# नाट्यरूप भारतवर्ष.

लेखक—

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

संपादक 'आनंद,' इंदूर.

किंमत १ रुपया.

[illegible]

# नाट्यरूप भारतवर्ष.

## भाग पहिला

बौद्धकालापासून पेशवाई अखेरीपर्यंत.

लेखकः—

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

संपादक ' आनंद '

प्रकाशकः—गोपाळ बळवंत जोशी,

आनंदकार्यालय, २३३ (अ) सदाशिव पेठ, पुणें.

सन १९१९.

किंमत १ रुपया.

# प्रस्तावना.

मुलांच्या शिक्षणाच्या कामांत अत्यंत महत्त्वाची पण तितकीच कठीण अशी गोष्ट म्हणजे मुलांना शिकण्याची गोडी लावणें ही आहे. ही एकदां लागली म्हणजे शिक्षकाचें पुढचें काम मुलांच्या हातीं योग्य पुस्तकें देऊन त्यांच्या अभिरुचीला योग्य वळण लावणें व त्यांना स्वतः विचार करण्यास शिकविणें येवढें राहतें, व तें विशेषसें कठीण नाहीं. मुलांमध्यें निरनिराळ्या विषयांची अभिरुचि उत्पन्न करण्यासाठीं निरनिराळ्या उपायांचा व साधनांचा उपयोग केला पाहिजे. यांपैकीं इतिहास या विषयाची गोडी लावण्यास तरी नाट्यपद्धतीनें त्या विषयाची मांडणी करणें हा उपाय अमेरिकेंत व आपल्या इकडेहि ज्यांनीं त्याचा थोडाफार अनुभव घेतला आहे अशांच्या मतें श्रेष्ठ आहे. हायस्कुलांत ग्यादरिंगच्या वेळीं ऐतिहासिक नाटकाचा प्रयोग मुलें करून दाखवितात, तेव्हां त्या नाटकाच्या कथानकांत इतिहासाचा जेवढा भाग आलेला असतो तेवढ्याचें मर्म त्यांना चांगल्या रीतीनें कळलेलें असतें असें दिसून येतें. कारण, नाटकांतल्या पात्रांचा अभिनय बिनचूक करतां येण्यासाठीं मुलें पात्रांच्या स्वभावांतल्या खुब्या वगैरे मोठ्या हौसेनें शिक्षकांकडून समजून

घेतात. पण नाटकाचें कथानक खुलविण्यासाठीं इतिहासाला सोडून असलेला बराचसा भाग अशा नाटकांतून घातलेला असल्यामुळें इतिहासाचें शिक्षण देण्याचे कामीं या नाटकांचा उपयोग फारसा करून घेतां येत नाहीं. किंबहुना हल्लींच्या ऐतिहासिक म्हणविणाऱ्या नाटकांच्या प्रयोगदर्शनानें कित्येक वेळां विद्यार्थ्यांच्या समजुतीवर विपरीतहि परिणाम घडतात. लहानपणीं भलतेच ग्रह मनांत एकदा जागा धरून बसले म्हणजे त्यांना तेथून घालविण्यास फारच प्रयास पडतात. यासाठीं मुलांच्याकडून नाट्यप्रयोग करविण्यासाठीं नाटकाची निवड करतांना शिक्षकांनीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे. किंबहुना वरील उद्देश लक्षांत ठेवून मुद्दाम स्वतंत्र पुस्तकेंच त्यासाठीं लिहिलीं पाहिजेत. अशीं पुस्तकें लिहिलीं गेल्यास त्यांचा उपयोग केवळ शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसच न होतां स्त्रिया व सामान्यतः नाटकें-कादंबऱ्या वगैरे वाचून करमणूक करून घेणाऱ्या बहुजनसमाजालाहि होण्यासारखा आहे. हाच विचार प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति माझ्या मनाला होण्यास कारण झाला आहे.

हिंदुस्थानच्या गेल्या दोन अडीच हजार वर्षांच्या इतिहासांतले सुमारें तीस ठळक प्रसंग निवडून काढून ते नाट्याच्या रूपानें अडीचशें पृष्ठांत द्यावे असा माझा पहिल्यानें विचार होता. पण कामाला प्रत्यक्ष सुरुवात केल्यानंतर त्यांतल्या अनेक अडचणी लक्षांत येऊं लागल्या. हिंदुस्थानच्या

संबंध इतिहासाची स्थूल कल्पना तर आली पाहिजे, आणि तिच्याबरोबर नाट्यविषयक प्रसंगांचें महत्त्व योग्य प्रकारें प्रेक्षकांच्या किंवा वाचकांच्या मनावर ठसून त्या प्रसंगांत योजिलेल्या पात्रांच्या भाषणांत त्या पात्रांच्या स्वभावाचें व तत्कालीन एकंदर परिस्थितीचेंहि प्रतिबिंब पडलें पाहिजे, अशा तऱ्हेची रचना करणें व ती पुनः थोडक्या पृष्ठांत आणणें हें काम किती मुष्किलीचें आहे याची खरी कल्पना तसा लेखनप्रयत्न करणारासच करतां येईल. अडीचशें पृष्ठांत हिंदुस्थानचा सबंध इतिहास अशा रीतीनें आणणें ही तर मला अशक्यच गोष्ट वाटली, आणि म्हणून मराठी राज्याची अखेर ही नाट्यरूप भारतवर्षाच्या पहिल्या भागाची कालमर्यादा ठरवून त्या धोरणानें पुढें लिहिण्याचें काम मीं केलें.

अशा प्रकारें सर्व धोरणें संभाळून आणि अनेक प्रकारच्या अडचणींतून वाट काढून अगदीं नवीन प्रकारचें शिक्षणविषयक पुस्तक लिहिण्याचें काम कठीण तर खरेंच; पण त्यापेक्षां शतपटीनें ज्यास्त अडचणी पुढेंच होत्या. या पुस्तकाची रचना एरव्हींच्या नाटकांच्या पुस्तकांच्या रचनेहून अगदीं निराळ्या पद्धतीची; त्या रचनेचे उद्देशहि निराळे; अर्थात् अशा पुस्तकाचा खप कसा व्हावा? तशांत कागद, छपाई, बांधणी वगैरे सर्वच गोष्टींची महागाई; इतका खर्च करून शेवटीं सगळेंच ऑफस झालें तर कसें होणार? ही काळजी मनाला वाटून असें पुस्तक छापण्यास हातीं

घेण्याची हिंमत होईना. तथापि मुलांमध्यें इतिहासवाचनाची गोडी लावण्यास असा कांहीं प्रयत्न अवश्य करून पाहावयास पाहिजे अशी तळमळ मनाला लागली होती व ती मुलांच्या शिक्षणाविषयीं आस्था बाळगणाऱ्या अनेक मित्रांपाशीं मीं बोलूनहि दाखविली होती. तिचा इष्ट परिणाम झाला व ती माझी इच्छा दोघा सज्जनांच्या साह्यानें सफळ होण्याचा योग अकल्पित रीतीनें जुळून आला. तो असा—

१९१७ च्या मार्च महिन्यांत येथें भरलेल्या महाराष्ट्र-साहित्यसंमेलनाचे प्रसंगीं मराठी वाङ्मयाचा उत्कर्ष इच्छिणाऱ्या अनेक सद्गृहस्थांनीं चांगले निबंध वगैरे लिहिण्यासाठीं यथाशक्ति लहान मोठ्या रकमा बक्षिसादाखल देण्याची इच्छा स्वयंस्फूर्तीनें जाहिर केली होती. कित्येकांनीं त्याच वेळीं आपापल्या पसंतीचे विषय सांगितले, व कित्येकांनीं ते मागाहून कळविण्याचें कबूल केलें. यांपैकीं पुढील दोघा सज्जनांना माझी कल्पना फार आवडून त्यांनीं आपापली देणगीची रकम ( प्रत्येकीं ५० रुपये ) या शिक्षणविषयक ग्रंथाच्या प्रकाशनाचे कामीं साह्य म्हणून देण्याची आपली इच्छा कळवून लागलीच ती पाठवूनहि दिली. हे उदार गृहस्थ म्हणजे

**रा. आनंदराव कर्णिक ( इंदूर ).**

**डॉ. कृष्णराव खोचे (प्रतापगड).**

हे होत हें कळविण्यास व प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशन हें पुष्कळ अंशानें त्यांच्याकडून मिळालेल्या उत्तेजनाचेंच फळ होय म्हणून त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यास मला फार आनंद वाटतो.

शेवटीं या पुस्तकरचनेच्या कामीं ज्यांचें मला विशेष साह्य झालें अशा सद्गृहस्थांच्या नांवांचा उल्लेख करून त्यांचे मनःपूर्वक आभार मानल्यावांचून ही प्रस्तावना मला पुरी करतां येत नाहीं. रा. कृष्णाजी लक्ष्मण सोमण ऊर्फ 'किरात' या सुप्रसिद्ध नाट्यलेखकाला माझी कल्पना फार आवडून त्यांनीं सर्व प्रकारें मला प्रोत्साहन दिलें. इतकेंच नाहीं, तर या पुस्तकासाठीं कांहीं प्रसंगहि लिहून दिले हे त्यांचे मजवर मोठे उपकार आहेत. त्याचप्रमाणें मिसेस् फ्लोरा ॲन स्टील यांच्या इंग्रजी पुस्तकाचा व रा. कीर्तने, खाडिलकर, शिरवळकर, भागवत इ० महाराष्ट्रीय नाटककारांच्या मराठी नाटकग्रंथांचा मीं पुष्कळ उपयोग करून घेतला आहे व त्याबद्दल मी सदर लेखकांचा फार ऋणी आहें हेंहि येथें सांगणें अवश्य आहे.

या पुस्तकाच्या छपाईचें काम चालू असतां पुण्यास इन्फ्लुएन्झानें दोन महिने कहर उडविल्यामुळें व दुसऱ्या कांहीं घरगुती अडचणींमुळें पुस्तक प्रसिद्ध होण्यास अजमासापेक्षां पुष्कळ अधिक काळ लागला. तथापि अनेक अडचणींतून पार पडून एकदाचें तें प्रसिद्ध होत आहे यांतच मी समाधान मानतों, व ज्या माझ्या बालमित्रांसाठीं मीं तें लिहिलें आहे त्यांना तें कसें काय आवडलें तें कळण्याची उत्सुकतेनें वाट पाहत असतों.

आनंदमंदिर, इंदूर.<br>
ता. १६।१२।१८.

वासुदेव गोविंद आपटे.

# अनुक्रमणिका.

# देणगीपत्र.

प्रिय ———————————— यास

हें पुस्तक ————————————

निमित्त देणगी म्हणून मी मोठ्या आनंदानें देत आहें. या देणगीचा सदुपयोग त्याच्या हातून होईल अशी मी उमेद बाळगतों.

मुक्काम ————
मिति किंवा तारीख. } ————————

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग पहिला.

### बुद्धाचा गृहत्याग.

**कथानक**—मगध देशांत कापिलवास्तु येथें शुद्धोदन नांवाचा एक शाक्यवंशी राजा राज्य करीत होता. त्याला सिद्धार्थ नांवाचा एकच पुत्र होता. अर्थात् बापाच्या मागें तोच गादीचा वारस होता. शुद्धोदन व त्याची राणी यांची साहजिकच अशी इच्छा होती कीं आपल्या मुलानें राज्याचा, ऐश्वर्यांचा व सुखोपचारांचा यथेच्छ उपभोग घ्यावा. पण सिद्धार्थाला त्या गोष्टीचा मनापासून कंटाळा असे. त्याचें मन अत्यंत कोमल होतें. जगांत जिकडे पाहावें तिकडे दुःख दृष्टीस पडतें; या जगांत स्थिर, शाश्वत असें कांहींच दिसत नाहीं; सगळें कांहीं नाशवंत आहे; असें असून माणसें अज्ञानानें मोह पा-

वतात व धनाची आणि सुखाची इच्छा धरून तीं मिळवि-ण्याचे मार्गे लागतात व त्यामुळें दुःखी होतात. तेव्हां लोकांचें हें अज्ञान घालवून त्यांना शाश्वत सुखाचा मार्ग दाखवावा म्हणून चिंतन करण्यासाठीं एके रात्रीं कोणालाही न कळवितां तो स्त्री, पुत्र व राज्य या सर्वांचा त्याग करून वनांत तपश्चर्येसाठीं चालता झाला व पुष्कळ घोर तपश्चर्या व चिंतन केल्यावर त्याला तो मार्ग अखेर सांपडला. तेव्हांपासून त्याला ' बुद्ध ' म्हणजे ज्ञानी म्हणूं लागले. यानें पुढें जो धर्म स्थापिला त्याला बौद्धधर्म हें नांव मिळालें. या कथेंतला अत्यंत चटकदार भाग म्हणजे बुद्धाचा गृहत्याग या पहिल्या प्रसंगांत आणिला आहे.

# बुद्धाचा गृहत्याग.

**पात्रें.**

सिद्धार्थ ( बुद्ध )–राजा शुद्धोदनाचा पुत्र व भावी धर्म संस्थापक.

देवदत्त—राजकुमार सिद्धार्थ याचा एक आप्त व सोबती.

छंदक—सिद्धाचा सारथी.

## प्रवेश पहिला.

स्थळ—उद्यान.

( देवदत्त आणि छंदक प्रवेश करतात. )

देव०–छंदका, कुमार सिद्धार्थ कुठें आहेत?

छंदक—हिराबागेंत अश्वत्थवृक्षाखालीं बसले आहेत.

देव०–तिथं डोळे मिटून बसले असतील! दैव देतं आणि कर्म नेतं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. आज सिद्धार्थाला काय कमी आहे? संपत्ति, ऐश्वर्य, हत्ती, घोडे, पालख्या, नोकरचाकर, सर्व कांहीं गोष्टींची अनुकूळता आहे. पण त्या सुखांचा उपभोग घेणं नशिबीं पाहिजे ना? एकुलता एक पुत्र व गादीचा वारस असल्यामुळं प्राणापलीकडे जपणारे आणि मुलाची हौस पुरविण्यास उत्सुक असलेले आईबाप, सदैव आज्ञेत तत्पर राहणारे नोकरचाकर, यशोधरेसारखी रूपवती आणि सद्गुणी स्त्री, पतिपत्नीमधलं प्रेमबंधन दृढ कर-

णारं कोमल अर्भक, इतक्या गोष्टी अनुकूळ असल्यावर हा इहलोकच एखाद्याला स्वर्ग वाटेल. पण सिद्धार्थाला त्याचं काय होय! तो आपला नेहमीं उदासचा उदासच! आज सकाळीं शिकार खेळण्यासाठीं मीं सहज एका हरिणाला बाण मारला. त्या हरिणाच्या वेदना पाहून सिद्धार्थाचं मन इतकं कळवळलं कीं तो तेव्हांपासून त्या हरिणाला पोटाशीं धरून बसला आहे! किती हा खुळचटपणा!

छंदक–काय ? कुमार खुळे ? अनाथ, दुर्बल व दुःखपीडित यांच्याविषयीं कळवळा व दया बाळगणें हा तुमच्या दृष्टीनें खुळेपणा आहे एकूण ?

देव०–हो. खुळे–वेडे–अगदीं वेडे! वेड्याला काय आणखी शिंगं असतात ?

छंदक–बरोबर आहे. दीन दुबळ्या प्राण्यांची हिंसा करण्यांत ज्यांना मजा किंबहुना पुरुषार्थ वाटतो, त्यांना भूतदया ज्यांचे ठायीं आहे ते वेडेच दिसणार!

देव०( हंसून )–भूतदया! भूतदया! छंदका, भूतदयेनें कुमार सिद्धार्थाच्या अंगांत बराच भूतसंचार केलेला दिसतो.

छंदक–होय. त्यांचे अंगांत भूतसंचार अन् आपल्या अंगांत राक्षससंचार, असंच कीं नाहीं ?

देव०–मी हरणाचे अंगावर बाण सोडला यांत राक्षससंचार कसा काय झाला तें कळूं दे.

छंदक–अहो, आपली हरणाची शिकार म्हणजे जगांतल्या प्रेमाचा नाश करणाऱ्या आपल्या वृत्तीची मूर्तिमंत साक्ष नव्हे तर काय ?

देव०—अस्सं अस्सं! एकूण कुमाराच्या भूतदयेच्या भूतानं तुलाही पछाडलेलं दिसतं. बरं पण, जाऊं दे. नसता वाद कशाला? हा विषयच आपण सोडून देऊं. काय म्हणालास? कुमार सिद्धार्थ हिराबागेंत अश्वत्थवृक्षाखालीं बसले आहेत? तेथें त्यांच्या भेटीला जाऊन त्यांच्या चिंतनांत व्यत्यय आणणं बरं नाहीं. दुसरे एखादे वेळीं त्यांची भेट घेतां येईल. आतां आपण आपला मित्र श्यामल याच्याकडेस जावं. (छंदकास) छंदका! राजकुमारांना मी भेटीला आलों होतों येवढं कळीव बरं का? ( जातो. )

छंदक–( स्वतःशीं ) उकिरड्यांत लोळणाऱ्या या कोंबड्याला रत्नाची किंमत काय कळणार? खावं, प्यावं, चैन करावी, येवढंच याच्या दृष्टीनं जन्माचं इतिकर्तव्य. स्वतःपुरती याची दृष्टि. कुमार सिद्धार्थ जगांतल्या साऱ्या प्राण्यांच्या दुःखांचा विचार करून अत्यंत कष्टी होतात हें याच्या दृष्टीनं वेडेपणाचं कृत्य ठरलं तर त्यांत नवल काय? देवदत्ताला एकट्याला तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे? आम्ही जगांतलीं बहुतेक सारींच माणसं त्याच्याच वर्गांतलीं आहों. सिद्धार्थासारखा महात्मा एखादा दुसराच. कुमारानीं आज रात्रीं बारा वाजतां रथ सिद्ध ठेवण्यास मला बजावून सांगितलं आहे. अशा अपरात्रीं कुमाराची स्वारी कुठं जाणार आहे कांहीं कळत नाहीं. पण आपण हुकुमाचे नोकर, ज्यास्ती चिकित्सा करा कशाला? हुकुमाप्रमाणं करावं म्हणजे झालं.

( जातो. )

## प्रवेश दुसरा.

स्थळ—यशोधरेचा महाल.

( देवी यशोधरा आपल्या अर्भकाला जवळ घेऊन व त्याच्या डोक्यावर हात ठेवून निजली आहे व तिला गाढ निद्रा लागली आहे. )

**सिद्धार्थ**—छंदका! रथ तयार आहे?

**छंदक**—आज्ञेप्रमाणें रथ तयार ठेविला आहे महाराज!

**सि०**—ठीक आहे तर. जा, तूं रथाजवळ ऐस. मी इतक्यांत तिकडे आलोंच.

**छंदक**—जशी कुमाराची आज्ञा. ( जातो. )

**सिद्धार्थ**—इतके दिवस मनांत योजिलेला हेतु अखेर आज माझे हातून पार पडण्याचा योग आला आहे. गृहत्याग करण्यापूर्वीं यशोधरेची शेवटची भेट घेण्यासाठीं म्हणून मी इथं आलों, पण हिला तर गाढ झोप लागलेली दिसत आहे! हेंही एक प्रकारानं बरंच आहे म्हणायचं! यशोधरे, घटकाभरांत माझी व तुझी ताटातूट व्हावयाची असं तुला अगोदर मीं कळविलं असतं तर हें निद्रासुख अनुभवण्याला तुला मिळालं असतं काय? अन् मलाही तुझ्या मनाला कष्ट देऊन व मायापाश तोडून प्रयाण करणं किती कठीण गेलं असतं! मी आतां आपलं मन अगदीं घट्ट केलं आहे, तरी पण तुझी ही प्रसन्न मुद्रा, हें सात्विक तेज, आणि हे मिट-

लेले कमलनेत्र माझ्या अंतःकरणाला किती जोरानं ओढून घेत आहेत! त्याचप्रमाणं हें सुंदर चिमुकलं अर्भक! लतांना फुटणाऱ्या नव्या पालवीप्रमाणं याचे हात पाय किती कोमल व आरक्त आहेत! ( हलकेच मुलाचा हात आपल्या हातांत घेऊन ) अहाहा! किती मृदु, कोमल आणि शीत याचा स्पर्श आहे हा! याच्या अंगाचा स्पर्श होतांच माझीं गात्रं कशीं थरारतात! अन् मनांत कांहीं निराळेच भाव उत्पन्न होतात. याला उचलून छातीशीं धरावं, व याच्या मुखाचं चुंबन घ्यावं असा मोह उत्पन्न होतो. ( यशोधरेकडे पाहून ) अरे! पण ही हंसली कां बरं? ही जागी तर झाली नाहीं ना? छेः! हिचे डोळे तर मिटलेले दिसताहेत. स्वप्नांत हंसली असेल. अरे वाः! याच वेळीं बाळही पण हंसतं आहे. दोघेही यावेळीं स्वप्नसृष्टींत परस्परांचं चुंबनसुख अनुभवीत तर नसतील? मीही यांच्यासारखा स्वप्नाचा अनुभव घेत असतों तर किती बरं होतं! मी जागा आहें कीं स्वप्नांतच आहें? स्वप्नांतच आहे खास! जागा असतों तर यांच्या दर्शनानं येवढ्या मोहांत पडलों नसतों. स्त्री आणि पुत्र यांच्या प्रेममोहाचीं बंधनं अत्यंत नाजुक व कोमल असलीं तरी तीं तोडण्याला अत्यंत कठीण असतात हेंच खरं. यांच्या पाशांत सांपडलेला मनुष्य मनानं अत्यंत दुर्बळ होतो. यांच्या पाशांत सांपडणं म्हणजे इंद्रियांच्या आधीन होणं, आणि नानाविध लालसा, वासना, व तृष्णा यांच्या कबज्यांत जाण्यासारखं आहे. असा परतंत्र झालेला मनुष्य जन्ममरणाच्या अ-

खंड फिरत्या चक्रांत सांपडून गोते खातच रहायचा! त्याला कुठली आली आहे स्वतःच्या व लोकांच्या उद्धाराची स्मृति! ( ऐकल्यासारखें करून ) काय? 'अनित्यः संसारः' हें वचन इथं कुणीं बरं उच्चारलं? पण इथं तर कुणी दिसत नाहीं. मग मला ते शब्द कसे ऐकूं आले? मी मोहपाशांत गुंतू नये म्हणून माझ्या रक्षकदेवतेनं मला इशारा देण्यासाठीं तर ते माझ्या कानांत उच्चारले नाहींत ना? मी संसारांत राहिलों तर चक्रवर्ती होईन अन् विरक्त झालों तर जगाचा उद्धारकर्ता होईन असं ज्योतिष्यांनीं माझं जातक वर्तिल्याचं बाबा सांगतात. पण चक्रवर्ती होणं म्हणजे काय? या जगांतले सारेच लोक चक्रवर्ती नाहींत काय? भवचक्राच्या फेऱ्यांतून सुटलेले प्राणी कितीसे आहेत? मीही त्यांतलाच एक झालों तर त्यांत काय विशेष आहे? इतर राजांना जिंकून व मांडलिक करून ठेवून त्यांचेवर प्रभुत्व गाजविण्यापेक्षां इंद्रियदमन करून सर्व दुःखांचा नाश करणं आणि जन्ममरणाचं चक्र आपणास हवं तसं फिरविणं हें चक्रवर्तित्व श्रेष्ठप्रतीचं नव्हे काय? ठरलं तर. हें चक्रवर्तित्व आपणास मिळवायचं आहे. 'अनित्यः संसारः' हें वचन कोरलेली चंदनाची पेटी यशोधरेनं माझ्या सांगण्याप्रमाणं आपल्या मंचकासंनिध ठेविली आहे. या पेटींत काय आहे तें तिला ठाऊक नाहीं हेंच बरं. ( पेटी उघडून भगवीं वस्त्रें काढतो. ) आपल्या पुढील कार्याला हींच वस्त्रं योग्य होत. ( अंगावरचीं उंची वस्त्रें व अलंकार काढून ) हे राजभूषणांनो, तुम्हांला हा

सिद्धार्थ अखेरचा नमस्कार करतो. ( भगवीं वस्त्रें धारण करून व पूर्वीचा पोषाख व अलंकार पेटींत ठेवून ) या वस्त्रालंकाराबरोबर मी आपली तृष्णा व वासना यांनाही याच पेटींत कुलुपबंद करून ठेवीत आहें. मनाच्या पेटींतून चंदनाच्या पेटींत! ( हंसून ) हें स्थलांतर कांहीं वावगं नाहीं. ( पेटीकडे पाहून ) अनित्यः संसारः ( स्त्रीपुत्राकडे पाहून व दीर्घ निःश्वास टाकून ) पुनः मोहाचं आकर्षण! छेः छेः! या वेषाला तरी त्याच्या तावडींत जाणं आवडायचं नाहीं. आतां इथं घुटमळतां उपयोगी नाहीं. मायापाश एकदम तोडले तरच तुटतील. ( एकदम पाठ वळवून ) साऱ्या जगाबरोबर तुमचंही कल्याण असो. अनित्यः संसारः, अनित्यः संसारः (असें म्हणत एकेक पाऊल हळूच टाकीत बाहेर पडतो. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग दुसरा.

### आर्यचाणक्य.

**कथानक**–मगध देशांत नंद घराण्यांतले राजे राज्य करीत होते. या घराण्यांतला शेवटचा राजा राज्य करीत असतां चाणक्य नांवाचा एक अतिशय बुद्धिमान्, तेजस्वी, आणि राजनीति उत्तम रीतीनें जाणणारा ब्राह्मण होऊन गेला. राजवाड्यांत या ब्राह्मणाचा कांहीं अपमान झाल्यावरून त्याचा सूड उगविण्याचा निश्चय करून या ब्राह्मणानें चंद्रगुप्त नांवाच्या क्षत्रिय वंशांतल्या एका तरुणास हातीं धरून मोठ्या धाडसानें व युक्तिप्रयुक्तीनें नंद राजाचा नाश केला व प्रतिज्ञेप्रमाणें चंद्रगुप्ताला मगधाच्या गादीवर बसाविलें. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर पूर्वीच्या नंद राजाचा राक्षस नांवाचा मुख्य प्रधान

त्याचा प्रतिस्पर्धी होता तरी त्याच्या अंगचे अप्रतिम गुणांस मान देऊन त्याला चाणक्यानें चंद्रगुप्ताच्या मुख्य प्रधानाचे जागीं नेमिलें, आणि आपण पुनः ब्राह्मणाचें अध्ययन–अध्यापनादि कर्म करण्यासाठीं चालता झाला. या कथेस उद्देशून हा दुसरा प्रसंग आहे.



# आर्यचाणक्य.

—※—

## पात्रें.

**चंद्रगुप्त**—मगध देशचा राजा.

**चाणक्य**—त्याचा मंत्री.

**राक्षस**—नंदराजाचा मंत्री व चाणक्याचा प्रतिस्पर्धी.

**गणदेव**—राजाचा लेखक.

कोतवाल, दूत, व नोकर वगैरे.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—राजवाडा.

( चंद्रगुप्त कोचावर बसून राज्यकारभाराचें काम पाहत आहे. )

**चंद्र०**—काय म्हणतां गणदेव ? कंटाळा आला असला तर काम बंद ठेवावं म्हणून ? छे: छे ! तुमची ही सल्ला अगदीं गैरवाजवी आहे.

**गण०**—माझ्या म्हणण्याचा आशय असा कीं बहुतेक काम आतां उरकलं आहे. थोडं उरलं आहे तें उद्यांवर ठेविलं तर चालेल.

**चंद्र०**—थोडंच उरलं आहेना ? मग तें उद्यावर टाकण्यापेक्षां आतांच थोडी कळ सोसून करणं बरं नाहीं काय ? आणखी असं पहा, जेव्हांचं काम तेव्हां झालंच पाहिजे असा आम्हींच नियम केला आणि तो आम्हींच मोडला तर अ-

धिकारी वर्गाला किती वाईट उदाहरण घालून दिल्यासारखं होईल ? अहो गणदेव, परमेश्वरानं आम्हांला राज्यपद दिलं तें कांहीं प्रजेच्या पैशावर स्वतः चैन करण्यासाठीं नाहीं. कोट्यवधि लोकांचं सुखदुःख आमच्यावर अवलंबून आहे. ही जबाबदारी केवढी आहे याचा कांहीं विचार करा. राजा हा प्रजेचा मालक नसून सेवक आहे. तुम्हीं सेवकांनीं आपल्या कामांत टंगळ मंगळ केली तर आमच्या रोषास पात्र होतां कीं नाहीं ? तसेच आम्ही आमच्यावर परमेश्वरानें सोपविलेल्या कामांत हयगय केली तर त्याबद्दल आम्हांला आमच्या मालकाजवळ—परमेश्वराजवळ—जाब द्यावा लागेल. कंटाळा विंटाळा मानून कसं चालेल ? कंटाळा येवो कीं कांहीं ही होवो, नेमलेलं काम वेळच्या वेळीं झालंच पाहिजे. निरनिराळ्या खात्यावरील अधिकाऱ्यांकडून आलेल्या वर्द्या वाचा.

**गणदेव**—जशी महाराजांची आज्ञा. ( कागद चाळून वाचतो. ) युद्धमंत्री सेवेसीं निवेदन करतात कीं बाजारबुणगें सोडून नुसती चतुरंग सेना सात लक्ष आज तयार आहे. भुईकोट, व डोंगरी किल्ले दुरुस्त आहेत. सुवर्णगडाच्या तटबंदीचं काम पुरं झालं आहे.

**चंद्र०**—ठीक. नौकाविभागाचे मंत्री काय लिहितात ?

**गण०**—( कागद काढून ) त्यांची वर्दी अद्याप आली नाहीं.

**चंद्र०**—कां बरं ? वर्दी वेळेवर न येण्याचं कारण त्यांना विचारा, आणि पुनः अशी दिरंगाई अविच्छिन्न कामास येणार नाहीं असं ताकीदीनं लिहा.

**गण०**–वाणिज्य–व्यवसाय खात्याचे मंत्री लिहितात कीं सरकारनें परदेशी आयात मालावरची जकात वाढविल्यामुळं आपल्या देशी व्यापाराला तेजी आली आहे. व्यापारी व कारखानदार लोकांना संतोष वाटत आहे, आणि देशी माल चांगला निघूं लागला आहे.

**चंद्र०**–फार संतोषाची गोष्ट! पण काय हो गणदेव, मजूर व कारखानदार यांच्यांत वेतनासंबंधानं वाद उपस्थित होऊन मजुरांनीं संप केल्याची खबर गेल्या आठवड्यांत आली होती. त्या प्रकरणाचं पुढं काय झालं?

**गण०**–आजच्या वर्दींत वाणिज्यमंत्री त्याचा खुलासा करीत आहेत. गांवच्या महाजनांच्या मध्यस्थीनं वादाचा निकाल दोन्ही पक्षांस समाधानकारक अशा रीतीनं लागून संप मोडला व मजूर लोक पुनः कामावर जाऊं लागले असें मंत्री निवेदन करतात.

**चंद्र०**–फार उत्तम गोष्ट. मध्यस्थी करणाऱ्या महाजनांचं नांव विचारा, आणि विजयादशमीच्या दरबाराचे वेळीं त्यांचा सन्मान करण्याविषयींची मला आठवण देण्यासाठीं स्मरणवहींत ही गोष्ट लिहून ठेवा.

**गण०**–निधिनिक्षेप खात्याचे अधिकारी लिहितात कीं व्यापारानिमित्त आलेल्या एका पारसिक लक्षाधीशास एकाएकीं वाख्याचा उपद्रव होऊन देवाज्ञा झाली. त्याच्या जिंदगीची मोजदाद करून पंधरा लक्ष होनांची रक्कम खजिन्यांत जमा करण्यांत आली आहे.

चंद्र०—त्यांना लिहा कीं सदर व्यापाऱ्याच्या मूळ ठिकाणाचा शोध करून तेथें त्याचे जे कोणी वारस असतील त्यांचा शक्य तितक्या त्वरेनं पत्ता लावून त्यांना इकडे बोलावून घ्या व ते आले म्हणजे इकडे वर्दी द्या.

गणदेव—जशी महाराजांची आज्ञा ( टिपून घेतो. )

चंद्र०—पारसिक व्यापारी वाख्याचा उपद्रव होऊन मेला असं तुम्हीं आतां वाचिलं, नाहीं काय? पण आपल्या नगरींत वाख्याचा उपद्रव चालू आहे अशी वर्दी आरोग्यखात्याकडून आलेली आहे काय ?

गण०—( कागद पाहून ) होय. आजच्याच वर्दींत त्याबद्दलचा खुलासा आहे कीं पाटलीपुत्र नगरींत वाख्याची साथ नसतां एकाएकीं हा व्यापारी कसा मेला याची पूसतपास करतां असं दिसून आलं कीं मयतानं दोन दिवस अगोदर त्याच्या देशाहून घरच्या मंडळीनं पाठविलेली मिठाई खाल्ली होती. ती कदाचित् दूषित असेल.

चंद्र०—पाटलीपुत्र नगरींत वाख्याच्या साथीचे वेळीं कोणकोणती सावधगिरी ठेविली पाहिजे याविषयीं नगरवासी लोकांना सावध करण्याबद्दलचा हुकुम त्या खात्याला लिहा. बरं पुढं ?

गण०—या पुढं जन्ममृत्यूची नोंद करण्याबद्दलच्या हुकुमाची अमान्यता केल्याबद्दल किती जणांवर खटले करण्यांत आले व त्यांना किती शिक्षा दिल्या त्याबद्दलचं पत्रक दिलं आहे.

चंद्र०—ठीक. आणखी कोण कोणाच्या वर्द्या आल्या आहेत?

**गण०**–सगळ्या खात्यांकडून आल्या आहेत; पण त्यांत निवेदन करण्यासारखं विशेष असं कांहीं नाहीं. सगळं यथास्थित चाललं आहे असाच मजकूर आहे.

**चंद्र०**–तुमचं काम आटोपलं एकूण. ठीक आहे. तुम्ही सर्व जण आतां जा.

( गणदेव व सगळे नोकर जातात. )

**चंद्र०**–( स्वगत ) ठीक ठीक. एकूण राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे हें ऐकून मोठं समाधान वाटतं. हे सगळे आर्य चाणक्याचे उपकार आहेत. आज या राज्याचा जो येवढा विस्तार झालेला दिसत आहे, आणि कारभार यंत्रासारखा सुरळीत चालून प्रजेच्या चर्येवर शांतता, सुख व समाधान यांचं तेज चमकलेलं दिसत आहे त्याचं सगळं श्रेय त्या महात्म्याकडे आहे. फार काय, पण मला हें राज्यपद मिळालं तें सुद्धां त्यांनीं मला हातीं धरल्यामुळं, ही गोष्ट मी आमरण विसरणार नाहीं.

( दूत येतो. )

**दूत**–आर्य चाणक्य दर्शनासाठीं आले आहेत.

**चंद्र०**–जा त्यांना लवकर घेऊन ये. ( जातो )

( चाणक्य येतो )

**चंद्र०**–यावें, मंत्रिराज बसावें. मी आतांच आपली आठवण केली होती.

**चाण०**–कां बरें ? कांहीं संकट बिंकट आलें आहे कीं काय ?

चंद्र०—छे, छेः! आतां संकटाचें नांव सुद्धां ऐकूं यावयाचें नाहीं. श्रीरामचंद्राचें नांव ऐकतांच जशीं भुतें पळतात, किंवा सूर्यकिरणांचें आगमन होतांच जशीं दिवाभितें आपलीं तोंडें लपवून बसतात, तसें आपल्या नांवाच्या नुसत्या श्रवणानेंच सारीं संकटें एकदम लय पावतात.

चाण०—राजा, या भरवशावर राहूं नकोस. अरे, राज्यपद हें नेह्मीं संकटाकीर्णच असावयाचें. त्यासाठीं किती कारस्थानें आणि मसलती चालतात व त्यांचा बारीक शोध ठेवून नायनाट करण्यासाठीं कशा युक्त्या कराव्या लागतात याचा अनुभव तुला आहेच. फार लांब कशाला? गतवर्षींचीच गोष्ट घे. तूं आपल्या क्रीडोद्यानांतल्या महालांत रहाण्याचा विचार केला होतास. तूं तेथें जाण्याच्या अगोदर मी स्वतः जाऊन ती जागा पाहून आलों. तों भिंतींतल्या फटींतून मुंग्यांची रांग चालतांना दिसली. मीं मनाशीं विचार केला कीं येथें खाण्यापिण्याचे जिनस नसतां मुंग्या दिसताहेत, तेव्हां खास येथें कांहीं तरी दगा आहे. महालाखालीं भुयार खणून त्यांत दुष्ट लोकांनीं वस्ती केली असली पाहिजे. म्हणून मी त्या महालाला एकदम आग लावून दिली; आणि त्या दिवसापासून भग्नदंत, क्रौंच, विमारक वगैरे तुझ्या कट्टया शत्रूंचें नांवसुद्धां ऐकूं येई नासें झालें. ते खास त्या भुयारांत जळून मेले असले पाहिजेत. जोंपर्यंत नंदाचा मंत्री राक्षस जिवंत आहे तोंपर्यंत तुझ्या जिवाविरुद्ध अशीं खलबतें चालावयाचींच.

चंद्र०—मग त्या राक्षसाचाच नाश आपण कां करीत नाहीं ?

चाण०—( हंसून ) तें धोरण निराळेंच आहे. तुझ्या लक्षांत नाहीं यावयाचें. अरे, राक्षसाला मारून टाकणें काय कठीण आहे ? तेव्हांच करतां येईल. पण त्याला नाहींसा करून टाकण्यापेक्षां त्याला आपल्या बाजूला वळवून घेण्यांतच आपलें अधिक हित आहे. त्यासाठींच तर त्याच्या अत्यंत जिवलग स्नेह्याला मी सुळावर लोंबकळत ठेविलें आहे. मित्राला सोडून त्याला जातां येऊं नये, आणि मित्राच्या जिवासाठीं तरी त्यानें आपल्याविरुद्ध खटपटी करूं नयेत यासाठीं युक्ति आहे. मी आज राक्षसाला तुझ्या दर्शनाला बोलाविलें आहें. तो इतक्यांत येईल.

( दूत येतो. )

दूत—महाराज, मंत्रिवर राक्षसाची स्वारी आर्यांच्या आज्ञेवरून स्वामिदर्शनाला आली आहे.

चंद्र०—जा, त्यांना आंत घेऊन ये.

( दूत जातो व राक्षसाला घेऊन येतो. )

राक्षस—( स्वगत ) चंद्रगुप्ताजवळ बसलेला हा ब्राह्मण चाणक्यच असला पाहिजे. त्याची तेजस्वी मुद्रा, तीक्ष्ण दृष्टि, आणि अपूर्व बुद्धिमत्ता दर्शविणारा विस्तीर्ण भालप्रदेश हीं लक्षणें याच्याशीं बरोबर जुळतात. हा माझा प्रतिस्पर्धी खरा, पण अलौकिक पुरुष आहे हें कबूल केलें पाहिजे.

**चाणक्य**–( सामोरा जाऊन ) यावें मंत्रिराज, यावें. आपणास मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे आणि तो हा कीं तुमचा मित्र चंदनदास याचा जीव तुम्हांला प्यार वाटतो कीं नाहीं?

**राक्षस**––हें काय विचारावें ?

**चाणक्य**–तर मग त्याच्या प्राणरक्षणासाठीं तुम्ही काय करण्यास तयार आहां ?

**राक्षस**––माझ्या मित्राच्या प्राणरक्षणासाठीं हवी ती गोष्ट करण्यास मी तयार होईन.

**चाणक्य**–( हंसून ) पण तुम्हांला मोकळे सोडून ती कोण करूं देईल ? स्पष्टच विचारतों कीं ही हातची तलवार खालीं ठेवून आणि महाराज चंद्रगुप्त यांच्याशीं विरोध करण्याचें सोडून त्यांचें मंत्रिपद स्वीकारण्यास तुमची तयारी आहे काय ?

**राक्षस**––क्षमा करा; जें मंत्रिपद आपल्यासारख्या राजकार्यधुरंधर पुरुषानें सुशोभित केलें त्या पदाला मी अल्पमति अगदीं अपात्र आहें.

**चाणक्य**––पात्रापात्रतेचा विचार करणें हें आमचें काम आहे. तुम्ही मंत्रिपद स्वीकारल्याशिवाय तुमच्या मित्राचे प्राण वाचत नाहींत असें खास समजूनच उत्तर द्या.

**राक्षस**––( अंमळ विचार करून ) जशी महाराजांची आज्ञा. हा दास सेवेला तयार आहे.

**कोतवाल** ( चाणक्यास )—चंदनदासाविषयीं अखेरचा हुकूम होण्याची वाट पाहत आहों.

**चाणक्य**—( हंसून ) आतां मंत्रिवर राक्षसच हुकूम देतील. मी आतां पुनश्च वेदपाठक ब्राह्मण—

**राक्षस**—छेः छेः ! आपण मला वेळोवेळीं सल्लामसलत देण्यास राहिलां तरच हा राज्यकारभाराचा गाडा सुरळीतपणें मला वाहून नेतां येईल. नाहीं तर माझी काय शक्ति आहे?

**चाणक्य**—अरे जा, राजमुद्रा घेऊन ये. चंदनदासाला त्याच्या अपराधाची क्षमा केल्याबद्दलच्या या हुकुमावर मंत्रिवर राक्षसाच्या हातूनच शिक्कामोर्तब झालें पाहिजे.

**राक्षस**—आर्या, धन्य आहे तुमच्या कर्तृत्वाची ! तुम्ही शहाणपणाच्याच जोरावर प्रतिपक्षाला जिंकलें, आणि शहाणपणाच्याच जोरावर हें राज्य यावच्चंद्रदिवाकरौ अबाधित राहील.

**सर्व**—तथास्तु.    ( पडदा पडतो.)

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग तिसरा.

### चंडाशोक व धर्माशोक.

**कथानक**—मागील प्रसंगांत सांगितलेला मगधदेशाचा राजा चंद्रगुप्त मरण पावल्यावर त्याचा मुलगा बिंबिसार मगधाच्या गादीवर बसला. बिंबिसाराच्या मागून त्याचा मुलगा अशोक हा इ. स. पूर्वी २७२ व्या वर्षी गादीवर बसला व तेथून ३७ वर्षे त्यानें राज्य केलें. असें सांगतात कीं अशोक पहिल्यानें अतिशय उग्र स्वभावाचा व क्रूर होता. म्हणून लोक त्याला चंड ( उग्र ) अशोक म्हणत. पण बौद्ध भिक्षु ( संन्यासी ) आचार्य उपगुप्त याच्या उपदेशानें त्याचा स्वभाव अगदीं पालटला व तो इतका धर्मशील बनला कीं तेच लोक त्याला धर्माचा अवतार समजून ' धर्माशोक ' म्हणू लागले. त्याच्या स्वभावांत झालेला हा पालट हाच पुढील प्रसंगाचा विषय आहे.

# चंडाशोक व धर्माशोक.

—⊱:*:⊰—

## पात्रें.

**अशोक**—मगध देशचा राजा.
**राधागुप्त**—त्याचा प्रधान.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—राधागुप्ताचा वाडा.

**राधा०** ( सचिंत )–दैवगति विचित्र म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. नाहीं तर आज या मगधदेशच्या प्रजेच्या नशिबीं वाघाहूनही क्रूर आणि दगडाहूनही कठोर अंतःकरणाच्या राजाच्या शासनाखालीं रहाण्याचा प्रसंग कां आला असता ? आमचे अशोक महाराज–पण छेः त्यांचें नांवसुद्धां उच्चारण्यास भय वाटतें–परवा त्यांच्या राण्या बागेंत क्रीडा करीत असतां अशोकवृक्षाच्या फांद्या खालीं फार लोंबल्या आहेत त्या तोडल्या पाहिजेत असें सहज कोठें म्हणाल्या; पण महाराजांनीं ते शब्द आपणाकडे लावून घेऊन त्या राण्यांचा कडेलोट केला ! सुमन, वीताशोक, तिष्य हे महाराजांचे सावत्र बंधुच ना? पण त्या सर्वांची त्यांनीं कत्तल केली ! माणसाचें डोकें कापणें ही गोष्ट भाजीचे देंख तोडण्याइतकी त्यांना क्षुद्र वाटते ! मतलबी व खुशामती लोक पो-

टाची खळी भरण्यासाठीं राजाच्या मनाचा कल पाहून त्याप्रमाणें कसे वागतात, आणि त्याच्या दुष्टपणाच्या व नीच कृतीला कसे उत्तेजन देतात हें पहावयाचें असेल तर तें आमच्या येथल्या दरबारांत फार चांगलें पाहण्यास मिळेल. आपण ऐश्वर्यानें, बलानें, व अधिकारानें इंद्राची बरोबरी करणारे आहों असें महाराजांचें तोंडून कोठें एकदां निघाल्याबरोबर ' पण आपल्या येथें अपराध्यांच्या शासनार्थ नरकलोक नाहीं, तेवढी उणीव दूर झाली पाहिजे ' असें एकानें सुचविलें. त्याबरोबर झाला हुकुम कीं मनुष्याला यातना करणाऱ्या सगळ्या यंत्रांसह नरकाची स्थापना झाली पाहिजे. झाला नरक तयार! आणि त्यांत राजाच्या केवळ विनोदाखातर रोज कित्येक मनुष्यप्राणी रोज तडफडा मरत आहेत! त्यांच्या बायकापोरांचे किती शाप रोज महाराजांना मिळत असतील तें एक परमेश्वर जाणे! खरोखर शक्तीपुढें शहाणपण चालत नाहीं. अशा राजाची प्रधानकी म्हणजे सुळावरची पोळी आहे. इतकेंच नाहीं, तर पुढच्या जन्मासाठीं महत्पातकांची रास करून ठेवणें आहे. पण इलाज काय? खाल्लें तर बाधतें, टाकिलें तर शापतें अशी चमत्कारिक स्थिति झाली आहे. कलिंग राजाकडे अन्यायानें खंडणीची भलतीच रकम मागितली आणि त्यानें ती दिली नाहीं म्हणून त्याच्यावर स्वारी केली. त्याच्याशीं झालेल्या लढाईत कीडमुंग्यांसारखीं माणसें मेलीं! त्या गोष्टीची नुसती आठवण काढली कीं अंगावर शहारा येतो! आणि वाटतें कीं अशा राजाची प्रधानकी करून पापाचे वाटे-

करी होण्यापेक्षां आत्महत्या करून घेऊन या जाचांतून एक-दाचें मोकळें व्हावें. पण शास्त्रांनीं आत्महत्या हें घोर पातक ठरविलें आहे म्हणून पुनः विचार येऊन पडतो. असो. कर्म आपलें म्हणावें. दुसरें काय?

( इतक्यांत राजदूत येतो. )

**राज०** ( मुजरा करून व हात जोडून )—महाराजांनीं आपणास बोलाविलें आहे.

**राधा०**—बरें आहे. आलोंच म्हणून सांग. (दूत जातो)

**राधा०** ( सुसकारा टाकून )—हें राजाचें बोलावणें कसलें? कोणाला तरी यमधर्माचें बोलावणें आहे खास. पण काय करणार? गेलें पाहिजे. महाराजांना ताळ्यावर आणण्यासाठीं मीं आतांपर्यंत नाना तऱ्हेचे उपाय करून पाहिले, पण व्यर्थ. आचार्य उपगुत नांवाच्या सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षूला मीं येवढ्यासाठीं मुद्दाम आणवून त्यांची व महाराजांची गांठ मोठ्या प्रयासानें घालून दिली. त्याला आज चार दिवस झाले. त्यांच्या उपदेशाचा यत्किंचित् जरी परिणाम महाराजांच्या मनावर झाला तरी मोठें कार्य होईल. पण हें होईल तेव्हां खरें. तोंपर्यंत या मगधाच्या नशिबीं काय काय पाहणें आहे कुणास ठाऊक?

(जातो.)

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—राजवाडा.

( अशोक उद्विग्न होऊन बसला आहे. प्रधान राधागुप्त जवळ आहे. )

**अशोक**—मंत्रिवर, आज तुम्हांला मी इतक्या घाईनें कां बोलाविलें तें माझ्या आतांपर्यंतच्या भाषणावरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल. आचार्य उपगुप्तांच्या उपदेशानें माझ्या डोक्यांत पूर्ण प्रकाश पडला आहे. माझें सगळें स्वरूप पालटलें आहे. चण्डाशोकाचा अवतार संपला आणि येथून नव्याच अशोकाची कारकीर्द सुरू झाली असेंच कां समजाना? मला जें दिव्य ज्ञान देऊन आचार्यांनीं कृतार्थ केलें आहे त्या ज्ञानाचा प्रसार माझ्या राज्यांत आणि माझ्या राज्याबाहेरही सर्वत्र व्हावा अशी तळमळ माझ्या मनाला लागून राहिली आहे. त्यासाठीं सर्वांना दिसतील अशा ठिकाठिकाणीं स्तंभ उभारून त्यांवर नीतिपर उपदेश खोदण्याचा, वाटसरूंच्या वाटेवर त्यांचें लक्ष जाईल अशा जागीं धर्मवचनें खडकावर ठळक अक्षरांनीं कोरून ठेवण्याचा, देशोदेशीं धर्मप्रचारक पाठवून बौद्धधर्माचा प्रसार करण्याचा, जागजागीं भगवान् गोतमबुद्ध यांच्या स्मरणार्थ स्तूप बांधण्याचा, व भिक्षु आणि भिक्षुणी यांना राहण्यासाठीं विहार बांधण्याचा विचार मीं केला आहे. बुद्धधर्म स्त्री आणि पुरुष, ब्राह्मण आणि शूद्र यांच्यामध्यें भेद न ठेवतां सर्वांना सत्कृत्यांच्या द्वारें मोक्षप्राप्ति करून

घेण्याचा मार्ग खुला करून ठेवीत आहे हें सर्वांना जाहिर झालें पाहिजे. कठोर आत्मत्याग व परोपकार हींच मोक्षप्राप्तीचीं साधनें आहेत हें माझ्या प्रजेला कळून तीं प्राप्त करून घेण्याची इच्छा तिला होईल असा हरएक उपाय करणें हें माझें कर्तव्य आहे. अतःपर माझ्या राज्यांत कोठेंही हिंसा होऊं नये. सर्व भूतांचे ठायीं दयादृष्टि राहील अशी तजवीज करून मी इतर राजांना व प्रजेला उत्कृष्ट आचरणाचें उदाहरण घालून दिलें पाहिजे. जसे माणसांसाठीं तसे मुक्या पशुपक्ष्यांसाठींही दवाखाने घातले पाहिजेत. सरकारी खजिन्यांतला पैसा इतःपर लढायांत खर्च न होतां शांतता स्थापन करण्याकडे, लोकांत धर्माची जागृति करण्याकडे, व दानधर्माच्या कृत्यांत खर्च होईल अशी तजवीज करा. धर्म हें राज्यकारभारांतलें एक मुख्य खातें करा. केवळ देहरक्षणापुरतें अन्न व भिक्षुवेषाचीं वस्त्रें यांना लागेल इतका पैसा मी स्वतःकरितां ठेवून बाकीचा पैसा प्रजेच्या ऐहिक व शाश्वत कल्याणाकडे लावण्याचा निश्चय केला आहे. हा माझा निश्चय पार पाडण्याचे कामीं तुमची मुख्य मदत मला झाली पाहिजे. मागच्या गोष्टी आतां सगळ्या विसरा, आणि या नवीन आखून दिलेल्या धोरणानें पुढें चाला.

राधा० ( स्वगत )—हें मी काय ऐकतों आहें! मी स्वप्नांत तर नाहींना? अथवा शंका कशाला पाहिजे? दयाघन प्रभूचीच ही सारी कृपा आहे! प्रभूची लीला अगाध आहे! ( उघड ) महाराज, सूर्याच्या प्रखर किरणांनीं संतप्त

झालेल्या जमिनीवर जशी एकाएकीं जलवृष्टि होऊन ती भूमि तृप्त व्हावी, तशी त्रस्त झालेल्या प्रजाजनांचें चिरकाल कल्याण करून त्यांना तृप्त करणारी महाराजांची ही आतांची आज्ञा आहे. यापुढें महाराजांना ' धर्माशोक ' ह्याच नांवानें सारी दुनिया ओळखत राहील आणि इतिहासांतही आपली कीर्ति अजरामर होऊन बसेल. प्रभूच्या आज्ञेप्रमाणें सगळ्या गोष्टी यथास्थित घडून येतील अशी मी तजवीज करतों.

**अशोक**—ठीक आहे. आतां मीही आचार्यांच्या दर्शनाला जातों. ( जातात. )




# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग चौथा.

### दगडाची साक्ष.

कथानक—अशोकराजाच्या मृत्यूपासून तों मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या तेथपर्यंतचा मध्यंतरीचा हजार बाराशें वर्षांचा काळ फार धामधुमीचा गेला. या काळांत हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक घडामोडी झाल्या; अनेक जुनीं राजघराणीं लयाला गेलीं व नवीं उदयाला आलीं. या काळांत अनेक परदेशीय लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून राज्यें मिळविलीं. या काळांत कांहीं फार थोर राजे होऊन गेले, व त्यांनीं विद्वानांना आश्रय दिल्यामुळें विद्येचा उत्कर्ष झाला; व्यापार वाढला; लोक सधन झाले; राजेलोकांचीही मिजास त्याबरोबर वाढली. या वेळच्या

राजकीय घडामोडीची व सामान्यतः एकंदर स्थितीची कल्पना आणून देण्यासाठीं हा कल्पित प्रसंग योजावा लागला आहे. यांत जातां जातां त्या काळच्या स्थितीसंबंधानें व सामान्यतः आमच्या देशी राजांच्या व राज्यपद्धतीच्यासंबंधानें परदेशी इतिहासकार जे आक्षेप घेतात त्यांनाही उत्तर देण्याचा यत्न केला आहे.



# दगडाची साक्ष.

### पात्रें.

**अशोकस्तंभ**—एक निर्जीव पाषाणस्तंभ.

**हरिपंत**—एक सुखवस्तु गृहस्थ.

**गणू**—हरिपंताचा बुद्धिमान् व चुणचुणीत मुलगा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—अजबखान्याचा एक भाग. येथें प्राचीन ऐतिहासिक इमारतींचे दगड, शिलालेख, मूर्ति वगैरे ठेविल्या आहेत.

( हरिपंत व त्यांचा मुलगा गणू प्रवेश करतात. )

**गणू**—बाबा, येथें कांहीं पाहण्यासारखें दिसत नाहीं. येथें सगळे दगड, आणि दगडांच्या फुटक्या तुटक्या मूर्तिच ठेवलेल्या दिसतात. हे दगड आणि या मूर्ति हो येथें कशाला ठेविल्या आहेत?

**हरि०**—हे दगड खरे; पण हे असे तसे दगड नाहींत. आपल्या देशाच्या प्राचीन वैभवाची, कलाकौशल्याची व प्राचीन इतिहासाची साक्ष देणारे हे दगड आहेत, समजलास? यांतले कांहीं दगड दोन अडीच हजार वर्षांइतके जुने आहेत. आपल्या देशांत प्राचीनकाळीं होऊन गेलेलीं अनेक राजघराणीं व राज्यांच्या घडामोडी त्यांनीं पाहिल्या आहेत.

यांना वाचा असती तर यांनीं आपल्या देशाचा सगळा जुना इत्थंभूत इतिहास तुला सांगितला असता.

**गणू**--खरेंच कांहो बाबा, हे दगड इतके जुने आहेत? मला जुन्याकाळच्या गोष्टी फार ऐकाव्याशा वाटतात. आपले बंडूनाना पेशवाईतल्या गोष्टी सांगतात त्या कशा मी घटकांच्या घटका त्यांचेजवळ बसून ऐकतों. या दगडांना तशा गोष्टी सांगतां येत्या तर मी येथून हललों सुद्धां नसतों.

**हरि०** ( थट्टेनें )--तो पहा कोपऱ्यांतला अशोकस्तंभ तुझ्याशीं बोलूं इच्छितो आहे. ऐकतोस कां तूं त्याची गोष्ट?

**गणू**--हो. हो. मोठ्या आनंदानें ऐकेन.

( स्तंभ बोलूं लागतो. )

**स्तंभ**--रावसाहेब म्हणाले तें कांहीं खोटें नाहीं. मीं हिंदुस्थानांत गेल्या दोन हजार वर्षांत घडलेल्या अनेक गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. पण त्या सांगायच्या कोणाला? हा अजबखाना पाहायला रोज शेंकडों लोक येतात; पण या दालनाच्या उंबरठ्याच्या आंत पाऊलसुद्धां कोणी ठेवीत नाहीं. म्हणून आम्हीही मुक्याचें व्रत घेऊन बसलों आहों. जुन्या इतिहासांतल्या गोष्टी ऐकण्याची तुझी उत्सुकता दिसली म्हणून मी किती तरी वर्षांनीं आज तोंड उघडीत आहें. तुझी ही उत्सुकता पाहून मला फार संतोष होतो. तूं अशोक राजाचें नांव कधीं ऐकलें आहेस काय?

**गणू**--होय. तो फार जुन्या काळांत होऊन गेला. तो आरंभीं फार दुष्ट होता, पण मागाहून तितकाच मोठा ध-

र्मात्मा झाला व त्यानें प्रजेला बौद्धधर्माचा व नीतीचा उपदेश करण्यासाठीं देशोदेशीं धर्मोपदेशक पाठविले, लेख कोरलेले स्तंभ उभारले, अन् खडकावर उपदेश कोरून ठेविले येवढें मी त्याच्या चरित्रांत वाचलें आहे. पुढचें मला कांहीं माहित नाहीं.

**स्तंभ**—अरे वा:! तुला जुन्या इतिहासाची बरीच माहिती दिसते. अशोकासंबंधाची तुझी माहिती बरोबर आहे. त्याच्या पुढची मी सांगतों. अशोकाच्या मागें त्याच्या घराण्यांत तसा मोठा राजा कोणी झाला नाहीं. शेवटचा राजा होता त्याला दगलबाजीनें मारून त्याचा सेनापति पुष्पमित्र यानें त्याचें राज्य बळकावलें. पण जसें द्यावें तसें घ्यावें हा ईश्वराच्या घरचा न्याय आहे. त्याप्रमाणें पुष्पमित्राच्या वंशजाशीं दगलबाजी करून वासुदेव नांवाचा एक ब्राह्मण प्रधान तें राज्य बळकावून बसला, पण त्यालाही तें पचलें नाहीं, आणि दक्षिणेंतल्या आंध्र राजांनीं त्यालाही हुसकावून लाविलें. पुढें सिथियन नांवाच्या परदेशीय लोकांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली. या सिथियन राजांत कनिष्क हा मोठा राजा होऊन गेला.

**गणू**—बौद्ध धर्माच्या इतिहासांत ज्याचें नांव आलें आहे तोच हा कनिष्क काय?

**स्तंभ**—होय. तोच हा कनिष्क. यानें बौद्धधर्माचा प्रसार चीन, सैबीरिया वगैरे देशांतून पुष्कळ केला. कालांतरानें आंध्र व सीथियन राजांचाही नाश होऊन गुप्त घराण्यांतले

राजे राज्य करूं लागले. यांनीं संस्कृत विद्येला चांगलें उत्तेजन दिलें. या गुप्त घराण्यांत समुद्रगुप्त हा मोठा राजा झाला. त्याचाच मुलगा यशोवर्मा अथवा विक्रमादित्य. हा शककर्ता झाला. विद्वानांना याचा मोठा आश्रय होता. कालीदास, भारवी, शबरस्वामी वगैरे मोठाले संस्कृत पंडित याच गुप्त राजांच्या वेळीं झाले.

गणू—कालीदासाचें शाकुंतल नाटक मीं मराठींत पाहिलें आहे. किर्लोस्कर कंपनी तें करीत असतें. मला तें नाटक फार आवडतें.

स्तंभ—गुप्तराजांचे वेळीं हूण लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या. पण त्यांचाही पराभव करून त्यांना हाकून लावणारे कांहीं राजे हिंदुस्थानांत निघाले. तथापि गुप्त घराणें लवकरच लयाला गेलें; आणि त्याचा शेवट करणारा प्रसिद्ध राजा म्हणजे श्रीहर्षवर्धन अथवा श्रीहर्ष हा होता. हा दर पांचवे वर्षीं मोठा उत्सव करून त्यावेळीं आपली सगळी संपत्ति गरिबांकडून लुटवीत असे. हा विद्वानांना आश्रय देत असे; इतकेंच नाहीं, तर स्वतःही चांगला विद्वान् ग्रंथकार होता. प्रसिद्ध कादंबरी ग्रंथाचा कर्ता बाणभट्ट याच्याच पदरीं होता.

गणू—बाणाची कादंबरी मीं मराठींत वाचली आहे. तींत फार बहारीचीं वर्णनें आहेत. देवलांचें शापसंभ्रम नाटक या कादंबरीच्याच कथेवर रचिलेलें आहे.

५

स्तंभ—काय सांगूं मुला! अशोक, कनिष्क, विक्रमादित्य, श्रीहर्ष यांच्यासारख्या राजांची आठवण झाली म्हणजे डोळे अश्रूंनीं भरून येतात. त्यांच्या वेळीं या भरतखंडांत लक्ष्मी आणि सरस्वती या दोघी कशा सख्या बहिणीसारख्या नांदत होत्या. त्यावेळचें वैभव पाहून परदेशांहून आलेल्या लोकांचे डोळे दिपत असत. त्या काळचे राजे स्वतःच्या सुखाची पर्वा न करतां प्रजेला सुख कसें लागेल याची अहोरात्र चिंता बाळगीत. धर्मानें व न्यायानें आपण न वागलों तर आपल्या हातून मोठें पातक घडल्यासारखें होईल व त्याबद्दल देवाच्या घरीं आपणास जाब द्यावा लागून शिक्षा भोगावी लागेल असें भय त्यांच्या मनाला नेहमीं वाटे. राजाकरितां प्रजा नव्हे, तर प्रजेकरितां राजा असतो ही गोष्ट ते नेहमीं ध्यानांत ठेवून वागत. ( उसासा टाकून ) गेले! ते दिवस गेले! आतां त्यांची नुसती आठवण मात्र राहिली आहे.

गणू—श्रीहर्ष हाच शेवटला हिंदु राजा झाला काय ?

स्तंभ—होय. साऱ्या भरतखंडावर राज्य करणारा शेवटला चक्रवर्ती राजा श्रीहर्ष हाच. त्याच्या पुढच्या काळांत हिंदुराज्यें होतीं पण तीं लहान लहान व स्वतंत्र होतीं.

गणू—या लहान लहान राज्यांत कोणी चांगले राजे झाले कीं नाहीं ?

स्तंभ—हो. कांहीं झाले. माळव्यांत धारा नगरींत परमार राजे राज्य करीत होते. यांचेच वंशज हल्लींचे पवार

राजे हे आहेत. या परमार कुळांत राजा भोज याची कीर्ति अजून लोक गातात! हाही विद्येचा मोठा भोक्ता व विद्वानांचा आश्रयदाता होता. गुजराथेंत चालुक्य राजे झाले. यांच्या पदरीं हेमचंद्रासारखे मोठाले जैन पंडित होते. मगध देशांत पाल राजे व बंगाल्यांत शूर व सेन नांवाचीं राजघराणीं झालीं.

**हरि०**—तुमच्या दोघांच्या संभाषणांत मी मध्येंच तोंड घालून एक शंका विचारतों याबद्दल मला क्षमा करा. तुम्ही तो काळ प्रत्यक्ष पाहिलेला आहे तेव्हां तुमच्यांकडूनच माझ्या शंकेचें समाधान होईल म्हणून विचारतों. हल्लींचे इतिहासकार मागच्या या राजांविषयीं पुष्कळ वेळां असें लिहितात कीं त्या राजांच्या हातांत हवी तेवढी सत्ता होती व ते तिचा मनास वाटेल तसा उपयोग करीत. लोकमत असें त्यावेळीं कांहीं नव्हतेंच, व असलें तरी राजेलोक त्याची पर्वा करीत नसत. तसेंच व्यापारवृद्धीकडे त्यांचें विशेषसें लक्ष नव्हतें. युद्धांत मिळविलेल्या लुटीनें त्यांचा खजिना भरत असे व खजिन्यांतल्या पैशावर हे राजे स्वतः हवी तशी चैन करीत. हें म्हणणें कितपत खरें आहे?

**स्तंभ**—पूर्वींचे सरसकट सगळे राजे तुम्ही म्हणतां अशा प्रकारचे म्हणजे प्रजेच्या पैशावर स्वतःची चैन चालविणारे, आणि प्रजेच्या सुखदुःखाविषयीं बेफिकीर होते हें जसें खरें नाहीं, तसे सगळे राजे धर्मपरायण आणि श्रीरामचंद्रासारखे

प्रजेच्या संतोषासाठीं हवा तो स्वार्थत्याग करण्यास तयार होते असेंही म्हणतां येणार नाहीं. असें असणें कोणत्याही काळांत शक्य नाहीं. त्या काळीं लोकमत नव्हतें किंवा असलें तरी राजेलोक त्याची पर्वा करीत नसत असें म्हणणेंही रास्त नाहीं. राजांचे मंत्री लोकमताचा विचार करूनच राजाला सल्ला देत व त्यांच्या सल्ल्यानें चालणें हा राजाचा धर्म समजला जात असे. जे राजे धर्माला तुच्छ समजणारे असत ते स्वैर वर्तन करीत हें खरें आहे; पण त्याबद्दलचें प्रायश्चित्तही त्यांना भोगावें लागे. लोकमताच्या विरुद्ध वागून प्रजेला असंतुष्ट ठेवणाऱ्या राजाच्या विरुद्ध बंडें होत व कधीं कधीं त्यामुळें राजाला राज्याला मुकावेंही लागे. दुसऱ्याचें असें उदाहरण पाहून प्रत्येक राजाला आपणावरही तो प्रसंग येईल कीं काय अशी भीती वाटून तो सहसा लोकमताच्या विरुद्ध जात नसे. व्यापारवृद्धीकडे राजांचें लक्ष नसे व प्रजेच्या पैशावर राजेलोक स्वतः चैन करीत असें मला तरी कधीं आढळून आलें नाहीं. त्यावेळीं हिंदुस्थानचा व्यापार चीन, अफगाणिस्थान, इराण, अरबस्तान इ० देशांशीं होता तो राजांचे साह्य असल्यावांचूनच इतका वाढला असे कोण म्हणेल? राजांच्या वैभवांविषयीं व चैनीविषयीं म्हणाल तर त्यावेळीं हिंदुस्थानांतून परदेशाकडे द्रव्याचा ओघ जात नव्हता; उलट व्यापारामुळें परदेशचेंच द्रव्य इकडे येई. अर्थात् इकडच्या लोकांजवळ तेव्हां इतकी संपत्ति होती कीं तिचा किंचित् अंश राजांनीं स्वतःच्या चैनीकडे खर्च केला

तर लोकांना त्याची कांहींच क्षिति वाटत नसे. त्या काळचे राजे विलासी व चैनी होते तसे लोकही संपन्न व सुखी होते. मग राजांची चैन त्यांच्या डोळ्यावर कशी येईल? असो. मी आणखी पुष्कळ सांगणार होतों, पण सहा वाजले, अजबखाना बंद होण्याची घंटा वाजत आहे. आणखी एखादे वेळीं तुम्ही आलां तर मुसलमानी रियासतीच्या वेळच्या बऱ्याच गोष्टी मी सांगेन. मुला, तूं माझा प्रिय मित्र आहेस. तुझ्यामुळें मला आज वाचा फुटली. पुनः लवकरच येऊन मला भेट दे बरं का? राम राम.

दोघे—राम राम! (जातात.)




# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग पांचवा.

### विषवृक्षाचें बीजारोपण.

**कथाभागः**—अजमीर व दिल्ली येथील राजा पृथ्वीराज व कनोजचा राजा जयचंद हे मावस भाऊ, पण पृथ्वीराज शूर, मनाचा उदार आणि थोर होता, आणि जयचंदाचा स्वभाव तितकाच मत्सरी, कुत्सित, व अनुदार असे. पृथ्वीराजाचा उत्कर्ष त्याच्यानें पाहवेना. शेवटीं पृथ्वीराजाचा नाश करविण्यासाठीं त्यानें महमंद घोरी नांवाच्या गिझनीच्या मुसलमान राजास बोलाविलें. या घोरीचा पृथ्वीराजानें पूर्वीं कित्येक वेळां पराभव केला होता. त्यामुळें तो पृथ्वीराजावर सूड उगविण्यास टपलाच होता. तशांत जयचंदाकडून बोलावणें आल्यावर त्याला दिल्लीवर स्वारी करण्यास अधिकच

उल्हास वाटला. त्यानें फौजेसह येऊन पृथ्वीराजावर तर सूड उगविलाच, पण त्याच्या मागोमाग कनोजवर स्वारी करून जयचंदाचाही नाश केला. आपापसांतल्या भांडणांत तिसऱ्याला घालून दुसऱ्याचें व आपलें स्वतःचेंही नुकसान करून घेण्याचें उदाहरण हिंदुस्थानांत जयचंदानें प्रथम घालून दिलें, आणि याच्यापायींच अखेर हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट झालें. हा कथाभाग या प्रसंगांत दाखविला आहे.



# विषवृक्षाचें बीजारोपण.

### पात्रें.

जयचंद–कनोजचा राजा.
महेश्वरराय–त्याचा मंत्री.
पृथ्वीराज–दिल्लीचा राजा.
हरिहर–त्याचा सरदार.
शहाबुद्दीन घोरी–गिझनीचा मुसलमान राजा.
राजदूत, नागरिक वगैरे.

## प्रवेश पहिला.

स्थळ—जयचंदाचा वाडा.

( जयचंद व महेश्वरराय विचार करीत बसले आहेत.)

जयचंद–असा अपमान! मी तर तो कधीं सहन करणार नाहीं. आमच्या शत्रूनें आमच्या देखत आमच्या कन्येला जबरदस्तीनें न्यावें आणि आम्हीं नुसतें त्याच्या तोंडाकडे पाहत रहावें हें कधीं आमचे हातून होणार नाहीं. शत्रूच्या वंशाचें पाळमूळ खणून काढीन तेव्हांच या जयचंदाचें मन शांत होईल. पृथ्वीराज तलवार गाजविणारा, पराक्रमी व शूर असला, तर हा जयचंद क्षात्रकर्मांत त्याच्याहून तिळमात्र कमी नाहीं. पृथ्वीराज तर नुसता अडदांड शिपाई आहे;

त्याच्या अंगीं मुत्सद्दीपणाचा लवलेश नाहीं. माझ्यापाशीं बुद्धिशस्त्र मोठें प्रखर आहे. युद्धांत तलवार कामास पडली नाहीं तर ( डोक्याला हात लावून ) ही माझी अक्कल मला केव्हांही दगा देणार नाहीं अशी माझी खात्री आहे. महेश्वरराय, या माझ्या शत्रूचा निःपात झालाच पाहिजे, मग तो शस्त्रानें होवो कीं युक्तीनें होवो. तो झाल्यावांचून माझ्या मनाची तळमळ शांत व्हावयाची नाहीं. तेव्हां शत्रूच्या नाशाची काय युक्ति काढतां बोला.

**महेश्वर**०—महाराजांच्या बुद्धितेजापुढें माझ्या बुद्धीची काय किंमत आहे ? तथापि हुजूरनें आज्ञा फर्माविली आहे म्हणून दोन शब्द बोलतों, त्याची क्षमा असावी. मला वाटतें अशा महत्त्वाच्या कामीं घाई उपयोगाची नाहीं. उतावीळपणानें केलेल्या अविचाराच्या कृत्याचा परिणाम पुढें पश्चात्तापांत होत असतो. पृथ्वीराज शूर आहे ही गोष्ट कोणालाही कबूल केलीच पाहिजे. त्याला स्वतःला मुत्सद्दीपणाचें अंग कमी असलें तरी त्याचे वडील सोमेश्वर महाराज यांच्या वेळचीं कांहीं वृद्ध शहाणी मुत्सद्दी मंडळी दिल्लीच्या दरबारीं आहे. ती त्याला योग्य सल्ला दिल्यावांचून राहणार नाहीं. ते काय डावपेच लढवितील याचा अगोदर विचार करूनच आपण आपलें ब्रेत केले पाहिजेत. या कामीं माझी सल्ला आपण विचारतां हा माझ्यावर आपला मोठा अनुग्रह आहे असें मी समजतों. मी या गादीचा वंशपरंपरेचा नोकर आहें. मी उतावीळपणानें भलतीच सल्ला दिली तर निमकहरामपणा केल्या-

सारखें होईल. म्हणून माझी अशी विनंति आहे कीं या गोष्टीचा नीट विचार करण्यासाठीं मला आठ दिवसांची मुदत द्यावी.

जय०–( रागानें ) मला वाटलेंच होतें तुम्ही असें कांहीं तरी टाळाटाळीचें उत्तर द्याल. म्हणून मीं तुमच्या सल्लयाची वाट न पाहतां अगोदरच नामी युक्ति योजून कार्याला सुरुवात सुद्धां केली आहे. युक्ति पण युक्ति आहे!

महे०–मी आतां वृद्ध झालों आहें. माझ्या मेंदूंत पूर्वींची तरतरी राहिली नाहीं. म्हणून मला काशीयात्रेला जाण्याची परवानगी व्हावी अशी विनंति मी हुजूरला पूर्वींच करून चुकलों आहें. पण हुजुरांनीं योजिलेली युक्ति कोणती तें सांगण्याची कृपा व्हावी.

जय०–सांगूंच तुम्हांला? हें पहा, शहाबुद्दीन घोरीला समरसिंह रावळाच्या मदतीनें पृथ्वीराजानें पानिपतच्या लढाईंत पराभूत करून हांकून लाविल्यापासून घोरी बाह्यात्कारीं आपण हिंदुस्थानची पर्वा करीत नाहीं, आपणास गिझनीचें राज्य आहे तेंच पुष्कळ आहे, असें दाखवीत आहे; पण अंतर्यामीं तो फार जळफळत आहे असें मला कळलें आहे. पृथ्वीराजाचा सूड उगवून त्याला ठार करीन तरच नांवाचा शहाबुद्दीन अशी त्यानें प्रतिज्ञा केली आहे. मीही पृथ्वीराजाचा समूळ उच्छेद करीन तेव्हांच मला स्वस्थपणानें झोप लागेल. अशा स्थितींत आमच्या दोघांच्याही प्रतिज्ञा शेवटाला जाण्याचा उत्तम मार्ग म्हणजे आपण शहाबुद्दिनाला

दिल्लीवर स्वारी करण्याच्या भरीस घालावें हा मला दिसतो. माझी अनुकूलता दिसतांच शहाबुद्दिनाला नवा दम येऊन तो दिल्लीवर स्वारी करून आपली प्रतिज्ञा शेवटास नेईल, आणि आपलें आयतेंच काम होईल. म्हणून मी शहाबुद्दिनाकडे तसा संदेशही पाठविला आहे, आणि त्याच्या उत्तराची वाट पहात आहें.

**महे०**—काय ? आपला निरोप गेला ? अरेरे! तर मग सर्वस्वी घात झाला! महाराज, माझें सगळें जीवित आपल्या हातीं आहे; आपण त्याचे मालक आहां; आपण त्याचें हवें तें भलें वाईट करूं शकतां; तथापि या इमानी सेवकाच्यानें अशा वेळीं खरें बोलल्यावांचून राहवत नाहीं म्हणून बोलतों, क्षमा असावी. महाराज, आपण आपल्या हातानें स्वतःच्या पायावर दगड पाडून घेतला आहे! आपल्या कृत्यानें एकट्या पृथ्वीराजाचाच काय, पण आपला स्वतःचा, किंबहुना या सगळ्या आर्यावर्ताचा, नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. चोराला खाजिना लुटून नेण्यास आमंत्रण करावें तसें आपण केलें आहे. आपल्या देशाचें वैभव, स्वतंत्रता, आणि वाडवडिलांची कीर्ति या सर्वांवर पाणी फिरविणारें आपलें हें अविचाराचें कृत्य आहे. मी मर्यादा सोडून बोलत आहें हें मी जाणतों आणि त्याबद्दल आपण द्याल ती शिक्षा भोगण्यास मी तयार आहें. आपल्या एकट्याच्या जिवाचें व घरादाराचें कांहींही होवो, पण साऱ्या देशाच्या वैभवमंदिराला आग लावणाऱ्या आपल्या या कृत्याचें भयंकर स्वरूप आपल्या

नजरेस स्पष्टपणें आणणें हें माझें कर्तव्य आहे म्हणूनच मी इतकें बोलण्याचें धारिष्ट केलें आहे. मी आपला अपराधी आहें असें आपणास वाटत असल्यास ही घ्या तलवार, आणि तोडा माझी मान. पण आपल्या या कृत्याचा निषेध केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

**जय०** ( संतापानें )–पुरें झालें तुझें हें शहाणपण. तुझ्या या पांढऱ्या केसांकडे पाहून मी तुला इतकें बोलूं दिलें हेंच अधिक झालें. दुसरा एखादा जीभ इतकी सैल सोडून बोलता तर येथल्या येथेंच त्याची ती जीभ छाटून टाकली असती. ( स्वगत ) हा म्हातारा फार तापट दिसतो. याला मोकळा ठेविला तर हा कदाचित् आपल्या कार्यांत विघ्न करील. तें उपयोगी नाहीं ( उघड ) कोण आहे रे तिकडे?

( राजदूत येतात. )

या थेरड्याला कैद करून बंदोबस्तांत ठेवा. आणि माझ्या परवानगीवांचून याला भेटण्याची मनाई आहे असें कोतवालाला बजावून सांगा.

**महे०**–( जातां जातां ) महाराजांचा हुकूम मला शिरसावंद्य आहे. मी तर मरणास सिद्ध झालोंच आहें. पण महाराजांनीं हें लक्षांत ठेवावें कीं आपल्या आपापसांतल्या भांडणांत तिऱ्हाइताला घालण्याचें जें उदाहरण महाराजांनीं घालून दिलें आहे तें विषाचें बीज या भरतभूमींत रुजून त्याचा लवकरच विषवृक्ष झालेला दिसेल व त्या वृक्षाची

फळें खाऊन या हिंदुस्थानचे लोक आपली अक्षय हानि करून घेतील. या म्हाताऱ्याच्या तोंडचे हे शब्द नीट लक्षांत ठेवावे ही माझी शेवटची प्रार्थना आहे. (मुजरा करून जातो)

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

( शहाबुद्दीन घोरी एकटाच प्रवेश करतो. )

**शहा०** ( पत्र वाचून हर्षानें )--परवरदिगार, तुझी लीला अगाध आहे! पानिपतच्या लढाईत आमचें सगळें सैन्य बरबाद होऊन पुनः गिझनीला पाय लागतात कीं नाहीं असें वाटत होतें, आणि आमचे लोक इतके नाउमेद झाले होते कीं पृथ्वीराजावर सूड उगविण्याचा आपला बेत जागचे जागीं राहतो कीं काय अशी भीती वाटत होती. पण इतक्यांत कन्नौजच्या जयचंद राजाकडून हें पत्र आल्यामुळें वाळून शुष्क होत चाललेल्या माझ्या आशारुपी वृक्षाला नवी पालवी फुटली आहे. जयचंद व पृथ्वीराज यांच्यामध्यें हाडवैर आहे हें मला ठाऊक आहे. जयचंदानें राजसूय यज्ञाचे वेळीं पृथ्वीराजाला निमंत्रण न करतां मंडपद्वारीं द्वारपालाचे जागीं त्याचा पुतळा बसविल्यामुळें पृथ्वीराजाला चीड येऊन त्यानें जयचंदाची मुलगी संयोगिता हिला जबरदस्तीनें पळवून नेलें. व तेव्हांपासून जयचंद पृथ्वीराजाचा नाश करण्यास टपलेला आहे ही बातमी मला दूतानें येऊन

सांगितली होती. जयचंदाच्या या पत्रांतल्या मजकुरावरून ती खरी दिसते. मी आपली फौज घेऊन दिल्लीवर स्वारी करावी व दिल्लींचें राज्य घ्यावें असें जयचंद लिहितो. फार उत्तम गोष्ट! तुम्ही असेच आपसांत भांडून आमच्यासारख्या परक्यांचा फायदा करून देत चला! जयचंदासारख्या हिंदुराजाकडून असें मानापानाचें बोलावणें आल्यावर कोणता शहाणा पुरुष त्याचा अनादर करील! येतों बरें! राजा जयचंदा, अगोदर पृथ्वीराजाचा समाचार घेऊन मग तुझाही समाचार घ्यायला लवकरच येतों. हिंदुस्थानांत जयचंदासारखे घरभेदे जिवंत आहेत तोंपर्यंत आमच्यासारख्या परक्यांनीं आपला लाग साधून घेतला नाहीं तर आमच्यासारखे महामूर्ख आम्हीच ठरूं! आमच्या हातीं हिंदुस्थानचें राज्य देण्याची परवरदिगारचीच इच्छा दिसते. नाहीं तर जयचंदासारख्याला एरवी अशी बुद्धि कशी व्हावी? अशी संधी पुनः यावयाची नाहीं, तेव्हां तिच्यापासून होईल तेवढा फायदा आपण करून घेतलाच पाहिजे. पृथ्वीराजाच्या हातीं मी अनेक वेळां सांपडलों असतां त्यानें मला सोडून दिलें, यावरून त्याला राजनीति कितीशी कळते तें दिसतेंच आहे. त्यानें एक मूर्खपणा केला म्हणून मी करीन कीं काय? पृथ्वीराज माझे हातीं तर लागू दे, म्हणजे त्यानें केलेल्या उपकाराबद्दल कृतज्ञ होऊन मी त्याला स्वर्गसुख भोगण्यासाठीं देवलोकींच पाठवून देईन. आपल्या फौजेची जय्यत तयारी

आहेच. एकदम कुचाचें शिंग फुंकण्यास आतां कोणती हरकत आहे? चला तर, आतां आपण त्याच उद्योगाला लागूं. ( जातो. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—पृथ्वीराजाचा राजवाडा.

( हरिहरराय प्रवेश करतो. )

**हरिहरराय**—आतां काय करावें? शत्रूचा तळ पंचवीस कोसांवर येऊन पडला तरी आमचे महाराज विलासांतच मग्न आहेत! शत्रु दोन दिवसांच्या आंत दिल्लीच्या वेशीपाशीं येऊन पोंचेल म्हणून महाराजांना खबर देऊन सावध करण्याकरितां मी तातडीनें आलों, पण माझा निरोपच अंतःपुरांत जाऊन पोंचत नाहीं! महाराजांना कोणी भेटूं नये किंवा पत्रद्वारें कांहीं कळवूं नये म्हणून आमच्या संयोगिता महाराणीसाहेबांनीं पक्का बंदोबस्त करून ठेविला आहे. महाराजांच्या मनावर त्यांनीं पक्की मोहिनी घातली आहे! या राणीसाहेब म्हणजे आम्हां प्रजेचें मूर्तिमंत दुर्दैवच म्हणावयाचें! या येथें आल्यापासून महाराजांना राज्यकारभाराचें कामच सुचत नाहीं. अष्टौप्रहर स्वारी राणीसाहेबांच्या विलासमंदिरांत असते. मी येवढ्यांतल्या येवढ्यांत दासींच्या हातीं चार निरोप आंत पाठविले. त्यांनीं मधल्यामध्यें निरोप ठेवूं नयेत म्हणून मोहोरांनीं त्यांच्या मुठी सुद्धां भरल्या. पण एक

निरोप पोंचेल तर शपथ! महाराजांच्या विलासांत कोणी विघ्न केल्यास त्याला काय शिक्षा होईल आणि काय नाहीं याचा नेम नाहीं, म्हणून सगळे सेवक भितात. पण आतां भिऊन कसे चालेल? दाराशीं शत्रु येऊन ठेपला आहे. आतां महाराजांना खडबडून जागे करण्याचा अखेरचा उपाय करून पहावा, मग आपल्या जिवाचें कांहींही होवो. ( रण-तुतारी वाजवितो. तिचा ध्वनि ऐकून पृथ्वीराज बाहेर येतो.)

**पृथ्वी०**—कोण? हरिहरराय, तुम्हीच कां? वा:! फार चांगलें! तुमच्यासारख्या सरदारानें अशा तऱ्हेचें अमर्याद-पणाचें वर्तन करावें हें आश्चर्य आहे!

**हरि०**—अपराधाची क्षमा असावी. पण महाराज, प्रसंगच तसा भयंकर आहे. म्हणून येवढें धाडस करावें लागलें.

**पृथ्वी०**—काय आहे असा प्रसंग?

**हरि०**—शहाबुद्दिन घोरी जंगी फौज घेऊन चार कोसा-वर येऊन पोंचला आहे.

**पृथ्वी०**—खोटें! अगदीं खोटें! शहाबुद्दिनाची अशी चां-गली मस्ती पानिपतला जिरली आहे कीं तो पुनः हिंदु-स्थानांत येण्याचें नांवसुद्धां काढणार नाहीं. हरिहरराय, तुम्ही एक भितरे तरी असलां पाहिजे, नाहीं तर विघ्नसंतोषी तरी असलां पाहिजे. तुमचें शौर्य मला माहित असल्यामुळें तुम्हांला माझ्यानें भित्रे म्हणवत नाहीं. तेव्हां तुम्हाला मी विघ्नसंतोषी म्हणतों, आणि माझ्या कामांत नसतें विघ्न केल्याबद्दल तुम्हांला कैदेची शिक्षा देतों. कोण आहे रे ति-कडे? याला अटकेंत नीट बंदोबस्तानें ठेवा.

**हरि०**—मला पाहिजे तर फाशीं द्या. माझ्या जिवाची मला पर्वा नाहीं. पण शत्रु वेशीपाशीं आला आहे त्याला दूर ठेवण्याची व स्वतःचा जीव बचाविण्याची तजवीज महाराजांनीं अगोदर करावी अशी माझी हात जोडून प्रार्थना आहे. ( जातो. )

( इतक्यांत दूत समरसिंहाकडची चिठ्ठी आणून देतो. )

**पृथ्वी०** ( ती वाचून )—काय समरसिंहसुद्धां शत्रु दिल्ली पर्यंत येऊन पोंचल्याचें आणि त्याचें पारिपत्य करण्यासाठीं स्वतः साठ हजार फौज घेऊन आल्याचें लिहितो! तर मग हरिहररायानें सांगितलेली बातमी खरी असली पाहिजे. समरसिंह खोटें कधीं लिहावयाचा नाहीं. त्याच्या शब्दावर माझा पुरा विश्वास आहे. तो आणखी काय लिहितो बरें? ( पत्र वाचून) 'जयचंदानें हाहुलीरायाला घोरीकडे पाठवून त्याच्याकडून ही स्वारी करविली आहे. आपणा हिंदुराजांत असा फितूर असल्यामुळें दुसऱ्या राजांकडून यावेळीं मदत होण्याची आशा नाहीं. चामुंडरायाला आपण कैदेंत ठेविलें आहे. त्याला मोकळा केल्यास तो आपल्या फार उपयोगीं पडेल' (उघड) वा! मी इतःपर हातांत शस्त्र धरणार नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली आहे ही गोष्ट समरसिंहाला ठाऊकच नाहीं वाटतें! बरें, पुढें पत्रांत आणखी कोणाविषयीं काय लिहिलें आहे तें पाहूं? ( वाचतो ) ' मी, हरिहरराय, रामगुरु पुरोहित आणि चांदभाट येवढे काय ते महाराजांचे खरे खरे हितचिंतक उरलों आहों. ' ( मनाशीं ) पण मी हरिहर-

रायाला आत्तांच कैद करून पाठविलें. माझ्या हातून रागाच्या आवेशांत केवढी ही चूक झाली! आतां मी त्याला सोडीन तर माझ्या पूर्वीच्या हुकुमाची काय किंमत राहिली? मी चंचलवृत्तीचा आहें असें लोक समजणार नाहींत काय? लोकांच्या दृष्टीनें माझी किंमत कमी होणार नाहीं काय? अलबत् होईल. यासाठीं अधिकाराची इज्जत राखण्याकरितां तरी पूर्वींचा हुकुम इतक्यांतच फिरवूं नये. रामगुरु व चांदभाट हे लढण्याच्या कामाचे नाहींत. तेव्हां आतां आपली सगळी मदार समरसिंहावर व स्वतःच्या तलवारीवर आहे. कांहीं चिंता नाहीं. घोरींचें पाणी आपण किती तरी वेळां ओळखलें आहे. त्याची बिशाद काय आपल्यापुढें उभा राहण्याची! पण आपण लढाईवर गेल्यास कांहीं दिवस तरी आपल्या प्रियेची व आपली ताटातूट होईल. जी आपल्याला क्षणभर विसंबत नाहीं ती महिनापंधरा दिवसांचा वियोग कसा सहन करील? पण इलाज नाहीं. तिची कशी तरी समजूत घालून युद्धाला निघालेंच पाहिजे. चला तर तिचा निरोप घेण्यास. ( जातो. )

---

## प्रवेश चौथा.

### स्थळ–रस्ता.

( दोघे नागरिक प्रवेश करतात. )

**पहिला नागरिक**–भाई चूडामणि, तुम्ही दिल्लीला गेलां होतां ते कधीं आलां? तिकडची काय खबर आणिली आहे?

**दुसरा नागरिक**–काय सांगू भाईजी ? दिल्ली शहर उदासवाणें दिसत आहे. एखाद्या रूपवती स्त्रीच्या कपाळीं कुंकुमतिलक नसला म्हणजे तेवढ्यानें तिचें दर्शन जसें अशुभ होतें, तसें एक पृथ्वीराज नाहींसे झाल्यानें त्यांची राजधानी अमंगळ दिसूं लागली आहे.

**प० ना०**--पृथ्वीराजाची काय खबर आहे ? आम्हीं येथें कांहीं चमत्कारिक बातमी ऐकली म्हणून विचारतों.

**दु० ना०**–तुम्हीं काय खबर ऐकली ? त्यांनीं शहाबुद्दिनाला मारून मग स्वतः आत्महत्त्या करून घेतली हीच ना?

**प० ना०**–होय. पण ती कितपत खरी आहे ?

**दु० ना०**–खरें खोटें परमेश्वर जाणे ! पण दिल्लींतसुद्धां हीच बोलवा आहे कीं घोरीनें पृथ्वीराजाला पकडून नेल्यावर कित्येक दिवस बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें होतें. पुढें पृथ्वीराजाचा धूर्त भाट चांदबरदाई यानें बादशहाची मर्जी सुप्रसन्न करून घेऊन एके दिवशीं पृथ्वीराजाच्या शब्दवेधित्वाची परीक्षा पाहण्यासाठीं त्याच्याकडून सगळी तयारी करविली. बादशहा स्वतः ती गंमत पाहण्यासाठीं आपल्या उच्चासनावर बसला होता. पृथ्वीराजाचे डोळे काढल्यामुळें तो अंध झाला आहे, तरी त्याचें शरसंधान अप्रतिम आहे. त्याच्या हातांत धनुष्यबाण दिले होते. एका बाजूस शंभर शंभर मण वजनाचे सात तवे एकापुढें एक ठेविले होते. तव्यावर खडा मारून काढलेल्या आवाजावरून पृथ्वीराजानें

बिनचूक बाण मारून ते फोडले. त्याबरोबर ' वाहवा! क्या बात है! ' असे प्रशंसापर उद्गार बादशहानें काढले. त्या शब्दाच्या धोरणानें पृथ्वीराजानें एक बाण खुद्द बादशहावर सोडला व तो बादशहाच्या छातींत शिरून बादशहा तत्काळ मरण पावला. त्याबरोबर एकदम गडबड झाली. तेव्हां ' मीं बादशहाला मारण्याची आपली प्रतिज्ञा शेवटास नेली आहे, आतां मी सुखानें मरेन ' असें म्हणून पृथ्वीराजानें जवळच्या एका सरदाराची तलवार हिसकावून घेतली व ती स्वतःच्या पोटांत खुपसून आपल्या जिवाचा अंत करून घेतला, अन् चंदभाटानेंही तसेंच केलें.

**प० ना०**—अरेरे! केवढा गुणवान् राजा, आणि त्याचा अंत अशा रीतीनें व्हावा ना!

**दु० ना०**—गुणवान् खरा, पण उन्मत्तपणा, आणि विषयांधता यांच्या पायीं फुकट गेला. पृथ्वीराजानें उन्मत्तपणानें आपल्या चांगल्या चांगल्या सरदारांना दूर केलें नसतें आणि संयोगीतेच्या प्रेमपाशांत बद्ध राहून राज्यकारभाराकडे व शत्रूच्या हालचालीकडे दुर्लक्ष केलें नसतें तर आज साऱ्या हिंदुस्थानचें सार्वभौमत्व त्याला प्राप्त झालें असतें.

**प० ना०** (दुःखाचा उसासा टाकून)—हं! एकूण 'विनाशकाले विपरीत बुद्धि ' होते म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आमच्या जयचंद महाराजाची गोष्ट ध्याना? पृथ्वी राजाचें व आमच्या महाराजाचें खाजगी वैर, अन तें वैर उगवण्या-

साठीं त्यांनीं घोरी सारख्या शत्रूला बोलावून त्याच्या हातानें पृथ्वीराजाचा आणि स्वतःचा ही पूर्ण नाश करविला! काय या शहाणपणाला म्हणावें? परमेश्वरा! अतःपर तरी हिंदुस्थानच्या कोणत्याही राजाला आपसांतल्या भांडणांत परक्याचें साह्य मागण्याची दुर्बुद्धि देऊं नकोस.

**दु० ना०**—परमेश्वर तुझी प्रार्थना ऐकेल असें मला तरी वाटत नाहीं. स्वतःचें नाक कापून दुसऱ्याला अपशकुन करण्याची खोड आमच्या लोकांच्या अंगीं इतकी खिळली आहे कीं हिच्याच पायीं साऱ्या हिंदुस्थानचा नाश होईल कीं काय अशी मला भीती वाटते.

**प० ना०**—परमेश्वर तुझी भीती निराधार ठरवो.

**दु० ना०**—तथास्तु. ( जातात. )


# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग सहावा.

### देशद्रोह्यास योग्य शासन.

**कथाभाग**—दिल्लीच्या बादशहाचा पुतण्या अलाउद्दिन खिलजी यानें दक्षिणेंत देवगिरीवर स्वारी केली त्यावेळचा हा कथाभाग आहे. रामदेवराव जाधव नांवाचा एक मराठा राजा यावेळीं देवगिरीस राज्य करीत होता. तो प्रबळ असल्यामुळें त्याच्या सरदारांत फितूर केल्याशिवाय आपला हेतु सिद्धीस जाणार नाहीं असें पाहून कृष्णराय नांवाच्या एका सरदारास द्रव्याची व मानापानाची लालूच दाखवून त्याला त्यानें आपलेकडे वळवून घेतलें. या कृष्णरायावर रामदेव

रावाचीही मोठी कृपा होती व त्याला आपली मुलगी वीरमति देण्याचें त्यानें ठरविलें होतें. पण कृष्णराय हा फितुरी आहे असें अचानक रीतीनें वीरमतीच्या दृष्टोत्पत्तीस येऊन तिनेंच संतापाच्या आवेशांत त्याला ठार केलें व अशा रीतीनें देशद्रोह्यास योग्य शासन केलें, ही कथा या प्रसंगांत आहे.



# देशद्रोह्यास योग्य शासन.

पात्रें.

अलाउद्दिन—दिल्लीच्या बादशहाचा पुतण्या.
वीरमति—देवगिरीचा राजा रामदेवराव याची मुलगी.
कृष्णराय—रामदेवरावाचा एक तरुण सरदार.
कासमखान—अलाउद्दिनाचा एक सरदार.

## प्रवेश पहिला.

स्थळ—अलाउद्दिनाची छावणी.

( अलाउद्दिन एकटाच आपल्या डेऱ्याबाहेर उभा आहे. )

अला०—( हर्षानें स्वगत ) तोड पण तोड! याला म्हणावें डोक्याची करामत! मीं आजपर्यंत अनेक लढाया मारल्या; शेंकडों वीरांचा समाचार घेतला; हजारों—लाखो—मनुष्यप्राण्यांची कत्तल करून त्यांच्या रक्ताचे पूर वाहविले; पण परवाच्या सारखा भयंकर प्रसंग नव्हता कधीं पाहिला! कोण तो घनघोर संग्राम! रणदुंदुभीचा नाद मेघांच्या गडगडाटाप्रमाणें सारखा सुरू होता; बाणांचा वर्षाव श्रावण महिन्यांतल्या पर्जन्यवृष्टीप्रमाणें अहोरात्र चालला होता; वीरांच्या तलवारी त्यांतून बिजलीप्रमाणें चमचम चमकत होत्या; जखमी झालेल्या शिपायांच्या अंगांतून रक्ताच्या चिळकांड्या

कारंजासारख्या उडत होत्या; तलवारीच्या प्रहारानें धडापासून वेगळीं झालेलीं मस्तकें जोरानें हवेंत अशीं उडत होतीं कीं जणूं काय भ्रमरच इतस्ततः भ्रमण करीत आहेत! या एका लढाईत इतकी प्राणहानि झाली कीं तेवढी शहानशहाला सबंध राज्य मिळवितांना सुद्धां सोसावी लागली नसेल! या काफर रामराजाचा एक वीर मारला गेला तर त्याची जागा घेण्यास दहा वीर पुढें आलेच! अशा सैतानापुढें कोणाचा कसा टिकाव लागावा? या अलाउद्दिनाला पीछेहाट हा शब्द ठाऊक नव्हता, पण येथें त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागला. रामराजाची शक्ति जबर! लढून त्याला जेरीस आणीन म्हटलें तर अशक्य! अशा ठिकाणीं युक्तीनेंच काम साधलें पाहिजे. भेद केल्याशिवाय देवगिरीचें राज्य हातीं येणार नाहीं असा विचार करून तो करण्यासाठीं रामराजाचा जावई कृष्णराय याच्याकडे खडा टाकून पाहिला. तूं या युद्धांत रामराजाच्या बाजूनें न लढतां अलग राहून राजाच्या फौजेला कांहीं युक्तीनें मैदानांत आणशील, तर आम्ही हां हां म्हणतां हिंदु फौजेचा नाश करून देवगिरीचें राज्य घेऊं आणि मग बादशहाकडून तुला रामराजाच्या मसनदीवर बसवून सोनें, जडजवाहिर, व अलंकार यांची पर्वतप्राय रास तुझ्या पायावर घालूं अशा अर्थाचें पत्र मी कृष्णरायाला लिहिलें व वैराग्याचा वेष धारण करणाऱ्या एका गुप्त विश्वासु जासूदाकडून तें त्याला पोंचाविलें. जासूदानेंही अगदीं बेमालुम काम केलें. कृष्णराय तरुण, महत्त्वाकांक्षी, लोभी, व

अविचारी असल्यामुळें तो लोभाच्या जाळ्यांत फसला, आणि आपल्या म्हणण्याप्रमाणें करण्यास कबूल झाला आहे. केवढी आनंदाची गोष्ट आहे! आतां या हिंदु तरुणाच्या हातूनच हिंदुराज्यावर जळजळीत निखारे ठेवून हिंदुपातशाहीची राखरांगोळी करवीन तर हा नांवाचा अलाउद्दिन. कृष्णराय वळला ही फार मोठी गोष्ट झाली! माझें भाग्यच शिकंदर म्हटलें पाहिजे. नांहीं तर रामदेवराव त्याला आपली मुलगी देणार असून पुढें मागें येथील दरबारांत आपली मोठी प्रतिष्ठा होईल ही त्याला खात्री असल्यावर तो कसचा वळणार! पण लोभी मनुष्याचें मन पुढच्या लाभापेक्षां जवळच्या लाभाचे आशेनें तेव्हांच मोहित होतें ही मनुष्यस्वभावाची खुबी या वेळीं माझ्या उपयोगीं पडणार खरी. अजून आपणाला बरींच कामें करायचीं आहेत. त्यांना आतां एकदम लागलें पाहिजे. ( जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—वीरमतीचा महाल.

( कृष्णराय युद्धास जाण्यापूर्वी वीरमतीचा निरोप घेण्यास येतो. )

कृष्ण०—( स्वगत ) महाराज रामदेवराव यांच्या दरबारांत पोक्त, अनुभवी व राजकारणपटु माणसें आहेत व त्यांच्यापुढें आपल्या अकलेचें तेज पडणार नाहीं म्हणून मला मोठी

भीती वाटत होती; पण आजच्या दरबारांत भ्रमाचा भोपळा फुटला. अलाउद्दिनानें येथून पळ काढला, तो इतका भेदरून गेला आहे कीं पुनः म्हणून दक्षिणेचें तोंड पाहणार नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली आहे, आतां आपण निर्भय झालों, अशा खोट्या कंड्या पिकवून मुसलमानांच्या स्वारीविषयींची शंका महाराजांच्या मनांतून मी काढून टाकली आणि किल्ल्यासारख्या बंदोबस्ताच्या जागेंतून निघून खालीं मैदानांत उतरण्यास आतां हरकत नाहीं असें महाराजांच्या मनांत भरवून दिलें. तथापि हें काम कांहीं सहज झालें नाहीं. तो वृद्ध सेनापति आपल्या अनुभवाचा व पोक्तपणाचा टेंबा मिरवीत माझ्या विचाराला प्रतिकूळ जाऊन महाराजांचें मन पालटण्याचा यत्न करीत होताच. शेवटीं महाराजांच्या जिवाची व राज्याच्या रक्षणाची सारी जबाबदारी मी घेतों आणि हुकूम होईल तर शत्रूंच्या मागोमाग जाऊन त्यांचा भेद आणितों असें जेव्हां मी छाती ठोकून सांगितलें तेव्हां महाराजांना माझा विश्वास पटला. अशीं मोठालीं कामें छाती ठोकूनच करण्यास तयार झालें पाहेजे. आतां शत्रूचा भेद आणण्याची कामगिरी महाराजांनीं माझ्यावर सोपविली आहे ती करण्याचें निमित्त करून अलाउद्दिनाची गांठ घ्यावी आणि पुढील मसलती ठरवाव्या म्हणजे झालें! महाराज किती भोळे! शत्रूचा भेद न आणतां इकडचाच भेद मी तिकडे पोंचविणार आहे हें त्या भोळ्या सांबाला काय ठा-

ऊक! तूं करतो आहेस हें काम चांगलें नाहीं, देशद्रोहाचें आहे, असें माझी मनोदेवता मला सांगत आहे. पण मनोदेवतेचें ऐकून मी या वेळीं कच खाल्ली तर या राज्याचा स्वामी होण्याची संधी पुनः कधीं तरी येईल काय? छेः! अशा वेळीं मनोदेवतेला झुगारून देण्यांतच खरा शहाणपणा, खरी दूरदृष्टि व खरें धैर्य आहे. वीरमतीला माझा खरा उद्देश न कळवितां उभ्याउभ्याच तिचा निरोप घेतला पाहिजे. कारण, तिच्याशीं ज्यास्त वेळ बोलत राहिलों तर ती माझ्या मनांतलें गुपित युक्तीनें काढून घेईल इतकी ती चाणाक्ष आहे. तेव्हां असेच उभ्या उभ्यानें तिच्याशीं चार शब्द बोलून आपण आपल्या कार्याला निघालें पाहिजे.

( वीरमतीपाशीं जातो. )

( उघड ) वीरमति, मी या वेळीं तुझ्याकडे कशासाठीं आलों आहे हें तूं तर्कानें ओळखशीलच.

**वीर०**—लढाईच्या तयारीनें आलां आहां तेव्हां शत्रूवर चालून जाण्याची कामगिरी आपलेकडे आली आहे हें ओळखायला काय येवढें कठीण आहे?

**कृष्ण०**—शाबास! तुझा तर्क जवळजवळ खरा आहे. म्हणजे मी शत्रूकडे जात आहें—( स्वगत ) अरे हें काय मी बोलून गेलों? इच्याशीं फार जपून बोललें पाहिजे.

**वीर०**—काय शत्रूकडे? शत्रूवर नव्हे?

**कृष्ण०**—अशी घाबरूं नकोस. शत्रूवर चाल करून जाण्यापूर्वीं त्याचा भेद कळणें अवश्य आहे म्हणून महाराजांनीं तें

अत्यंत नाजूक आणि विश्वासाचें काम माझ्याकडे सोंपविलें आहे. म्हणून जाण्यापूर्वी–( वीरमतीचा हात आपल्या हातांत घेण्यासाठीं पुढें होतो. )

**वीर०**-( त्याचा हात झिडकारून ) तर मग आपल्या हाताच्या स्पर्शानें हा माझा देह विटाळून घेण्याची माझी इच्छा नाहीं. शत्रूचा भेद काढणें हें खऱ्या मर्दाचें काम नाहीं; तें हलकें काम करण्यांत भूषण मानणारा पुरुष महाराज रामदेवराव यांच्या कन्येच्या प्रेमास काय पण आदरास सुद्धां पात्र नाहीं, समजलांत?

**कृष्ण०**—मर्दुमकी दाखविण्याचा प्रसंग येईल तेव्हां हा कृष्णराय तीही दाखवील. पण त्याच्या अगोदर राजनीतीचे डावपेच खेळण्याचें मुत्सद्दीगिरीचें कामही हा कृष्णराय कसें करून दाखवितो तें तर पहाशील?

**वीर०**—आम्ही स्त्रिया राजनीतिबीति कांहीं ओळखीत नाहीं. रणभूमीवर जिवाची पर्वा न करतां मर्दुमकी करून दाखवितील त्याच वीरांचे गळ्यांत खऱ्या वीरपत्न्या माळ घालीत असतात. शत्रूचा भेद काढण्याचें काम चातुर्याचें असेल, पण खऱ्या वीराला तें शोभत नाहीं.

**कृष्ण०**——जाऊं दे. हा वाद घालण्याचा समय नाहीं. तुम्हां बायकांना राजकारणाचें महत्त्व कळत नाहीं. आजची माझी कामगिरी यशस्वी झाली तर–

**वीर०**-तर काय? दिवाणगिरी मिळेल इतकेंच ना?

कृष्ण०–( स्वगत ) एकूण हिची महत्त्वाकांक्षा याहूनही मोठी दिसते. ती काय असेल बरें? माझ्या मनांत जी गोष्ट आहे तीच असेल काय? होय. खास तीच असली पाहिजे. मग आपलें गुपित हिला सांगण्यास कोणती हरकत आहे? पण नको. आतांच नको. हिच्या मनांत निराळेंच कांहीं असलें तर आपल्या कार्यांत निष्कारण विघ्न उपस्थित व्हावयाचें. ( उघड ) बरें तर वीरमति, मला आतां निरोप दे. येवढी ही मोहीम फत्ते झाल्यावर आपल्या विवाहाचा मंगल समारंभ मोठ्या थाटानें होईल. तो दिवस केव्हां उजाडेल असें मला झालें आहे.

वीर०–( उजवा डोळा लवलासें पाहून दचकते आणि स्वतःशीं म्हणते ) अगबाई! हा काय प्रकार आहे! पण छे:! यावेळीं भलतीच शंका मनांत आणून यांचें मन निरुत्साह करणें बरें नाहीं. ( उघड ) कृष्णराय, तुम्ही आपले कार्यांत यशस्वी होऊन लवकर परत यावें आणि माझें स्मरण म्हणून मी आपल्या हातानें गुंफलेल्या या हाराचा स्वीकार करावा ( हार त्याच्या गळ्यांत घालते. )

( कृष्णराय तिच्याकडे प्रेमदृष्टीनें पाहत जातो. )

वीर०–( स्वगत ) हे गेले, पण आतां झालेल्या अपशकुनानें माझ्या मनाला रुखरुख लागून राहिली आहे. यांनीं पतकरलेलें काम फार जोखमीचें आहे. अलाउद्दिन मोठा दगलबाज आहे म्हणतात. कोणत्या वेळीं कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. तेव्हां आपण यांना न कळूं देतां पुरुष-

वेषानें यांच्या मागोमाग जावें हें चांगलें. आई जगदंबे! तूंच आम्हां मराठ्यांची पाठराखी आणि यश देणारी देवता आहेस. तूंच आमची लाज राखली पाहिजे. आतां लवकर पुरुषाचा वेष घेऊन यांच्या मागोमाग गेलें पाहिजे. (जाते.)

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ—अलाउद्दिनाच्या छावणीजवळचें एक रान.

वीर०—( पुरुषवेषांत स्वगत ) मी हें काय पाहत आहें? शत्रूकडच्या सरदाराशीं कृष्णराय गुप्त गोष्टी करीत आहेत, आणि मुसलमान सरदार त्यांना शाबासकी देत आहे, हा प्रकार पाहून माझें वेडें मन भलभलत्या शंका घेऊं लागलें आहे. पण हें बरोबर नाहीं. ज्याला आपण मनानें वरलें आहे त्या कृष्णरायाविषयीं असले निष्कारण कुतर्क मनांत आणणें हें महत्पाप आहे. आतां आपण या झाडाच्या आड उभे राहून या दोघांचें संभाषण नीट ऐकूं या म्हणजे आपणांस आलेली शंका आपोआप दूर होईल. ( झाडाच्या आड उभी राहते. )

( कृष्णराय व कासमखान बोलत बोलत येतात. )

कासम०—वाहवा! कृष्णरायजी! तुम्हीं फार बहार केली. तुमच्यासारखा जवामर्द पुरुष मी साऱ्या दुनियेंत नव्हता पाहिला. शाबास आहे तुमच्या शहाणपणाची! तुमच्या महाराजांच्या दरबारांत इतके बुजुर्ग मुत्सद्दी असतां, आणि मैदा-

नांत उतरण्याच्याविरुद्ध ते सल्ला देत असतां महाराजांनीं त्यांचें न ऐकतां तुमची सल्ला ऐकली, यावरून तुमच्या खुबीदार भाषणाची वाहवा करावी तेवढी थोडी आहे. तुमच्या लोकांना गडावरून खालीं आणणें हेंच मोठ्या मुष्किलीचें काम होतें; आणि तें तुम्ही फार चातुर्यानें केलें हें ऐकून बादशहाची मर्जी फार प्रसन्न झाली आहे. आतां देवगिरीच्या फौजेचा नाश करून तें राज्य घेण्याचें काम आम्हांला सहज करतां येईल. तुमच्या या कामागिरीबद्दल तुम्हांला कबूल केलेलें बक्षीस बादशहाकडून योग्य वेळीं मिळेलच. पण तूर्त बादशहानें हा रत्नजडित शिरपेंच आणि हे अमूल्य अलंकार पाठविले आहेत यांचा आपण स्वीकार करावा.

कृष्ण०—( त्या अलंकारांना वंदन करून ) बादशहाची मर्जी प्रसन्न झाली यांतच मला मोठा संतोष वाटतो. मी आपली कामगिरी करून ठेविली आहे; आतां बादशाही फौज जाण्याचाच काय तो अवकाश आहे. शिवाय किल्ल्यांत दारूगोळ्याबद्दल मिठाचीं पोतीं भरून ठेवण्याची तजवीज मीं गुप्तपणें केली आहे. आतां रामदेवराव व त्याचे सरदार कितीही शूरत्वानें लढले तरी दारूगोळा नसल्यावर ते काय करणार ?

वीर०—(स्वगत) अरे नीचा कृष्णराया ! तूं असा दगलबाज असशील अशी मला कल्पनाही झाली नाहीं, म्हणून मी आपलें मन तुझ्या स्वाधीन करण्याचें घोर पातक केलें. हाय हाय ! जगांत विश्वासास पात्र असें कोणीच उरलें नाहीं असें आतां

म्हटलें पाहिजे. हे धरणीमाते, हा भयंकर प्रकार प्रत्यक्ष पाहण्यास मला जिवंत का ठेवलेंस? हे मृत्यो! तूं आपला काळपाश यापूर्वीच माझेवर कां नाहीं टाकलास? हाय रे दैवा! असला देशद्रोही कुलांगार पुरुष माझा स्वामी म्हणून योजून माझी विटंबना करण्यांत तुझा कोणता हेतु होता? असला पति पतकरून व पितृहत्येचें, बंधुघाताचें आणि देशद्रोहाचें पातक डोक्यावर घेऊन रौरव नरकांत जाण्यापेक्षां आमरण अविवाहित राहिलेलें काय वाईट आहे? या देशद्रोही नराधमाला मी आपलें तनमन अर्पण करणार होत्यें काय? अरेरे! तसें केलें असतें तर केवढा घात झाला असता? पण या विचारांत मी असा किती वेळ घालविणार? छेः! तें उपयोगी नाहीं. आतांच पुढें होऊन या तलवारीनें याची गर्दन उडविली पाहिजे. फार वेळ विचार केल्यानें मनुष्याचें मन भ्याड होतें. तें कांहीं नाहीं. बस ठरला विचार. अशी जाऊन या दोघांच्या गर्दनी छाटल्या पाहिजेत.

( आवेशानें पुढें होऊन दोघांवर प्रहार करते व दोघेही जखमी होऊन पडतात. )

**कासम॰**—या खुदा! ही बिजली अस्मानांतून कशी एकाएकीं आमचेवर येऊन पडली! या अल्ला! ( प्राण सोडतो.)

**कृष्ण॰**—कोण तूं? आणि आम्हांला अशा रीतीनें असावध स्थितींत मारण्यांत तुझा उद्देश तरी काय?

**वीर॰**—मी कोण? मला अजून ओळखली नाहीं वाटतें? महाराज रामराजे यांची कन्या मी वीरमति. अरे कुलांगारा,

चांडाळा! मला मारण्यांत तुझा उद्देश काय असें विचारण्यास तुला लाज नाहीं वाटत? जडजवाहिर, मानपान किंवा याहूनही थोरलें एखादें बक्षीस बादशहाकडून मिळविण्याच्या लोभानें तूं आपल्या देशबांधवांच्या माना या खाटकांच्या हातीं देण्यास तयार झालास काय? माझ्या पित्यानें तुला लहानाचा मोठा केला, आणि शेवटीं माझा विवाह तुझ्याशीं लावून देण्याचें वचन देऊन तुला कृतार्थ केलें त्या उपकाराची फेड तूं त्यांच्याशीं असा विश्वासघात करून करणार होतास, नाहीं काय? थूः असो तुझ्या जिण्यावर! तूं जन्माला तरी कशाला आलास? असे देशद्रोहाचे विचार मनांत वागवून तूं माझ्याशीं प्रेमाच्या गुलगुल गोष्टी करीत होतास ना? अरे, कावळ्यानें मानससरोवराचा अभिलाष धरण्यासारखें हें आहे हें कसें तुझ्या लक्षांत आलें नाहीं? चांडाळा, मी प्रेमानें दिलेला पुष्पहार ज्या वक्षस्थलावर तूं धारण केलास, त्याच वक्षःस्थलावर हा माझा लत्ताप्रहारही आतां धारण कर. ( लत्ताप्रहार करते. ) आम्ही स्त्रिया, खऱ्या गुणवान् व सच्छील पुरुषाच्या दासी होऊन राहूं; पण तुझ्यासारख्या नराधमाला नागिणीसारख्या दंश करून परलोकची वाट दाखवूं हें अजून तरी तुला कळलें कीं नाहीं? तुझ्या स्पर्शानें विटाळलेल्या या देहाचाही मी आतां त्याग करत्यें आणि तुझ्या घोर पातकाची साक्ष परमेश्वरापुढें देण्यासाठीं तुझ्याबरोबरच परलोकीं येत्यें. ( स्वतःच्या उरांत जंबीर खुपसून मरून पडते. )

———

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग सातवा.

### हिचें नांव स्वामिभक्ति!

कथाभाग—मेवाडचा राजा विक्रमाजित हा दुष्ट होता. इतका कीं त्याचे पुष्कळसे सरदार व प्रजाजन त्याच्या विरुद्ध उठले व राजाचा भाऊ बनबीर याजकडून राजाला मारवून त्याच्या गादीवर त्यांनीं बनबीर याला बसविलें. पण विक्रमाजिताला उदयसिंग नांवाचा सहा वर्षांचा एक मुलगा होता. त्याला जिवंत राहूं दिल्यास पुढें मागें त्याचा पक्ष घेऊन कोणी बंड करतील या भयानें बनबीरानें त्या राजपुत्रालाही मारण्याचा विचार केला. तो राजपुत्र त्याची दाई पन्ना हिच्या पाशीं नेहमीं असे. पन्नेलाही त्याच्याच बरोबरीचा एक

मुलगा होता. राजपुत्राच्या जिवावर प्रसंग आलेला पाहून पन्नेनें प्रत्यक्ष स्वतःच्या पुत्राच्या प्राणाचा बळी देऊन राजकुमाराचा जीव वांचविला व त्याला घेऊन ती युक्तीनें पळून गेली, ही कथा या प्रसंगांत आहे. स्वामिभक्तीचें असें अलौकिक उदाहरण इतिहासांत दुसरें क्वचित्च आढळेल.



# हिचें नांव स्वामिभक्ति !

## पात्रें.

**बनबीर**—विक्रमाजिताचा भाऊ व उदयसिंगाचा चुलता.

**उदयसिंग**—विक्रमाजिताचा पुत्र व बनबीराचा पुतण्या.

**पन्ना**—उदयसिंगाची दाई.

**संग्रामसिंग**—पन्नेचा पुत्र.

**रतन**—विक्रमाजिताचा विश्वासु सेवक.

## प्रवेश पहिला.

स्थळ—राजवाडा.

( बनबीर कांहीं सशस्त्र लोकांसह हातांत तलवार घेऊन प्रवेश करतो. )

**बनबीर**—( लोकांस ) जवानमर्द हो, पहातां काय? शिरा राजवाड्यांत आणि तुम्हांस छळणाऱ्या, दुष्ट, अधम उन्मत्त, व क्रूर विक्रमाजित राजाचा शिरच्छेद करा. या राजानें गादीवर बसल्यापासून कसकशीं अनन्वित कृत्यें केलीं आहेत तीं तुम्ही पहाल तर अशा राजाचा वध करण्यांत पाप मुळींच नसून उलट गोब्राह्मणांना दुःखमुक्त केल्याचें पुण्य आहे अशी तुमची खात्री होईल. या राजानें अजितसिंह व विजयसिंह यांच्यासारख्या आपल्या पदरच्या वृद्ध व थोर सरदारांचा

भरदरबारांत अपमान केला; कीर्तिसिंहाच्या पत्नीची विटं-बना केली; स्वतःच्या चैनीखातर गांवेंच्या गांवें उठवून तेथें शिकारखाने तयार करविले. जगद्विख्यात जो संगराणा त्याला संकटाचेवेळीं आश्रय देऊन व सर्व प्रकारें साह्य करून सुखाचे व वैभवाचे दिवस दाखविणाऱ्या वृद्ध करमचंदाला या कृतघ्न नरपशूनें भरदरबारांत ठार मारविलें. अशीं एक का दोन, किती याच्या नीचपणाचीं कृत्यें तुम्हांला सांगूं? दरबारांतले यच्चावत् सरदार याला कंटाळून गेले आहेत. अशा या दुष्टाला ठार मारण्यांत राजनिष्ठाभंग केल्याची शंका यत्किंचित्‌ही मनाला शिवूं देऊं नका. हा आपला खरा राजाच नव्हे; चितोडच्या गादीला भ्रष्ट करणारा, वडिलांच्या निर्मल कीर्तीला कलंक लावणारा हा कोणी राक्षस आहे यांत शंका नाहीं. तुम्हांला चितोडच्या गादीची, संगराण्याच्या कुळाची, व आपल्या आयाबहिणींच्या अब्रूची यत्किंचित् चाड असेल तर या राजाला येथल्या येथें ठार करून त्याचें मुंडकें भाल्यावर खोचून साऱ्या राजधानींत त्याची धिंड तुम्ही काढाल. तुमच्या मुखचर्येवरून तर माझे शब्द तुम्हांला बरोबर पटलेले दिसत आहेत. तुमचे बाहु राजाच्या रक्ताचा घोट घेण्यासाठीं फुरफुरत आहेत. काय करूं रे? माझा तो भाऊ नसता तर—पण नको; साऱ्या प्रजेच्या कल्याणासाठीं बंधुप्रेमाचा पाश तोडून मीच स्वतः हें पुण्यकृत्य करतों. मी पुढें होतों. तुम्ही माझे मागोमाग या. ( सर्व जातात. )

———

## प्रवेश दुसरा.

( पन्ना, तिचा मुलगा संग्रामसिंग व राजपुत्र उदयसिंग प्रवेश करतात. )

**उदय०**—आई, आज आम्ही शिकारीला गेलों होतों, तिथली एक मौज तुला सांगावयाची आहे.

**पन्ना**—काय घडली मौज मला ऐकूं द्यावी.

**संग्राम०**—कांहीं नाहीं ग आई, शिकारींत माणसाला जिवावरचे अनेक प्रसंग येतात, त्यांतलाच एक प्रसंग आज आला होता, त्याविषयीं सांगत आहेत कुमार.

**उदय०**—जिवावरचा प्रसंग अन् त्यांत कांहीं अर्थ नाहीं असं कसं होईल? कसाही असला तरी तो प्रसंग आईला सांगावासा मला वाटतो. आम्ही कनी आज एका वाघिणीची शिकार केली. हाका करून शिकारी लोकांनीं तिला जाळींतून बाहेर काढली, तेव्हां ती अतिशय चवताळलेली होती. तिचे डोळे इंगळासारखे लाल होतें. ती बाहेर पडतांच मी तिच्यावर नेम धरून बाण मारला. तो तिच्या डाव्या डोळ्याला लागला. तशी ती अधिकच चवताळून तिनें नाकानें वास घेऊन त्या वासाच्या रोखानें नेमकी माझ्यावर उडी फेकली. मी एका मोठ्या सुळकेदार खडकाच्या आड होतों. तिची उडी खडकाच्या पायथ्याशीं येऊन पडली, आणि वळून ती माझ्या अंगावर येणार इतक्यांत संग्रामानें तिच्यावर बाण सोडला. तो नेमका तिच्या नरड्याला लागून विव्हळत ती

धाडदिशी खालीं पडली. खरोखर आज संग्रामानें माझा जीव वांचविला.

**पन्ना**—संग्राम हा काय निमित्त झाला; खरा रक्षणकर्ता परमेश्वरच म्हटला पाहिजे.

**उदय०**—माझ्या आईच्या मागं तूं माझं संरक्षण करतेस, तसं संग्रामानंही आतांपासून माझ्या जिवाचं रक्षण करावं असंच देवाच्या मनांत कदाचित् असेल. नसेल कशावरून ?

**पन्ना**—बरं, पण आज तुम्ही दोघेही शिकारीच्या श्रमानं थकलेले दिसतां. देवाचं नामस्मरण करून लवकर आपापल्या अंथरुणावर जाऊन निजा कसे ?

**उदय०**—आई, माझी तुला आज एक विनंति आहे.

**पन्ना**—काय हुकुम आहे कुमार? आज्ञा व्हावी. ही बंदी सेवक हुकुमाची तामिली करण्यास तत्पर आहे.

**उदय०**—माझी अशी इच्छा आहे कीं मी आज संग्रामाच्या बिछान्यावर निजावं, अन् माझे जागीं माझा पोषाख घालून संग्रामानं निजावं.

**पन्ना**—कुमार, संग्रामानं आज जी तुमची सेवा केली तिच्या मानानं त्याला हें बक्षीस फार मोठं आहे. तुमचं मन फार कोमल आहे. तुमचं अंतःकरण फार उदार आहे. तुमच्या आज्ञेच्या आड येणं मला उचित नाहीं. पण—

**उदय०**—पण काय ? तुला कशाची येवढी भीती वाटते ? महाराजांना कळलं तर ते रागावतील याची होय ? मीच स-

काळीं त्यांना सांगून त्यांची समजूत घालीन. संग्राम मला माझ्या जिवापेक्षांही प्यार वाटतो. त्याला राजकुमाराचा पोषाख कसा काय शोभतो तें मला पाह्यचं आहे. आई, ऐकच माझी येवढी विनंति.

**पन्ना**–कुमार! तुम्ही इतका आग्रह करतां, अन् तुमचं मन माझ्यानं मोडवत नाहीं, म्हणूनच मी तसं करण्याला रुकार देल्यें. बाकी असं करणं रास्त नाहीं असं माझं मन मला सांगत आहे.

( उदयसिंग आणि संग्रामसिंग परस्पर पोषाख बदलतात. )

**उदय०**–आई, मी तुला नमस्कार करून संग्रामाचे जागीं निजायला जातों. ( नमस्कार करतो. )

**पन्ना**–आयुष्मान् भव.

( उदयसिंग जातो. )

**संग्राम०**–आई, मलाही झोप येऊं लागली आहे. निजण्याची परवानगी असावी. ( नमस्कार करून निजतो. )

**पन्ना** ( स्वगत )–कुमार उदयसिंग जवळ असले म्हणजे मनाला वाटणारा खेद, चिंता, निराशा सगळ्यांचं घटकाभर विस्मरण होतं. वय लहान, पण मन किती थोर आहे! कुमाराची वृत्ति कशी सदा आनंदी असते. बापलेकांच्या स्वभावांत केवढं जमीन अस्मानाचं अंतर आहे! महाराजांचा स्वभाव किती दुष्ट, आणि वर्तन किती उद्दामपणाचं! या गोष्टी नसत्या तर आज सगळे सरदार त्यांच्याविरुद्ध कट कां

करते? अन् त्यांचेवर उलटून त्यांना पदभ्रष्ट करण्याचा किंबहुना त्यांना ठार मारून त्या दासीपुत्राला–बनबीराला–गादी देण्याचा विचार कां करते? महाराज विक्रमाजिताच्या जिवावरचा प्रसंग आहे. पण महाराजांचे डोळ्यांवर अशी कांहीं धुंदी आलेली आहे कीं तिच्यामुळे ते अगदीं बेगुमान राहत आहेत. महाराजांचा जीव तर धोक्यांत आहेच, पण मला सिंहाच्या या छाव्याच्या–उदयसिंगाच्या–जिवाचीही फार भीती वाटत आहे. परमेश्वरा, मी माझ्या छोट्या मालकाला कशी जीवापलीकडे जपत असते तें तूं पाहतोसच. तुझ्या कृपेची पाखर त्याच्यावर घाल येवढीच तुला माझी प्रार्थना आहे.

( इतक्यांत राजवाड्यांत आक्रोशध्वनि होतो, व रतन घाबऱ्या घाबऱ्या येतो. )

**पन्ना**–काय रे रतन, वाड्यांत कसली रे गडबड आहे? अन् तूं असा घाबरलेला कां दिसतोस?

**रतन**–काय सांगूं पन्नाबाई? घात झाला, सर्वस्वीं घात झाला! आपल्या जीवाचा कलीजा दुष्ट बनबीरानें काढून नेला! बनबीरानें महाराज विक्रमाजिताचा खून केला. तो दुष्ट आतां कुमाराचा शोध करीत इकडेसच येत आहे. ही खबर तुम्हांला वेळेवर द्यावी म्हणून मी येवढा घाईनें आलों आहें. पन्नाबाई, आतां एक अक्षर ज्यास्त बोलण्याला फुरसत नाहीं. कुमाराचा जीव वांचविण्याची कांहीं तरी तजवीज

करा. नाहींपेक्षां संगराण्याचा निर्वंश होऊन चितोडची गादी त्या दासीपुत्राच्या हातांत जाईल. तुमच्या आमच्या स्वामिभक्तीच्या कसोटीची हीच वेळ आहे.

**पन्ना**—हाय रे दैवा! शेवटीं मला पडत असलेलं दुःस्वप्न तूं खरं केलंस म्हणायचं. आतां कुमाराचे रक्षणाची तजवीज काय करावी? ( विचार करून स्वतःशीं ) ठीक आहे. असंच करावं. कुमाराला फुलांच्या हाऱ्यांत निजवून तो हारा रतनच्या डोक्यावर द्यावा अन् त्याला अगोदर शहराच्या बाहेर काढावं. कुमाराच्या जागीं आपला बाळ संग्राम निजला आहे तसाच त्याला निजूं द्यावं. कुमाराला तरी आज संग्रामाला आपला पोषाख देऊन आपले जागीं निजविण्याचा आग्रह धरण्याची बुद्धि परमेश्वरानंच दिली म्हणावयाची!

**रतन**—पन्नाबाई, आटपा लवकर, विचार कसला करतां? कुमाराचा जीव कशा तरी उपायानं वांचविला पाहिजे.

**पन्ना**—रतन, मीं एक युक्ति योजिली आहे. पण ती पार पाडण्याला तुझी मदत मिळाली पाहिजे.

**रतन**—बोला लवकर तुमची युक्ति. हा रतन आपल्या मालकाच्या जिवासाठीं जीव द्यायला तयार आहे. कोणती मदत पाहिजे?

**पन्ना**—इकडे कान कर म्हणजे सांगत्यें. (कानांत सांगत्ये.)

**रतन**—युक्ति तर नामी आहे. पण कुमारासाठीं तुम्हांला आपल्या एकुलत्या एक प्रिय लेकराचा बळी द्यावा लागणार आहे. पन्नाबाई, तुमच्याही लेकराचा जीव वांचून कुमाराचेंही

रक्षण होईल अशी एखादी युक्ति नाहीं का तुमच्या लक्षांत येत?

**पन्ना**—रतन, आतां विचार करून वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. मेवाडच्या गादीसाठीं माझा पुत्र बळी द्यावा लागला तरी बेहेत्तर आहे. पण राणासंग यांचा निर्वंश झालेला माझ्यानं पाहवणार नाहीं. रतन, आतां विचार करूं नकोस. सांगितल्याप्रमाणं करून कुमाराला घेऊन अगोदर शहराच्या बाहेर पड. मीही लवकरच तुझ्या मागोमाग येत्यें.

**रतन**—पन्नाबाई, धन्य आहे तुमच्या स्वामिभक्तीची! तुमच्या आईबापांनीं तुमच्या अंगच्या अपूर्व गुणावरून तुमचं नांव ठेवलेलं दिसतं. पंन्ना या नांवांतच कांहीं जादु आहे कीं काय तें कळत नाहीं. पन्ना अथवा पाच याची लोक नवरत्नांत गणना करीत आले आहेत ते कांहीं उगाच नाहीं तर!

**पन्ना**—रतन, तुझी ही वटवट पुरे कर, अन् अगोदर फुलांचा हारा घेऊन बाहेर पड कसा! नाहीं तर तो दुष्ट बनबीर—अगबाई, सैतानाचं नांव घेतांच त्याची स्वारी हजर होते, तसा हा दुष्ट, आपल्या प्रत्यक्ष भावाचा खून करणारा, पापी चंडाळ नांव घेतांच आपलं अशुभ दर्शन देण्यासाठीं रक्तानं भरलेली तलवार विजयपताकेसारखी नाचवीत इकडेसच येत आहे. रतन, नीघ नीघ अगोदर.

( रतन हारा घेऊन मागच्या दारानें जातो. )

———

## प्रवेश तिसरा.

( बनबीर प्रवेश करतो. )

**बनबीर**—पन्ने, राजकुमार उदयसिंग कोठें आहे? बोल. मी त्याचा समाचार घ्यायला आलों आहें. ( ती बोलत नाहीं असें पाहून ) काय? तूं बोलत नाहींस? विक्रमाजिताच्या रक्तानं माखलेली ही तलवार पाहिलीस? मी चितोडच्या गादीचा मालक झालों आहें याविषयीं आतां तरी तुझी खात्री झाली कीं नाहीं? मी या गादीचा मालक आहें अन तूं माझी सेवक आहेस हें लक्षांत ठेवून नीट, सरळ आणि खरं उत्तर दे, नाहीं तर व्यर्थ प्राणाला मुकशील.

**पन्ना** ( स्वगत )—एकीकडे स्वामिभक्ति आणि दुसरीकडे अपत्यप्रेम यांच्या द्वंद्वांत सांपडून माझं हृदय कसं द्विधा झालं आहे. माझा कंठ दाटून आला आहे; तोंडांतून शब्द सुद्धां फुटत नाहीं. पण मना, तुला आतां कठोरता धारण केली पाहिजे. आतां जर तूं कच खाल्लीस, तर हा दुष्ट माझा तर प्राण घेईलच; पण राजकुमाराच्या शोधासाठीं चोहींकडे माणसें पाठवून त्यालाही पकडून आणून ठार करील. राजकुमाराच्या रक्तांत याची समशेर बुडालेली पाहण्यापेक्षां राजनिष्ठेच्या चरणीं स्वतःचा पुत्र अर्पण करण्याचा झालेला निश्चय कायम ठेवण्यास लागणाऱ्या धैर्याची देवाजवळ याचना कर, अन् हाच राजकुमार म्हणून संग्रामाकडे बोट दाखविण्याची शक्ति देवाजवळ माग.

**बन०**–कां ? अजून बोलत नाहींस ? पन्ने, तूं बोलली नाहींस म्हणजे राजकुमार माझ्या तडाख्यांतून सुटेल असं कां तुला वाटतं ? तूं त्याला पाताळांत दडवून ठेविलंस तरी हा बनबीर आज त्याला तेथून हुडकून काढून स्वर्गाची वाट दाखविल्याशिवाय राहणार नाहीं. मग माझ्याशीं–तुझ्या नव्या राजाशीं–प्रतारणा करून कां उगाच पातकांत पडतेस ? बोल. हा इथं तोंडावरून पांघरूण घेऊन निजलेला राजकुमारच आहे ना ?

**पन्ना**–( सद्गदित कंठानें ) होय.

( तें ऐकतांच बनबीर त्याला ठार करतो. )

**बन०**–उदयसिंगा, नीज; आतां तूं अनंत काळपर्यंत सुखानं निद्रा घे. तुझ्या निद्रासुखाच्या आड कोणी यायचं नाहीं. ( हर्षानें ) माझा मार्ग निष्कंटक झाला. आजचा दिवस माझ्या आयुष्यांतला सुवर्णदिन म्हटला पाहिजे. पन्ने, तूं माझ्याशीं सत्यानें वागलीस याबद्दल हें घे तुला बक्षीस. ( गळ्यांतली मोत्यांची कंठी तिच्या अंगावर फेकतो आणि चालता होतो. )

**पन्ना** ( स्वगत )–अरेरे ! याचे हे शेवटचे शब्द माझ्या कानाला कसे कडकडीत तापलेल्या तेलाप्रमाणं वेदना करीत आहेत. मी याच्याशीं सत्यतेनं वागल्यें असं समजून यानं माझ्या अंगावर टाकलेला हा मोत्यांचा हार मला कृष्णसर्पासारखा भयंकर दिसत आहे. प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याला मारविल्याबद्दलचं बक्षीस घेणारी कोणी दुष्ट माता या ज़गांत आतां

पर्यंत जन्माला आली नसेल. पण माझं सगळंच कांहीं विचित्र आहे. माझ्या एका डोळ्यांतून कुमाराच्या सुटकेबद्दल आनंदाश्रु आणि दुसऱ्या डोळ्यांतून पुत्रशोकाबद्दल दुःखाश्रु टपटप गळत आहेत. चितोडमधले सगळे सरदार प्रजेला छळणाऱ्या दुष्ट राजा विक्रमाजिताला मारून बनवीराला त्याची गादी मिळवून देण्यांत साह्य करीत आहेत, आणि मी त्याच विक्रमाजिताच्या पुत्राच्या प्राणरक्षणासाठीं स्वतःच्या पुत्राचे प्राण अर्पण केले आहेत. मी चुकल्यें तर नाहीं ना? नाहीं. महाराज विक्रमाजित दुष्ट होते, तेव्हां त्यांना शासन झालं तें योग्यच झालं. पण त्यांच्या कुमारानं असा कोणता अपराध केला होता कीं त्याबद्दल त्याचा गादीवरचा हक्क नाहींसा करून त्याचा प्राणनाशही करावा, आणि चितोडची गादी दासीपुत्राला देण्यांत यावी? संगराण्याच्या गादीशीं निमकहलालपणा दाखवावा हें प्रजेंतल्या प्रत्येक माणसाचं कर्तव्य आहे. तेंच मीं केलं. मीं धरलेला पक्ष सत्याचा, न्यायाचा, अन् धर्माचा आहे. अर्थात् अशा कामांत श्रीभगवान् माझा पाठीराखा होईल. मला माझ्या उद्योगांत यश न मिळालं तर त्याची लाज त्याला आहे. कर्ता करविता सगळा तो आहे. मी पामर, त्यांतून अबला, माझ्यानं काय होणार आहे? पण मी अशी विचार करीत किती वेळ उभी राहणार? कुमार मारला गेला असं समजून त्याचं उत्तरकार्य करण्यासाठीं सरदारमंडळी आतां घटकाभरांत जमा होतील,

आणि त्यांना माझं कपट उमगेल. मग माझी येथून सुटका होणं मुष्कील होईल. मला तर कुमाराच्या जिवाच्या रक्षणासाठीं अजून पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. रतन शहराबाहेर माझी वाट पहात उभा असेल. त्याला घेऊन मला ईडरच्या, कुंभलमेरच्या किंवा दुसऱ्या एखाद्या ठिकाणच्या विश्वासु राजाचा आश्रय केला पाहिजे. ( मृत पुत्राकडे पाहून ) बाळा संग्रामा, तूं आपल्या जन्माचं सार्थक केलंस; तूं आतां स्वर्गलोकचं दिव्य सुख भोगीत राहशील. पण तुझ्या या आकस्मिक जाण्यानं तुझ्या आईचं हें हृदय आमरण पोळत राहील. बाळा, तुला मी असाच येथें सोडून चालल्यें याबद्दल मला क्षमा कर. काय करूं? स्वामिभक्तीचं कर्तव्य मला ज़ोराच्या हाकेनं दुसरीकडे बोलावीत आहे, अन् तिकडं मला गेलं पाहिजे. ( मुलाकडे पाहून अश्रु पुशीत कष्टानें एकेक पाऊल टाकीत जाते. )


# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग आठवा.

### राजपुतांतला भीष्म.

**कथाभाग**—शंतनु राजाला वृद्धपणीं मत्स्यगंधा नांवाच्या एका सुस्वरूप मुलीशीं लग्न करण्याची बुद्धि झाली, पण त्या मुलीच्या बापानें अशी अट घातली होती कीं या मुलीच्या पोटीं जो पुत्र होईल त्यालाच राज्य मिळालें पाहिजे. राजाला देवव्रत नांवाचा एक मुलगा अगोदरच होता आणि तो वडील मुलगा म्हणून गादीवर त्याचा हक्क होता. तेव्हां धर्मशास्त्राची ही अडचण दूर करून आपल्या बापाची इच्छा पूर्ण करण्यासाठीं देवव्रतानें आपला गादीवरचा हक्क खुषीनें सोडला व त्यावरून त्याला ‘ भीष्म ’ हें नांव पडलें वगैरे कथा महाभारतांत आहे. हुबेहूब त्यासारखीच एक गोष्ट

राजपुतान्याच्या इतिहासांत घडलेली आहे. महाभारतांतल्या भीष्माप्रमाणेंच मेवाडच्या भीमसिंगानें बापाच्या इच्छेसाठीं स्वतःचा गादीवरचा हक्क सोडला होता. म्हणून भीमसिंगाला ' राजपुतांतला भीष्म ' म्हणत. हा कथाभाग या प्रसंगांत दाखविला आहे.



# राजपुतांतला भीष्म.

## पात्रें.

उदयसिंह—मेवाडचा राणा.

भीमसिंग—त्यांचा पुत्र.

| | |
|---|---|
| कृष्णरावत<br>तुवर<br>जालिमसिंग | —मेवाडच्या राण्याचे सरदार. |

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—राजवाडा.

**उदय०**—( सचिंत ) आडकित्यांतल्या सुपारीप्रमाणें मी यावेळीं दोन्ही बाजूंनीं अडचणींत सांपडलों आहें. कोठून मला द्वितीय संबंध करण्याची दुर्बुद्धि झाली कोणास ठाऊक! त्यावेळीं उच्छृंखल झालेल्या मनोविकाराला वश होऊन मीं सोनीगडच्या राजकन्येशीं विवाह करण्याचें मनांत आणिलें, आणि शास्त्राज्ञा व कुलाचार यांचा अपमान करून ' हिच्या पोटीं होणाऱ्या पुत्रास मी वारस करीन ' असें अभिवचन दिलें तेव्हां माझी अक्कल कोठें गेली होती? भीम हा थोरल्या राणीचा पुत्र; त्याचा गादीवरचा श्रेष्ठ हक्क धर्मशास्त्र व कुलाचार यांना धाब्यावर बसवून मीं आपली नीच कामेच्छा तृप्त करण्याकरितां नाहींसा केला ना? अरेरे, पापी-चांडाळा! या अन्यायाच्या, अधर्माच्या आणि कुलशीलाला

कलंक लावणाऱ्या कृत्याबद्दल देवापुढें काय जाब देशील? भीमसिंगामध्यें तूं कोणते अवगुण पाहिलेस कीं त्यामुळें गादीवरचा त्याचा जन्मसिद्ध हक्क नाहींसा करण्याची बुद्धि तुला झाली? या गोष्टीविषयीं जों जों जास्त विचार करावा तों तों आपल्या हातून घडलेल्या या पापकृत्याचें स्वरूप अधिकच कृष्ण दिसूं लागतें. आतां पश्चात्ताप करून तरी काय उपयोग? त्या गतगोष्टीची आठवण तरी आतां कशाला पाहिजे? पण नको म्हटलें तरी माझें हें वृद्धपणच मला त्या गोष्टीची आठवण करून देत आहे. वारसासंबंधाच्या या प्रश्नाचा निकाल मला आपल्या हयातींतच करून टाकिला पाहिजे. नाहींतर माझ्या पश्चात् भाऊबंदकीच्या कलहापायीं सगळ्या राज्याचा नाश व्हावयाचा. माझा वडील मुलगा भीमसिंग पाणीदार व तेजस्वी आहे. आणि जगमल्लाच्या मामाला मीं दिलेल्या अभिवचनामुळें तो गादीवर हक्क सांगून भांडत राहील. जगमल्लांत तशी कांहीं तेजस्विता नाहीं. तो आपला साधाभोळा व सालस मुलगा आहे; तेव्हां भीमसिंगालाच उपदेशाच्या चार गोष्टी सांगून त्याचें मन वळवावें, आणि त्यानें आपण होऊन आपला वारसाचा हक्क सोडावा असें करण्यासाठीं मी आपले वृद्ध व भरवशाचे दोघे सरदार कृष्णरावत व तुवर यांना भीमसिंगाकडे पाठविले आहे. ते अजून कसे बरें आले नाहींत? भीमसिंगावर त्यांची मात्रा लागूं पडली नाहीं कीं काय?

( दूत येतो. )

दूत—हुजूरच्या दर्शनासाठीं छोटे कुमार सरदारांसह येत आहेत.

( कुमार भीमसिंग व सरदार येतात. )

**भीम०**—पिताजी, आपली इच्छा या सरदारांनीं मला कळविली. आपल्या आज्ञेच्या बाहेर मी कधीं जाणार नाहीं. पित्याच्या इच्छेविरुद्ध वागणें हा मोठा अधर्म, महत्पाप आहे, आणि तें या भीमसिंगाच्या हातून कधीं होणार नाहीं. धनलोभानें, अधिकारलोभानें, व राज्यलोभानें माझ्या मनाला मोह पडून कदाचित् तें माझ्या हातून घडेल म्हणून आपल्या तलवारीवर हात ठेवून मी अशी शपथ वाहतों कीं आजपासून उदेपूरच्या राज्याच्या हद्दींत मी पाणी पिणार नाहीं. पिताजी, आतां आपल्या मनांतली शंका दूर होईल ना?

**उदय०**—कुमार, तूं धन्य आहेस! तुझ्या वयाच्या मानानें तुझी तेजस्विता, शहाणपण आणि मनाचें औदार्य फार मोठें आहे. तूं आपल्या कुलाची कीर्ति चोहींकडे पसरवून आपल्या पूर्वजांना संतोष देशील. पण कुमार, येवढी घनघोर प्रतिज्ञा करण्याचें कारण नव्हतें. तुझ्या शब्दावर माझा व या मेवाडच्या राज्यांतल्या प्रजेचा पूर्ण भरंवसा होता. जगमल्ल हा साधाभोळा व गरीब वृत्तीचा असल्यामुळें तो गादीवर बसल्यावर त्याच्या राज्याच्या रक्षणार्थ तुझ्या समशेरीच्या साह्याची फार जरूरी होती. तुझ्या या प्रतिज्ञेनें तुला उदेपूरचे राज्यांतून बाहेर जावें लागेल. मागे एखादें परचक्र या राज्यावर आलें तर त्याचें निवारण करण्यास तुझ्यावाचून दुसरा कोण समर्थ आहे? अशा वेळीं तुझी प्रतिज्ञाच तुझ्या इच्छे-

ऱ्या आड येऊन तुला या राज्यांत पाऊल घालूं देणार नाहीं याचा विचार कर आणि जगमल्ल मला परत बोलावील त्या वेळीं मी येईन असें मला वचन दे.

**भीम०**—पिताजी, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे, तशी आपल्या गादीवर बसणारा माझा भाऊ जगमल्ल याची आज्ञा शिरसावंद्य करून मी त्या आज्ञेप्रमाणें वागेन असें याच तलवारीची शपथ वाहून सांगतों. आतां आपला संतोष झाला ना?

**उदय०**—कुमार, तुझ्यासारखा पराक्रमी, तेजस्वी व आज्ञाधारक पुत्र महत् भाग्यानें प्राप्त झाल्यावर कोणत्या पित्याच्या मनाला संतोष होणार नाहीं? कुमार, तुझ्या या प्रतिज्ञेमुळें आतांच तुझा व माझा वियोग होणार आहे हें मनांत आलें म्हणजे अंतःकरणांत कसें भडभडून येतें! बाळा, ये आणि तुझ्या या वृद्ध पित्याला कडकडून भेट. माझ्या अंतकाळीं तुझी भेट होणार नाहीं हें मनांत आलें म्हणजे माझा जीव कसा कासावीस होतो! आपल्याच कुळांत पूर्वीं होऊन गेलेल्या दशरथ राजाप्रमाणें 'हा पुत्रा भीमसिंगा!' असे शोकोद्गार काढीतच माझा अंत व्हावा अशी परमेश्वराचीच इच्छा दिसते. नाहीं तर 'मी या राज्यांत इतःपर पाण्याचा घोट घेणार नाहीं' अशी घोर प्रतिज्ञा करण्याची बुद्धि तुला कां झाली असती?

**भीम०**—पिताजी, आपण कांहीं काळजी करूं नका. वडिलांच्या पुण्यप्रतापानें आणि आशिर्वादानें हा भीमसिंग

आपली प्रतिज्ञा पूर्णपणें पाळून श्रीरामचंद्राप्रमाणें वनवासांतही आनंदानें राहील, आणि मेवाडच्या गादीविषयींची राजनिष्ठा तिळमात्र कमी न होऊं देतां वडिलांच्या कीर्तीत यथाशक्ति भरच घालण्यास समर्थ होईल.

**उदय॰**–तथास्तु.

( पडदा पडतो. )

-----

## प्रवेश दुसरा.

स्थळ–अरण्य.

( भीमसिंग आणि त्याचा विश्वासु नोकर कुबेर प्रवेश करतात. )

**भीम॰**–कुबेर, आपण सकाळीं उदेपुराहून निघालों तेव्हां किती वाजले होते?

**कुबेर**–पांच वाजले असतील, सरकार.

**भीम॰**–आणि आतां?

**कुबेर**–बरोबर मध्यान्ह झाली आहे. हा पहा भगवान सूर्यनारायण बरोबर डोक्यावर आला आहे.

**भीम॰**–तर मग आपण आतां या विशाल वटवृक्षाखालीं थोडा वेळ आराम करूं. भूक व तहान या दोहोंनीं माझा जीव व्याकुळ झाला आहे. जवळपास कोठें पाण्याचा झरा असला तर पहा आणि चित्तकाला पाणी पाजून माझ्यासाठीं ही झारी भरून आण.

कुबेर—समोर ती झाडी दिसते आहे. तेथें स्वच्छ व थंडगार पाण्याचा झरा आहे. आपण येथें जरा आराम करावा. मी आत्तां पाणी घेऊन येतों. ( जातो. )

**भीम०**—( स्वगत ) मेवाडच्या गादीवरचा हक्क सोडण्याची शपथ पिताजींनीं माझ्याकडून घेवविली, आणि तेवढ्यानें त्यांच्या मनाचें समाधान झालें, पण खरोखर माझ्या मनाचें समाधान त्यानें होत नाहीं. महाभारतांतली भीष्माचार्यांची कथा मीं ऐकिली आहे. त्यांच्यावरही माझ्यासारखीच शपथ वाहण्याचा प्रसंग आला होता. पण त्यावेळीं त्यांनीं मनाचा दुर्बळपणा यत्किंचित्ही न दाखवितां राज्यावरचा हक्क सोडला; इतकेंच नाहीं, तर पुढें आपल्या मुलांबाळांनीं तो सांगूं नये म्हणून आजन्म ब्रह्मचर्यव्रत स्वीकारलें! तशीच शपथ घेण्याची बुद्धि मला कां बरें परमेश्वरानें दिली नाहीं? मी मनाचा दुर्बळ आहें, याहून कडक शपथ माझ्यानें पाळली जाणार नाहीं, असें परमेश्वरास वाटलें असेल काय? हाय हाय! परमेश्वरा, माझें मन इतकें दुर्बळ करणारा तरी तूंच ना? भीष्माचार्यांना मनाची कठोरता देऊन तूं त्यांचें अक्षयीं कल्याण केलेंस व त्यांची कीर्ति अजरामर करून ठेविलीस; आणि माझ्याविषयींच तूं असा निष्ठुर कां झालास? ( विचार करून ) पण मी तरी ईश्वराला बोल कां लावावा? मनाला आपल्या कह्यांत ठेवण्याची शक्ति परमेश्वरानें सर्वांना सारखीच दिली आहे. पण त्या शक्तीचा उपयोग करून घेण्याचें सर्वांना सारखें साधत नाहीं यांत पर-

मेश्वराकडे काय दोष आहे? असो; शपथ घेतांना झालेली चूक अन्य तऱ्हेनें भरून काढण्याची आणि मेवाडच्या राजकुळांत जन्मास आल्यासारखें कांहीं सार्थक करून अजरामर कीर्ति मिळविण्याची प्रतिज्ञा मी भगवान् सूर्यनारायणाला साक्षी ठेवून करतों. ती पार पाडण्याचें मला सामर्थ्य दे येवढी तुला हात जोडून प्रार्थना आहे. मी तडकाफडकीं घराबाहेर पडलों आहें खरा; पण कोठें जावयाचें तें कांहींच ठरविलें नाहीं. मी मोगल बादशहाच्या आश्रयाला गेलों तर तेथें माझा योग्य मानमरातब राखला जाऊन मला माझ्या गुणानुरूप लष्करांत मोठी हुद्याची जागा व जहागिरीही मिळेल असें माझे हितचिंतक सांगतात. पण यवनांचा आश्रय करण्याचा विचारच मला ओंगळवाणा वाटतो. काय? ज्यांनीं आमच्या धर्माचा उच्छेद केला, मंदिरें भ्रष्ट केलीं, आम्हां रजपुतांच्या रक्ताची शुद्धताही नाहींशी केली, त्या यवनाधिपतीकडे जाऊन त्याची सेवा करण्यांत आणि त्यानें दिलेल्या मानमरातबांत मी भूषण मानूं? छेः! ही गोष्ट या भीमसिंगाच्या हातून कालत्रयीं व्हावयाची नाहीं. मी जोंधळ्याची भाकर तेलतिखटाशीं खाऊन दिवस काढीन, पण आपल्या स्वाभिमानाला व कुलाभिमानाला कलंक लावणारें असें वर्तन कधीं करणार नाहीं.

( कुबेर पाणी घेऊन येतो. )

**कुबेर**--पलीकडच्या झऱ्याचें स्वच्छ व थंडगार पाणी आणिलें आहे महाराज. ( चांदीच्या पेल्यांत तें ओतून पेला पुढें करतो. )

भीम० ( ओंठाला पेला लावणार इतक्यांत प्रतिज्ञेचें स्मरण होऊन चपापतो आणि पाणी फेकून देतो )–अरेरे! माझ्या हातून आज केवढें भयंकर पापकृत्य होत होतें! कुबेर, आपण अजून उदेपूरच्या हद्दीच्या बाहेर पडलों नाहीं, असें असतां मी पाणी प्यालों असतों तर 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' होऊन माझ्या हातून आपल्या प्रतिज्ञेचा भंग घडला असता. परमेश्वरानें वेळींच या अधःपातापासून वाचविलें हे त्याचे माझ्यावर मोठे उपकार झाले असें म्हटलें पाहिजे. हे वनदेवि! माझ्या अपराधाची क्षमा कर. प्रतिज्ञेचें विस्मरण होऊन माझ्या हातून अज्ञानानें तिचा भंग होत होता. उदेपूरच्या हद्दींत पाण्याचा एक थेंब तोंडांत टाकण्याचा मला अधिकार नाहीं ही गोष्ट मी विसरलों याबद्दल मला क्षमा कर. ( कुबेरास ) कुबेर, तूं फराळ करून पाणी पिऊन घे, आणि घोड्यावर स्वार हो. आणखी पांच कोसांवर उदेपूरच्या हद्दीपलीकडे जाऊन मुकाम करण्याचें मीं ठरविलें आहे.

कुबेर–हा सेवक तयार आहे महाराज. स्वामींनीं अन्न किंवा जल यांचें सेवन केल्याशिवाय सेवकांनीं तें करूं नये हा त्यांचा सेवाधर्म आहे. मलाही तो पाळिला पाहिजे.

( जातात. )

———

## प्रवेश तिसरा.

### स्थळ—रस्ता.

( तुवर आणि जालिमसिंग प्रवेश करतात. )

**तुवर**–कुमार भीमसिंगानें उदेपूरच्या हद्दींत पाणी पिणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून राज्यत्याग केल्याला बरींच वर्षें झालीं. मागें उदयसिंग महाराज देवलोकीं गेले; आणि कुमार जगमल्ल गादीवर बसले. हें सर्व व्हावें तसें झालें. पण आतां भीमसिंगाला प्रतिज्ञेचा भंग करून परत येण्याची दुर्बुद्धि कशी झाली तें कांहीं मला कळत नाहीं. बरें, आले तर आले, पण आपल्या भावाचे राज्यहि बळकावून बसले! केवढा हा नीचपणा!

**जालिम०**–( हंसून ) मित्रा, हें सगळें राजनीतीचें गौडबंगाल आहे. दुरून पाहणाराला तें विचित्र दिसतें खरें, पण ज्याला आंतलें खरें मर्म ठाऊक आहे त्याला यांत विचित्र असें कांहींच वाटणार नाहीं. कुमार भीमसिंगानें आपल्या प्रतिज्ञेचा भंग मुळींच केला नाहीं. त्याला ' नीच ' हें विशेषण लावून तूं मात्र त्या महात्म्याच्या निंदेचें पातक जोडीत आहेस.

**तुवर**–तें कसें ?

**जालिम०**–कसें तें सांगतों ऐक. कुमार भीमसिंगानें राज्यत्याग केल्यावर कित्येक वर्षें अत्यंत भयंकर विपत्तींत काढलीं. फार काय, पण त्यांना कित्येक दिवस उपाससुद्धां

काढावे लागले; तथापि त्यांनीं धीर न सोडतां क्षात्रधर्माला उचित असें वर्तन ठेवून सामान्य लोकांवर आपली छाप बसविल्यामुळें हळूं हळूं त्यांना पुष्कळ सैनिक जाऊन मिळाले. त्यांच्या साह्यानें त्यांनीं लूटमार करून व अनेक दुष्ट व जुलमी राजांचा समाचार घेऊन आपल्या नांवाचा डंका गाजविला. दिल्लीचे बादशहापर्यंत भीमसिंगाच्या पराक्रमाची बातमी जाऊन पोंचली. इकडे उदयसिंग महाराजांचा मृत्यु होऊन जगमल्ल महाराजांना राज्याभिषेक झाला. पण त्याबरोबर अशीही खबर आली कीं मोगल बादशहा मोठी फौज घेऊन चितोडवर चालून येण्याच्या तयारींत आहे. बादशाही फौजेला तोंड देण्याइतकें धैर्य व साहस जगमल्ल महाराजांचे ठायीं नसल्यामुळें बादशहाच्या हातांत राज्य जाऊं देण्यापेक्षां आपला भाऊ भीमसिंग यालाच सन्मानानें आणून त्याच्या स्वाधीन राज्य करावें अशी महाराजांना कोणी सल्ला दिली व त्याप्रमाणें त्यांनीं भीमसिंगाकडे स्वतः जाऊन व त्यांची विनवणी करून त्यांना परत आणिलें व स्वतःच्या हातानें त्यांना गादीवर बसविलें.

**तुवर**—तें खरें, पण भीमसिंगाच्या प्रतिज्ञेचा यांत भंग झाला नाहीं काय?

**जालिम०**—नाहीं. कारण, राज्यावर परचक्राचें संकट आल्यास परत येऊन राज्य रक्षण करावें अशी उदयसिंग महाराजांची त्यांना आज्ञाच होती. आणि भीमसिंगासारख्या मनुष्याच्यानें पित्राज्ञेचा भंग व राज्याचा नाश झालेला कसा

पाहवेल? म्हणून त्यांनीं जगमल्लाच्या शब्दाला मान देऊन येऊन पडलेलें कर्तव्य मुकाट्यानें स्वीकारलें यांत त्यांच्याकडे काय दोष आहे?

**तुवर**—खरेंच गड्या, तूं म्हणतोस ती हकीकत खरी असेल तर रामायण आणि महाभारत यांतल्या कथेचीच पुनरावृत्ति आपल्या मेवाडच्या राज्यांत होत आहे असें म्हटलें पाहिजे. रामायणी कथेंत राम थोर कीं भरत थोर हें सांगणें जसें कठीण आहे, त्याचप्रमाणें या कथेंतही भीमसिंग व जगमल्ल या दोघांत कोणाच्या मनाचें औदार्य अधिक हें सांगणें खरोखर कठीण आहे खरेंच.

( डंका वाजतो. )

ऐकलास हा डंक्याचा नाद? भीमसिंग महाराजांची स्वारी कुलस्वामीच्या दर्शनाला जाण्यास निघाली आहे. आतां आपणांस असे रस्त्यांत उभे राहून गोष्टी बोलणें योग्य नाहीं. चल, आपण एके बाजूला जाऊं.

( दोघे जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग नववा.

### उज्ज्वल देशाभिमान.

**कथाभाग**—प्रतापसिंगासारखा खरा देशाभिमानी, शूर, निधड्या छातीचा, संकटांना धैर्यानें तोंड देणारा, उदार स्वभावाचा, आणि दीर्घोद्योगी पुरुष मेवाडांतच काय, पण साऱ्या राजस्थानांत दुसरा कोणी झाला नाहीं. त्याच्यावर किती संकटें आलीं, कशा विपत्तींत त्यानें दिवस काढले, आणि चितोड परत मिळविण्याची त्याच्या मनाला कशी तळमळ लागून राहिली होती, इ. गोष्टी या प्रसंगांत पाहण्यास मिळतील.

# उज्ज्वल देशाभिमान.

पात्रें.

**प्रतापसिंग**—मेवाडचा राणा.

भामाशहा, रणधीरसिंग, जवानसिंग, जालमसिंग, सज्जनसिंग वगैरे त्याचे विश्वासु सरदार व नोकर.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—उदेपुरांतला रस्ता.

( जालमसिंग व जवानसिंग प्रवेश करतात. )

**जालम०**—भाई जवानसिंग, फार दिवसांनीं तुमची गांठ पडल्यानें माझ्या मनाला फार आनंद वाटतो. राणाजी तर खुशाल आहेत ना?

**जवान०**—भाई, तुमचें दर्शन झाल्यानें माझ्याही मनाला फार खुषी झाली आहे. आमच्या वनवासांत कोण आम्हांला भेटायला येतो? आणि कोण आमची खबर पुसतो? आमचे राणाजी शरीरानें खुशाल आहेत. ईश्वर त्यांना सुखी राखो.

**जालम०**—शरीरानें खुशाल आहेत असें तुम्ही आतां म्हणालात, यांत कांहीं तरी गूढ अर्थ आहे अशी शंका येते.

**जवान०**—यांत गूढ काय आहे? सगळा अर्थ खुला आहे. राणाजी संकटांत, विपत्तींत आणि वनवासांत दिवस काढीत आहेत. पण त्यांना स्वतःला त्याबद्दल कांहीं सुद्धां

खेद वाटत नाहीं. खेद वाटतो तो एकाच गोष्टीबद्दल. आणि ती गोष्ट ही कीं त्यांच्या जातभाईनीं–सत्यासाठीं, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं, आपल्या धर्मासाठीं आणि कुलाभिमानासाठीं धनदौलत, सुख, घरदार, स्त्री, पुत्र, फार काय, पण प्राण सुद्धां खर्ची घालणें ज्यांचें कर्तव्य–अशा रजपुतांनीं मेवाडचें स्वातंत्र्य परत मिळविण्याचा उद्योग आपण करीत असतां आपणांस कोणत्याच प्रकारें साह्य केलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर उलट दुस्मनाच्या मोहपाशांत सापडून, व त्याच्या द्रव्याला आणि भुलथापांला फसून घरभेदेपणासारखें नीचपणाचें कृत्य केलें.

जालम०–अरेरे! फारच वाईट आणि नीच कृत्य हें. रजपुतांच्या शुभ्र कीर्तीला कलंक लावणाऱ्या या कृत्यामुळें प्रतापसिंगासारख्या पुरुषाची मोठीच नाउमेद निःसंशय झाली असेल.

जवान०–(हंसून) नाउमेद? तर मग अजून तुम्हीं राणाजीला पुरतेपणीं ओखळलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. अहो, ज्यानें खायला अन्न व पांघरायला वस्त्र आहे तर आहे, नाहीं तर नाहीं, मागें शत्रु लागलेच आहेत, रजपुत राजे मनांतून तर या महापुरुषाविषयीं अत्यंत आदरबुद्धि वागवितात, परंतु पातशहाच्या भीतीनें त्याला रात्रभर आश्रय देण्याला सुद्धां भितात, अशा भयंकर विपत्तींत एक नाहीं, दोन नाहींत, पंचवीस वर्षें काढलीं, परंतु पातशहापुढें शिर नमवून आपल्या कुलाला बट्टा लावून घेतला नाहीं, ‘ तूं शरण ये म्हणजे तुझे

राज्य परत देतों ' असें पातशहा वारंवार म्हणत असतांही ज्याचा अभिमान असा जाज्वल्य कीं त्यानें पातशहाला उलट निरोप पाठविला कीं ' मी बाप्पा रावळाचा वंशज आहें. प्राण गेला तरी बेहत्तर, पण शत्रूपुढें मान वाकवून मी आपल्या अभिमानशाली रजपूत कुळाला कधीं बाटविणार नाहीं ' तो राणा प्रतापसिंग नाउमेद होऊन सागरासारखें आपलें गांभीर्य आणि मेरुपर्वतासारखा अचल धीर सोडील हें तुम्हांला शक्य तरी कसें वाटलें ?

**जालम**०—राणाजीची धन्य म्हटली पाहिजे. अशा पुरुषाची सेवा करण्याचा सुयोग तुम्हांला प्राप्त झाला आहे हें तुमचें भाग्यच म्हटलें पाहिजे.

**जवान**०—यांत काय संशय? आम्ही तर राणाजीचे एकनिष्ठ सेवक आणि भक्तच आहों. आम्ही त्यांच्या गुणांचे पोवाडे गाऊं, त्यांच्या हातचा दूना ( प्रसाद ) आवडीनें खाऊं आणि त्यांच्यासाठीं प्राण द्यायला तयार राहूं यांत नवल नाहीं; पण राणाजीचा कट्टा शत्रु व दिल्लीच्या पातशहाचा मुख्य वजीर खानखानान यानें सुद्धां राण्याच्या अंगचे गुण पाहून असे उद्गार काढले कीं ' राणाजीसारखा पुरुष हें दुनियेचें एक भूषण आहे. राजवैभव व सुखप्राप्ति यांना कस्पटाप्रमाणें लेखून आपल्या पूज्य कुलाचें नांव अजरामर करणाऱ्या तुला धन्य म्हणावयाचें नाहीं तर म्हणायचें कोणाला?'

**जालम**०—अशा सत्पुरुषाला आणि असे विपत्तींत दिवस

काढायला लागावें ही कालचक्राची गति किती विचित्र म्हटली पाहिजे !

**जवान०**—किती विचित्र म्हणून सांगूं! राणाजीवर आलेल्या एकेक संकटाचा प्रसंग तुम्ही ऐकाल, तर हरिश्चंद्राचे सत्त्वाची परीक्षा पाहण्यासाठीं विश्वामित्र मुनीनें त्या राजावर आणिलेल्या भयंकर प्रसंगांची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. रानावनांत हिंडून क्षुधा प्रदीप्त झाली म्हणून ती शांत करण्याकरितां जरा कोठें वृक्षाच्या छायेखालीं बसावें, इतक्यांत दुस्मन् आले असें ऐकतांच पुढचें वाढलेलें पान टाकून स्वतःच्या व परिवाराच्या रक्षणासाठीं चालतें व्हावें; कधीं कधीं तर राणाजीला, त्यांच्या राणीसाहेबांना व कच्यावच्यांना दांतीं दांत लावून उपास सुद्धां काढावे लागले आहेत! पोटांत अन्न नसल्यामुळें मुलें ओरडून ओरडून आकांत करीत व ती त्यांची दीनावस्था पाहून राणाजीच्या पोटांत उमळून येई. तथापि सत्त्व सोडण्याचें त्यांच्या स्वप्नांतसुद्धां कधीं आलें नाहीं.

**जालम०**—राणाजीचे गुण जों जों अधिक ऐकावे तों तों त्यांच्याविषयींचे प्रेम व आदर हीं वाढतच जातात. पण भाईजी, मी एक प्रश्न येथें विचारतों त्याबद्दल मला माफ करा. राणाजींनीं आपणा स्वतःला व आपल्या बायकापोरांना इतक्या विपत्तींत दिवस कंठायला लाविलें त्यापेक्षां पातशहाशीं सलोखा ठेवून ते राहिले असते तर नसतें कां चाललें ?

**जवान०**—तुमच्या आमच्यासारख्या क्षुद्र माणसांत आणि राणाजीसारख्या थोर विभूतींत अंतर असतें तें येथेंच. आपण

क्षुद्र प्राणी तात्पुरत्या सुखाकडे दृष्टि देऊन त्याप्रीत्यर्थ स्वाभिमान, स्वकुलाभिमान, स्वजात्यभिमान, यांना फार काय, पण स्वदेशाभिमानाला सुद्धां तिलांजलि देण्यास तयार होतों. राणाजीसारखे महात्मे ऐहिक सुखांना तुच्छ मानून कितीही कष्ट सोसावे लागले तरी मनुष्यजीवनाचे उच्च ध्येयापासून आपलें चित्त कधीं भ्रष्ट होऊं देत नाहींत. उच्च ध्येयाच्या प्राप्तीसाठीं असे कष्ट सोसण्यांतच त्यांना एक प्रकारचें सुख वाटतें. रजपूत कुळांत जन्माला यावयाचें तें येवढ्याचसाठीं असें ते म्हणत असतात.

**जालम०**—भाई, आज राणाजीबद्दल तुमच्याकडून बरीच नवी माहिती कळली, तिच्या योगानें मनाचें समाधान झालें. तुमच्याही फार दिवसांनंतरच्या भेटीमुळें मनाला आनंद झाला, आणि एरवीं चकाट्या पिटण्यांत जो काळ गेला असता तो एका महात्म्याचें चरित्र ऐकण्यांत सत्कारणीं लागला. खरोखर तुमचे हे उपकार म्हटले पाहिजेत. तुम्ही आतां परत राणाजीकडे कधीं जाणार आहां ?

**जवान०**—माझ्याकडे कांहीं कामागिरी सोंपविली आहे ती करून पांच चार दिवसांत मी परत जाणार आहें. राणाजीविषयींची खरी माहिती करून त्यांच्या अंगच्या देशाभिमानाचा यत्किंचित् अंश जरी तुमच्यासारख्या एखाद्या सच्चा रजपुताच्या ठायीं स्फुरित झाला तरी इतका वेळ झालेल्या आपल्या संभाषणाचें सार्थक झालें असें मी समजेन.

जालम०—ओघानें गोष्ट निघालीच म्हणून सांगतों. माझ्या मनांत तुमच्यासारखेच राणाजीच्या सेवेंत आपलें उरलेलें आयुष्य घालवावें असें आलें आहे. मी घरादाराची व्यवस्था लावून लवकरच तुम्हांला येऊन मिळणार आहें. पण भाई, राणाजी माझा स्वीकार करतील ना?

जवान०—हें काय विचारावें? राणाजीला तुमच्यासारख्या इमानदार, आणि खऱ्या देशाभिमानी रजपुताच्या साह्याची अत्यंत जरूरी आहे. चितोड शहर परत मिळविण्यासाठीं त्यांच्या जिवाला अतिशय तळमळ लागून राहिली आहे. तुमच्यासारखे इमानी जवानमर्द रजपूत जितके अधिक मिळतील तितकी लवकर त्यांची ती इच्छा पूर्ण होईल. यासंबंधांत पाहिजे तर मी राणाजीजवळ अगोदर बोलून त्यांची मनीषा तुम्हांस कळवीन.

जालम०—फार उत्तम. तर मग मी आतां त्याच उद्योगाला लागतों. तुम्ही मात्र म्हटल्याप्रमाणें करण्यास विसरूं नका.

जवान०—छेः छेः! अशी गोष्ट कशी विसरेन? बरें आहे तर, घेतों आतां रजा! ( दोघेही जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ—अरण्यप्रदेश.

( राणा प्रतापसिंग व त्याचे कांहीं सरदार प्रवेश करतात. )

प्रताप०—विपत्तींत साह्य करणारे मित्र हो, माझ्या बरोबर तुम्हांला आतांपर्यंत अनेक प्रकारें दुःख भोगावें लागलें

आणि अखेर आपली प्रिय जन्मभूमिही सोडण्याचा प्रसंग माझ्याबरोबर तुम्हांला प्राप्त झाला आहे!

**पहिला सर०**—महाराज, असें बोलून स्वतःच्या जिवाला निष्कारण कष्टी कां करतां? आपण जी विपत्ति भोगीत आहां ती काय स्वतःसाठीं आहे? जन्मभूमीच्या उद्धारार्थ आपण जे कष्ट सोशीत आहां त्यांत वाटेकरी होऊन आपणांस साह्य करणें हें आमचें कर्तव्य नाहीं काय?

**प्रताप०**—या अधम प्रतापाच्या हातून जन्मभूमीचें रक्षण सुद्धां कोठें घडलें आहे? आणि आतां तर देशत्याग करण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे!

**दुसरा सर०**—पृथ्वीनाथ! याबद्दल आपण उगाच खेद कां मानावा? परमेश्वराची लीला अगम्य आहे. आपल्या हातूनच योग्य समयीं मेवाडचा उद्धार व्हावा अशी त्या जगचालक प्रभूची इच्छा नसेल कशावरून?

**प्रताप०**—तें कोणीं सांगावें? येवढें खरें कीं आपल्या देखत आपल्या जन्मभूमीची अशी दुर्दशा पाहण्यापेक्षां परदेशीं जाऊन मरण पतकरावें असें मला वाटतें. म्हणूनच मी म्हणतों, भाईहो, जन्मभूमीचा मायामोह सोडून माझ्याबरोबर परदेशाला चला. पण भरधाव घोडा टाकीत हा समोरून कोण येत आहे?

**प० स०**—सरकार, हे आपले दिवाणजी भामाशाह दिसतात.

( भामाशाह येतो. )

**भामाशाह** ( प्रतापास वंदन करून )—हे मेवाडाधिपति, गोब्राह्मणांचे व हिंदुधर्माचे पालनकर्ते, हा भामाशाह तुम्हांला प्रणाम करीत आहे.

**प्रताप**०—भामाशाह, उठा! असे तुम्ही घाबरलेले कां दिसतां? मला कडकडून भेट द्या, आणि काय खबर असेल ती स्पष्टपणें सांगा. कितीही वाईट खबर असली तरी ती ऐकण्यास मन घट्ट करण्याचें आतां माझ्या अंगवळणी पडलें आहे.

**भामा**०— कांहीं एक खबर नाहीं महाराज.

**प्रताप**०—मग असे दौडत कां आलांत?

**भामा**०—माझ्याच्यानें स्वस्थ बसवेना म्हणून. जळावांचून जसा मासा तळमळत असतो, तसा माझा जीव आपणावांचून तळमळत आहे. धिक् माझें जीवन! आपणास माझ्याकडून कांहीं एक साह्य मिळालें नाहीं, माझ्या हातून हें कृतघ्नतेचें महत्पाप घडलें, मीं कर्तव्यपराङ्मुखतेंत इतके दिवस काढले याबद्दल माझ्या जिवाला तळमळ लागून मी आपला शोध करीत येथवर आलों. दुसरें कांहीं नाहीं सरकार.

**प्रताप**०—वृद्धपणीं तुमचे हातून मला कांहीं साह्य झालें नाहीं, यांत तुमचा काय दोष आहे?

**भामा**०—महाराज, आपण जन्मभूमीच्या उद्धारार्थ रानावनांत वणवण करीत आणि अवर्णनीय संकटें सोशीत हिंडावें आणि आपल्या अन्नावर पोसलेल्या या देहानें सुखानें घरीं कालक्रमणा करावी हें कसें होईल? आपल्याच चरणाच्या कृपेनें

मला सुस्थिति व वैभव हीं प्राप्त झालीं. पण वृद्धपणामुळें मी आपली सेवा करण्यास असमर्थ आहें याबद्दल माझ्या मनाला अतिशय दुःख वाटतें, आणि ‘ धिक्कार असो अशा या जिण्याला ’ असे उद्गार माझ्या तोंडून वारंवार निघतात. शेवटीं राहवेना, म्हणून आपल्या दर्शनासाठीं मोठ्या उत्सुकतेनें इकडे आलों.

**प्रताप०**—दिवाणजी, भवितव्य कोणालाही चुकलें नाहीं. माझ्या नशिबीं वनवासच लिहिलेला आहे, त्याला तुमचा किंवा दुसऱ्या कोणाचा काय इलाज आहे?

**भामा०**—महाराज, सेवकाची एक प्रार्थना आहे.

**प्रताप०**—बोला, दिवाणजी! तुमच्या शब्दाला मीं मान दिला नाहीं असें कधीं घडलें आहे काय?

**भामा०**—नाहीं, आणि म्हणूनच प्रार्थना करण्याची धिटाई मी करीत आहें, त्याची क्षमा असावी. महाराज, आपल्या सेवेंत राहून या दासानें आतापर्यंत पंचवीस लक्ष रुपयांची जिंदगी केली आहे. ही आपल्या चरणाचीच कृपा आहे. ती आपल्या चरणीं परत अर्पण करावी अशी माझी इच्छा आहे. तिचा स्वीकार करून महाराजांनीं मला कृतार्थ करावें. या रकमेवर आपणांस एक लहानसें सैन्य उभारतां येईल. तें उभारून आपण दुस्मनांचा समाचार घेण्याचा यत्न पुनः एकवार करून पहावा. तो सिद्धीस गेला तर उत्तमच. दुर्दैवानें फसलाच तर पुढें जो विचार सुचेल त्याप्रमाणें करावें. (प्रतापसिंह इतर सरदारांकडे पाहतो.) महाराज, असा

संकोच कां? हें धन काय माझें आहे? मीं काय तें आपल्या सामर्थ्यावर मिळविलें आहे? सगळा आपल्याच चरणांचा प्रताप आहे. आपणच त्याचे खरे मालक आहां.

**प्रताप०**—दिवाणजी, तुमची स्वामिभक्ति आणि औदार्य यांतून कशाची अधिक तारीफ करावी तें मला कळत नाहीं. तुमच्या देणगीचा स्वीकार करून तुमच्या म्हातारपणीं तुम्हांला विपत्तींत दिवस कंठण्यास लावणें योग्य होणार नाहीं. म्हणून तुमची विनंति मान्य करण्यास मला संकोच वाटतो. दुसरें कांहीं नाहीं.

**भामा०**—महाराज, तो विचारच आपण मनांत आणूं नये. शीर सलामत तो पगडी पच्यायशी. स्वामींच्या कार्यांत जी दौलत खर्चीं पडत नाहीं ती असून नसून सारखीच आहे मला. आपण तिचा स्वीकार केला नाहीं तर मीही तिचा उपभोग घेणार नाहीं अशी शपथ वाहिली आहे. माझा वृद्धापकाळ आहे खरा; पण आपल्या चरणांच्या पुण्याईनें मला मीठ भाकरी खाऊन आपलें कल्याण चिंतीत समाधानानें राहतां येईल. आपण माझ्या विनंतीचा असा अनादर करूं नये. दोन तीन सरदारांना माझेबरोबर द्यावे म्हणजे त्यांच्या हातीं मी रकम बंदोबस्तानें पाठवून देईन.

**प्रताप०**—दिवाणजी, धन्य आहे तुमची! तुमच्या या प्रेमळ आणि उदार देणगीनें माझ्या मनांत मेवाडच्या उद्धाराविषयींची आशा पुनः प्रेरित केली आहे. तुमच्या देणगीचा मी अत्यंत आदरपूर्वक स्वीकार करतों. मला निमित्त

करून तुमच्या हातानें जन्मभूमीचा उद्धार करण्याचा ईश्वरी संकेत नसेल कशावरून? (सरदारांस) जगजीवन, रामसिंग, आणि जवानसिंग! तुम्ही तिघे दिवाणजीबरोबर जा. तुम्ही येईपर्यंत आम्ही येथेंच मुकाम करतों. पुढें काय करावयाचें त्याचे बेत तुम्ही आल्यावर करूं. (सरदार जातात.)

(पडदा पडतो.)

## प्रवेश तिसरा.

स्थळ—प्रतापसिंगाचा वाडा.

(प्रतापसिंग मृत्युशय्येवर पडला आहे. भोंवतालीं त्याची विश्वासु सरदार मंडळी बसली आहे.)

**रणधीरसिंग**—महाराजांनीं आतां राज्याविषयीं बिलकुल फिकीर करूं नये. महाराजांच्या पुण्यप्रतापानें आणि श्रीएकलिंग देवाच्या कृपेनें गनीम आतां पुरतेपणीं चीत झाला आहे. रजपुतांच्या वाटेस जाण्याचें तो आतां नांवही काढणार नाहीं. रजपुतांच्या नांवाला कित्येक हरामखोर, बदजात, बेइमानी कुलांगारांनीं लाविलेला कलंक महाराजांनीं धुऊन काढून रजपुतांच्या तलवारीचा दरारा पुनः प्रस्थापित केला आहे. या कामीं महाराजांना अत्यंत परिश्रम करावे लागले, व संकटें सोसावीं लागलीं, पण त्याचें फळ श्रीच्या कृपेनें मिळून उदेपूरच्या प्रजेला पुनः स्वातंत्र्याचा लाभ झाला, येवढ्यानें महाराजांची कीर्ति इतिहासांत अजरामर होऊन राहील.

प्रताप०—मलाच एकट्याला नाहीं, तर माझ्या बरोबरच्या प्रत्येक माणूसमात्राला अमर्याद कष्ट व विपत्ति सोसावी लागली आहे यांत शंका नाहीं. अशा संकटाचे काळीं भामाशाह सारखे उदार व इमानदार साह्यकर्ते नसते तर मी एकट्यानें काय केलें असतें? मला द्रव्याची जरूरी लागली तेव्हां त्यांनीं आपण होऊन आपलें सारें द्रव्य देशकार्यासाठीं माझ्या स्वाधीन केलें.त्याच्यायोगानें शत्रूशीं लढण्याला मला केवढें बळ आलें तें मी तोंडानें काय सांगू? तसेंच तुम्ही रणधीरसिंग! तुम्ही आपल्या वर्तनानें नांवाला सार्थता आणिली. जवानसिंगांना तर अनेक वेळीं शत्रूकडच्या बातम्या काढतांना धोक्यांत जीव घालावा लागला; सज्जनसिंगही तसेच इमानदारीनें व हुशारीनें हरएक काम करीत आले. तुमच्या साऱ्या सरदारांच्या व सेवकांच्या जिवावर माझी एकंदर भिस्त होती. तुम्ही आपला रजपुतांचा बाणा कायम राखून जिवाकडे न पाहतां उदेपूरच्या गादीची सेवा निरपेक्ष रीतीनें केली म्हणूनच येवढा कार्यभाग मला साधतां आला. मी आणखी कांहीं दिवस वांचलों असतों तर या मेवाडांतच काय, पण साऱ्या राजस्थानांत, अविंधांचें नांवसुद्धां राहूं दिलें नसतें. तुमच्यासारख्या इमानदार, देशाभिमानी, तलवार बहादर सरदारांचें पूर्ण साह्य असल्यावर ती गोष्ट काय अशक्य होती? परंतु तसें घडावें अशी परमेश्वराची इच्छा दिसत नाहीं. मर्जी त्याची!

**जवान०**—महाराजांनीं त्याची फिकीर बाळगूं नये. महाराजांच्या पुण्यप्रतापानें ही त्यांची इच्छा पूर्ण करण्याचे कामीं हे प्राण खर्ची पडले तरी बेहेत्तर आहे अशी प्रतिज्ञा मी या चरणापाशीं करण्यास तयार आहें.

**रणधीर०**—आणि कोणता रजपूत तयार नाहीं? मीही या चरणांजवळ तशीच प्रतिज्ञा करतों.

**प्रताप०**—जवानसिंग, रणधीरसिंग, तुम्ही म्हटल्याप्रमाणें करण्यास चुकणार नाहीं ही माझी पूर्ण खात्री आहे. त्यासाठीं शपथा घेण्याचें कारण नाहीं. राजस्थानांतून या अविंधांना घालवून देऊन त्यांचा नायनाट करणें हें काम मुष्किलीचें आहे. तें तुमच्या हातून झालें तर तुमचे स्वर्गस्थ पूर्वज तुमच्यावर प्रेमाश्रूंचा वर्षाव करतील आणि तुमच्या जयजयकारानें त्रिभुवन गर्जवून सोडतील. ती मोठी गोष्ट तूर्त राहूं द्या. पण एक गोष्ट माझ्या जिवाला अगदीं लागून राहिली आहे. ती जरी तुमच्या हातून पार पडली तरी माझ्या आत्म्याला संतोष होईल. आपण आपलें राज्य बहुतेक परत मिळविलेंच आहे. पण चितोड अद्याप आपले हातीं आलें नाहीं. त्या आशेंत माझा सारा जीव गुंतून राहिला आहे. ज्या चितोडासाठीं बाप्पा रावळापासून आज तागाईत हजारों रजपूत लढून त्यांनीं धारातीर्थीं आपले देह ठेविले, ज्या चितोडाच्या संरक्षणार्थ लक्षावधि रजपूत स्त्रियांच्या हातांतलीं कंकणें फुटून वैधव्य आलेलें सुद्धां त्या स्त्रियांनीं संतोषानें पतकरलें, ज्या चितोडसाठीं रजपुतांनीं रक्ताचीं शिंपणें

केलीं, ज्या चितोडसाठीं रजपूत स्त्रियांनीं तीन वेळां जोहार केला, ज्या चितोडसाठीं हजारों आत्महत्त्या, भयंकर वध, आणि अदृष्टपूर्व रक्तपात झाला, तो रजपुतांचा कंठमणि, तो मेवाडचा सौभाग्यतिलक, तो रजपुतांच्या धैर्याची व शौर्याची परीक्षा पाहणारा चितोडगड शत्रूंच्या हातून सोडवितां आला नाहीं ही मला केवढी लांछनास्पद गोष्ट आहे? 'प्रतापसिंगा, थूः तुझ्या शौर्याच्या कीर्तीवर आणि शिसोदे वंशांत जन्म पावल्याबद्दलच्या कुलाभिमानावर! प्रताप हें तुझें नांव व्यर्थ आहे. तू आपल्या नांवाला कालिमा लाविलास' असें ते पहा माझे पूर्वज मला धिक्कारपूर्वक म्हणत आहेत. त्यांना मी आतां कसें तोंड दाखवूं? माझ्या स्वर्गस्थ पितरांनो, हा प्रताप तुमचा खरोखर गुन्हेगार आहे. याला त्याच्या कर्तृत्वशून्यतेबद्दल तुम्ही चांगलें कडक शासन करा. हा त्या शिक्षेला सर्वथा पात्र आहे. तुम्हांला तोंड दाखविण्यास मला खरोखर शरम वाटते. ( वस्त्रानें तोंड झांकतो. )

**सज्जन०**—महाराजांची शक्ति अगोदरच क्षीण झालेली आहे. तशांत महाराजांनीं आपल्या जिवाला अशा रीतीनें दुःख दिल्यास चांगला परिणाम होणार नाहीं. महाराजांनीं आतांपर्यंत जें कार्य केलें आहे तें येवढें मोठें आहे कीं त्याच्यामुळें त्यांची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ या भारतवर्षांत राहील. परमेश्वरानें महाराजांना उदंड आयुष्य द्यावें म्हणजे चितोडगडच काय पण सारा राजस्थान शत्रूच्या हातून मुक्त होऊन पुनः स्वतंत्र होईल.

प्रताप०—तें घडलेलें पाहणें माझ्या भाग्यांत नाहीं. माझा अंतकाळ जवळ येऊन ठेपला आहे. आतां माझी तुम्हांला शेवटची प्रार्थना हीच—

सर्व—काय आज्ञा आहे?

प्रताप०—माझा हेतु इतकाच कीं माझा देश माझ्या पश्चात् परकीयांचे हातीं जाऊं नये. येवढी खात्री तुम्हीं दिलीत म्हणजे मी संतोषानें मरेन.

सर्व—आमच्यापैकीं प्रत्येकजण आपली ही आज्ञा शिरसावंद्य मानून तिच्या सिद्धीसाठीं प्राणसुद्धां अर्पण करण्यास तयार आहे.


प्रताप०—फार आनंदाची गोष्ट आहे. मरणोन्मुख माणसाच्या इच्छा तृप्त करण्याविषयीं अशीच तत्परता लोक नेहमीं दाखवितात, आणि त्याचें प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर सगळ्या गोष्टी विसरतात; तसें तुमच्या हातून होणार नाहीं अशी मी आशा करतों. तुम्ही आतां जे शब्द उच्चारले व ज्या शपथा घेतल्या त्यांचें स्मरण राहूं द्या. नाहीं तर माझी पाठ फिरतांच तुम्हांला विलाससुख भोगण्याची बुद्धि होईल; आपल्या झोंपड्या टाकून तुम्ही मोठाले वाडे बांधाल, आणि दिल्लीपतीच्या चरणकमळीं मस्तकें घासून त्याचा प्रसाद म्हणून मोठाले अधिकार, मानपान आणि संपत्ति मिळवून दुसऱ्याची गुलामगिरी करण्यांतच भूषण मानाल. असें करूं नका; पूर्वजांच्या शुभ्र कीर्तीला कलंक लावण्याचें नीच कर्म

करूं नका. राजस्थानाचा आणि त्यांतही विशेषतः मेवाडच्या गादीचा अभिमान आतां तुम्हांस वाटत आहे तसाच तो पुढेंही वाटूं द्या, येवढेंच माझें तुम्हांला अखेरचें सांगणें आहे.

**सर्व**—जर आम्ही खरे रजपूत असूं तर महाराजांच्या इच्छेप्रमाणें चालूं. झोंपड्या टाकून वाडे बांधणार नाहीं. ऐष-आरामांत राहून जन्मभूमीशीं द्रोह करणार नाहीं, आणि मेवा-डचें स्वातंत्र्य जें महाराजांनीं येवढ्या परिश्रमानें संपादलें आहे त्याच्या संरक्षणार्थ आमच्या रक्ताचा शेवटचा थेंब खर्च कर-ण्यास मागें पुढें पाहणार नाहीं.

**प्रताप**०—तुमचेकडून येवढें आश्वासन मिळाल्यावर मला आणखी काय पाहिजे? आतां मला सुखानें मरण येईल.

( पडदा पडतो. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग दहावा.

### खरा ब्राह्मण.

**कथाभाग**—दक्षिणेंत मुसलमानांची सत्ता सर्वत्र स्थापित झाली होती अशा वेळीं तेथें एक हिंदुराज्यही हळूं हळूं उदयास येत होतें. या राज्याच्या गादीवर हरिहरराय नांवाचा राजा असतां त्याच्या प्रधानाचें पद माधवाचार्य नांवाच्या एका विद्वान् , निःस्पृह, सुशील आणि दक्ष अशा ब्राह्मणाकडे होतें. यानें विजयनगर नांवाचें नगर वसवून तें राजधानीचें ठिकाण केलें आणि अशा चातुर्यानें राज्याचा कारभार चालविला कीं लवकरच विजयनगर हें संपत्ति, ऐश्वर्य, शांतता, सुरक्षितता, प्रजेचा संतोष, इ. सर्व बाबतींत अप्रतिम म्हणून त्याची सर्वत्र कीर्ति झाली. मुसलमान राजां-

च्यानें हें पाहवेना, आणि त्यांनीं तें हिंदुराज्य बुडविण्यासाठीं हरतऱ्हेच्या युक्त्या करून पाहिल्या. पण माधवाचार्य मुख्य मंत्र्याचे पदावर होते तोंपर्यंत मुसलमान राजांचें कांहीं चाललें नाहीं. पुढें पुष्कळ वर्षांनीं अखेर मुसलमान राजांनीं जूट करून तें राज्य नष्ट केलें. या इतिहासांतला माधवाचार्यांच्या वर्तनापुरता भाग या प्रसंगांत आलेला आहे.

# खरा ब्राह्मण.

पात्रें.

**माधवाचार्य**--विजयनगरचा राजा हरिहरराय याचा ब्राह्मण मंत्री.

**शुक**—त्याचा शिष्य.

**बदरीनाथ**—विजापूर दरबारचा एक सरदार.

## प्रवेश पहिला.

स्थळ—आचार्यांचा आश्रम.

( बदरीनाथ प्रवेश करतो. )

**बदरी॰**--( स्वगत ) एकीकडे आड आणि एकीकडे विहीर अशी माझी स्थिति झाली आहे! विजयनगरचें राज्य म्हणजे आम्हां हिंदूंचें राज्य. त्याचा अभिमान आम्हां हिंदूंना नाहीं तर मग कोणाला वाटायचा? मला तरी निदान पोटांतून तो वाटतो. कां वाटणार नाहीं? विजयनगरचे स्वामी आणि मी एका हाडामासाचे, एका रक्ताचे, एकाच देवाची पूजा करणारे, एकाच धर्मग्रंथाला म्हणजे वेदांना पूज्य मानणारे; गोब्राह्मण दोघांनाही सारखेच वंद्य. मग माझा जीव या विजयनगरच्या राज्याकडे ओढला गेला तर काय नवल? आज मी या राज्यांत आहें म्हणून मला हें उघड रीतीनें बोलतां

तरी येतें. आमच्या पातशाहाच्या राज्यांत असें बोललों तर हत्तीच्या पायाखालींच लोळण घेण्याची पाळी आली असती! हिंदुराज्य असून येथें पुनः अविंधाचा द्वेष नाहीं. केवढा उदारपणा हा! नाहीं तर आमचा विजापूर दरबार! या हिंदुपदपातशाहीनें त्याचें काय घोडें मारलें आहे? पण हिंदूंचा उत्कर्ष त्या दरबारच्या डोळ्यांत सलत आहे. अशा अविंधांची सेवा करण्याचा प्रसंग आमच्यासारख्या हिंदूवर यावा हें पूर्वजन्मींच्या दुष्कृताचें फळ म्हटलें पाहिजे, दुसरें काय ? या विजयनगरचें ऐश्वर्य काय, संपत्ति काय, व्यवस्था काय, बंदोबस्त काय, शिस्त काय, जें पहावें तें अलौकिकच! ख्याति ऐकत होतों त्यापेक्षांही प्रत्यक्ष पाहण्यांत कांकणभर ज्यास्तच! अशा राज्याला पादाक्रांत करण्याची असुरी इच्छा धारण करून आमच्या पातशहांनीं प्रत्यक्ष स्थिति अवलोकन करण्यासाठीं वेषांतर करून येथें येण्याचा मला हुकुम दिला, हा पातशहाचा माझ्यावर मोठा अनुग्रहच म्हटला पाहिजे. हुजूरच्या हुकुमाप्रमाणें वेषांतर करून मी आज कित्येक दिवस या नगरांत हिंडलों, आणि बारकाईनें सगळें कांहीं पाहिलें. पण कोठेंही जुलूम, प्रजेचा असंतोष किंवा अधर्माचरण, न्यायाच्या कामीं ढील किंवा बंदोबस्तांत व्यंग असें दिसतच नाहीं या दृष्टीला! मी बादशहाकडे परत जाऊन काय सांगणार! खरें सांगावें तर हुजुरला रुचावयाचें नाहीं. मी हिंदु म्हणून हिंदुराजाचा अभिमान धरून बोलतों, आणि स्वामीशीं निमकहरामपणा करतों असें बादशहाला वाटायचें! तेव्हां कांहीं तरी काल्पनिक व्यंगें

दाखवून मला या राज्याची निंदा करणें भाग आहे. आम्हां दरबारी लोकांना आपला बडेजाव कायम राखण्यासाठीं मालकाच्या मर्जीचा कल पाहून कोणाची तरी खोटी स्तुतिनिंदा करण्याची विद्या उपजतच अवगत असते म्हणा! तोंडपुजेपणा हा आमच्या षष्ठीला पुजलेला असतो. तेव्हां आपल्याकडे सोपविलेली कामगिरी आपण सफाईनें बजावून देऊं. पण खरें विचाराल तर अंतःकरणाचा सगळा ओढा इकडे आहे. ज्या महापुरुषाच्या पुण्यकारक कृतीनें या राज्याला हें ऐश्वर्य प्राप्त झालें आहे त्या सत्पुरुषाचें एकवार दर्शन तरी घडावें म्हणून मी आज मुद्दाम इकडे आलों आहें. तेव्हां तें काम अगोदर केलें पाहिजे. येवढ्या मोठ्या राज्याचीं सूत्रें हलविणारे महामंत्री भल्या मोठ्या टोलेजंग वाड्यांत राहत असतील, त्यांच्या भेटीला सतरा ठिकाणचे परवाने लागतील व चौक्यापाहरे ओलांडून जावें लागत असेल अशी माझी कल्पना होती. पण येथें पाहतों तो तशांतला कांहींच प्रकार दिसत नाहीं. माधवाचार्य या भिकार आश्रमांत राहतात आणि त्यांच्याकडे जाण्याला कोणालाही मज्जाव नाहीं! ही गोष्ट कोणाला खरी तरी वाटेल काय? महात्म्यांचें सगळेंच विचित्र असतें हीच गोष्ट खरी. आश्रमाच्या दाराशीं हा ब्राह्मणबटु उभा आहे. त्यालाच आचार्यांबद्दलची माहिती विचारावी.

( शुकाजवळ जाऊन )

नमस्कार, ब्राह्मणबटो, नमस्कार.

शुक–नमस्कार. आपण कोण व कोणीकडे आलां?

बदरी०–श्रीमान् मंत्रिवर माधवाचार्य येथेंच राहतात ना? मला त्यांचें दर्शन घ्यायचें आहे.

शुक–होय. आचार्य येथें राहतात खरे, पण त्यांची गांठ यावेळीं पडणार नाहीं.

बदरी०–कां बरें?

शुक–आचार्य यावेळीं स्नानसंध्यादि नित्यकृत्यांत गुंतलेले आहेत. सकाळीं नऊवाजेपर्यंत ते कोणाचीही भेट घेत नाहींत.

बदरी०–हा आश्रम त्यांनीं स्नानसंध्या, जपतपादिकर्में निवांतपणीं करतां यावीं म्हणून बांधलेला दिसतो. पण राज्यकारभाराचीं कामें ते कोठें करतात?

शुक–त्यांची स्नानसंध्या, हव्यकव्य, पठनपाठन, ग्रंथलेखन, राज्यकारभार, सगळीं कामें येथेंच होतात.

बदरी०–हा साधेपणा अत्यंत आश्चर्यकारक आहे म्हणायचा!

शुक—आश्चर्य कसलें? आपण ब्राह्मण आहों. साध्या राहणीनें गरीबींत दिवस काढून इतर लोकांना वर्तनाचा उत्तम कित्ता घालून द्यावा हें ब्राह्मणाचें कर्तव्य ते विसरले नाहींत.

बदरी०–आश्रम तर लहान दिसतो. त्यांत पाकशाला कोठें दिसत नाहीं हें कसें काय?

शुक–आचार्यांना पाकशाळेची अवश्यकताच लागत नाहीं. त्यांचा आहार म्हणजे फळें व दूध. ती पलीकडे फळझाडांची

बाग आहे, ती त्यांनीं स्वतः हातानें लाविली आहे. उजव्या हाताला जी पडवी दिसते ती गोशाळा. तींत तीनचार गाई आहेत. सकाळीं ते स्वतः गाईची सेवा करतात, आणि गोदोहन करून दुधाचा व फळाचा नैवेद्य देवाला समर्पण केल्यावर त्यांचें सेवन करतात. याप्रमाणें चोवीस तासांत दोनदां आहार करतात. दिवसभर आपला नियमित व्यवसाय करून बारा घटका रात्र झाली म्हणजे या लोकरीच्या आसनावर बसून देवाचें नामस्मरण करून या आसनावरच झोपीं जातात.

**बदरी०**–वाहवा! साऱ्या राज्याचा प्रपंचभार ज्यांनीं शिरावर घेतलेला आहे त्यांचा स्वतःचा प्रपंच इतका अल्प असलेलें हें एक अद्वितीयच उदाहरण म्हणावयाचें?

**शुक** ( कानोसा घेऊन )–आचार्यांचें ध्यान आटोपून गीतापाठ सुरू झाला वाटतें. आतां आपणाला फार वेळ थांबावें लागणार नाहीं. आपण या शिलाखंडावर बसावें. आचार्य आतां लवकरच बाहेर येतील. मीही आपल्या कामाला जातों. ( शुक जातो. )

**बदरी०**–( स्वगत ) या महात्म्याचें जें जें पहावें तें तें अलौकिकच! या पुरुषाची साधी राहणी कोणीकडे आणि आमच्या इथल्या दिवाणांचा बडेजाव कोणीकडे! इथें शिपाईप्यादे नाहींत; पहारा नाहीं; कोणालाही भेटण्याला मज्जाव नाहीं; आमच्या दिवाणसाहेबांच्या दाराशीं स्वार, खासबरदार, चोपदार वगैरे लोकांची गर्दी. येवढ्या गर्दींतून आंत नुसता निरोप पोहोचण्याला दोन दोन दिवस लागायचे! आणि मग भे-

टीचा विचार होऊन काय तें ठरायचें! विद्या व विनय हीं आचार्यांचीं भूषणें; तर कंठी, शिरपेंच, इत्यादि अलंकार हीं आमच्या इथल्या नंदीबैलांचीं भूषणें आहेत!

( माधवाचार्य बाहेर येतात; बदरीनाथ नमस्कार करतो. आचार्य विनयपूर्वक त्याचा स्वीकार करतात )

**बदरी०**—आपल्या दर्शनाची इच्छा धरून आल्यासारखें तें झाल्याबद्दल माझ्या मनाला फार आनंद वाटत आहे.

**माध०**—आपण आलांत ही फार चांगली गोष्ट आहे. मी आपल्या आगमनाची मार्गप्रतीक्षाच करीत होतों.

**बदरी०** ( मनांत )—हे मला कोणी निराळेंच समजतात वाटतें. ( उघड ) आपली कांहीं गैरसमजूत झालेली दिसते. आपण समजतां तो मी नाहीं. मी फार दुरून आलेला एक गरीब यात्रेकरू आहें.

**माध०**—या जगांत आपण सगळेच यात्रेकरू आहों. कांहीं वेळ मुकाम करून सर्वांनाच पुढें जायचें आहे. माझी बिलकुल गैरसमजूत झालेली नाहीं, अन् आपण दुरून आलेला असें मोघम बोलण्याचेंही कारण नाहीं. आपण कोण, कोठून, केव्हां व कशाकरितां आलां आहां तें सगळें मला कळलें आहे. आपल्या यजमानाचें क्षेमकुशल आहे ना?

**बदरी०** ( स्वगत )—यांचा माझ्याविषयीं गैरसमज झाला आहे कीं यांना खरोखरीच माझेविषयींची बातमी लागली आहे? यांचें हें डावपेचाचें बोलणें माझ्या पोटांतलें काढून

घेण्यासाठीं तर नसेल? ( उघड ) अजून आपला गैरसमज कायम आहेसा दिसतो.

**माध०**—हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे? ( शुकाला हाक मारून ) शुका, मघा वाड्यांतून पाहुण्यासाठीं पोषाखाचा थाळा आला आहे तो आण पाहूं? ( शुक तो आणितो. त्यांत बदरीनाथ विजापुरांत करीत असे तसाच हुबेहुब पोषाख दिसतो. तो पुढें करून ) विजापूरच्या आदिलशहाची आम्हांस अशी सूचना आहे कीं इकडून येणारे एक यात्रेकरू आपला पोषाख येथेंच विसरले आहेत. तो जासुदाच्या हातीं इकडून पाठविण्यांत येत आहे. तो त्यांचा त्यांस द्यावा. आतां तर आपली खात्री झाली ना?

**बदरी०**—( शरमिंधा होऊन ) मी सर्वस्वी आपला अपराधी आहें. अपराधाची क्षमा असावी.

**माध०**—बदरीनाथ, तुम्ही आमचा कांहीं अपराध केला नाहीं, तर क्षमा कशाची करायची? अपराध केलाच असला तर तो तुम्हीं आपल्या धर्माचा केला आहे. अहो, असें पहा आपल्या हिंदुधर्माला सध्या कोणी त्राता उरला नाहीं. जिकडे पहावें तिकडे यवनांचें राज्य झालें आहे. दक्षिणेंत हें विजयनगरचें राज्य तेवढें हिंदुराज्य आहे. तेव्हां तुमच्यासारख्या हिंदूंनीं वास्तविक म्हटलें म्हणजे आपल्या हिंदुधर्माचा अभिमान धरून हिंदुराजाची सेवा पतकरायची. पण तसें न करतां वीतभर पोटाच्या खळीसाठीं तुम्ही गोब्राह्मणांचा छळ करणाऱ्या यवन राजाची सेवा पतकरली. सेवा-

धर्म एकदां पतकरल्यावर मग लोभानें मनुष्य हवीं तीं नीच कर्मे करण्यास उद्युक्त होतो किंवा त्याला तीं करावीं लागतात. मी स्पष्टपणें बोलतों याबद्दल मला माफ करा. पण मी विचारतों कीं निःस्पृहता, निर्लोभिता, अदांभिकत्व हे ब्राह्मणाचे गुण शास्त्रांत सांगितले आहेत ना? ते आपल्या हातून कितीसे पाळिले जातात, याचा नीट विचार करा; म्हणजे ब्राह्मण सध्या किती दुर्गतीला पोचले आहेत व अशी त्यांची स्थिति कां झाली आहे तें तुम्हांला कळून येईल. तुमच्या आदिलशाहींत ब्राह्मणांची स्थिति कशी काय आहे?

**बदरी०**—अतिशय वाईट आहे. ब्राह्मण म्हटला म्हणजे तो सर्वांच्या अवहेलनेस व तिरस्कारास पात्र झालाच.

**माध०**—याचें कारण काय असेल असें तुम्हांला वाटतें?

**बदरी०**—ब्राह्मणांची अभिमानशून्यता! दुसरें काय असणार? लोभबुद्धि सगळ्या अभिमानाचा पार नाश करून टाकते, आणि माणसाला तृणवत् करून सोडते.

**माध०**—हें खरें ना? तर मग यापुढें तुमच्यासारख्या ब्राह्मणांनीं काय करावयास पाहिजे तें तुमच्या ध्यानांत आलेंच असेल.

**बदरी०**—होय. आपण माझ्या डोळ्यांत जें ज्ञानांजन घातलें आहे त्यानें आतां माझे डोळे चांगले उघडले आहेत, आणि जो कर्तव्यमार्ग मला पूर्वीं दिसत नव्हता तो आतां दिसूं लागला आहे. माझ्यावर आपले हे अनंत उपकार आ-

हेत असें मी समजतों. मी आपलेकडे दुष्ट बुद्धीनें आलों होतों खरा, पण आतां ती दुष्ट बुद्धि गळाली. आतां शिष्यत्वाच्या दृष्टीनें आपण माझा स्वीकार करावा, अन् माझ्याकडून सेवा घ्यावी. मी आपले चरणापाशीं लवकरच कायमचा येऊन राहण्याचा विचार केला आहे.

**माध०**–नको नको. येथें माझ्यापाशींच येऊन राहिलें पाहिजे असें नाहीं. माझ्या म्हणण्याचा भावार्थ तुमच्या गळीं पूर्णपणें उतरला असला तर येथच्यापेक्षां तेथूनच तुम्हांला माझ्या उपयोगीं–म्हणजे आपल्या हिंदुराज्याच्या उपयोगीं–अधिक पडतां येईल. सर्व ठिकाणच्या वित्तंबातम्या अतिशय त्वरेनें आणण्याची माझी व्यवस्था आहे हें तुमच्या अनुभवाला आलेंच आहे. त्यांत वेळोवेळीं तुमच्याही मदतीची भर पडल्यास या हिंदुराज्याचें एक मोठें कार्य होईल. आतां माझी राजवाड्यांत जाण्याची वेळ झाली आहे. तेव्हां तुम्हांला निरोप देणें मला भाग आहे.

**बदरी०**–मी येतों तर. माझ्याविषयीं मनांत यत्किंचितही किंतु न बाळगतां माझ्या हातून वेळोवेळीं सेवा घ्यावी व मला कृतार्थ करावें येवढी माझी प्रार्थना आहे. ( नमस्कार करून जातो. )

**माध०**–तथास्तु. जयसच्चिदानंद! जयसच्चिदानंद!

( जातो. )

---

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग अकरावा.

### गर्वाचें घर खालीं.

**कथाभाग**—दक्षिणेंत विजयनगरचें राज्य फार वैभवशाली व प्रबळ झालेलें पाहून आसपासच्या मुसलमान राजांनीं जूट करून तें राज्य बुडविण्याचा कट केला. त्यांना संधीही चांगली मिळाली. विजयनगरचा राजा सदाशिवराय हा दुर्बळ होता. त्याचा दिवाण रामराय हा व त्याचे दोघे बंधु या तिघांनीं राजाला सर्वस्वी आपल्या हुकुमतींत ठेविलें होतें. रामरायाचा स्वभाव फार महत्त्वाकांक्षी, आणि उर्मट होता. त्यामुळें खुद्द विजयनगरचेच कित्येक मोठाले सरदार त्रासले होते. रामरायानें मुसलमान बादशहाकडून आलेल्या वकिलांचा भरदरबारांत अपमान करून त्यांना हांकून लावि-

त्याबरोबर लढाईला आयतेंच निमित्त मिळून मुसलमानी फौजा विजयनगरावर चाल करून गेल्या. रामरायाच्या बाजूनें लढणारे पुष्कळ सरदार होते; पण ते केवळ वरपांगी लढत होते. मनापासून लढणारे फार थोडे होते. तालीकोट येथें रामराय व मुसलमान यांच्यामध्यें जंगी लढाई झाली. या लढाईच्या वेळीं रामरायाच्या हातून बऱ्याच चुका झाल्या, आणि हिंदुराजाचा पराभव होऊन विजयनगरचें राज्य मुसलमानांचे हातीं गेलें. विजयनगरची सगळी संपत्ति मुसलमानांनीं लुटून नेली; हजारों हिंदुलोकांची कत्तल केली; अनेक सुंदर सुंदर इमारती, वाडे व देवळें यांना जमीनदोस्त केलें; सगळा देश उजाड करून टाकला. या तालीकोटच्या लढाईच्या किंचित् अगोदरची स्थिति, या लढाईचे वेळीं ठळक ठळक सरदारांच्या मनाची वृत्ति कशी होती, व त्या वेळीं हंबीररावासारखे थोर मनाचे व उच्चप्रतीच्या देशाभिमानानें प्रेरित अशीं माणसें व इंदुमतीसारख्या खऱ्या वीरपत्न्या असल्यामुळेंच विजयनगरचा टिकाव त्या काळापर्यंत कसा लागला होता–वगैरे गोष्टी या प्रसंगांत पाहण्यास मिळतील.

# गर्वाचें घर खालीं !

पात्रें.

दौलतराव—विजयनगरचा एक सरदार.

हंबीरराय—विजयनगरचा दुसरा एक सरदार.

इंदुमती—दौलतरावाची स्त्री.

## प्रवेश पहिला.

स्थळ—दौलतरावाचा वाडा.

( दौलतराव व हंबीरराव बोलत बसले आहेत. )

दौलत०—हंबीरराव, पाहिलातना आजच्या दरबाराचा प्रकार? आतां तुम्हीच सांगा हा प्रकार तुम्हांला कसा काय आवडतो तें ?

हंबीर०—हा प्रकार कोणाला आवडणार आहे? राज्याचा मालक सदाशिवराय याला तो गुलाम रामराय कळसूत्री बाहुल्यासारखा नाचवीत असतो. घोटभर पाणी पी असें दिवाणानें म्हटलें कीं राजानें घोटभरच पाणी प्यालें पाहिजे. ज्यास्ती पिण्याची त्याची काय प्राज्ञा आहे? रामराय आणि त्याचे दोघे भाऊ तिरुमल आणि वेंकटाद्रि यांचें त्रिकूट करील ती आज या विजयनगरांत पूर्वदिशा होत आहे.

दौलत०—राजसत्तेला या गुलामानें आपल्या मुठींत आ-

णून सोडलें आहे. पण खरें पुसाल तर त्याचेंसुद्धां मला आज येवढें वाटत नाहीं. कारण, सदाशिवरायाच्या अंगांत जर कांहीं कर्तृत्वशक्ति असती तर त्यानें आपल्या सरदारांच्या साह्यानें या महत्त्वाकांक्षी हरामखोर दिवाणाला आपल्या कह्यांत ठेविलें असतें. मालक कर्तृत्वशून्य असले कीं दिवाण शिरजोर व्हायचेच. पण राजा कर्तृत्वशून्य असला कीं त्याचे सारे सरदारही तसेच कर्तृत्वशून्य असतात असें जें हा रामराय समजतो आहे तें कसें खोटें आहे तें त्याला केव्हां तरी कळायला पाहिजे, आणि तें कळण्याची संधी आतां अनायासें प्राप्त झाली आहे. आज दिवाण रामरायानें विजापूरच्या बादशाहीकडून आलेल्या वकिलाचा भरदरबारांत जो अपमान केला, त्याचा सूड उगवल्यावांचून आदिलशहा कधीं राहणार नाहीं. महिन्यापंधरा दिवसांतच लढाईचा प्रसंग येऊन ठेपणार, आणि मग पाहतों तुमच्या आमच्यासारख्या सरदारांवांचून हा मुसलमानांशीं कसा लढाई करतो तें. महाष्ट्रावरच्या स्वारींत तुम्ही, लोचनराय, आणि सांबराय यांच्यासारखे तलवारबहादर सरदार बरोबर नसते तर तो मुलूख या रामरायाच्यानें सर करवला असता काय? तसेच कुतुबशाहीच्या कुमकेस हा रामराय गेला तेव्हां मी, विजयराय व व्यंकटराय, यांच्यासारखे सरदार त्याची पाठ राखायला नसतों तर या गुलामानें मुसलमानांशीं तोऱ्यानें वागून आपली छाप त्यांचेवर बसविली ती त्याला कशी बसवितां आली असती तें पाहिलें असतें. पण या मागच्या गोष्टी हा

हरामखोर आतां अगदीं विसरला आहे आणि आतां तुम्हां आम्हांला कस्पटासारखें समजूं लागला आहे! बरें आहे म्हणावें. हल्लींच्या युद्धाच्या प्रसंगीं तूं एकटा मुसलमानांच्या जुटीपुढें कसा काय टिकाव धरतोस तें दिसेलच.

**हंबीर०**—म्हणजे आतांच्या मोहिमीवर जायचें नाहीं असा तुम्हीं विचार केला आहे कीं काय?

**दौलत०**—होय. असाच माझा विचार आहे; आणि तुम्हीं व बाकीचे सरदार ज्यांना म्हणून यत्किंचित् स्वाभिमान आहे त्यांनींसुद्धां हाच विचार करावा असें माझें म्हणणें आहे.

**हंबीर०**—तुम्ही म्हणतां तें खरें; पण विजयनगरचें सिंहासन डळमळूं लागल्यावर स्वाभिमानाला बाजूला ठेवून देशाभिमानाला आणि स्वामिभक्तीला आपण जागलें पाहिजे असें मला वाटतें. दौलतराव, हा रामराय काय दोन दिवस टुरटुर करील, आणि पेंचांत सांपडला म्हणजे तुमचे पायही धरायला येईल. आजपर्यंत याच्यासारखे कैक दिवाण झाले आणि पुढें होतील. पण दक्षिणेंत हिंदुपदपातशाही ही येवढीच आहे आणि तीही मुसलमान राजांच्या डोळ्यांत सलत आहे. अशा वेळीं रामरायासारख्या क्षुद्र व्यक्तीकडे पाहायचें कीं हिंदुपदपातशाहीची गादी कायम राहील अशी तजवीज करायची याचा विचार तुम्हीं आम्हीं अगोदर नीट केला पाहिजे. आज कसलाही दुर्बळ कां होईना पण या गादीवर आपला हिंदु राजा आहे, त्यामुळें गोब्राह्मणांचा प्रति-

पाळ होत आहे; हिंदुधर्माचें रक्षण होत आहे; तुमच्या आमच्यासारख्या सरदारांना वर मान करून आम्ही हिंदु आहों असें अभिमानानें म्हणायास सांपडतें आहे. या मोहिमींत तुम्ही आम्ही अलिप्त राहिलों तर परिणाम काय होईल? मुसल्मान राजांनीं या खेपेस जूट करून हिंदुराज्य नष्ट करण्याचा दृढ संकल्प केला आहे. अशा वेळीं आपण हिंदु सरदार स्वतःच्या मानासाठीं घरीं बसून राहिलों, आणि लढाईत, समजा, हिंदूंना अपयश आलें तर या विजयनगरची हिंदुगादी नष्ट होऊन अविंधाचें राज्य होईल, आणि तुम्हां आम्हांला मग अविंधापुढें मान झुकवून कुर्निसात करावी लागेल; हिंदूंचीं धर्ममंदिरें आपल्या देखत देखत भ्रष्ट झालेलीं पहावीं लागतील; आपल्या आयाबहिणींची विटंबना झालेली पाहण्याचा प्रसंग येईल; आणखी काय काय अनर्थ होतील ते परमेश्वर जाणे! रामरायाविषयीं तुमचा द्वेष आहे, विजयनगरच्या गादीविषयीं तर नाहींना? मग एकावरचा राग दुसऱ्यावर काढण्यांत कोणता शहाणपणा आहे तो मला कळत नाहीं. मी स्पष्ट बोलतों याची क्षमा करा; ईश्वरानें तसा प्रसंग आणूं नये, पण तुमच्यासारख्या शूर व तलवारबहादर वीरांनीं अलिप्त राहण्याचा विचार केल्यामुळें दुर्दैवानें हें राज्य नष्ट होण्याचा दुःखकारक प्रसंग आलाच, तर तुमचें तरी त्यापासून कोणतें कल्याण होणार आहे? तुमच्या घरादारावर नांगर फिरेल; तुमच्या बायकापोरांचा छळ व विटंबना होईल; आणि तुम्ही जिवंत राहिलांच तर शिखानष्ट होऊन

अविंधांचे गुलाम होऊन तुम्हांस राहावें लागेल. त्यांत तुमचा कोणता स्वाभिमान राहणार आहे?

( इतक्यांत दुंदुभीचा नाद होतो. )

**हंबीर**--हें पहा लढाईचें बोलावणें. दौलतराव, अजून तरी तुम्ही आपला हट्ट सोडा. हा हंबीरराव तुमची हात जोडून प्रार्थना करीत आहे. तुमच्यासारखे शूर वीर अलिप्त राहिल्यावर परिणाम काय होणार आहे त्याचें भेसुर चित्र माझ्या कल्पनेच्या दृष्टीसमोर अगदीं स्पष्ट उभें आहे. म्हणून पुनः एकवार विनंति करतों कीं हें डोक्यांतलें वेड सोडून द्या, लढाईसाठीं कंबर कसा, आणि राज्यावरचें सध्याचें संकट दूर करा. हें संकट दूर झाल्यावर त्या दुष्ट रामरायाला पाताळांत घालण्यासाठीं तुम्ही, आम्ही, सगळेजण एका विचारानें कांहीं तोड काढूं. पण खाजगी द्वेष उगवण्यासाठीं राज्याचा नाश होऊं देणें चांगलें नाहीं. मला आतां ज्यास्त वेळ थांबतां येत नाहीं. युद्धाची सिद्धता करण्यासाठीं लवकर गेलें पाहिजे. चला, उठा, तुम्हीही लवकर सज्ज होऊन बाहेर पडा, आणि आपल्या बाहूंत किती शक्ति भरली आहे तें दाखवून शत्रूला आणि त्यांच्याबरोबर रामरायालाही चकित करून सोडा. मी आतां जातों. आई जगदंबा तुम्हांला सद्‌बुद्धि देवो. ( जातो. )

**दौलत०** (स्वगत)–हंः! आले आहेत मोठे शिष्ट उपदेश करायला! यांना स्वतःला स्वाभिमान नाहीं तसा दुसऱ्या-

लाही नाहीं असें यांना वाटतें. बस, तें कांहीं नाहीं. आपला जो विचार ठरला तो ठरला. मी आतां आपला विचार पालटला तर लोचनराय, व्यंकटराय वगैरे ज्या सरदारांना मी हल्लींच्या युद्धप्रसंगीं अलिप्त राहण्याविषयीं सांगून आणभाक करविली आहे ते मला काय म्हणतील? मी त्यांच्याशीं दगलबाजी केली असें होणार नाहीं काय? छेः! तें अगदीं उपयोगाचें नाहीं. युद्धाविषयींचा विचारच आतां मनांत येऊं द्यायचा नाहीं. मी एकटा विचार करीत बसलों तर कदाचित् माझी बुद्धि फिरेल. यासाठीं आतां इंदुमतीच्या महालांत जाऊन आपल्या प्रियेशीं विनोद वगैरे करण्यांत काळ घालवून क्षुब्ध झालेल्या डोक्याला घटकाभर विश्रांति दिली पाहिजे. ( जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ–इंदुमतीचा महाल.

**इंदुमती** ( स्वगत )–आजच्या दरबारांत कांहीं तरी मोठी भानगड झाल्याचें कळल्यामुळें माझ्या मनाला रुखरुख लागली होती. ती शांत व्हावी म्हणून हंबीररावाशीं इकडे चाललेलें भाषण मी दाराच्या आडून ऐकलें. त्यापासून मनाची तळमळ शांत तर झाली नाहींच, पण उलट माझ्या मनांत राग, चिंता, निराशा, आणि दुःख यांचें जंगी काहूर मात्र उठलें आहे. हा इकडचा हट्टी स्वभाव! रामरायाची वागणूक

उन्मत्तपणाची म्हणून त्याच्याविषयीं द्वेषभाव इकडे वाटणें हें स्वाभाविक आहे. कोणी जरा पाणउतारा केलेला इकडच्या मानी स्वभावाला खपत नाहीं याबद्दल माझ्या मनाला मोठा अभिमान वाटतो. पण खाजगी द्वेष आणि स्वाभिमान यांना तरी कांहीं मर्यादा नको काय? देशाच्या हिताच्या आड ते येऊं लागले, व त्यांच्यापायीं राज्याचा नाश होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं तरी आपलाच हट्ट धरून बसायचें आणि राज्याचा नाश होऊं द्यायचा याला म्हणावें तरी काय? यांत कसला आला आहे स्वाभिमान किंवा पुरुषार्थ? हंबीररावानें पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या तरी इकडचा हेका सुटता सुटत नाहीं. आतां मी आपली करामत करून पाहायचें ठरविलें आहे. स्वारी इकडे आली कीं अशी कानउघाडणी करतें कीं पाहत्यें मग माझ्यापुढें स्वारीचा हट्ट कसा चालतो तें. ( कानोसा घेऊन ) कोणाचींशीं पावलें वाजत आहेत. स्वारीच बहुधा इकडे येत असेल. दाराला आंतून कडी लावून घ्यावी. ( दाराला आंतून कडी लावते. )

**दौलत०**( कडी वाजवून ) कोण आहे आंत? दार उघडा.

**इंदु०**—दाराशीं कोण आहे तें कळल्याशिवाय कडी कशी काढायची?

**दौलत०**—मी आहें. मी.

**इंदु०**—मी कोण?

**दौलत०**—काय? माझ्या शब्दाची ओळख पटूं नये? आ-

श्चर्य आहे म्हणायचें! मी या घराचा मालक दौलतराव आलों आहें.

इंदु०—छेः! हें अगदीं खोटें दिसतें. या घराचे मालक, माझ्या प्राणांचे स्वामी, या विजयनगरच्या राज्याचे आधारस्तंभ व एकनिष्ठ सेवक, रणाचें शिंग फुंकलें गेल्यानंतर क्षणभर सुद्धां घरांत राहायचे नाहींत. ते माझा निरोप घेण्याची देखील वाट न पाहतां राज्याच्या रक्षणासाठीं धावत रणांगणावर जाऊन सुद्धां पोंचले असतील. त्यांचा कोणी तोतया दुष्टबुद्धि मनांत धरून मला फसविण्यासाठीं आला असेल. तोतया नाहीं अशी माझी खात्री झाल्याशिवाय मी नाहीं दार उघडायची.

दौलत० ( स्वगत )—आतां हिला चांगलें फसवूनच आपला कार्यभाग साधला पाहिजे. ( उघड ) इंदुमति, तूं म्हणतेस तें अगदीं खरें आहे. हा दौलतराव युद्धास निघण्यापूर्वी तुझा निरोप घेण्यासाठींच आला आहे.

( इंदुमती दार उघडते व दौलतराव प्रवेश करतो. )

इंदु० ( चपापून )—युद्धाला जाण्याच्या तयारीनें माझा निरोप घेण्यासाठीं आलों असें आतां म्हटलें ना? मग हें काय? वीराला उचित असें कवच, शिरोभूषण आणि शस्त्रें कोठें आहेत?

दौलत० ( हंसून )—ह्यंः ह्यंः ह्यंः! जशी कडी लावणें ही तुझी थट्टा, तसें लढाईला जाण्याच्या तयारीनें आलों

आहे असें सांगणें ही माझी थट्टा! फिटंफाट झाली! (चुंबन घेण्यासाठीं पुढें सरकतो. )

इंदु० ( हात झिटकारून )—हां! खबरदार माझ्या अंगाला हात लाविला तर! घराला आग लागली आहे अशा वेळीं ज्याला थट्टा सुचते त्याचें डोकें ठिकाणावर आणण्यासाठीं चांगल्या चर्रकन वाजणाऱ्या डागण्याच द्यायला पाहिजेत. नौबत झाली आणि रणशिंग मघाच फुंकलें. विजयनगरचे सगळे सरदार युद्धासाठीं सज्ज होऊन व आपापल्या पत्नीचा निरोप घेऊन केव्हांच बाहेर पडले, आणि इकडे अजून स्वस्थता कशी?

**दौलत०**—आज लढाईवर जायचें नाहीं असा निश्चय मीं केला आहे; आणि म्हणून तर चित्तविनोदार्थ मी यावेळीं इकडे आलों आहें.

इंदु०—काय मी हें ऐकल्यें आहे? लढाईला जाण्याच्या तयारीनें तुझा निरोप घेण्यासाठीं मी आलों आहें असें मघाशीं म्हटलें तें खोटें एकूण? राजसेवेंत चुकारपणा करणें हें एक महत्पाप, आणि त्याला आणखी असत्य भाषणाच्या पातकाची जोड देणारा नीच, पापी, चांडाळ पुरुष माझे पति म्हणविण्याला योग्य नाहीं असें मी समजत्यें. तुम्ही जर माझे खरे खरे पति असतां तर राजद्रोहासारखें, आणि युद्धास जाण्याला भिण्यासारखें महत् पातक करण्याची तुमची छातीच झाली नसती. तें पातक करून पुनः मी चित्तविनोदार्थ आलों आहें असें वर म्हणण्यास तुमच्या मनाला लाज कशी वा-

टली नाहीं? धिक्कार असो तुमच्या जिण्याला! जा, येथून निघून जा. तुम्ही तोतये आहां; माझे खरे पति नव्हेतच. लढाईपासून तोंड छपवून आणि बुरखा घेऊन जनानखान्यांत राहूं इच्छिणाऱ्या तुमच्यासारख्या नामर्दाला वीरपत्नीचा हा महाल कदापि आश्रय देणार नाहीं. ही इंदुमती इतःपर तुमचें हें काळें तोंड पाहूं इच्छित नाहीं.

**दौलत०**—इंदुमति! मीं आजपर्यंत अनेक लढाया मारून प्रांतावर प्रांत काबीज करून विजयनगरच्या राज्याला जोडले ते नामर्दपणामुळें असें कां तूं समजतेस? मी भित्रेपणामुळें लढाईवर जाण्याचें टाळीत आहें अशी जर तुझी समजूत झाली असेल तर ती साफ चुकीची आहे. माझ्या धैर्याची परीक्षा तुला पाहायची असेल तर तूं मला एकटा, शस्त्र वगैरे कांहीं न घेतां, एखाद्या सिंहाच्या गुहेंत जाऊन त्याची आयाळ धरून त्याला बाहेर खेचून काढण्यास किंवा तसेंच दुसरें एखादें अचाट धाडसाचें काम सांग, आणि त्या गोष्टीला मीं माघार घेतली तर मला नामर्द म्हण आणि माझें तोंड पाहूं नकोस. मी नामर्द नाहीं, निधड्या छातीचा वीर आहें, पण तुला न सांगण्यासारख्या कांहीं कारणामुळें मीं आजच्या युद्धप्रसंगीं न जाण्याचें ठरविलें आहे, म्हणून तुला माझा नामर्दपणा वाटत आहे त्याला माझा नाइलाज आहे. माझा धिक्कार करण्यांत आणि असें टाकून बोलण्यांत तूं माझ्याविषयीं आणि स्वतःविषयीं ही मोठा अन्याय करीत आहेस.

इंदु०—मला न सांगण्यासारखें तुमचें कारण मला ठाऊक आहे. हंवीररावाशीं झालेलें तुमचें सारें भाषण मी ऐकलें आहे, आणि म्हणून मी म्हणत्यें कीं तुम्ही नुसते नामर्दच नाहीं तर त्याहून अधिक नीच म्हणजे देशद्रोही आहां. खाजगी द्वेषाच्या पायीं साऱ्या राज्याचें व धर्माचें वाटोळें करून स्वतःच्या व पूर्वजांच्या निष्कलंक कीर्तीला कालिमा लावण्यासारखें अधमपणाचें वर्तन करण्यास तुम्हांस शरम वाटत नाहीं. तुमच्यासारख्यांची वीरपत्नी म्हणविण्यांत मला आजपर्यंत भूषण वाटत असे. पण आतां लोक मला देशद्रोह्याची पत्नी म्हणतील आणि तिरस्कारानें माझ्याकडे पाहतील, तें दुःख माझ्यानें सहन करवणार नाहीं. म्हणून म्हणत्यें कीं तुम्हांला देशद्रोह करावयाचाच असला तर अगोदर ( कट्यार काढून त्याच्या हातीं देते ) ही कट्यार माझ्या वक्षःस्थळांत खुपसून मला या जगांतून नाहींशी करा; आणि मग तुम्हांला काय हवें तें करा. ज्या विजयनगरच्या स्वामीनें तुमचा हा पिंड पोसला, आणि तुम्हांला येवढ्या ऐश्वर्यपदाला पोंचविलें त्याच्याशीं निमकहरामपणा करणाऱ्या तुमच्यासारख्याची पत्नी म्हणवून घेण्यांत मला भूषण तर वाटत नाहींच, पण कमाल प्रतीचें दूषण वाटतें. असला कलंक लावून घेण्यापेक्षां मृत्यु आलेला मी आनंदानें पतकरीन. हं! आटपा, तुम्हांला तुमच्या शौर्याचा उपयोग देशाच्या स्वातंत्र्याच्या व रक्षणाच्या कामीं करण्याची इच्छा नसेल तर या अनाथ अबलेवर शस्त्र चालविण्यांत तरी तो करून दाखवा.

म्हणजे तुमचेंही शौर्य दिसेल आणि मीही संकटांतून मुक्त होईन.

**दौलत०**—इंदुमति, तूं खरी वीरकन्या आहेस. तुझ्या या मर्मभेदक वाग्बाणांनीं माझें हृदय विदीर्ण केलें तेवढें पुरें आहे. तुझ्या उपदेशानें माझ्या डोळ्यांत चांगलें झणझणीत अंजन घातलें आहे. माझ्या बुद्धिरूपी नेत्रपटला-वर आलेलें दुरभिमानाचें पटल दूर झालें आहे. सुंदरी, आतां माझ्यावरचा तुझा राग शांत होऊं दे. इतःपर हा तुझा सेवक तुझ्या आज्ञेंत तत्पर राहील. मी रणांगणावर जाण्याला तयार आहें. देवि, तूंच आपल्या हातांनीं माझ्या अंगांत चिलखत घाल, आणि मी यशस्वी होऊन परत ये-ईन असा आशिर्वाद दे. हा दास तुला शरण आला आहे. तूं माझी पत्नी नाहींस; माझी गुरु, माझी स्फूर्तिदात्री देवता आहेस. चल. तर लवकर माझी युद्धाची तयारी कर.

**इंदु०**--आतां कसें वीराला उचित भाषण केलेंत. मी मर्यादा उल्लंघून बोलल्यें त्याबद्दल या दासीला क्षमा असावी.

**दौलत०**—आतां असा बोलण्यांत कालक्षेप करणें चांगलें नाहीं. मला लवकर निघालें पाहिजे. मी पोषाख करून कुल-स्वामिनीला नमस्कार करण्यास जातों.

**इंदु०**–( हर्षानें ) चलावें, मीही आपल्याबरोबर देव-घरापर्यंत येत्यें. ( दोघेही जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग बारावा.

### शपथेचें महत्त्व.

**कथाभाग**—बाबरशहा हा हिंदुस्थानांत मोगलशाहीची स्थापना करणारा झाला. याच्या अंगांत कित्येक असे विलक्षण गुण होते कीं त्यामुळें इतिहासकार त्याची तुलना महाराष्ट्रराज्यसंस्थापक श्री छत्रपति शिवाजी महाराज यांच्याशीं करतात. हा स्वतः उत्तम प्रकारें शिस्तीनें वागणारा व दुसऱ्याला शिस्तीनें वागण्यास लावणारा, शूर, उदार, मातृभक्त, प्रेमळ, दुसऱ्यावर छाप बसविणारा, मनुष्यस्वभाव पूर्णपणें ओळखणारा, स्पष्टवक्ता, करारी आणि उद्योगी होता. या गुणांपैकीं कांहींची छाया पुढील लहानशा प्रसंगांत पडलेली दिसून येईल.

# शपथेचें महत्त्व.

## पात्रें.

बाबरशहा—दिल्लीचा बादशहा.

हुमायून—त्याचा मुलगा.

लष्करी अंमलदार, संत्री वगैरे.

## प्रवेश पहिला.

स्थळ—लष्करी छावणी.

( दोन संत्री बाबरशहाच्या डेऱ्यावर पहारा देत आहेत. )

**पहिला संत्री**—अबब! कोण हा थंडीचा कडाखा! हातां-पायांचीं लांकडें होण्याची वेळ आली!

**दु० सं०**—आतां आपला पहारा संपतच आला आहे. ही पहा पांचाची नौबद वाजूं लागली. ( नौबद वाजते. )

**प० सं०**—शहानें इतक्या पहाटेस लष्करी कवायतीची वेळ काय म्हणून ठरविली तें कळत नाहीं. ही म्हणजे कशी ऐन झोपेची वेळ!

**दु० सं०**—तुला शहाचा स्वभाव माहित नाहीं वाटतें! त्यांची शिस्त फार कडक आहे. सकाळीं पांच वाजतां कवाईत घ्यायची हें एकदां ठरलें म्हणजे उन्हाळा असो, पावसाळा असो कीं थंडीचा कडाखा असो, हुकुमांत फेरबदल म्हणून

व्हायचा नाहीं. ठरलें तें ठरलें, आणि त्याप्रमाणें सर्वजणांनीं वागलेंच पाहिजे. हुकुम मोडील त्याला जन्मभर आठवण राहील अशी शिक्षा व्हायची.

प० सं०–हो. या हुकुमावरून बरी आठवण झाली. माझ्या मनांतून तुला एक गोष्ट विचारायची होती. खानजमान यांची मनसबदारी काढून घेतली म्हणून म्हणतात. तें खरें आहे काय? त्यांच्यावर येवढा घुस्सा काय म्हणून?

दु० सं०–' म्हणतात ' असें कां म्हणतोस? जी गोष्ट उघड दरबारांत लोकांवर दहशत बसविण्याकरितां करण्यांत आली तिच्याबद्दलची विचारपूस अशी चोरून कशाला पाहिजे? खानजमानला पठाणकोट काबीज करण्यास पाठविलें होतें. तेथें त्यानें लूट मिळविली ती सरकारांत जमा न करतां खान मधल्यामध्यें खाऊन गेला. म्हणून त्याला शिक्षा केली. असे सरदार लोक जर लूट मधल्यामध्यें लांबवूं लागले तर सरकारी खजिना कसा भरलेला राहील?

प० सं०–पण दुष्मनावर–

दु० सं०–हां गप्प! शहाची स्वारी डेऱ्यांतून बाहेर येत आहे.

( बाबर हुमायूनसह बाहेर येतो. )

**बाबर**–( संत्र्यांस ) जा, तुम्हांला परवानगी आहे. हा बाबर जागा असल्यावर त्याला पाहऱ्याची जरूरी नाहीं. त्याचा बचाव तो स्वतःच करील.

**हुमा०**--परवानगी मिळेल तर हुजूरला एक अर्ज करायचा आहे.

**बाबर**--अर्जदारांना माझ्यापाशीं केव्हांही रोकटोक नसते.

**हुमा०**--काल शेख अमलला त्याच्या गुन्ह्याबद्दल जी सजा देण्यांत आली ती रद्द करण्यांत यावी असा अर्ज करतों.

**बाबर**--सबब?

**हुमा०**--तो काल कवायतीला हजर नव्हता. याचें कारण परवाचे रात्रीं त्यानें नशा केला होता.

**बाबर**--वा! सबब तर खाशी शोधून काढली! नशा करणें हें अगोदर वाईट, आणि त्यांतून केलाच तरी तो सरकारी कामाच्या आड येऊं देणें हें त्याहून वाईट. अशा माणसाबद्दल रदबदली करण्याचें काम तुमच्यासारख्या शहाजाद्यानें अंगावर घेऊं नये. मी स्वतः नशा करतों. शिराजच्या अंगुराची शराब मला फार प्यार आहे. पण तिच्यानें बेहोष होऊन मी सकाळची कवाईत घेण्याचें काम कधीं टाळलेलें मला स्मरत नाहीं. पण थांबा, मी नशा करतों म्हणून माझे लोकही तसेंच करतात असें माझ्या नजरेला वारंवार येतें. त्याचा अगोदर पक्का बंदोबस्त मला केला पाहिजे. शहाजादे, मी डेऱ्यांतून जाऊन येतों. तोंपर्यंत तुम्ही सगळ्या लष्करी कामदारांना चंद्रकोरीसारखें कुतरींत उभे करा.

( हुमायून लष्करी कामगारांना तसे उभे करतो. )

**बाबर०** ( हातांत मद्याचा पेला घेऊन येऊन )--हें माझ्या हातांत काय आहे पाहिलेंत? यांत सैतानाचा तबरुक

आहे. ज्याला आपल्या जिवाचा, इज्जतीचा, आणि धर्माचा कंटाळा आला असेल, ज्याला आपलीं बायकापोरें नकोशीं झालीं असतील, ज्याला आपल्या इमानाचा त्याग करण्याची बुद्धि होत असेल, ज्याला आपल्या घरादारावर जळजळीत अंगार ठेवण्याची इच्छा असेल, ज्याला खुदानें मनुष्यजन्माला घातल्याबद्दल वाईट वाटून त्या खुदाची चूक सुधारण्यासाठीं पशूसारखें आचरण ठेवण्याची इच्छा होत असेल, ज्याच्यानें आपले भाईबंद सुखांत असलेले पाहवत नसतील व ज्याला या लोकीं राहून नरकवासाचें सुख अनुभवण्याची दिलीख्वाहिश वाटत असेल, त्यानें पुढें यावें आणि हा तबरुक घ्यावा. मला सांगायला शरम वाटते, पण माझ्यानें खोटें बोलवत नाहीं, मी आजपर्यंत हा प्रसाद घेत असें; पण मी येवढी खबरदारी घेतली होती कीं या सैतानानें माझ्या फर्जाच्या आड येऊं नये. पण आतां माझ्या ध्यानांत येऊन चुकलें आहे कीं हा प्रसाद घेण्यापुरतें माझे लोक माझ्यासारखे वागतात, आणि नशांत धुंद होऊन बेहोष राहतात; पण फर्जाची वख्त आली कीं त्यांना होष राहत नाहीं. लोकांना वाईट उदाहरण घालून देण्याचें काम सोपें आहे. लोकांचें वाईट उदाहरण पाहून त्यासारखें वागूं लागणें हेंही तसेंच सोपें आहे. या सैतानाच्या हातांत तुमच्या मुंड्या देण्यास इतके दिवस मी कारण झालों. पण आतां त्याच्या हातून तुमची सुटका करण्याचा मी पुरा पुरा इरादा केला आहे. अनेक जोरावर दुष्मनांच्या माऱ्यांतून मी तुम्हांला

बचावून नेलें आहे. त्या मला मनुष्यजातीच्या या दुष्मनाच्या हातून सोडविणें मोठेंसें मुष्किल नाहीं हेंच मी आतां तुम्हांला दाखविणार आहें. ( पेला फेकून देऊन ) हें पहा मी या सैतानाला दूर फेंकून दिलें. त्याला पुनः स्पर्श करायचा नाहीं अशी कसम मी चंद्रसूर्यासमक्ष आणि तुम्हां सर्वांदेखत खातों. माझ्यासारखी कसम खाण्याची व ती कडक रीतीनें पाळण्याची हिंमत ज्यांचे ठायीं असेल त्यांनीं पुढें यावें. कसम खातांना काय तो नीट विचार करा. एकदां ती खाल्लयावर कोणी ती मोडली तर त्यांची गर्दन छाटली जाईल हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

**नूरमहंमद**–हा मी कसम खातों.

**बाबर**–शाबास! आणखी कोण पुढें येतो?

**मीरख्वाजा**–मीही तशीच कसम खातों.

**बाबर**–भले बहाद्दर!

**हुमायून**–( पुढें होऊन ) मीही पण–

**बाबर**–हां! थांबा! शहाजादे. तुम्ही शहाणे असाल तर या भानगडींत पडूं नका. तुमची चंचलवृत्ति पाहून मला असें वाटतें कीं तुम्ही प्रत्यक्ष मुलाचा खून करण्याचा वखत माझेवर लौकरच आणाल.

( हुमायून खजिल होतो. लष्करी अंमलदारांतून पुष्कळजण मी मी म्हणत पुढें येतात. )

बाबर—शाबास! वीरांनो, शाबास! आकाशांत एक सूर्य आहे तर तो आपल्या प्रकाशानें सारें जग रोषन् करून सोडीत आहे. माझ्या लष्करांत तुमच्यासारखे इतके सूर्य असल्यावर माझ्या शिपायांच्या मनांत वसत असलेला पापी विचारांचा अंधार तुम्ही आपल्या प्रतापानें घालवून त्यांचीं मनें रोषन कराल यांत काय संशय आहे? या सैतानाला तुम्ही आपले-पासून दूर ठेवल्यावर सगळा हिंदुस्थान देश तुम्ही काबीज कराल अशी माझी खात्री आहे. आज तुम्हीं घेतलेल्या या शपथांमुळें माझा जोष दुप्पट वाढला आहे. जा. आज तुम-च्या या वर्तनानें खुष होऊन तुम्हांला सुटी देण्यांत येत आहे.

( सर्व सरदार व अंमलदार जातात. )

बाबर—( हुमायुनास ) चार मंडळी देखत मी तुमची अशी बेइज्जत केली म्हणून तुम्ही नाउमेद झालेले दिसतां. पण माझा तरी त्या गोष्टीला काय इलाज होता? अडचणी सोसून संकटांत उडी घालण्याचे आणि पराक्रम करून नांव गाजविण्याचे तुमचे हे दिवस जर तुम्ही बुऱ्या आदतींत घालवूं लागलां तर हिंदुस्थानांत मोगलपातशाही मी स्थापीत आहें ती कशी टिकणार? मागें एका पत्रांत तुम्हीं लिहिलें होतें कीं स्नेही मंडळी सोडून माझ्यानें येववत नाहीं. त्याचवेळीं हे तुमचे स्नेही कोण असतील तें मी समजलों. राजा होणें फुकाचें नाहीं. ती एक जबरदस्त कैदच आहे. राजाला किती नफ़्सकुशी करावी लागते याची तुम्हांला कल्पना नाहीं.


राजा स्वतःच बेशिस्त रीतीनें वागूं लागला तर त्याचा दबाव त्याच्या सरदारांवर, अंमलदारांवर आणि लोकांवर कसा राहील? राजानें स्वतः चांगलें उदाहरण घालून दिलें तर लोकही त्याचा कित्ता गिरवितील. मी आजपर्यंत नशा करीत असें, पण कधीं बेहोष झालों नाहीं, आणि आपल्या कामांत चुकलों नाहीं. सकाळीं पांच वाजतां उठून फौजेची कवाईत घेण्यांत आजपर्यंत माझे हातून कसूर झालेली नाहीं. तरी पण येवढ्यानें काम भागणार नाहीं, शराबाची आदत बिलकुल सोडली पाहिजे हें पाहून मी आज शराब न पिण्याची कसम सर्वांच्या आधीं खाल्ली. माझें उदाहरण पाहून दुसऱ्याही पुष्कळांनीं तशी कसम खाल्ली. हें तुम्हीं पाहिलेंच आहे. आतां ज्यांनीं ज्यांनीं शपथा घेतल्या आहेत त्यांनीं त्यांनीं त्या पाळिल्या आहेत येवढें पाहिलें म्हणजे माझें काम झालें. शपथ घेतल्यावर तुमच्या हातून ती पाळली गेली नाहीं म्हणजे लोकांना वाईट उदाहरण घालून दिलें असें होईल व माझ्याशी शिक्षेला तुम्ही पात्र व्हाल. मी मघाशीं तुम्हांला कां झिडकारलें याचें कारण आतां तुमच्या ध्यानीं आलें असेल.

**हुमा०**--( पायाशीं लागून ) गरीब परवर, हा हुमायून हुजूरचा गुन्हेगार आहे. त्याला एकदा क्षमा असावी. यापुढें आपला पुत्र म्हणविण्याची लायकी अंगीं आणण्याची बनेल तेवढी खटपट करण्यास हा चुकणार नाहीं. आपल्या दुआ

देण्यानें आपली मर्जी मी पूर्णपणें संपादन करून घेईन अशी मला उमेद आहे.

**बाबर**—हा तुमचा अफसोस हमेशा टिकला तर तुम्ही म्हणतां त्याहूनही ज्यास्त ताज्जुब वाटण्यासारख्या गोष्टी घडतील. उठा! चला आतां माझ्याबरोबर. राज्यप्रकरणाचे फैसले कसे करावे लागतात तें नीट लक्ष लावून पहा.

( जातात. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग तेरावा.

### अकबराचें औदार्य.

**कथाभाग**—बाबरशहाच्या मागून त्याचा मुलगा हुमायून हा दिल्लीच्या गादीवर बसला असतां शेरशहा नांवाच्या पठाणानें त्याला गादीवरून काढून पळून जाण्यास लाविलें; तो पळत असतां सिंधप्रांतांत उमरकोट येथें त्याला मुलगा झाला. हाच दिल्लीचा सुप्रसिद्ध मोगल बादशहा अकबर हा होय. हुमायुनानें खटपट करून आपलें राज्य परत मिळविलें; पण पुढें लवकरच तो मेला. अकबराला लहानपणापासूनच त्याच्या बापानें बेहरामखान नांवाच्या आपल्या विश्वासु सरदाराच्या देखरेखीखालीं ठेविलें होतें. हुमायून मेल्यावर अकबर गादीवर बसला, तरी राज्याचा सगळा कारभार बेहराम

पाहत असे. तो कित्येक वेळां आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असे. त्यामुळें त्याच्याविरुद्ध अकबराकडे पुष्कळ तक्रारी आल्या होत्या. अकबरही आतां अठरा वर्षांचा–स्वतः राज्यकारभार पाहण्यासारखा–झाल्याकारणानें त्यानें बेहरामखानाच्या हातून अधिकार काढून स्वतःच्या हातीं घेतले. तेव्हां बेहरामाला राग येऊन त्यानें बंड केलें. पण अकबराच्या फौजेनें तें बंड मोडून बेहरामाला पकडून आणिलें. अकबरानें बेहरामाचे उपकार स्मरून त्याच्या अपराधाची क्षमा केली; इतकेंच नाहीं, तर त्याचा बहुमान करून नेमणूक करून दिली. अकबरबादशहाच्या स्वभावांतला हा उदारपणा फारच प्रशंसनीय होता. याचें चित्र या प्रसंगांत दाखविलें आहे.

# अकबराचें औदार्य.

—⊂:*:⊃—

## पात्रें.

**अकबर**—दिल्लीचा बादशहा.

**मुल्ला पीरमहमद**—त्याचा बाळपणचा शिक्षक.

**महाम अनागा**—अकबराची वृद्ध दाई.

**बेहरामखान**—अकबराचा पालनकर्ता व मुख्य वजीर.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—बादशहाचा वाडा.

( अकबर व पीरमहमद बोलत आहेत. )

**अक०**—असें मोघम बोलणें नको. काय तें स्पष्ट बोला. 'तुमचें राज्य आतां कुठचें!' असे जे दुःखाचे उद्गार तुम्हीं काढले त्याचा अर्थ काय? कोणी दुष्मन् आमच्या राज्यावर चालून आल्याची खबर तुम्हांस लागली आहे? कां माझे सरदार दुष्मनाला फितूर होऊन मला मसनदीवरून दूर करण्याविषयींचा कट करीत आहेत? आहे तरी काय प्रकरण?

**पीर०**—माझ्या म्हाताऱ्याच्या तोंडून सहज कांहीं शब्द चुकून निघून गेले असतील. तिकडे खाविंदांनीं लक्ष देऊं नये आणि त्यांतली गोष्ट मनाला लावून घेऊं नये अशी माझी विनंति आहे.

अक०—नाहीं. तसा प्रकार खरोखर असता तर मीं तिकडे दुर्लक्ष केलें असतें. पण तुमच्यासारखीं बुजुर्ग माणसें भलतेंच कांहीं बोलावयाचीं नाहींत अशी माझी खात्री आहे. तुम्हीं जें म्हणालांत त्याचा खरा अर्थ मला समजून घेतलाच पाहिजे. मुल्लाजी, तुमचें आपल्या शिष्यावरचें प्रेम इतक्यांतच नाहींसें झालें काय? तुम्हांला माझ्या हिताची कळकळ आतां वाटत नाहीं असेंच मी समजावयाचें काय? बोला. स्पष्ट बोला. माझे कान तुमच्या शब्दांचा अर्थ समजून घेण्यास उत्कंठित झाले आहेत.

पीर०—खाविंद, गुन्ह्याची माफी असावी. अल्लाच्या कृपेनें या राज्यावर परचक्रही आलेलें नाहीं, आणि राजद्रोही लोकांचें बंड करण्याविषयींचे कटही चालले नाहींत. अल्लाच्या कृपेस पात्र झालेले, परम दयाळु आणि न्यायवंत अशा आपल्या वडिलांनीं महत्प्रयासानें मिळविलेल्या या राज्याचे खरे वारस आपण असतां दुसराच मनुष्य तें बळकावून बसला आहे याबद्दल आमच्यासारख्या खैरख्वाह रयतेला वाईट वाटत आहे इतकेंच.

अक०—अजून तुमच्या भाषणांत मोघमपणा आहे. काय असेल तें स्पष्ट बोला.

पीर०—माफीचें वचन मिळाल्यास आधिक खुलासा करतां येईल. नाहीं तर मी खरें बोलून जाईन, आणि त्याबद्दल हें माझें वृद्ध डोकें मारलें जाईल याची मला भीती वाटते.

अक०—मुल्लाजी, तुम्ही आमचे गुरु. स्पष्टपणें बोलण्याचा

व मी चुकत असेन तेथें विनमुर्वत सांगण्याचा तुम्हांला अधिकार आहेच. तो अधिकार आमच्या वडिलांनींच तुम्हांला दिला आहे. तो काढून घेणें ही गोष्ट माझ्या अखत्यारांतली नाहीं. तुम्हांला अभय आहे. खुशाल स्पष्टपणें सांगा.

पीर०—आपण पातशाही तख्तावर बसलां आहां म्हणून आपणांस पातशहा म्हणावयाचें. पण खरा पातशाही अधिकार आपले हातीं आहे काय? लहानशा पोराला पुढें घेऊन एखादा मनुष्य घोड्यावर बसला आणि त्यानें घोडा भरधाव पळविला, तर तो मुलानें पळविला असें कोणी समजेल काय? ज्याच्या हातीं घोड्याचा लगाम तोच खरा स्वार. हेंच उदाहरण आपल्या राज्यकारभाराला लावून पहा म्हणजे खरा पातशहा कोण? आपण कीं खानखानान बहेरामखान तें कळून येईल. रयत तरी निदान आपणांस पातशहा म्हणून ओळखत नाहीं. तिच्याकडे तरी काय दोष आहे? खुद्द खाविंदाचे हुकूम बाजूला ठेवून जर खान स्वतःच्या मर्जीप्रमाणें रंकाचा राव आणि रावाचा रंक करीत आहे, लोकांच्या मालमत्तेचा आणि प्राणांचा मालक आपण आहों असें नुसतें बोलून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीनें दाखवीत आहे, आणि त्याचा हात कोणी धरीत नाहीं, तर खानच आज खरा पातशहा आहे असें एखाद्यानें म्हटलें तर त्यांत कोठें चुकलें?

अक०—मुल्लासाहेब, तुमचें म्हणणें विचार करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं.

**नोकर**—महाम अनागा खाविंदाच्या मुलाकतीच्या इरा-द्यानें आली आहे.

**अक०**—येऊं द्या तिला आंत.

( महाम अनागा येते. )

**अक०**—मातोश्री, तुमचा अर्ज मीं वाचिला, आणि त्यावर विचारही केला. तुमचा मुलगा आदमखान यानें फार घोर अपराध केला आहे. तुम्हीं मला लहानणीं वाढविलें, आदमखान माझा दूधभाई, म्हणून मी त्याला फौजेंत मनसबदार केलें, आणि त्याला आपली हुशारी दाखविण्याची संधी मिळावी म्हणून माळव्यांत बाजबहादरावर पाठविलें. त्यानें लष्करी कामागिरी चांगली बजाविली. पण त्यांच्या स्त्रियांचा जो अपमान केला तो गुन्हा मोठा होता. त्या गुन्ह्याच्या पायीं स्वतःची इज्जत राखण्यासाठीं बाजबहादुराच्या स्त्रीनें जहर खाऊन प्राण दिला. यांत पातशाहीची मोठीच बेइज्जत झाली. बाजबहादर दुष्मन् खरा, पण मोठा इज्जतीचा सरदार. त्याच्या स्त्रीची अशी इज्जत घेतली हा मोठा गुन्हा त्यानें केला. तरी तुमच्याकडे पाहून मी त्याला माफी दिली. वजीर शमसुद्दिन यानें आदमचा कांहींएक गुन्हा केला नसतां त्यालाही त्यानें त्याच्या वाड्यांत जाऊन ठार केलें. कोण हा उन्मत्तपणा! माझा दूधभाऊ तर काय, पण सख्खा भाऊ असता आणि त्यानें अशी स्त्रियांची इज्जत घेतली असती, किंवा रयतेला नाहक छळलें असतें, तर मी त्याला कडक सजा केल्याशिवाय राहिलों नसतों. पण तुस-

च्या वृद्धपणाकडे पाहून मी आदमवर आतांपर्यंत मेहरनजर ठेविली. आतां त्याचें वर्तन फारच बेताल झालें तेव्हां पुनः तुमच्याकडे पाहून मी त्याला नजरकैदेंत ठेविलें आहे. यापेक्षां त्याच्यावर आणखी रहीम कोणती करावयाची? आतां तुम्ही पुनः अर्ज करण्याची तकलीफ घेऊं नका. त्याचा कांहींएक उपयोग होणार नाहीं.

**महाम अनागा** (कष्टी होऊन)—जहापन्हां, मी आपणास माझ्या पोटच्या मुलाहून ज्यास्त काळजीनें वाढविलें आहे. त्याची आठवण करा. आपला नाश करण्याचें त्या वेळीं मीं मनांत आणिलें असतें तर तें मला सहज करतां आलें असतें. पण तो विचार माझ्या स्वप्नांतही कधीं आला नाहीं. आणि आतां त्याच माझ्या मुलावर आपली नाराजी होऊन आपल्याच हुकुमानें त्याला कैदेंत पडलेलें पाहण्याचें माझ्या नशिबीं यावें ना? अल्लाची मर्जी! माझ्या मुलाच्या हातून गुन्हा घडला हें मला कबूल आहे. पण असा गुन्हा दुसऱ्या कोणाच्या हातून घडला नाहीं काय? लढाईत हिमू सरकारच्या हातीं लागला असतां आपल्या देखत बेहरामखानानें आपण नको नको म्हणत असतां त्याची गर्दन छाटली. त्या बेहरामखानाला कोणती शिक्षा मिळाली? राज्यकारभाराचे कामांत त्याच्या हातून शेकडों अन्याय रोज घडत आले आहेत, त्याबद्दल त्याच्यावर नाराजी कां झाली नाहीं? फार कशाला? हे मुल्लासाहेबच घ्या. यांना बेहरामानें बिनाकसूर कामावरून काढून यांचे जागीं आपल्या मर्जींतल्या एका

माणसाला नेमिलें. हा न्यायच झाला ना? बेहरामखानानें आपणांस लहानपणीं सभाळलें म्हणून त्याला शंभर–हजार–गुन्हे माफ असावेत, आणि आपल्या दुधावर सरकारचा पिंड जिनें वाढविला त्या बुद्धीच्या मुलाला एक गुन्हा माफ नसावा, तेव्हां तकदीर म्हणावयाचें, दुसरें काय?

अक०–माजी, तुम्ही आतां जा. तुमच्या अर्जाचा पुनः विचार होईल. ( पीरमहंमदास ) तुम्ही मला जी गोष्ट सांगितली तिचाही मी विचार करीन.

( अकबर महाम अनागाचा हात स्वतः धरून तिला दरवाजापर्यंत नेऊन पोंचवितो. पीरमहंमदही जातो. )

अक० ( स्वतःशीं )–या दोघांच्या म्हणण्यांत पुष्कळ सत्य आहे आणि तें त्यांनीं निर्भीडपणानें सांगितलें म्हणून माझ्या मनाला खरोखर आनंद वाटतो. बादशहा झाला तरी त्याला दोनच डोळे असतात. इतरांपेक्षां त्याला ज्यास्त दिसतें असें नाहीं. पुष्कळ वेळां इतरांच्या डोळ्यांपेक्षां त्याच्या डोळ्यांला कमी दिसत असतें. कारण कीं मतलबी व हांजी हांजी करणारांच्या युक्तयांचे पडदे त्याच्या दृष्टीआड येत असतात. म्हणून मी सर्वांचे अर्ज शांत चित्तानें ऐकून घेण्याचा विचार केला आहे. बेहरामखान फार इमानी माणूस आहे यांत शंका नाहीं. पण अधिकार गाजविण्याची फार हौस आहे हें मी पाहून ठेविलें आहे. तो शूर, धैर्याचा, धाडशी आणि हुशार आहे; पण सारासार विचार न करतां एखादी गोष्ट मनांत आल्याबरोबर तडाख्यासरशीं करून टाकायची असा

त्याचा उतावळा स्वभाव आहे व तो जेथें तेथें नडतो. तो मोठमोठ्यांची बेअदबी करतो, अधिकाराचा दुरुपयोग करतो, फार काय, पण माझ्या इच्छेला सुद्धां जुमानीत नाहीं, हा त्याचा उर्मटपणा मला दिसत नाहीं असें नाहीं. पण त्यानें माझ्यावर आजपर्यंत केलेले अगणित उपकार मनांत आणून मी त्याचें चालू देत आहें. पण आतां माझें हित मला पाहिलें पाहिजे. त्याच्याविषयीं सरदार लोकांचीं व रयतेचीं मनें कलुषित झालीं असतां त्याच्या हातीं सगळा अधिकार ठेवणें धोक्याचें आहे. शिवाय, मला तरी स्वतः काम पाहूं लागल्याशिवाय राज्यकारभार करण्याचें शहाणपण कसें यावें? दुसऱ्यावर सगळीं कामें सोंपवून आपण ऐषआरामांत चूर होऊन राहणें म्हणजे रयतेशीं बेइमान होणें आहे. तें माझ्यानें होणार नाहीं. बेहरामखानाच्या हातांतला अधिकार काढून घ्यावा तर त्याला राग येणार—निदान वाईट तरी वाटणार; आणि तुम्ही अधिकार सोडा, मी आपला कारभार पाहतों, हें प्रत्यक्ष त्याच्या तोंडावर माझ्यानें सांगवणारही नाहीं. त्याला आतां काय बरें युक्ति करावी? ( विचार करून ) हां. त्याला चांगलें गौरवून पत्र लिहावें आणि तुमचा वृद्धापकाळ झाला तरी तुमच्या शिरावर राज्यकारभाराच्या जबाबदारीचें ओझें राहूं देणें हा निष्ठुरपणा होईल म्हणून तें ओझें हलकें करण्याचा मीं विचार केला आहे असें युक्तीनें पत्र लिहून कळवावें. ही गोष्ट कानच्या कोप-

ऱ्याला कळली नाहीं म्हणजे त्याला वाईट वाटायचें नाहीं. पण हें व्हावें कसें? मला कोठें लिहितां येतें? अरेरे! लहानपणीं कबूतरें उडविण्यांत मी आपल्या आयुष्याचा काळ घालविला, आणि शिक्षकांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून अक्षरशत्रु राहिलों, तो जर थोडीबहुत विद्या शिकलों असतों तर आज असें महत्त्वाचें पत्र लिहिण्यासाठीं मला मुनशीची मदत घेऊन त्याला आपली गुप्त गोष्ट सांगण्याचा प्रसंग कां आला असता. पण आतां खेद करून काय उपयोग? गेली गोष्ट परत येत नाहीं. आतां मुनशीला बोलावणें पाठवून मनांत आलेली गोष्ट करून टाकली पाहिजे. (जातो.)

---

## प्रवेश दुसरा.

( अकबर सिंहासनावर बसला आहे व बेहरामखान त्याच्या पायीं पडत आहे. )

बेह०—खाविंद, हा बेहराम आपला निखालस गुन्हेगार आहे. आपण कराल ती सजा याला थोडी आहे. तरी पण आपल्या वडिलांच्या व पुढें आपल्या सेवेंत माझे काळे केस पांढरे झाले या गोष्टिकडे लक्ष देऊन गुन्ह्याची माफी असावी असा मी अर्ज करतों. माफी मिळाल्याशिवाय आपले पाय मी सोडणार नाहीं.

अक०—खानखानन, उठा ( हात धरून उठवितो. ) तुमचे माझ्यावर इतके अगणित उपकार आहेत कीं तुमच्या

हातून घडलेल्या गुन्ह्याबद्दल माफी मागण्याचें खरेखर कांहीं कारणच नाहीं. तुमचा तिच्यावर हक्कच आहे. आणि तुम्ही तरी असा कोणता मोठा गुन्हा केला आहे? अनेक वर्षें-पर्यंत तुम्हीं भोगलेले सगळे अधिकार एकदम काढून घे-ण्यांत माझ्याच हातून चूक झाली. माणसाला आपल्या हातचे अधिकार एकदम नाहींसे झाल्याबद्दल जितकें दुःख होतें तितकें दुसरें कशानेंही होत नाहीं. वीराचे हातीं जशी तलवार तसे मुत्सद्याच्या हातांत अधिकार असतात. ते गेले म्हणजे आपण निर्माल्यवत् झालों असें माणसाला वाटतें. तुम्हांलाही तसें वाटलें यांत ताज्जुब वाटण्यासारखें कांहीं नाहीं. हा मनुष्यस्वभावाचा धर्मच आहे. तुम्ही या गादी-विरुद्ध बंड करून गेलेले अधिकार परत मिळविण्याचा प्र-यत्न केला येवढें मात्र वाईट झालें. तुमच्या इतक्या वर्षां-च्या इमानदारीनें केलेल्या नोकरीवर त्यानें पाणी फिरलें आणि तुमच्या नांवलौकिकास बट्टा लागला. यापेक्षां तुम्ही माझ्यापाशीं येऊन खुल्या दिलानें आपल्या मनांतला हेतु सांगितला असता, तर तुमची इज्जत राखण्यासाठीं कांहीं अधिकार मीं तुमच्याकडे ठेविले असते. असो; पण आतां त्याचें काय? वडिलांच्या पुण्याईनें आणि आशिर्वादानें स-गळे अनर्थ टळले आहेत. तुम्हांलाही कृतकर्माचा पुरा प-श्चात्ताप झाला आहे. तो पश्चात्ताप अल्लाच्या घरीं रुजू आहे. तेव्हां आतां झाल्या गोष्टी विसरा. मी विसरलोंच आहें.

आणि या गोष्टीची खात्री पटविण्यासाठीं मी आपणास या दरबारांत पूर्वीच्याच सन्मान्य जागीं बसवितों. या दरबारांत राहण्याची इच्छा नसली तर काल्पी व चंदेरी प्रांतांची सुभेदारी देतों. तेंही कबूल नसेल, आणि राहिलेलें आयुष्य अल्लाचें नामस्मरण करण्यांत व धर्मकृत्यांत घालविण्याचें मनांत असेल तर तसें सांगा. मक्केस जाऊन राहावयाचें असेल तर तेथें तुमच्या मोठेपणास साजेल असा सर्व तऱ्हेचा बंदोबस्त ठेवण्यांत येईल.

बेह० ( सद्गदित कंठानें )–खाविंद, एकवार आपल्या पायाशीं मी बेइमान केलें; आतां आपल्या राज्यांतलें कोणतेंही काम करण्याची माझी योग्यता नाहीं. हें काळें झालेलें तोंड दुनियेला दाखविण्याची माझी इच्छाही नाहीं. आपण उदार मनानें क्षमा केली हेंच माझ्या नोकरीचें योग्य बक्षीस आपण मला दिलें आहे. आता आपलें सदोदित कल्याण चिंतून राहिलेले आयुष्याचे दिवस मक्केंत घालवावे येवढीच माझी इच्छा आहे. अल्ला आपणास व आपल्या मुलाबाळांस सुखी राखो.

अक०–हा तुमचा विचार कांहीं वावगा नाहीं. तुम्ही खुशाल मक्केला जावें. तेथें तुम्हांला सालीना पंनास हजार रुपयांची नेमणूक मी करून देतों. ती घेऊन तुम्ही आपला काळ अल्लाच्या चिंतनांत घालावा. तुम्ही येथें राहिलां असतां तर तुमच्या पोक्त सल्ल्याचा लाभ आम्हांस मिळाला

असता. परंतु स्वतःच्या फायद्यासाठीं मी तुमच्या परमार्थाच्या आड यावें हें बरोबर होणार नाहीं. म्हणून मी तसें न करता आपणास खुषीनें रजा देतों. ( बेहरामास बहुमानाचीं वस्त्रें देण्यांत देतात. )

बेह०—सरकारच्या दयाळूपणानें माझ्या दिलाला पूर्णपणें जिंकून गुलाम करून सोडलें आहे.

( मुजरा करून जातो. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग चौदावा.

### हिंदु कीं मुसलमान.

**कथाभाग**—अकबरासारखा थोर, उदार, धोरणी व हिंदुप्रजेला संतोष देणारा दुसरा मुसलमान बादशहा झाला नाहीं. यानें राज्याच्या बळकटीसाठीं व हिंदु प्रजेला संतुष्ट राखण्यासाठीं काय काय केलें, व त्याचे मनांत कशाप्रकारचे विचार नेहमीं घोळत असत याची थोडीशी छाया पुढील प्रसंगांत दाखविली आहे.

# हिंदु कीं मुसलमान.

पात्रें.

अकबर—दिल्लीचा बादशहा.

अबुलफज्ल—त्याचा एक मंत्री.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—बादशहाचा राजवाडा.

**अकबर** ( स्वगत )—मला तक्तनशीन होऊन पुरीं चौदा वर्षें झालीं. इतक्या दिवसांत मी राज्याची मजबुती कोणती केली ? आणि प्रजेच्या सुखासाठीं कोणत्या गोष्टी केल्या, याचा हिशोब त्या आकाशांतल्या मालकानें विचारला तर मी काय उत्तर देणार ? राज्यांतलीं बंडें आणि दंगेधोपे मोडले आणि शांतता केली असें सांगितल्यानें त्याचें समाधान होईल काय? छे: ! मुसलमान सरदारांचीं बंडें मोडलीं तरी जोंपर्यंत हिंदु-रजपूत-राजे असंतुष्ट आहेत तोंपर्यंत माझें तक्त डळमळीतच राहणार. त्यांच्याशीं दिलजमाई झाली नाहीं आणि दिल्लीच्या पातशाहीविषयीं त्यांचे ठायीं प्रेम व दृढ निष्ठा उत्पन्न झाली नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानांतल्या मोगलांच्या राज्याला चिर-स्थायीपणा कधीं यावयाचा नाहीं. यासाठीं हिंदु आणि मुस-लमान यांच्यांतला भेद अगोदर दूर केला पाहिजे. तो काढून टाकण्याचा कांहीं प्रयत्न माझे हातून आतांपर्यंत झाला आहे

काय? हिंदू राजांना या बादशाही तक्ताविषयीं प्रेम व अभिमान वाटावा म्हणून रजपुतांशीं बेटीव्यवहार सुरू करण्याचा व हुशार आणि विश्वासु हिंदूंना मोठाल्या अधिकाराच्या जागा देण्याचा माझा बेत अद्याप विचाराच्याच अवस्थेंत आहे. त्याला कृतीचें स्वरूप मिळालें नाहीं तोंपर्यंत मी तुम्हांला फार प्यार करतों असें तोंडानें कितीही वेळां म्हटलें तरी लोकांचा माझ्यावर कसा विश्वास बसावा? बरें, मी जर हिंदूंना जवळ ओढलें तर माझे मोगल सरदार व अफगाण अंमलदार यांना वैषम्य नाहीं कां वाटणार? अलबत् वाटेल. पण वाटेना वाटलें तर? मला येवढ्या मोठ्या हिंदुराजांचें आणि हिंदुप्रजेचें पाठबळ मिळाल्यावर थोडेसे मुसलमान सरदार बिथरले म्हणून मला काय त्यांची पर्वा आहे? हिंदु लोक अत्यंत प्रामाणिक आणि राजनिष्ठ असा त्यांचा पूर्वापार लौकिक आहे. मी त्यांच्याशीं बेइमान झालों नाहीं तर तेही माझ्याशीं बेमान होणार नाहींत अशी माझी पूर्ण खात्री आहे. त्यांच्या देशांत येऊन त्यांच्यावर राज्य करावयाचें तर त्या राज्याचा पाया त्यांचा विश्वास व मैत्री संपादूनच भक्कम केला पाहिजे.

( इतक्यांत दूत प्रवेश करतो. )

दूत—जहांपन्हाँ, अबुलफज्ल साहेबांची स्वारी हुजूरच्या मुलाकतीसाठीं आली आहे.

अक०—फार उत्तम आहे. येऊं दे त्यांना.

( अबुलफज्ल कुर्निसात करतो. )

**अक०**–या! फार चांगले वेळेवर आलांत. मला या वेळीं तुमच्या सल्लामसलतीची जरूरच होती.

**अबु०**–हुकूम फर्मावावा. त्याची तामिली करण्यास हा बंदा हाजिर आहे.

**अक०**–हें पहा, आपल्या दरबारांतलें उल्मांचें प्रस्थ तुम्हीं कशा युक्तीनें नाहींसें केलें तें माझ्या चांगलें ध्यानांत आहे. बेटे स्वत: अज्ञानी असून दुसऱ्याला धर्माचा उपदेश करण्याचा अधिकार आपला आहे अशी केवढी आढ्यता मिरवीत असत! पण तुम्ही फार चतुराईनें त्यांचा काटा काढून फेंकून दिलांत. तें असो. पण मी काय बरें तुम्हांला विचारणार होतों? ( स्मरण करून ) हो! तुम्ही आज बरेच दिवस येथें आहां. हिंदुलोकांचा धर्म, चालीरीति, स्वभाव, व त्यांचे विचार यांची तुम्हांला चांगली माहिती आहे. तुम्हीं त्यांचा इतिहास वाचला आहे व त्यांच्या स्वभावांतली मख्खी पुरतेपणीं ओळखली आहे. तेव्हां त्या लोकांना खुष ठेवण्याची युक्ति तुम्हांला जशी सांगतां येईल तशी दुसऱ्या कोणाला सांगतां येणार नाहीं.

**अबु०**–सरकारेअली, माझ्या अल्प समजुतीप्रमाणें हिंदु-लोक फार अल्पसंतुष्ट आहेत. त्यांना धर्मासारखें प्यार दुसरें कांहीं वाटत नाहीं. त्यांच्या धर्माची स्तुति त्यांच्या तोंडावर केली, आणि एकदोन किरकोळ बाबतींत त्यांच्या चाली उचलल्या कीं झालेच ते खुष! फार काय, पण आपण यो-

ग्याचा पेहराव कधींमधीं केला, आणि एकादशी व शिवरात्रीसारख्या दिवशीं उपास केला, अथवा सकाळीं सूर्याला नेमानें नमस्कार केला कीं हे भोळे लोक आपणाला विष्णूचा अवतार समजून आपल्या पायांचें तीर्थसुद्धां घेऊं लागतील.

अक०—तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें आहे. या लोकांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन आपण त्यांचें प्रेम संपादावें आणि त्यांच्या संतोषाच्या पायावर मोगल पातशाहीचा पाया मजबूत करावा असा माझाही विचार आहे. आपण हिंदु व मुसलमान यात भेद मानीत नाहीं, किंबहुना स्वतः मुसलमान असून इस्लामापेक्षां हिंदुधर्मालाच अधिक मान देत असतों हें लोकांच्या मनावर ठसविण्यासाठीं गोवध प्रथम बंद करण्याचें मीं योजिलें आहे. तसेंच बादशहाचा दरबार म्हणजे एकट्या मुसलमानांचा नव्हे हें जाहिर व्हावें म्हणून मुसलमानी सणाचे दिवशीं दरबारांत होणारे सगळे समारंभ बंद करणार आहे. सूर्याची पूजा करण्याची तुमची सूचना फार चांगली आहे. बीरबलानेंही हीच गोष्ट मला सांगितली होती. सर्वांना ज्याचेपासून जीवन मिळतें त्याची पूजा करावयाची नाहीं, तर कोणाची करावयाची? माझ्या कारकीर्दींत सर्वांना आपापल्या धर्माप्रमाणें वागण्याची पूर्ण मुभा देण्याचें मीं ठरविलें आहे. हें सगळें केवळ राजनीतीचे उपाय म्हणून मी करणार नसून खरोखरच माझ्या मनांतली धर्माविषयींची संकुचितबुद्धि नाहींशी झाली आहे

म्हणून मी करणार आहें. हिंदु राजांचें मन आपलेकडे ओढून घेण्यास आणखी काय करावें असें आपणांस वाटतें?

अबु०—हिंदूंशीं बेटी—

अक०—बस बस! माझ्या अगदीं मनांतलें बोललांत. तुम्हीं आलांत त्यावेळीं मी याच गोष्टीचा विचार आपल्या मनाशीं करीत होतों. पण काय हो, मानी रजपूत राजे या गोष्टीला कबूल होतील असें तुम्हांला वाटतें काय?

अबु०—आपण हिंदूंच्या देवांना भजूं लागलांत, हिंदुधर्माची तारीफ वारंवार केली, उपासतापास आणि व्रतें आरंभिलीं, म्हणजे हळूं हळूं आपली गणना हिंदुलोक साधूंत व योग्यांत करूं लागतील; आणि आपणावर मुसलमान धर्माचा नुसता आळ आला आहे, वस्तुतः आपण हिंदूच आहां, अशी त्यांची खात्री एकदां पटली म्हणजे मग बेटीव्यवहाराच्या आड मोठीशी अडचण येणार नाहीं. येवढी गोष्ट खरी कीं उदेपुरासारखें पिढीजात अभिमानी घराणें आपल्या बेटी बादशहाच्या जनानखान्यांत पाठवितील हें कधींही घडणार नाहीं. पण जोधपूर, बिकानेर, जेसलमीर, कुमळमेर, अलवर वगैरे रजपूत राजे बादशाही घराण्याशीं शरी संबंध घडवून आणण्यांत स्वतःला भूषण मानतील अशी माझी समजूत आहे.

( दूत प्रवेश करतो. )

दूत—सरकारनें शिकारीला जाण्याची तयारी करण्यास

बहादुरखाँ यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें सर्व सिद्धता आहे असा त्यांचेकडून निरोप आला आहे.

अक०—बरें आहे तर. माझा शिकारीचा पोशाख घेऊन ये. ( अबुलफज्ल यास ) आज तुमच्याकडून मोठी महत्त्वाची सल्ला मला मिळाली आहे. मी तुमच्या सूचनांचा अवश्य विचार करीन, आणि तुम्हीही त्यांबद्दल अधिक विचार करून चार दिवसांनीं मला पुनः अवश्य भेटा.

( अबुलफज्ल कुर्निसात करून जातो. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग पंधरावा.

### अबलेचें प्राबल्य.

**कथाभाग**— अकबर बादशहाचा पुत्र जहांगीर हा व्यसनी होता. तो नेहमीं दारू पिऊन गुंगून पडत असे. तथापि दारूचें व्यसन फार वाईट आणि नाश करणारें आहे हें त्याला समजत होतें व आपल्या सरदारांना व प्रजेला तें व्यसन लागूं नये म्हणून दारू पिणारास तो कडक शासन करी. हें त्याच्या सरदारांना आवडलें नाहीं. दुसरी गोष्ट—नूरजहान नांवाची त्याची राणी होती. ती फार शहाणी, धिराची, धोरणी आणि हुशार असल्यामुळें एकीकडे जहांगिराला तिनें

अगदीं मुठींत ठेविलें होतें व दुसरीकडे सरदार लोकांनीं बंडें वगैरे करूं नये म्हणून त्यांनाही तिनें धाकांत ठेविलें होतें. पण एका अबलेनें आपणावर येवढी सत्ता चालवावी हें कित्येक सरदारांना आवडलें नाहीं व त्यांनीं बंड केलें हा कथाभाग या प्रसंगांत आला आहे.



# अबलेचें प्राबल्य.

—:*:—

## पात्रें.

इनायतुल्ला, अब्दल्ला, मीर हुसेन इ. जहांगिरचे सरदार.

## प्रवेश पहिला.

स्थळ—सैन्याचा तळ.

मीर०—दोस्त हो, माझा तर विचार ठरला. त्याप्रमाणें दोन चार दिवसांत युक्तीनें मी येथून पाय काढणार. पण तुम्ही काय तो आपला नक्की विचार ठरवा. येथें यापुढें राहणें म्हणजे आपली इज्जत हातानें घालवून बसणें आहे. बादशाहा तुमची इज्जत किती ठेवीत असतो हें तुम्ही परवा दरबारांत पाहिलेंच. शराब पिणें हा कुराणशरीफाच्या दृष्टीनें गुन्हा असला तरी तो धार्मिक गुन्हा आहे. त्याबद्दलची सजा परवारदिगार देईल ती देईल. शहानशहाला त्याबद्दल कायदा करण्याचें कांहीं कारण नाहीं. आम्ही लढाईच्या वेळीं अन्नपाण्याची, हुक्क्याची, जिवाची सुद्धां पर्वा न करतां लढावें, आणि आलेला शीण घालविण्याकरितां थोडासा नशा केला म्हणून बादशहानें भरदरबारांत आमची इज्जत घ्यावी हें मला तरी हरगिज कबूल नाहीं.

अब्द०—अलबत, अलबत. माझें सुद्धां तेंच म्हणणें आहे. परवाच्या दरबारांत घडलेला प्रकार तर निवळ जुलमाचा व

कोणाही सरळ माणसाला चीड आणणारा घडला. बादशहानें खुद्द शराब पिण्याला इजाजत दिली, आणि अखबारनवीसांनें शराब पिणारांचीं नांवें टिपून घेऊन बादशहापुढें वाचल्यावर बादशहानें कोणाला जबर दंड कर, कोणाची मनसबदारी काढून घे, कोणाला नाक घासायला लाव, कोणाला फटके लगाव, असे हुकूम सोडले! वाः! खासा न्याय! एकूण दुनियेंत कोणी कोणाचा—खास बादशहाच्या शब्दाचासुद्धां—इतबार धरूं नये असा वक्त आला म्हणावयाचा! शराबखोरी करणें वाईट असतें तर दुनियेंत ती आज इतकीं वर्षें कशी चालत आली असती?

**मीर०**—आणि खुद्द बादशहाला शराबखोरीची चीड असती तर त्यानें स्वतः नसती कां ती टाकली! आपण स्वतः मात्र शराब पिऊन रात्रंदिवस मस्त होऊन राहावयाचें आणि दुसऱ्यानें तसें केलें म्हणजे मात्र त्याला सक्त सजा द्यावयाची हा चांगला न्याय आहे बुवा!

**इना०**—दोस्तहो, माझें थोडें बोलणें ऐकून घ्याल कां? माझ्या दृष्टीनें बादशहा करतो आहे तें कांहीं वाईट बुद्धीनें करीत नाहीं. आपल्या सर्वांच्या फायद्याचीच ती गोष्ट आहे. मात्र ती करण्याची पद्धत चुकीची आहे. शराबखोरीपासून आजपर्यंत अनेक अनर्थ घडले आहेत. शराब पिण्यानें तनदुरुस्ती राहत नाहीं, मनुष्य गाफिल राहतो, आणि नशाच्या भरांत त्याची अक्कल ठिकाणावर नसल्यामुळें त्याच्या हातून

काय चूक होईल आणि तिचा काय परिणाम होईल याचा नेम नसतो. म्हणून बादशहानें शराबखोरी मना केली यांत त्यानें काय वाईट केलें?

मीर०—काय वाईट केलें? शराबखोरी करण्याचा आमचा पिढीजाद हक्क त्यानें उडविला, याहून आणखी वाईट तें काय करावयाचें?

इना०—( हंसून ) शराबखोरी करण्याचा हक्क! वाः! मीरसाहेब, कमाल केलीत बुवा बोलण्याची! स्वतःच्या घराला आग लावण्याचा हक्क! आत्महत्या करण्याचा हक्क! मुलाबाळांना भिकेला लावण्याचा हक्क! असे एक कां दोन, किती तरी तुमचे हक्क बादशहानें बुडविले आहेत! त्यांच्या साठींसुद्धां बादशहावर रागावलें पाहिजे. पण ही थट्टा सोडून देऊं. मी म्हणतों कीं बादशहानें भरदरबारांत मोठमोठ्या सरदारांची इज्जत घेतली हें वाईट तर खरेंच, पण हा अन्याय करणाऱ्या खऱ्या गुन्हेगाराला सोडून बिचाऱ्या बादशहावर कां व्यर्थ रागावतां? बादशहाला स्वतःची अक्कल मुळींच नाहीं. तो त्या महत्त्वाकांक्षी औरतेच्या मुठींत सर्वस्वी सापडला आहे. ती सांगेल तितकें मोजकें पाणी तो पीत असतो.

मीर०—बादशहा अन् पाणी पिणार? ( हंसून ) कां? शिराजहून अंगुराची शराब येण्याचें आजच कांहीं बंद झालें नाहीं! तें बंद होईल तेव्हां बादशहाच्या ओंठाला पाण्याचा स्पर्श होईल.

अब०—असें मस्करीवर नेऊं नका. इनायतुल्ला साहेबांचें बोलणें विचार करण्यासारखें आहे. बादशहा अन्याय करीत असला तरी तो अन्याय त्याचा हात स्वतः करीत नाहीं. दुसरें कोणी त्या हाताकडून तो करवीत आहे, हें आपणा-सर्वांना माहित आहे. आज काल जहांगीर आपला बादशहा नाहीं, नूरजहान आहे. जर तुमची इज्जत कोणीं घेतली असेल तर ती तिनें घेतली आहे. यासाठीं मी म्हणतों कीं याबद्दलची सजा तिला झाली पाहिजे. ती करण्याची हिंमत तुमच्यांत आहे काय?

मीर०—होय आहे. हा पठ्ठा ती करायला तयार आहे.

इना०—ती गोष्ट सोडून द्या. तुम्हीं तिला अजून पुरी ओळखली नाहीं. बेअदबी माफ करा; पण मला जें खरें खरें दिसतें तें सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. नुसत्या मुत्सद्दीपणाच्या डावपेंचांतच नाहीं, तर लढाईत दाखविण्याच्या शौर्याच्या कामांतही ती तुम्हां आम्हां सर्वांना भारी आहे. परवाच तिनें मोहबतखानासारख्या येवढ्या मोठ्या सरदा-राला कसें चकाविलें तें नाहीं तुम्हीं पाहिलें? मोहबतखाना-च्या तावडींतून बादशहाला सोडविण्यासाठीं फौजेची पाहणी करण्याचें निमित्त केलें, आणि रजपूत व मुसलमान एकत्र झाल्यास दंगा होईल म्हणून तुम्ही आपले रजपूत शिपाई दूर ठेवा असें मोहबतखानाला सांगून त्याच्याकडून रजपूत फौज दूर करविल्यावर बादशहाला गराडा घालून आपल्या ताब्यांत घेतलें. असा युक्तिबाजपणा आपल्यापैकीं एकाच्या

तरी अंगांत आहे काय? अहो, ही जातीची औरत आहे, पण अक्कल आणि छाती खरोखर मर्दाची आहे.

अब०—मर्दाची नव्हे सैतानाची आहे म्हणा. मर्दाची म्हणून खऱ्या मर्दानीपणाला कमीपणा कां लावतां? खरा मर्द कधीं तिच्यासारखीं नीचपणाचीं कृत्यें करणार नाहीं. मोहबतखानानें कांहीं निरोप देऊन बादशहाकडे आपल्या जांवयाला पाठविला असतां या दुष्ट औरतेनें त्याला मध्येंच रस्त्यांत हत्तीवरून उतरण्यास लावून आणि त्याचे कपडे छिनावून घेऊन त्याला पांघरण्याला लकतरा दिल्या आणि त्याला काठ्यांनीं बडवून रोडक्या तट्टावर बसवून त्याची बिचाऱ्याची धिंड काढली! याला तुम्ही काय मर्दानीपणा म्हणतां? मी तर ही केवळ सैतानी समजतों.

इना०—माझ्या म्हणण्याचा मतलब इतकाच होता कीं कोणत्या वेळीं कसें वागून आपली छाप कायम ठेवावी याची तिला पुरी वाकबी आहे. सैतानी करायच्या वेळीं सैतानी करायला चुकावयाची नाहीं; हात जोडण्याची वेळ आली तर हातही जोडील, आणि लढाईंत शिपाई कचरतांना दिसले तर त्यांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न करणारें भाषणही करण्याची खुबी तिला ठाऊक आहे. नुसतें भाषणच करणारी ती औरत नाहीं. अचूक नेम मारण्यांत, वाघाची शिकार करण्यांत, आणि हरएक कामांत तिची छाती जबर आहे. अशा औरतेपुढें मोहबतखान आणि असफखान यांच्यासारख्यांचा टिकाव लागला नाहीं, तेव्हां ती काय तुमच्या आम-

च्यासारख्यांना दाद देणार आहे ? म्हणून म्हणतों कीं जो कांहीं बेत ठरवावयाचा तो फार विचारानें ठरविला पाहिजे.

अब०—अन् त्यापेक्षां ही महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण एके ठिकाणीं जमून कांहीं विचार करीत होतों हीसुद्धां गोष्ट गुप्त ठेविली पाहिजे. नाहींतर ती नांवाची नूरजहान आहे. तिला आपण जमलों होतों येवढा नुसता वास लागला कीं पुरे आहे, ती आपणा सर्वांच्या मागें हात धुऊन लागायची आणि सर्वांना धुळीस मिळविल्यावांचून स्वस्थ राहायची नाहीं.

मीर०—वाः ! भले एकापेक्षां एक नामर्द जमले आहेत ! चालूं द्या तुमचा विचार. माझ्यानें आतां येथें राहवत नाहीं. दोस्तहो, हा मीरहुसेन तुम्हांला शेवटचा सलाम करीत आहे त्याचा स्वीकार करा. कमजास्त शब्द रागाच्या भरांत तों- डून निघाले असतील त्याबद्दल माफी करा. (जातो.)

सर्व—अरे हा गेला ! फारच बुवा याचा स्वभाव तापट ! चला, आपण त्याची समजूत करून त्याला परत आणूं.

( सगळे जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग सोळावा.

### ऐश्वर्याचा उपभोग.

**कथाभाग**—जहांगीरच्या मागून दिल्लीच्या गादीवर आलेला शहाजहान बादशहा मोठा ऐश्वर्यशाली होता. त्याला सत्ता, संपत्ति, मानपान, व स्त्रीप्रेम हीं इतरांपेक्षां विशेष अनुकूळ होतीं व त्यांचा त्यानें अशा रीतीनें उपयोग केला कीं त्यांपासून त्याचा लौकिक होऊन कलाकौशल्या विषयीं हिंदुस्थानची कीर्ति अद्याप साऱ्या जगांत गाजत आहे. त्याचें त्याची स्त्री अर्जमंदबानु ऊर्फ मुमताज़् हिच्यावर अतोनात प्रेम होतें. ती त्याच्या अगोदर मेली. तिची कबर म्हणून त्यानें साऱ्या जगांत अप्रतिम सुंदर अशी ताजमहाल नांवाची इमारत बांधली. या इमारतीकडे एकंदर ९ कोटि १७ लक्ष

रुपये खर्च झाले व त्या इमारतीच्या चालू खर्चासाठीं बादशहानें एकेक लाख रुपये सालिना उत्पन्नाचीं अशीं तीस गांवें लावून दिलीं होतीं. ऐश्वर्याचा उपभोग घेतला असा शहाजहान बादशहानेंच असें त्याच्याविषयीं इतिहासकारांनीं लिहून ठेविलें आहे.

# ऐश्वर्याचा उपभोग.

## पात्रें.

शहाजहान–दिल्लीचा बादशहा.

अलेप्पो, बोखारा, व गोवळकोंडा येथील जवाहिऱ्ये, दूत वगैरे.

## प्रवेश पहिला.

स्थळ–आग्र्याचा राजवाडा.

( शहाजहान बादशहा एकटा दुःखित होऊन बसला आहे. )

शहाज०(स्वतःशीं)–प्यार! वाः! किती लहान हा शब्द! पण तमाम दुनियेवर आपला प्रभाव गाजवीत आहे! प्यार ही एक अजब चीज आहे! दुनियेंतल्या साऱ्या दुःखावर हटकून अक्सर करणारी ती दवा आहे यांत शंका नाहीं. ज्याच्यावर आफत येऊन बेतली असेल आणि त्या आफतींत इष्काची मात्रा ज्याला मिळाली असेल त्यालाच तिची किंमत कळणार. दुसऱ्यांना कशी कळणार ? म्हणूनच—

"मैं जानूं तूं क्या जाने ?
जिसपर बिपदा बीती है वो जाने,
या मौला जाने!"

असें जें एका शहाण्या माणसानें म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. माझी प्यारी अर्जमंदबानु माझ्यावर मनापासून

प्यार करणारी होती; म्हणून राज्यांतले फंदाफितूर, सरदार लोकांचे कट, वगैरे शेकडों आफती माझ्यावर आल्या, तरी मला त्यांची बिलकुल पर्वा वाटली नाहीं. भाग्यानें प्राप्त झालेल्या ऐश्वर्याचा उपभोग मी माझ्या प्यारीबरोबर यथेच्छ घेत राहिलों. तिची कोणती ही हौस पुरविण्याची मीं ठेविली नाहीं. असें असतां हे प्यारी अर्जमंदबानु! तूं माझ्यावर रागावून मला सोडून कां बरें गेलीस! तूं माझ्या सुखाची खाण होतीस. ती नाहींशी झाल्यावर मला हें ऐश्वर्य, फार काय, पण हें जीवित सुद्धां नकोसें वाटावें यांत आश्चर्य काय? पण एका गोष्टीसाठीं मीं अजून प्राण ठेविला आहे; आणि ती गोष्ट म्हणजे ही कीं अर्जमंद, तुझ्या माझ्या प्रेमाला आणि माझ्या ऐश्वर्याला शोभेल आणि दुनियेंत जिची बरोबरी कोणाला कधीं करतां येणार नाहीं अशी अपूर्व कबर तुझ्यासाठीं बांधून मग तिच्याच शेजारीं आपली कबर बांधून तींत हा देह ठेवावयाचा. दुनियेंतला उत्तम मालमसाला, आणि उत्तमोत्तम कारागीर आणवून तुझी कबर तयार करवीन आणि त्यावर दिल्लीच्या जवाहिरखान्यांतलीं बहुमोल रत्नें बसवीन तेव्हांच माझ्या मनाचें समाधान होईल.

( इतक्यांत एक दूत प्रवेश करतो. )

दूत—हुजूर! अलेपो, बोखारा, गोवलकोंडा वगैरे दूरदूरच्या देशांतले जवाहिऱ्ये हुजूरच्या हुकुमावरून मुलाखतीसाठीं आले आहेत.

शहाज०—येऊं दे त्यांना आंत.

दूत—जो हुकुम. ( जातो व त्यांना घेऊन येतो. )

शहा०—या. बसा. सांगितल्या प्रमाणें तुमच्या देशांतलें उत्तमांतलें उत्तम जवाहीर आणिलें आहेना? हें पहा, एकच गोष्ट तुम्हांला सांगतों. आज आमच्या जवाहिरखान्यांत डोळे दिपवून टाकण्यासारखीं कोट्यावधि रुपयांचीं हिरे, माणकें, पाच, नीळ वगैरे रत्नें आहेत. त्यांच्याहून सरस असें जवाहीर असेल तेवढेंच बाहेर काढा. किरकोळ व डोळ्यांत न भरणारें जवाहिर पाहण्याची तकलीफ आम्ही घेणार नाहीं.

प० जो०—गरीबपरवर, दुसरें तिसरें मी कांहीं दाखवीत नाहीं. मोजके पांचच हिरे मीं आणिले आहेत. पण ते साऱ्या दुनियेंतल्या जवाहिरांचे ताज गणिले जातील असे आहेत. हुजूरनीं यांचेवर कृपेनें नजर फिरवावी असा अर्ज आहे. ( बादशहाच्या पुढें करतो. )

शहाज० ( त्यांतला एक चांगला हातीं घेऊन )—काय! हाच तुमच्या देशांतला उत्कृष्ट माल काय? आणि तुम्ही आतां जी येवढी तारीफ केली ती याचीच काय? तुम्ही आम्हांला कोण समजतां? आमच्या इथल्या नोकरांना आम्हीं जे अलंकार दिले आहेत त्यांत सुद्धां याच्यापेक्षां अधिक तेजस्वी हिरे आहेत. (नोकरास हाक मारून ) जमालला सांग कीं परवा तुला जो कंठा इनाम दिला तो या सौदागिरांना दाखविण्यासाठीं घेऊन ये.

प० जो०—हुजूरचें ऐश्वर्य साऱ्या दुनियेभर गाजत आहे. हुजूरइतका भाग्यवान् प्राणी दुसरा कोण आहे? तेव्हां या-

ऱ्यापेक्षां चांगलें जवाहिर हुजूरपाशीं असल्याचें नवल नाहीं. माझ्या गरीबाजवळ जें होतें तें हजर केलें. गुन्हा माफ असावा, आणि इतक्या दुरून आलों त्यासारखा कांहीं तरी सौदा व्हावा.

शहाज०–अलबत्! आमच्या दरबारांत आलेला कोणी सौदागीर रिकाम्या हातानें आम्ही जाऊं देणार नाहीं. बोला तुमच्या मालाची किंमत.

प० जो०–( स्वतःशीं ) माझ्या मालाची खरी किंमत १० लक्ष मोहोरा आहे. पण ती येथें सांगून उपयोगाचें नाहीं. त्यांतली निमी अधिक रकम कचेरींतल्या लोकांचीं तोंडें दाबण्यांतच खर्च व्हावयाची! खऱ्या किंमतीच्या दुप्पट रकम सांगितली पाहिजे. ( उघड ) हुजूर जो हुकूम फर्मावतील तो खरा. हा बंदा पातशाहीची कीर्ति ऐकून अलेप्पोहून इतका दूर आला आहे. नुसता वाटेचा खर्चच दोन लाख मोहोरा झाला आहे. किमानपक्षीं २० लक्ष मोहोरा तरी मिळाव्या असा अर्ज आहे. या उप्पर हुजूरची मर्जी.

शहाज०–तुमच्या मालाची खरी किंमत सातआठ लक्ष मोहोरापेक्षां ज्यास्त होऊं शकत नाहीं. शिवाय वाटखर्च व दुसरे खर्च मिळून तुम्हास बारा लक्ष मोहोरा देण्याचा आम्ही हुकूम करतों. उद्या खजीन्यांतून आपली रकम घेऊन जा.

( सौदागर जातो. )

( दुसऱ्या जोहोरीस ) काय शेटजी? तुम्ही कोठून आलां? तुमचें नांव काय?

दु० जो०—मी बोखाऱ्याहून आलों आहें. माझें नांव दिलदारखान.

शहाज०—वा: ! नांव तर योग्य आहे; पण दिल खुष करण्यासारखा माल आहे का ?

दिल०—मी आपल्याच तोंडानें स्वत:च्या मालाचें वर्णन करणें योग्य नाहीं. समर्कंदच्या सुलतान साहेबांना माझें जवाहिर अतिशय पसंत पडलें आहे इतकें सांगितलें म्हणजे बस आहे. हुजूरची खात्री होईल ती खरी. हा पहा दिलचमन नांवाचा हिरा. याच्यासारखा तेजस्वी हिरा आज दुनियेंत नाहीं. हा दुसरा ताज—इ—नूर नांवाचा हिरा आहे. हा खुष्कंदचे नबाब साहेब ५० लक्ष मोहोरांस मागत होते, पण दिला नाहीं. याचे खरे भोक्ते हुजूरसारखे पातशहाच होत. या शिवाय लहान मोठे हिरे, माणकें, पुष्कळ आहेत; पण तीं मी बाहेर काढलीं नाहींत. माझी खात्री आहे कीं हे दोन हिरे हुजूरच्या पसंतीला खास उतरतील.

शहाज० ( दोन्ही हिऱ्यांकडे बारकाईनें पाहून )—दिलदारखान, तुम्ही बादशाही दरबारांत आलां आहां हें ध्यानांत आहे ना ? ( रागानें हिरे फेकून देऊन ) जा. तुमच्या खुष्कंदच्या नबाबसाहेबांनाच ते नेऊन द्या; उठा, चालते व्हा; आत्तांच्या आतां आमच्या राज्याच्या बाहेर व्हा. तुमची फसवणूक येथें बिलकुल चालावयाची नाहीं. गोड गोड थापा मारून खोटे हिरे खरे म्हणून चालवायला तुम्ही येथें

आलां आहां. येथें रत्नांची पारख कोणाला नाहीं अशी का तुमची समजूत आहे?

दिल०(घाबरून)–त–त–तसें ना–ना–नाहीं हु–हु–हुजुर.

शहाज०–बस! ज्यास्त बोलण्याचें कारण नाहीं. तुमचें कपट आम्हीं पूर्णपणें ओळखलें आहे. हं. गुंडाळा आपला गाशा अन् एकदम आमच्या मुलखांतून निघून जा. नाहींतर गिरफ्तार करण्यांत येईल. ( जोहोरी मुकाट्यानें जातो. ) ( तिसऱ्या जोहोऱ्यास ) तुम्ही गोवलकोंड्याहून आलां आहांत ना? गोवलकोंडा उत्तम हिऱ्याविषयीं मशहूरच आहे. तुमचा मुलख फार चांगला आहे म्हणून ऐकतों. तुमचे नबाब साहेब रयतेला कसे काय वागवितात?

ति०जोहोरी–ते आमचे मायबाप आहेत याहून ज्यास्त काय सांगावें?

शहाज०–बरें, तें असो; तुम्ही काय माल आणिला आहे? दाखवा पाहूं?

ति०जो०–हुजूर, आणिलेला माल हज़र करतों. त्याची प्रशंसा मी माझ्या मुखानें करावी असें नाहीं. हुजूरला जें वाटेल तें खरें. (बरेचसे हिरे, माणकें, वगैरे जवाहिर पुढें करतो.)

शहाज०–( तें सगळें बारकाईनें पाहून ) तुम्ही हिंदु आहां. गंगाजीची शपथ घेऊन मालाची किंमत सांगा. तुमचा माल ठळक जरी नसला, तरी आम्ही बांधीत असलेल्या नव्या ताजमहालावर कुराण-इ-शरीफ मधल्या कलमांच्या

हरूफांत बसविण्याला तुमचें जवाहिर चांगलें उपयोगीं पडेल. आम्ही तें खरीदणार आहों.

ति०जोहोरी–हुजूरनें मालाची परीक्षा केलीच आहे. आणखीही कोणा रत्नपारख्याकडून करवावी, आणि मग किंमतीचें नक्की करवावें असा माझा अर्ज आहे.

शहाज०–तुमचें म्हणणें रास्त आहे. ठीक आहे. तुम्ही उद्यां या म्हणजे काय तो निकाल करून टाकूं.

( जोहोरी जातो. )

शहाज०–माझ्या प्यारीचें येवढें स्मारक माझे हातून पुरें झालें म्हणजे मी कृतार्थ होईन. परमेश्वराची करणी अगाध आहे आणि त्याचे हेतु गूढ आहेत. पण येवढी गोष्ट खरी कीं तो एकेक प्राणी कांहीं तरी विशिष्ट कार्यासाठीं निर्माण करीत असतो. माझे आजोबा जलालुद्दिन महंमद अकबर यांना त्यानें हिंदु व मुसलमान यांच्यांत एकी करण्यासाठीं जन्मास घातलें, तसें ऐश्वर्यसुखाचा उपभोग यथेच्छ घेऊन हिंदुस्थानच्या कलाकौशल्याची कीर्ति दिगंत करावी याचसाठीं मला त्याचा आदेश झाला आहे असें मला वाटतें. परवरदिगर, तुमचा आदेश म्हणून आणि माझ्या परलोकवासी झालेल्या प्यारीच्या प्रेमाची साक्ष म्हणून मी आपला सगळा खजीना व अक्कल खर्चून अशी इमारत उठवून देईन कीं अलंदुनिया आश्चर्यच करीत राहील. हा माझ्या मनांतला हेतु पूर्ण करण्यास लागणारें आयुष्य व सामर्थ्य मात्र मला तुम्ही द्यावें येवढीच तुमच्या जवळ माझी प्रार्थना आहे.

---

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग सतरावा.

### अज्ञान हें दुराग्रहाचें मूळ.

**कथाभाग**—या प्रसंगांत औरंगजेबाच्या स्वभावाविषयीं व राजनीतीविषयीं त्या काळच्या लोकांचीं कशीं भिन्न भिन्न प्रकारचीं मतें होतीं व औरंगजेबानें हिंदूंचीं मनें कशीं दुखविलीं होतीं त्याचें चित्र लहानशा संवादाच्या रूपानें रेखाटण्याचा यत्न केला आहे. औरंगजेबाच्या कारकीर्दीचें सगळें सार या एका प्रसंगांत आणिलें आहे.

# अज्ञान हें दुराग्रहाचें मूळ.

पात्रें.

हंबीरराव
अनवरुद्दिनखान } औरंगजेब बादशहाचे सरदार.
चंद्रभान

## प्रवेश पहिला.

स्थळ- अरण्यांतली एक झाडी.

( शिकारीच्या वेषांत चंद्रभान प्रवेश करतो. )

चंद्र०—मनाची उदासीनता घालवावी म्हणून मुद्दाम आज शिकारीला निघालों. शिकारही चांगली झाली. पण मनाची उदासीनता पुनः आपली आहेच! आजचा दिवस गेला तेवढा आपल्या पदरांत पडला, उद्याचा विचार उद्या पाहतां येईल, अशा रीतीनें आयुष्याचा एकेक दिवस आम्ही आळेंबळें ढकलीत आहों. या औरंगजेबानें आम्हां सर्व हिंदु राजांना व सरदारांना निर्माल्यवत् करून सोडलें आहे! मुलांच्या खेळण्यांतलीं चित्रें जशीं वरून दिसायला चांगलीं धष्टपुष्ट, सुंदर, आनंदी व सुखी दिसतात, पण आंत पहावें तर पोकळ! हाड ना मांस! तशी आमची स्थिति आहे. धन-दौलत, मानमरातब, अधिकार, डामडौल, सर्व कांहीं पाह-णारांचे डोळे दिपवून टाकण्यासारखें, पण त्यांत सार पाहिलें

तर कांहींच नाहीं. आम्हांला स्वतंत्रता नाहीं, आमच्यावर बादशहाचा भरंवसा नाहीं, आणि शाश्वतीचा तर पत्ताच नाहीं! आपल्याला तर बुवा अशा जिण्याचा अगदीं वीट आला आहे. पण चंद्रभाना, वीट येऊन उपयोग काय? या गुलामगिरींतून तुझी सुटका होण्याचा कांहीं तरी मार्ग तुला दिसतो आहे काय? नाहींना? मग जिवाला व्यर्थ खेद कशाला करून घेतोस?

( इतक्यांत हंबीरराव व अनवरुद्दिनखान शिकारीच्याच वेषांत येतात. )

**हंबीर॰** ( चंद्रभानाला पाहून चपापून )–अरे! हे तर चंद्रभानजी! वा:! फार छान झालें. चंद्रभानजी, तुमच्या या अकस्मात् झालेल्या भेटीनें आमच्या आजच्या आनंदांत चांगलीच भर पडली म्हणायची! पण काय हो चंद्रभानजी, तुम्ही आज असे उदासवाणे कां दिसतां? शिकारीचा थकवा आला आहे वाटतें. बरोबर आहे. पातशहाची स्वारी दक्षिणेंत गेली आहे ती परत येईपर्यंतच काय ती शिकारीची मौज घेण्यास मिळायची! स्वारी एकदा परत आली आणि दरबारच्या मसलती, आणि गळेकापू लोकांचे डावपेच सुरू झाले म्हणजे मग कसली आली आहे शिकार! आपलें पागोटें संभाळतां संभाळतां आणि दरबारची संधानें राखतां राखतां जिवाला सारख्या यातना व्हावयाच्या! म्हणून आपण आज शक्तीच्या बाहेर शिकारीचे श्रम केलेले दिसतात. कांहीं हरकत नाहीं. तुमचा शीण घालविण्याची महामात्रा आमचे

जवळ र ़. हे आमचे दोस्त अनवरुद्दिनखाँ तुमच्यासारखेच मोठे खानदानीचे, मनाचे मोठे उदार आणि सरळ वर्तनाचे आहेत.

चंद्र०—अशा थोर सरदाराशीं आपण माझा परिचय करून देत आहां ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हे खानदानीचे आहेत हें यांच्या मुद्रेवरूनच दिसतें आहे. मनाचे हो उदार असतील या विषयीं तुमच्या शब्दावर माझा पूर्ण विश्वास आहे. पण माफ करा, मी सरळ वर्तनाचा आहें असें जें शेवटीं तुम्हीं सुचविलें तें मात्र खरें नाहीं. यांच्या सरळ वर्तना विषयीं मी शंका घेत नाहीं. माझ्याच स्वतःच्या सरळ वर्तना विषयीं माझी शंका आहे. कारण, दरबारांत—त्यांतून ही औरंगजेब पातशहाच्या दरबारांत—वागलेला मनुष्य सरळ वर्तनाचा असणें शक्यच नाही. 'यथा राजा तथा प्रजा' हा नियम खोटा कसा म्हणतां?

हंबीर०—तुम्ही म्हणतां तें अगदीं बरोबर आहे. दरबारांत वागायचें म्हणजे दुटप्पीपणा ठेविल्याखेरीज चालायचेंच नाहीं; आणि तो जितका ज्यास्त ठेवावा तितका मानपान आणि अधिकार यांत बढती व्हायची. पण दरबारांतला दुटप्पीपणा दरबारांत ठेवून इतर गोष्टींत सरळपणा ठेवण्याला तर कांहीं हरकत नाहीं?

चंद्र०—पण जाऊं द्या. या गोष्टीची चर्चा कशाला पाहिजे? तुम्ही ही आज आमच्यासारखेच शिकारीला आला होतां वाटतें!

हंबीर०—होय. हे आमचे दोस्त पातशहाबरोबर स्वारीत गेले होते. तेथें एका लुच्चया माणसाच्या कपटानें पातशहाच्या

नाराजीला बळी पडून यांना परत दिल्लीला यावें लागलें. त्यामुळें यांच्या मनाला आलेली उदासीनता घालवावी म्हणून मी बळेंच यांना शिकारीला घेऊन आलों.

चंद्र०—मनावर झालेल्या घावावर हा तात्पुरता इलाज आहे. ठीक आहे. करून पहावा इतकेंच.

हंबीर०—चंद्रभानजी, तुमच्या उदासीनतेचें कारण शिकारीमुळें आलेला शीण इतकेंच मी आतांपर्यंत समजत होतों. पण तुमच्या या उद्गारावरून खरें कारण कांहीं निराळेंच असावेंसें दिसतें. बोला. अगदीं संकोच न धरतां सांगा. हे माझे दोस्त यवन आहेत म्हणून कचरूं नका. हे जातीनें यवन असले तरी मनानें ते आपल्यासारखेच आहेत. यांच्या देखत अगदीं निःशंकपणानें बोलण्याला कोणतीही हरकत नाहीं. तुमचें मन आज असें उदास कां?

चंद्र०—आजच काय? रोजचेंच आहे. आम्ही खानदानीचे रजपूत आहों असें उघडपणें म्हणण्याची सुद्धां आम्हांला लाज वाटते. कां न वाटावी? आमच्या पूर्वजांनीं केलेले पराक्रम, मिळविलेला लौकिक, आणि राखलेला स्वाभिमान व स्वधर्माभिमान यांची छाया तरी आज आमच्यांत दिसते काय? आमची खानदानी तरी कोठें उरली आहे? आम्हीं रजपुतांनीं आपल्या आयाबहिणींना मुसलमान बादशहांच्या जनानखान्यांत पाठवून आणि स्वतंत्रतेला कंटाळून मोगल पातशहाची सेवा करण्यांत भूषण मानण्यास सुरुवात केली तेव्हांच स्वाभिमानाची, कुलाभिमानाची आणि देशा-

भिमानाची राखरांगोळी नाहीं का झाली? आतां कुठें राहिली आहे आमची खानदानी आणि स्वाभिमान? आतां आमचें जीवन म्हणजे शुद्ध नरकांतल्या किड्यांचें जीवन आहे. तुमच्यासारख्या मराठे सरदारांची गोष्ट कांहीं तरी बरी. तुम्हींही मोगलांची सरदारी पतकरली, तेव्हां स्वाभिमानाला आणि देशाभिमानाला तिलांजलि दिली आहे; पण निदान तुमचा कुलाभिमान तरी अद्याप निष्कलंक आहे. द्रव्याचा आणि अधिकाराचा मोहपाश तुमच्यानें तोडवला नाहीं. नाहीं तर तुम्ही तुमच्या शिवाजी महाराजांच्या आणि हिंदुधर्माच्या कट्टया दुष्मनाची नोकरी पतकरून येथें कशाला राहिला असतां? आपण सगळे एकाच माळेतले मणि आहोंत, कोणी वाटोळे गरगरीत, तर कोणी थपडा खाऊन खाऊन चपटे झालेले इतकाच काय तो फरक! नाहीं तर हिंदूंचा होत असलेला येवढा छळ पाहत असतांही या दुष्ट नीच यवन पातशहाची चाकरी करीत कां राहिलों असतों?

**हंबीर**०—चंद्रभानजी, तुम्ही म्हणतां ती गोष्ट अगदीं खरी आहे. मी पडलों शिपाई गडी. ज्याची भाकरी खायची त्याची इमानानें चाकरी करायची येवढें मला ठाऊक. कुलाभिमान, अन् देशाभिमान यासारख्या गोष्टींचा विचारच माझ्या डोक्यांत कधीं आला नाहीं.

**अन**०—हंबीरराव, तुमच्या दोघांच्या संभाषणांत माझ्यासारख्या अगदीं परक्या माणसानें तोंड घालणें चांगलें नाहीं. तशांत मी पडलों पातशहाच्या इस्लाम धर्माचा. पातशहाला

अनुकूल असें बोललों तर मी धर्माभिमानानें अंध झालों असें तुम्हाला वाटणार. बरें, प्रतिकूळ बोललों तर पातशहानें विनाकारण माझें नुकसान केल्यामुळें चिडून त्याच्या उलट बोलत आहें असें वाटणार. तेव्हां मी गप बसावें हें रास्त. पण तुमच्या मित्राचे मघाचे अलमगीर पातशहाविषयींचे उद्गार, आणि तुमची आतांची अभिमानशून्यतेची कबुली ऐकून माझ्यानें स्वस्थ बसवत नाहीं. म्हणून दोन शब्द बोलतों, त्याची माफी असावी. पुष्कळ लोक अकबर पातशहानें हिंदु व मुसलमान यांच्यांत एकी करण्याचें धोरण ठेविलें या बद्दल त्याला थोरपणा देतात, आणि अलमगीर पातशहाचें त्यांच्या उलट वर्तन आहे म्हणून त्याला नांवें ठेवतात. पण मला त्यांच्या भोळेपणाची खरोखर कींव येते. कपटी मित्रापेक्षां उघड उघड शत्रु पुरवतो. अकबर पातशहानें हिंदु स्त्रिया केल्या, पण आपल्या राजघराण्यांतली एकतरी मुलगी हिंदूच्या घरांत दिल्याचें ऐकलें आहे काय ? हंबीरराव, तुम्हांला कुलाभिमानाची व स्वदेशाभिमानाची खरी किंमत आजपर्यंत कळली नाहीं म्हणून तुम्ही मुसलमानांच्या सेवेंत आतांपर्यंत राहिलां यांत तुम्हांला भूषण नसून दूषणच आहे असें मी समजतों. मी मुसलमान आहें, शिवाजीराजे माझे दुस्मन् आहेत, तरी तुम्ही सगळे मराठे सरदार शिवाजीच्या पक्षाला जाऊन मिळायला पाहिजे होते असें मी म्हणतों. तें ज्यांनीं केलें नाहीं त्यांनीं मुसलमानाच्या घरांत मुली दिल्या नसल्या तरी त्यांचा जातिवंतपणा नष्टच झाला असें

मी समजतों. अकबरानें रजपुतांची खानदानी त्या तऱ्हेनें बुडविली, तर तुम्हीं आपल्या हातांनीं या तऱ्हेनें बुडविली इतकाच काय तो फरक. तुम्हां मराठ्यांच्या मनांत कुलाभिमान, धर्माभिमान, व देशाभिमान उत्पन्न करण्याला अलमगीर पातशहाच मुख्यतः कारण झाला आहे हे त्याचे उपकार समजा. हिंदूंचा खरा कपटी मित्र व घातकर्ता कोणी असेल तर तो अकबर पातशहा, आणि हितकर्ता शत्रु असेल तर तो अलमगीर पातशहा आहे असें मी म्हणतों.

**हंबीर०**—वाः! खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करून दाखविण्याची अजब विद्या तुम्हीं चांगली पैदा केली आहे म्हणावयाची! म्हणे अकबर कपटी अन् औरंगजेब सालस! त्याला जसें कांहीं कपट ठाऊकच नाहीं! ज्यानें प्रत्यक्ष बापाला कैदेंत टाकिलें, व त्याला विष देण्याचाही यत्न केला, आपल्या सख्या भावांचाही नाश केला, इराणच्या शहाअब्बास बादशहाकडे पाठविलेला वकील काम फत्ते न करतां अपमान सहन करून परत आला म्हणून ज्यानें त्याला सर्पदंश करवून मारलें, पृथुसिंहाच्या तोंडावर गोड गोड बोलून व भरदरबारांत त्याचा सन्मान करून व विषारी पोषाख घालण्यास लावून त्याला ठार करण्याचा उद्देश तडीस नेला, तो पातशहा कपटी नाहीं असें तुम्हीच म्हणावें.

**अनव०**—पण अलमगीर कपटी नाहीं असें मीं कधीं म्हटलें? त्याच्या कपटी आणि बेमरंवशाच्या वर्तनाचीं उदाहरणें तुमच्यापेक्षांही मी अधिक देऊं शकेन. माझें म्हणणें इतकेंच

आहे कीं औरंगजेबाचा हा स्वभाव त्याच्या वेळच्या परिस्थितीमुळें आणि त्याला मिळालेल्या शिक्षणानें तसा बनला होता. बापाच्याविरुद्ध बंड करण्याचें उदाहरण शहाजहान बादशहानेंच नाहीं कां घालून दिलें ? राजनीतींत कपटाचा उपयोग आजवर कोणीं केला नाहीं ? अकबरानें तो कसा केला आणि सोन्याची सुरी हिंदूंच्या छातींत कशी भोसकली तें मीं मघा सांगितलेंच. आतां हिंदूंच्या छळासंबंधानें पाहूं. इस्लाम धर्मविषयींची त्याची कडक श्रद्धा असल्यामुळें मूर्तिपूजा करणारे तेवढे सगळे अधर्मी, पापी, व दुराचारी आणि त्यांचा नायनाट करण्यांतच पुण्य आहे अशी त्याची समजूत होऊन बसली होती. ही समजूत चुकीची होती, अविचाराची होती, अन्यायाची होती, हें सगळें खरें; पण प्रामाणिकपणाची होती. त्यानें स्वतःचा मिजास वाढविण्यासाठीं तो छळ केला नाहीं. त्याला मुळीं मिजासच नाहीं. त्याला ऐषआरामाचा मनापासून तिटकारा आहे. त्याचा पोषाख आणि राहणी एखाद्या फकीराइतकी साधी आहे हें आपण पाहतोंच. काम करण्याचा त्याला बिलकुल कंटाळा नाहीं. जेथें धर्मभेदाचा संबंध येत नाहीं तेथें तो कसा उत्कृष्ट न्याय देतो ! स्वतः नियम पाळणें आणि प्रजेकडून ते पाळविणें या कामांत त्याचा हात धरणारा कोणी नाहीं. सारांश, धर्माविषयींचा दुराग्रह आणि बेभरंवसा हे दोन ठळक दुर्गुण त्याचे ठायीं नसते तर मोगल पातशहांत याच्यासारखा थोर पातशहा कोणी झाला नाहीं असें तुम्हीं सुद्धां म्हटलें असतें.

मी मुसलमान आहें म्हणून त्याचा पक्ष उचलतों असें समजूं नका. त्यानें माझें स्वतःचें अतोनात नुकसान केलें आहे. पण तें त्याच्या बेभरंवशी स्वभावानें केलें आहे, वाईट हेतूनें नव्हे, म्हणून मला त्याचा येवढा राग येत नाहीं. माझ्या अपमानास व नुकसानीस तो कारण झाला म्हणून तो माझा शत्रुच म्हटला पाहिजे. पण शत्रूच्या सुद्धां अंगीं जे खरे गुण असतील त्यांना गुण म्हणण्याइतका थोरपणा विचारी माणसाच्या ठायीं असावयाला नको काय? या दृष्टीनें पहाल तर तुम्हांला पातशहाची जी येवढी चीड वाटते तेवढी खास वाटणार नाहीं.

हंबीर०–हो हो. खानसाहेब म्हणतात तें खरें दिसतें. काय चंद्रभानजी! अजून तरी तुमची समजूत पटून तुमच्या मनाची खिन्नता दूर झाली कीं नाहीं! कसे आहेत आमचे खानसाहेब? ते दरबारांत राहून सरळ, मनाचे उदार, आणि दिलदार आहेत असें मीं तुम्हांस सांगितलें तें काय खोटें?

चंद्र०–खानसाहेबाशीं पूर्वी कधीं परिचय नसल्यामुळें त्यांच्याविषयीं माझ्या मनांत शंका आली होती खरी; पण त्यांच्या स्वभावाचा सरळपणा व मनाची उदारता याविषयीं आतां माझी खात्री होऊन चुकली आहे. तुम्हीं मला असा एक नवा उमदा दोस्त मिळवून दिल्याबद्दल तुमचा मी फार आभारी आहें.

अनव०–मी कमजास्त बोललों असेन त्याची क्षमा करा, आणि आजची ही पहिली भेट म्हणजे खऱ्या दोस्तीचा आरंभ समजून लोभाची वृद्धि ठेवा येवढीच विनंति आहे.

चंद्र०—पण काय हो हंबीरराव, खानसाहेब मराठी भाषा इतकी चांगली बोलतात हें कसें ?

अनव०—विद्वान् मराठी पंडितांच्या सहवासाचा हा परिणाम आहे. मी दक्षिणेंत पातशहाच्या स्वारींत कित्येक वर्षे काढलीं आहेत. तेथें मी मुद्दाम एक पंडित जवळ बाळगून मराठी भाषा शिकलों व मराठ्यांच्या चालीरीति आणि आचारविचार यांची माहिती करून घेतली. तेव्हांपासून मराठ्यांविषयींचा माझा दुष्ट ग्रह नाहींसा होऊन ते शूर, स्वाभिमानी, उद्योगी, धर्मनिष्ठ आणि दिलदार लोक आहेत असा माझा ग्रह झालेला आहे. अज्ञान हें गैरसमजुतींचें व दुराग्रहाचें मूळ असतें.

हंबीर०—आजची आपली अचानक झालेली भेट एकंदरीन फारच मजेदार व फायदेशीर झाली म्हणायची. पण हें पाहिलेंत कां? बोलण्याच्या नादांत सूर्य अस्तास जाण्याची वेळ झाली, पण त्या गोष्टीचें आपणास भान राहिलें नाहीं. लवकरच अंधार पडेल. तर चला आपण बरोबरच परत जाऊं.

सर्व—फार उत्तम. चलावें.

( सर्व जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग अठरावा.

### स्वराज्यस्थापनेची तयारी.

**कथाभाग**—श्री छत्रपति शिवाजी महाराज यांच्या अंगीं लहानपणापासूनच स्वाभिमान, व स्वदेशाभिमान या गुणांचा अंकुर दिसूं लागला होता, व त्याला त्यांची आई व गुरु दादोजी कोंडदेव यांच्याकडून अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजनच मिळत गेल्यामुळें मुसलमानांनीं बळकावलेला मुलख हळूं हळूं परत घेऊन त्यांचे जागीं मराठी सत्तेची स्थापना करण्याच्या त्यांच्या प्रयत्नास चांगलेंच साह्य कसें मिळालें हें पुढील प्रसंगांत दाखविलें आहे. श्री शिवाजी महाराज स्वराज्याचा पाया घालण्याच्या तयारींत असून त्या पायाला मजबुती आणण्यासाठीं एखादा किल्ला सर करण्याच्या उद्योगांत आहेत अशा वेळची स्थिति या प्रसंगांत दाखविली आहे.

# स्वराज्यस्थापनेची तयारी.

## पात्रें

जिजाबाई–शिवाजी महाराजांची आई.

दादोजी कोंडदेव–शहाजीचे पुण्याचे कारभारी.

शिवाजी–शहाजीचा पुत्र व भावी मराठी साम्राज्याचा संस्थापक.

धनाजी–जिजाबाईचा नोकर.

## प्रवेश पहिला.

स्थळ–पुण्यांतला वाडा.

( जिजाबाई आणि दादोजी प्रवेश करतात. )

जिजा०–पंत, इतका वेळ तुमचं बोलणं मीं जें ऐकून घेतलं त्यावरून शिवबाच्या संबंधांत जो माझा विचार तोच तुमचा ही आहे अशी माझी खात्री झाली आहे. त्यानं जो प्रकार मांडला आहे तो बराच धाडसाचा आहे खरा; पण त्यांत कांहीं वावगं आहे असं तुमच्यासारखंच मलाही वाटत नाहीं. शिवबाचं वय तें काय अन् त्यानं येवढं थोरलं कृत्य हातीं घेतलं तें काय! असं आपल्यासारख्या पोक्त माणसांना वाटणं स्वाभाविक आहे. पण अशीं कामं तरुणपणीं अंगांत रक्त उसळत असतं अशाच वेळीं करण्याची बुद्धि

होत असते. या वयांत संकटांना तोंड देण्याला लागणारा छातीचा निधडेपणा अंगीं असतो तो पुढें टिकत नाहीं. अविंधाच्या हातून गोब्राह्मणांचा होत असलेला छळ व धर्माचा उच्छेद हीं पाहून तुम्हां आम्हांलाही चीड येते. पण आपल्या अंगचं कर्तृत्व पोक्तपणाखालीं दडपलं गेलं असतं त्यामुळं जागच्याजागीं चरफडण्यापलीकडे आपल्या हातून कांहीं कार्य होत नाहीं. शिवबाची गोष्ट निराळी आहे. त्याच्या अंगीं स्वाभिमानाची जी ज्योत पेटलेली दिसते आहे ती पेटविणारे तुम्ही आम्हीच आहों. त्याच्या वयाप्रमाणें त्याच्या अंगीं स्वाभाविक असलेल्या हूडपणारूपी वायूनं ती ज्वाळा भडकविण्याचं कार्य केलं आहे इतकंच.

**दादोजी०**--आईसाहेबांचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. कुमाराच्या वर्तनाला बाहेरून जरी मी नांवें ठेवीत असलों तरी तीं येवढ्याचसाठीं कीं यजमानांची या गोष्टीला फूस आहे असा बोभाट दरबारच्या कानापर्यंत जाऊं नये. शिवाय, कुमारांच्या वर्तनाला थोडासा आळा असलेला बरा; नाहीं तर कुमार आणि त्यांचे तरुण सोबती एखादे वेळीं भलतेंच कांहीं करून वडिलोपार्जित नांवलौकिकावर आणि मालमिळकतीवर नसती घोरपड आणावयाचे! आज आईसाहेबांना विनंति करण्यांत तरी माझा येवढाच उद्देश होता कीं कुमारांच्या मनांत स्वाभिमान, स्वराज्याभिमान व स्वधर्माभिमान यांचा जो अंकुर उत्पन्न झालेला दिसूं लागला आहे

त्याला बिलकुल धक्का न लावतां तो अंकुर तसाच वाढेल, पण त्यांच्या आसपास वाढणाऱ्या विषारी वनस्पति मात्र काढून टाकण्यांत येतील असा योग्य उपदेश आईसाहेबां-कडून कुमारांना करवावा. मी असा उपदेश नेहमी करीतच असतों, पण--

जिजा०-पण काय? शिवबा तुमचं ऐकत नाहीं किंवा तुमच्या उपदेशाचा अनादर करतो असं तुमचं म्हणणं काय?

दादोजी०-नाहीं नाहीं! तसें मी म्हणेन तर खोटें बोल-ल्याचें पाप मला लागेल. कुमार माझा उपदेश लक्षपूर्वक ऐकून घेतात, मला वडिलासारखाच मान देतात, त्यांच्या माझ्यासंबंधाच्या पूर्वीच्या आणि आतांच्या वर्तनांत काडी-इतका फरक नाहीं; पण आईसाहेबांनीं माझ्यासारखाच उप-देश कुमाराला केला म्हणजे माझ्या उपदेशाला दुजोरा मि-ळून कार्याला बळकटी येईल.

जिजा०-पंत, तुमच्या आतांच्या बोलण्यानं माझ्या जि-वाला बराच धीर आला आहे. तुमच्या अर्धवट बोलण्याव-रून मला शिवबाविषयीं भलतीच शंका आली होती. तो तुमचा अपमान करतो कीं काय असं मला वाटलं होतं. असो. मी शिवबाला आतां बोलावून आणून तुमच्या सम-क्षच उपदेशाचे चार शब्द सांगत्यें. ( नोकरास ) धनाजी! शिवबाला सांग कीं मीं बोलाविलं आहे.

धनाजी-जी, बाईसाहेब. ( जातो. )

दादोजी—मला वाटतें कीं मीं मघाशीं यजमानाचें जें पत्र आपलेपाशीं दिलें आहे त्यांतल्या मजकुराचाही आपल्या उपदेशांत उल्लेख केला तर बरें होईल. म्हणजे आपलें तिघांचेंही म्हणणें एकाच अर्थाचें आहे हें कुमारांना कळून त्यांच्या मनावर अधिक चांगला परिणाम होईल.

जिजाबाई०—नुसता उल्लेखच कशाला? मी तें सबंध पत्रच त्याला वाचायला देणार आहें.

दादोजी—होय. तोही विचार कांहीं वाईट नाहीं. सबंध पत्र वाचण्यांत आल्यानें आपण करतों आहों काय, आणि त्याचा परिणाम काय होणार आहे हें त्यांना अधिक चांगलें कळेल.

( इतक्यांत कुमार शिवाजी प्रवेश करतो व उभयतांस वंदन करतो. )

जिजा०—ये बाळा, बैस.

शिवाजी—आईसाहेब,काय आज्ञा आहे? मला कां बोलावलें?

जिजा०—एका नाजूक कामांत तुझी सल्ला घ्यावयाची आहे. ( पत्र काढून ) हें पत्र बेंगरूळाहून नुकतंच आलं आहे. हें नीट वाच, आणि याचं उत्तर काय लिहावयाचं तें नीट विचार करून सांग.

शिवाजी—( पत्र वाचतो. )

"राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दादोजी कोंडदेव गोसावी यांसी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहां-

कित शहाजीराजे भोसले राम राम. येथील कुशळ तागायत छ० ९ मोहरम मुकाम बेंगरूळ येथें श्रीचे कृपें सुखरूप आहों. विशेष. सांप्रत बहुता दिसांत तिकडील पत्र येऊन वर्तमान कळलें नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षीत आहे. चिरंजीव शिवबानें हूडपणाचे खेळ मांडले आहेत येविसीं तुम्ही लिहिलेंच होतें. जासूद यशवंताचे तोंडूनही सर्व मजकूर विदित झाला. तेणेंकरून चित्तास विक्षोभ झाला. तुम्ही पोक्त माणसें काय करीत आहां? स्वराज्य करणें तोंडच्या गोष्टी नाहींत. तें तो पुरुषार्थाचें काम. अविंध मातबर. त्याशी टक्कर द्यावयाची तरी शिराची मजबुती पाहिजे. शहाणपणा असेल तर वडिलीं संपादिलें आहे तें नीट जतन करून सर्वांस सुख दिलें म्हणजे पुरे आहे. अधिक करून दाखविणें तें पुढें. दुसऱ्याच्या जिवास क्लेश लावून नसता पुरुषार्थ करतों म्हणण्यांत हासिल नाहीं. देवें दिलें तें उपभोगायचें सोडून वायफळ बोलण्यांत व नसती उठाठेव करण्यांत अर्थ नाहीं. धन्याशीं द्रोह केल्याच्या पातकाचे अधिकारी व्हाल. हजरीतीची मर्जी बहाल आहे ती खपा होऊन जहागिरी जप्त होतील; कुटुंबाचा व लौकिकाचा नायनाट होईल. या गोष्टी चिरंजिवास समजावून देणें. रागलोभाची पर्वा न बाळगणें. फार काय लिहिणें. सुज्ञ असां."

जिजा०—बाळा शिवबा, वाचलेंस पत्र? यावर तुझें काय म्हणणं आहे?

शिवाजी—आईसाहेब, आपण वडील माणसें मला देवासारखीं पूज्य आहां. आपल्या दृष्टीनें माझ्या खरोखर हिताचें असेल तेंच आपण सदोदित सांगत राहाल अशी माझी पूर्ण खात्री आहे; आपली आज्ञा पाळावी हा माझाही पुत्रधर्म आहे; माझ्या वर्तनानें कुळाची बदनामी किंवा हानि होईल असें कोणतेंही कृत्य करण्याची बुद्धि देऊं नकोस अशी माझी परमेश्वरास हात जोडून प्रार्थना आहे. पण बदनामी, धन्याशीं द्रोह, लौकिकाचा नायनाट अन् कुळाचा उच्छेद हे व असे दुसरे शब्द जे या पत्रांत आहेत त्यांचा अर्थ मला नीटसा समजत नाहीं. गोब्राह्मणांच्या माना दुष्ट अविंधांच्या हातून सोडविण्याचा यत्न करणें हें कुळाची बदनामी करण्यासारखें कृत्य आहे काय? 'धन्याशीं द्रोह केल्याच्या पातकाचे अधिकारी व्हाल.' हे धनी कोण? ज्यांनीं आमचे घरांत जबरदस्तीनें शिरून आमच्या घराचा ताबा अन्यायानें घेतला, आणि आम्हांस गुलाम बनविलें, आमच्या लोकांच्या सुंता केल्या, देवांच्या मूर्ती फोडल्या, व हिंदुधर्माचा उच्छेद केला, ते आमचे धनी काय? आणि त्याचा जुलूम नाहींसा करण्याचा यत्न करणें हा स्वामिद्रोह! ठीकच आहे. अविंधांची सेवा करणें यांतच ज्यांना मान, प्रतिष्ठा, लौकिक किंवा पुण्य आणि पुरुषार्थ वाटतो त्यांनीं तो पुण्यमार्ग खुशाल आचरावा. अविंधाचा नायनाट करून स्वराज्य स्थापण्याचा उद्योग मीं आरंभिला आहे यांत माझा स्वतःचा व कुळाचाही उच्छेद झाला तरी मला त्याबद्दल यत्किंचित्ही क्षिति वाटायची

नाहीं. अखेरपर्यंत अविंधाच्या सेवेचा डाग या देहाला लागला नाहीं याबद्दल उलट मला अभिमानच वाटेल. 'अविंध मातबर. त्यासी टक्कर द्यावयाची तरी शिराची मजबुती पाहिजे.' अलबत्! ती मजबुती करण्यासाठीं तर येवढा आमचा उद्योग चालला आहे, आणि श्रीअंबाबाईच्या कृपेनें लवकरच एखादा किल्ला हस्तगत करण्याची उमेद बाळगून आहों. 'वायफळ बोलण्यांत अर्थ नाहीं.' खरोखरच नाहीं. 'करून दाखविण्यांतच पुरुषार्थ आहे;' आणि म्हणून तर आईसाहेब, आपल्या व ( दादोजीकडे वळून ) गुरुचरणाला वंदन करून हा शिवबा त्याच पुरुषार्थाच्या कार्यासाठीं बाहेर पडत आहे. याला आपण उत्तमोत्तम आशिर्वाद देऊन कृतार्थ करावें हीच माझी शेवटची प्रार्थना आहे. आतां दुष्मनाला मारीन किंवा मरेन हाच निश्चय. आईसाहेब, आतां आपली व माझी गांठ केव्हां पडेल याचा नेम नाहीं. पडली तर कांहीं तरी आपल्याला भूषण वाटेल अशाच स्थितींत पडेल. न पडली तर कुलाची बदनामी करणारा, व त्याचा उच्छेद करण्यास निघालेला कुलांगार कारटा नाहींसा झाला याबद्दल तुम्ही खुशाल आनंद माना. ( आवेशानें चालता होतो. )

**जिजा०**—अगबाई! म्हणतां म्हणतां शिवबा त्वेषानें चालता झाला. पंत, हें हो काय भलतंच झालं! मी त्याला उपदेश करून ताळ्यावर आणण्याचे अगोदरच तो बेफाम होऊन एकदम चालता झाला!

दादोजी—आतांशीं कुमारांनीं हा अस्सा प्रकार मांडला आहे. त्यांना आतां आटोक्यांत ठेवणें फार कठीण झालें आहे. आपण बेफिकीर असा. मीं माणसें पाठवून ते कोठें गेले, काय काय उद्योग करताहेत, वगैरे सगळी बित्तंबातमी आणवितों. ( दादोजी जातो. )

जिजा०—माझा शिवबा म्हणाला त्यांतलं एक अक्षरसुद्धां खोटं नाहीं. अविंधाची सेवा करण्यांत इकडे मोठी प्रतिष्ठा वाटते; पण खरं पाहिलं तर प्रतिष्ठा कसली ? निव्वळ गुलामगिरी आहे. माझ्या शिवबाच्या अंतःकरणांत स्वाभिमानाची व धर्माभिमानाची जी ज्योत पेटली आहे ती दुसऱ्या कोणाचा संताप करणारी असली तरी मला निदान आशादायकच वाटते. आई जगदंबे, माझ्या बाळाच्या हातून कुळाचा व देशाचा उद्धार होऊन स्वराज्याची स्थापना होऊं दे येवढंच तुझ्यापाशीं हात जोडून मागत्यें.

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग एकोणिसावा.

### स्वामिभक्त बाजीप्रभु.

**कथाभाग**—शिवाजी महाराजांनीं अफजुलखानास मारल्यावर विजापूरच्या बादशहानें त्याच्या पारिपत्यासाठीं सिद्दी-जौहर, फाजलखाँ व सिद्दी अजीज असे तीन सरदार पाठविले व त्यांनीं येऊन महाराज पन्हाळा किल्ल्यांत होते त्यास एकाएकीं वेढा घातला. तो किल्ला मजबूत नव्हता म्हणून तेथून जवळ असलेल्या विशाळगडावर जाण्याची इच्छा करून महाराजांनीं मुसलमानांशीं तहाचें बोलणें लाविलें व मुसलमान बेसावध असतां एके रात्रीं निवडक मंडळीसह ते मुसलमानांच्या वेढ्यांतून मुकाट्यानें मार्ग काढीत विशाळगडाकडे गेले. ही बातमी लवकरच फुटून मुसलमा-

नांनीं त्यांचा पाठलाग केला. तेव्हां एका खिंडीच्या तोंडापाशीं बाजीप्रभु देशपांडे या सरदारास उभे करून महाराज त्याला म्हणाले कीं " आम्ही खिंडींतून पार होऊन किल्ल्यावर जाऊन पोहोचेपर्यंत तुम्ही शत्रूला अडवून धरावें. आम्ही गडावर जाऊन पोहोंचलों म्हणजे तोफेचा आवाज करून तुम्हांस खबर देऊं. " या हुकुमाप्रमाणें बाजीप्रभूजवळ जरी फारच थोडे लोक होते तरी त्यानें शिकस्तीनें शत्रूशीं लढून त्याला अडवून धरलें. या लढाईंत बाजीचे पुष्कळ लोक पडले. स्वतः बाजी घायाळ होऊन मरणोन्मुख झाले. इतक्यांत किल्ल्यावरून सोडलेल्या तोफेचा आवाज ऐकूं आला. तेव्हां स्वामिभक्त बाजीप्रभूला फार आनंद झाला, आणि 'आतां मी सुखानें मरेन' असे उद्गार काढून त्यानें प्राण सोडला. हा कथाभाग या प्रसंगांत आहे.

# स्वामिभक्त बाजीप्रभु.

## पात्रें.

श्रीशिवाजी महाराज, बाजीप्रभु (महाराजांचा एक सरदार, ) येसाजी ( महाराजांचा एक सेवक, ) सिद्दी जौहर ऊर्फ सलाबतजंग ( विजापूरचा मुसलमान सरदार ) फाजल महंमद व सिद्दी अजीज ( विजापूरचे मुसलमान सरदार. )

## प्रवेश पहिला.

स्थळ—पन्हाळा किल्ला.

( सिद्दी जौहर, फाजल महंमद व सिद्दी अजीज घाईघाईनें प्रवेश करतात. )

**सिद्दी जौहर**—तोबा! तोबा! यह शिवाजी कैसा बैमान है! कल किला खाली कर देता हूं ऐसा कुबूल करके हमारे लोगोंकी बेहोशारी देखकर रातके रातही में फरार होगया! यह कितनी नामर्दी है! लेकिन् उसको बैमान कहनेके बजाय हमारे लोग ही नामर्द कहना चाहिये. शिवाजीके साथ बहोत थोडे लोग थे. उन्होको हमारे लोगोंने रातके वख्त किलेके चारों गिर्द हमारा घेरा होते हुवे पहराचौकी उलांगकर कैसे जाने दिया! ( फाजल महंमदास ) क्यों? खानसाहेब, ऐसी बेहोशियारी कैसी की?

**फाजल०**—कसूर माफ होना चाहिये. आप जानते हैं कि शिवाजी पक्का सैतान है. वो ऊपर आस्मानमें या जमीनके नीचे पातालमेंसे भी निकल गया होगा. कैसा और कब गया उसका पता कोई भी नही लगा सकेगा. यह मरहट्टों की जात बडी हरामखोर और धोकेबाज है. उसमें सिवाजी तो पक्काही शैताना है. मेरे हाथमें एकदफा तो आनेदो, फिर देखना इस समशेरसे एक ही वारमें उसकी गर्दन उडा देता हूं.

**सिद्दी अजीज**—जनाबे आली! खाँ साहबका फर्माना दुरुस्त है. शिवाजी अगरचे मर्द होता तो सामने खडा होकर हमारेसे दो हाथ करता और फिर हम देखते वो कैसा भाग जाता! हमारे लोग रातके वख्त नशा करके आराम लेते हुए भाग जाना यह मर्दका काम नहीं है. यह सिर्फ जनानियत है.

**सिद्दी जौहर**—बस बस यह तारीफ! दुष्मन् को कब्जसे जाने देनेपर अब इस तारीफ की क्या कीमत! लेकिन् हां! शिवाजी हमारे हाथसे निकलकर कहां जायगा? वोह इस विशालगडके किलेपर गया होगा. अभी वहां न पहुंचा होगा, उतनेमें ही उसको रास्ते में मिलाकर उसके लोगोंकी कत्ल करना चाहिये.

**फाजल**—यह जिम्मा मेरा है. उसका सिर छाटकर लायें या उसको जिन्दा पकड लाऊं यही सिर्फ फर्माइये. फिर यह बंदा उस मुताबिक किये वगैर रहेगा नहीं.

**सिद्दीजौहर**—जाओ. पहिले जल्द जाकर दुस्मन्का पिच्छा पकडो. दुस्मन् अभी बहोत फासलेपर न पहूंचा होगा. जिन्दा या मरा कैसे ही पकडकर सिवाजीको यहां लेआओ. इतनाही काम तुमने बजा लाया तो बादशाह के दरबारमें तुम्हारा रुतबा बढेगा यह खातर रख्खो. अब एक लहेमेकीभी देर न करो. चले जाव. ( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—खिंडीच्या तोंडापाशीं.

( बाजी प्रभु आपल्या लहानशा तुकडीसह प्रवेश करतो. )

**बाजी०**( आपल्या लोकांस )—माझे शूर, वीर, बहादूर गडी हो, यवनांच्या छातीवर पाय देऊन आपण येथपर्यंत तर सुखरूप येऊन पोंचलों. मागून शत्रु वेगानें पाठलाग करीत येत आहे आणि महाराज खिंडींतून पार होऊन जाण्यापूर्वींच शत्रु येऊन भिडतील हें नक्की आहे. अशा वेळीं त्यांना या खिंडीच्या तोंडाशीं अडवून धरण्याची कामगिरी महाराजांनीं मला सांगितली आहे. ही कामगिरी उत्तम रीतीनें बजाविली गेली, आणि महाराज सुखरूपपणें गडावर जाऊन पोंचले म्हणजे मग त्यांना शत्रूची भीती मुळींच बाळगायला नको. आपले लोक थोडे, शत्रूचा जमाव भारी. प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे. पण खरी मर्दुमकी आणि स्वामिनिष्ठा यांची परीक्षा अशाच वेळीं होत असते. महाराजांच्या पुण्य-

प्रतापानें आणि श्रीजगदंबेच्या कृपेनें तुमच्यावर सोंपविलेली ही कामगिरी तुम्ही उत्कृष्ट प्रकारें पार पाडाल अशी मला खात्री वाटते. आपल्या देशाच्या कार्यासाठीं, गोब्राह्मणांच्या रक्षणासाठीं, हिंदुधर्माची अब्रू राखण्यासाठीं, आणि मराठ्यांच्या नांव लौकिकासाठीं तुम्ही आपल्या रक्ताचा अखेरचा थेंब खर्चीं घालण्यास तयार झालें पाहिजे. महाराज किल्ल्यावर जाऊन पोहोंचल्याबद्दलची खूण म्हणून डागलेल्या तोफेचा आवाज कानीं येईपर्यंत एकाही मुसलमानाला खिंडींत शिरूं देतां कामा नये. त्यापायीं आपल्या देहाचें कांहींही होवो; शत्रूच्या शस्त्रांनीं या देहाचे तुकडे तुकडे होण्याची वेळ आली तरी कचरतां कामा नये. जो कोणी यावेळीं माघार घेईल त्या नामर्दाला त्याच्या शेजारच्या गड्यानें एकदम छाटून टाकलें पाहिजे. आपणा मराठ्यांच्या अंगांत किती वीरश्री, आणि शौर्य भरलें आहे तें जगाला दाखविण्याची ही संधी तुम्हांला भाग्यानेंच प्राप्त झाली आहे. ही संधी हातची घालवाल तर तुमच्या वाडवडिलांच्या निष्कलंक कीर्तीला अक्षय डाग लावून नरकाचें साधन मात्र करून घ्याल; आणि ती साधून लढतां लढतां मराल तर स्वर्गलोक जिंकाल. ( आवाज ऐकून ) ते पहा गनीम धावतच येताहेत. सावध असा, श्री जगदंबेचें स्मरण करा व महाराजांच्या नांवाचा जयजयकार करून, जो यवन पुढें येईल तो छाटून टाका.

( इतक्यांत दीन दीन करीत मुसलमान येतात; निकराची लढाई होते. तींत बाजीप्रभूला मोठी जखम लागते. )

———

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**-विशाळगडच्या किल्ल्यावर.

( शिवाजी महाराज व त्यांचे सरदार बसले आहेत. )

**शिवाजी**—आजचा प्रसंग मोठाच बिकट होता, पण त्यांतूनही श्रीजगदंबेच्या कृपेनें पार पडलों. हा किल्ला मजबूत आहे. शत्रु कितीही भारी असला तरी त्याची पर्वा न करतां कित्येक महिनेपर्यंत लढतां येईल. दाणागोट्याचीही बेगमी करून ठेवलेली आहे. हें सगळें ठीक झालें; पण मी येसाजीस खिंडीकडची बातमी आणण्यासाठीं पाठविलें होतें, तो अद्याप कसा आला नाहीं? काय असेल तें असो, पण माझ्या जिवाला मघापासून कशी हुरहुर लागून राहिली आहे! कांहीं तरी अशुभ वार्ता कानीं पडायची आहे असें दिसतें.

( येसाजी येतो त्यास पाहून )

काय रे येसाजी, काय बातमी आणिली आहेस? कांहीं अशुभ वार्ता आहे वाटतें? तुझी उतरलेली मुद्राच सांगते आहे. बोल. बोल. माझा बाजीप्रभु खुशाल आहेना?

**येसाजी**—काय सांगूं महाराज? बाजी पराक्रमाची शिकस्त करून देवाच्या घरीं गेले, अन् तेथें ते खुशाल आहेत.

**शिवाजी**—काय? माझा बाजी लढाईत पडला? हाय रे दैवा! हें काय केलेंस? मी किल्ल्यावर सुराक्षित पोहोचेपर्यंत शत्रूला खिंडीपाशीं अडवून धरण्याची कामगिरी बाजीला सांगण्याची बुद्धि मला कोठून झाली? बाजीसारखें रत्न मी

आपल्या हातानें गमावून बसलों. येसाजी, त्या माझ्या एकनिष्ठ मित्रानें मरतांना माझी आठवण केली होती काय ? त्याच्या तोंडचे अखेरीचे शब्द तरी काय होते सांग ?

**येसाजीः**—महाराज ! काय सांगूं ? महाराजांच्या पदरीं एकाहून एक बहादर वीर पुष्कळ आहेत. जेथें महाराजांचें पाऊल तेथें त्यांचें शिर पडावयाचें अशी प्रतिज्ञा करून ते लढतात. शत्रूला पाठ म्हणून दाखवावयाची नाहीं हा त्यांचा बाणा. पण बाजीनें त्यांच्यावरही ताण केली. त्याच्याजवळ सारे पन्नास साठ शिपाई होते. त्यांना घेऊन गडी खिंडीच्या तोंडाशीं उभा राहिला. शत्रूचा जमाव अडीच हजार होता. पण शत्रूची काय बिशाद आहे एक रेसभर पुढें पाऊल टाकण्याची ! आला गनीम पुढें कीं छाटलाच, असें सारखें चाललें होतें. शत्रुही बाजीचा हा अलौकिक पराक्रम पाहून तोंडांत बोटें घालून उभा होता. मुसलमान चिडून आवेशानें लढत होते. मावळे जिवाची पर्वा न करतां शत्रूला मागें रेटीत होते. असें होतां होतां अर्धे मावळे रणांगणीं पडले. बाजीलाही गोळी लागून जखम झाली. तरी पण अंगावरचा शेला फाडून त्याची चिंधी जखमेला गुंडाळून पुनः हातांत समशेर घेऊन लढण्याला बाजी तयारच ! आतां दहावीसच मावळे उरले होते. शत्रु खिंड खास काबीज करणार असा नक्की सुमार दिसूं लागला. बाजीच्या तोंडावर चिंतेची झांक दिसूं लागली. इतक्यांत गडावरच्या तोफेचा आवाज ऐकतांच त्या वीराच्या चर्येचा रंग एकदम पालटला. चिंतेच्या कालिम्याची छटा होती ती जाऊन आनंदानें चर्या प्रफुल्लित झाली, आणि ‘ महाराज गडावर सुखरूप पोंचले ना ? बस, मीं आपली कामगिरी बजाविली. आतां मला खुशाल मरण येऊं दे ’ असें म्हणून त्यानें प्राण सोडला.

**शिवाजी**—हाय हाय ! माझा एकनिष्ठ जिव्हाळ्याचा मित्र बाजी अखेर माझ्यासाठीं धारातीर्थी देह ठेवून गेला ना ! धन्य आहे त्याच्या स्वामिभक्तीची ! असे मित्र मला परमेश्वरानें दिले आहेत ही त्याची केवढी कृपा म्हटली पाहिजे ! मराठ्यांच्या इतिहासांत बाजीनें आपलें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेविलें आहे यांत शंका नाहीं. वीर असावा तर असाच !

( इतक्यांत दूत धांवत येतो. )

**दूत**—( घाबऱ्या घाबऱ्या )—महाराज, आपल्या लोकांनीं बाजीचें प्रेत शत्रूच्या हातीं न लागूं देतां मोठ्या शिताफीनें आणिलेलें पाहून तें हिसकावून घेण्यासाठीं शत्रु त्यांच्या पाठीस लागले आहेत. लवकर कुमक न धाडली तर ते तें घेऊन जातील.

**शिवाजी**—( सरदारांस )—पाहतां काय ! एकदम धांवत जाऊन त्यांची बाजू सांवरून धरा, आणि माझ्या मित्राचें जिवंतपणीं नाहीं तर निदान त्याच्या शवाचें तरी अखेरचें दर्शन मला घडूं द्या.

( सगळे जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग विसावा.

### श्रीशिवाजी महाराजांची सुटका.

**कथाभाग**—दिल्लीच्या औरंगजेब बादशहानें राजा जयसिंग या रजपूत सरदाराकडून शिवाजी महाराजांचें मन वळवून त्यांस दिल्लीस नेलें व तेथें दरबारांत त्यांनीं अपमान केल्याच्या कारणावरून रागावूनें महाराजांना अटकेंत ठेविलें. पण महाराजांना या संकटांतून निसटण्याला एक युक्ति सांपडून त्या युक्तीनें ते आपल्या विश्वासु नोकरांसह संभाजीसहवर्तमान दिल्लींतून पळाले, हा प्रकार या प्रसंगांत वर्णिला आहे.

---

# श्रीशिवाजी महाराजांची सुटका.

### स्थळ.

आग्रा येथील रामसिंगाच्या बागेंतला वाडा.

### पात्रें.

शिवाजी, संभाजी, वैद्याचा वेष घेतलेला रायाजी, मानाजी, बादशहानें पाठविलेला हकीम, शहरकोतवाल पोलादखान इ.

( शिवाजी दुखण्याचें मिष करून अंथरुणावर पडला आहे व जवळ रायाजी बसला आहे. )

**शिवाजी**—रायाजी, पाहिलीसना जयसिंगाची ही हरामखोरी ! त्याच्या शब्दावर भरंवसा ठेवून आपण आलों ही मोठी चूक झाली. पण आतां त्याबद्दल पश्चात्ताप करून काय उपयोग ? पुढें काय करायचें तें आपलें ठरलें आहे, आणि त्याप्रमाणें मी दुखणेकऱ्याचें सोंग घेऊन पडलों आहें. वैद्याची बतावणी करण्याचे कामांत तूंही पटाईत आहेस. माझ्या आजारीपणाची खबर बादशहाला कळविण्यासाठीं मानाजीला पाठविलें होतें. तो अजून कसा परत आला नाहीं ?

( इतक्यांत मानाजी घाबऱ्या घाबऱ्या येतो. )

**शिवाजी**—मानाजी, तूं आपलें काम केलेंस ? तूं असा घाबरलेला कां दिसतोस ?

**मानाजी**—काय सांगूं महाराज ? प्रसंग तर मोठा कठीण आला आहे. बादशहा कसला छट ! त्यानें आपले छक्केपंजे ओळ-

खले कीं काय कोण जाणे ! आपण आजारी आहां ही बातमी त्याला खरीच वाटेना. त्यानें आपली प्रकृति पाहून औषध देण्या-साठीं दरबारच्या बड्या हकीमाला घेऊन जाण्याविषयीं कोतवालाला हुकूम दिला आहे. ते आत्तां येऊन पोंचतील. महाराजांना माझी एक विनंति आहे.

**शिवाजी**—बोल, तुला काय सांगायचें तें खुशाल सांग.

**मानाजी**--हकीमानें कांहीं औषध दिलें तर—

**शिवाजी**—तें घेऊं नका असेंच कीं नाहीं तुझें म्हणणें ? अरे, बादशहा औषधाच्या निमित्तानें मला जहर देववून मारून टाकील हें मी पूर्णपणें समजून आहें. तूं निर्धास्त रहा.

( कोतवाल पोलादखान व हकीम येतात. )

**पोलादखान**—( वैद्यास )-वैद्यराज, शिवाजीमहाराजांची तब्यत दिक्क आहे हें ऐकून शहान्शहाला फार दुःख झालें व त्यांनीं कृपावंत होऊन औषधोपचारासाठीं बड्या हकीमजीस पाठविलें आहे. खुद्द हुजूरपन्हा यांचीच दवा घेत असतात. यांच्यासारखा हुशार हकीम साऱ्या हिंदुस्थानांत नाहीं मिळायचा.

**हकीम**—कर्ता करविता सगळा तो परवरदिगार आहे. आपण दुबळीं माणसें काय करणार ? येवढें खरें कीं माझ्या हाता-ला आजपर्यंत अल्लानें सारखें यशच दिलें आहे.

**शिवाजी**—( दुःखाचा उसासा टाकून ) हाय रे दैवा ! माझी आई, बायकामाणसें व जिवास जीव देणारे मित्र कोणीकडे आणि मी कोणीकडे ! पुनः तीं मला दिसतील काय ? माझा रायगड अन् प्रतापगड हे मला पुनः कोठून दिसणार ! देवा ! आतां माझ्यानें दुःख सहन होत नाहीं. मला तूं लवकर आपल्या-जवळ ने.

**हकीम**—( वैद्यास ) रोगी काय म्हणतो ?

**वैद्य**—त्यांना आतां जगण्याची आशा वाटत नाहीं. त्यांचा धीर सुटला आहे.

( हकीम नाडी पहाण्यासाठीं हात लावण्याला जातो. )

( हकीमजीच्या कानांत ) रोग्याचा धीर सुटणें हें आमच्या आयुर्वेदांत अशुभ लक्षण समजतात. तेव्हां मरायच्या वेळीं आपण यांना उगाच कशाला शिवतां ? आतां कांहीं तंत उरला नाहीं हें दुरूनच दिसतें आहे.

**हकीम**—नाहीं. मला तुमच्यासारखी निराशा वाटत नाहीं. यांचा आवाज अद्याप खणखणीत आहे.

**वैद्य**—दिवा विझण्यापूर्वी एकदां ज्योत मोठी असते, त्यांतलाच हा प्रकार आहे झालं. ( शिवाजीस ) महाराज, हे वडे हकीमजी आपल्या समाचारासाठीं बादशहाकडून आले आहेत.

**शिवाजी**—( आंत स्वर ओढून ) बरें आहे. पण काय उपयोग होणार आहे तें दिसतेंच आहे. मीं शेवटचीं दानें सुद्धां केलीं. डोळ्यांपुढें अंधेरी येऊं लागली. आतां यमराजाचें अखेरचें बोलावणेंच काय तें यायचें राहिलें आहे.

**हकीम**—( नाडी पाहून ) छेः छेः ! अशी उमेद सोडूं नका. नाडीचे ठोके बरोबर पडत आहेत. भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

**वैद्यराज**—हो कां ? मघाशीं नाडी अगदींच मंद होती अन् आतां जोरानें चालली आहे ! नाडीची अशी चंचलता असणें हें दुसरें दुश्चिन्हच म्हणावयाचें !

**हकीम**—डोळ्यांतलें तेजही अजून कायम आहे.

**वैद्य**—त्यावर नाहीं माझा भरंवसा. अंगांत ताप भरला म्हणजे रोग्याचे डोळे असेच तेजस्वी दिसतात.

**हकीम**—( शिवाजीच्या अंगाला हात लावून ) आतां अंगांत तापही नाहीं.

**वैद्य**—अरेरे ! हें तर फार वाईट ! मघाशीं हाताला चटके बसण्याइतका ताप होता, अन् आतां तो एकदम उतरला ! हेंहि लक्षण कांहीं चांगलें नाहीं. ( हकीमाच्या कानांत ) छातीवरला काळा डाग पाहिलात का ? तो आज सकाळपर्यंत नव्हता. आमच्या आयुर्वेद ग्रंथांत तर हा डाग म्हणजे तात्कालिक मृत्यूचें लक्षण समजतात, आणि आपल्या युनानी ग्रंथांतही—

**हकीम**—( डागाकडे पाहून ) हो हो, तसेंच समजतात हें तुमचें म्हणणें बरोबर आहे. तुम्ही आमचे युनानी ग्रंथ पाहिले आहेत वाटतें ?

**वैद्य**—( हंसत ) अलबत, आपल्या ग्रंथांची काय योग्यता ! ते पाहिल्यावांचून खरा वैद्य किंवा हकीम होऊंच शकत नाहीं.

**हकीम**—घाबरूं नका. यावर माझेजवळ उत्तम दवा आहे. ती दिल्यावर दोन घटकांत डाग नाहींसा होईल.

**शिवाजी**—आतां मला औषधबिवषध कांहीं नको. थोडेंसें गंगोदक तोंडांत घाला म्हणजे मी सुखानें राम म्हणेन.

**हकीम**—( एकीकडे ) कोतवालसाहेब, प्रसंग कठीण आहे. हुजूरला सगळी स्थिति लवकर कळविली पाहिजे. चला आपण जाऊं.

**पोलाद्खान**—( जातां जातां पेटाऱ्याकडे पाहून ) सरदार लोकांकडे मेवामिठाई पाठविण्याचा तुमचा क्रम अजून सुरूच आहे वाटतें ! हे पेटारे त्याचेच असतील. पण हे मले मोठे दिसतात !

**मानाजी**—महाराजांची स्वारी दिक्क असल्यामुळें हजारों फकीर, साधु, संन्यासी यांना मिठाई वांटावयाची असते. म्हणून हे पेटारे मुद्दाम मोठाले आणिले आहेत.

**पोलादखान**—ठीक आहे. तुम्हांला वेशीवर कोणी हरकत विनहरकत तर करीत नाहींना ? केल्यास मला सांगा. खैराती-च्या आड कोणी येणें चांगलें नाहीं.

**मानाजी**—आपली मोठी मेहरबानी आहे. ( जातात. ) ( शिवाजी तत्काळ अंथरुणावरून उठून ) रायाजी, शाबास आहे तुझ्या शहाणपणाची ! माझ्या छातीवरचा काळा डाग माझ्या जन्मापासूनचा आहे. पण त्याचा आज तूं छानदार उपयोग करून हकीमाला चूप बसाविलेंस ! असो. आतां आपण येथें क्षणमात्र काळ घालविणें चांगलें नाहीं. बादशहाला यांच्या येण्याची वर्दी लागून भेट होण्याला कांहीं वेळ लागेल व बादशाहा शंकेखोर असल्यानें पुनः एकाद्या सरदाराला खात्री करून घेण्यासाठीं पाठवील. तो येण्याच्या आंत आपण या शहराच्या वेशी-पार झालें पाहिजे. मानाजी, सगळी तयारी जय्यत ठेविली आहेस ना ?

**मानाजी**—सगळी तयारी आहे सरकार. हा पहा मिठाईचा ढीग. हे पेटारे. ते उचलण्यासाठीं मजुरांचा वेष घेऊन आपली मंडळी बाहेर उभी आहे. वेशीबाहेर दोन कोसांवर दोन घोडेही तयार आहेत.

**शिवाजी**—शाबास ! माणसें बरोबर असावीं तर अशीं

असावीं. ( संभाजीस ) बाळा, हं आटप. घे देवाचें नांव आणि निज या पेटाऱ्यांत. कोंपऱ्यांत लहानसें भोंक आहे त्यांतून हवा घे.

( रायजीस व मानाजीस ) हं ! भरा आतां मिठाई. मीही या दुसऱ्या पेटाऱ्यांत बसतों. हिरोजी, सगळी बतावणी हुबेहुब झाली पाहिजे. झोंपेचें मिष करुन तोंडावर पांघरूण घेऊन निजून रहा. परमेश्वराचे घरीं तुझी स्वामिभक्ति रुजू राहील. येतों आतां. रामराम. हं ! हाका मारा मजुरांना पेटारे नेण्यास.

( मजूर येऊन पेटारे नेतात. )

**रायाजी**—( हिरोजीस ) हिरोजी, तुम्हांला येथें टाकून जाणें महाराजांच्या व आमच्या कसें जिवावर आलें आहे ! पण स्वामिकार्यासाठीं सगळें कांहीं केलें पाहिजे. बरें आहे, श्री-भवानी मातेच्या कृपेनें पुनः आपल्या भेटी होतील. तूर्त तरी आमचा रामराम घ्यावा. ( हिरोजी व रायाजी कडकडून भेटतात. हिरोजी तोंडावरून पांघरुण घेऊन निजतो, व रायाजी वैद्याच्या वेषांतच दार लोटून घेऊन बाहेर पडतो. इतक्यांत बादशहाकडून आलेला सरदार इमदादखान भेटतो. )

**इमदाद०**—वैद्यराज, महाराजांची तब्यत कशी आहे ?

**वैद्य०**—दोन दिवस व दोन रात्रीं येवढ्यांत महाराजांचा डोळ्याशीं डोळा लागला नव्हता, तो आतां नुकताच लागला आहे. म्हणून त्यांनीं मलासुद्धां बाहेर जाण्यास व दार लावून घेण्यास सांगितलें आहे. तेव्हां आपण कृपा करून येथें बाहेरच बसा. मला फार तहान लागली आहे. समोरच्या विहिरीवरून थोडें थंडगार पाणी पिऊन मी येतों. मग आपल्याशीं बोलत बसेन.

**इमदाद०**—ठीक आहे, लवकर या. ( रायाजी गेल्यावर शंका

येऊन ) दार लावून घेण्यांत काहीं लबाडी तर नाहींना? ( दाराच्या फटींतून पाहून ) आहे. आंत महाराज तोंडावरून पांघरूण घेऊन निजले आहेत खरे. त्यांची झोंप उघडेपर्यंत आपणही येथें तळ दिला पाहिजे. ( बाहेर ओसरीवर बिछायतीवरच लोळतो, तों तेथें त्याचा डोळा लागतो. )

( इतक्यांत बादशहाकडून दुसरा सरदार येतो. )

**दु० सर०**—भाई इमदादखाँ, हुजूरनीं तुम्हांस ज्या कामासाठीं पाठविलें तें काम विसरलां वाटतें ?

**इमदाद०**—हुजूरचा हुकूम आणि मी विसरेन ? छेः छेः ? महाराजांना दोन दिवसांत झोंप लागली नव्हती ती आतां कोठें लागली आहे म्हणून त्यांचा हिंदु वैद्य सांगत होता. म्हणून दार उघडून मी आंत गेलों नाहीं.

**दु० सर०**—पण गनीमाला खरीच झोंप लागली आहे कां तो मेला आहे, याची तरी पुरी चौकशी केली आहे का तुम्ही ? चला आपण दार उघडून आंत जाऊं.

**इमदाद०**—पण झोंप मोडल्यानें प्रकृति जास्त बिघडली तर ?

**दु० सर०**—बिघडली तर बिघडली. तो मेला तर ... काय जाणार आहे ? कुठें आहे तो काफीर वैद्य ?

**इमदाद०**—तो मघाच पाणी पिण्यासाठीं विहिरीवर गेला आहे, तो अजून आला नाहीं.

**दु० सर०**—( गंभीरपणानें ) हं ! या सगळ्या गोष्टी मला संशयास्पद दिसतात. आंत जाऊन खात्री करून घेतलीच पाहिजे.

( आंत जाऊन हिरोजीच्या तोंडावरचें पांघरूण काढतो. आणि त्यावरोबर हा दुसराच कोणी माणूस पाहून चकित होतो. ) दगा रे दगा ! हा शिवाजी नाहीं. गनीम याला येथें निजवून पळाला वाटतें ! ( हिरोजीस ) ए काफर, शिवाजी कोठें गेला तें सांगतोस कीं गर्दन छाटूं ?

( हिरोजी कांहीं बोलत नाहीं. दोघेही सरदार त्याला कैद करून बंदोबस्तानें घेऊन जातात. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग एकविसावा.

### संभाजीचा वध.

**कथाभाग**--श्रीशिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचा वडील मुलगा संभाजी हा त्यांच्या गादीवर बसला. यानें कलुशासारख्या लबाड आणि मूर्ख माणसाच्या नादीं लागून पदरच्या शहाण्या माणसांना व शूर सरदारांना दूर ठेविलें इतकेंच नाहीं तर स्वतः व्यसनांत निमग्न व बेफिकीर राहून राज्याची आणि त्याच्याबरोबर आपल्या अंगच्या गुणांची धूळधाण केली, आणि शेवटीं स्वतःचा नाश करून घेऊन मराठी राज्यावर मोठें संकट ओढवून आणिलें ह्या हृदयद्रावक कथेस उद्देशून पुढील प्रसंग आहे.

## संभाजीचा वध.

**स्थळ**--तुळापूर येथील औरंगजेब बादशहाची छावणी.

**पात्रें.**

**औरंगजेब**--दिल्लीचा बादशहा.

**संभाजी**--मराठ्यांचा राजा, व शिवाजी महाराजांचा पुत्र.

**तकरीबखान**--बादशहाचा एक सरदार.

**औरंग०**--( स्वगत ) मी खरोखर भाग्यवान् म्हणून संभाजी माझ्या हातीं लागला. नाहींतर तो सिंहाचा बच्चा असा जाळ्यांत अडकायचा ? शिवाजी राजे मेल्यापासून आज आठनऊ वर्षें ज्यानें आम्हांला दाद दिली नाहीं, आमच्यासारख्या बलाढ्य शत्रूच्या मोठमोठ्या सरदारांना ज्यानें सतावून सोडलें, आज राजापुरास तर उद्यां भडोचेस, परवां हवसाणांत तर तेरवां फोंड्यावर, असा विजलीसारखा चमकत जो भराऱ्या मारणारा, ज्यानें वाघाप्रमाणें शत्रूवर उडी घालतांना जिवाची कधीं पर्वा केली नाहीं, ज्यानें गंगातीरावर सहा हजार विश्वासघातकी लोकांचा मोठ्या शिताफीनें समाचार घेतला, तो असा मुकाट्यानें आमच्या हातीं लागणार ! पण आमचें तकदीर मोठ्या जोरावर म्हणून अशा पुरुषाला व्यसनाधीन होण्याची बुद्धि झाली ! पुरुष अलौकिक तर खरा, पण व्यसनाच्या पायीं खराब झाला ! अरेरे, व्यसनामुळें असे अनेक अनर्थ घडलेले पाहत असतां लोकांचे डोळे उघडत नाहींत ! कोठें त्यांची अकल जाते कांहीं कळत नाहीं. पण असे व्यसनी लोक जगांत

आहेत ह्मणून आमच्यासारख्यांचें फावतें; पण खरोखर व्यसन करणें हा जर परमेश्वराच्या घरचा गुन्हा आहे तर त्यांच्या व्यसनापासून आपण फायदा करून घेण्यांत पाप आहे असें तरी कसें ह्मणावें ? तें असो; आतां माझ्यापुढें एक मोठा विकट प्रश्न आहे तो अगोदर सोडविला पाहिजे. संभाजीला मारावें कीं जिवंत राहूं द्यावें ? कशांत आपला ज्यास्त फायदा आहे ? त्याला मारूं नये, पक्क्या बंदोबस्तानें कैदेंतच ठेवावें, अशी आमचे सरदारांची सल्ला आहे. एका अर्थी त्यांची सल्ला बरोबर आहे. त्याच्या पायांत जंजीर अडकवून त्याला किल्लोकिल्लीं नेलें आणि ' किल्ला खालीं करा, नाहींतर याची गर्दन उडवितों ' असें किल्लेदारास म्हटलें, तर अशा नुसत्या जरबेनेंच मराठ्यांचे सगळे किल्ले सर करतां येतील. अनायासेंच आपलें काम होईल. याला मारून टाकल्यानें काय मिळणार ? उलट हे मराठे सैतान ज्यास्त खवळून जाऊन आम्हांला पुरे पुरे करून सोडतील. तेव्हां संभाजीला मारायचें नाहीं ही गोष्ट ठरली. कोण आहेरे तिकडे ? बाहेर असलेल्या तकरीबखानाला संभाजीला आंत घेऊन येण्यास सांग.

**नोकर**—जसा हुजूरचा हुकूम. ( मुजरा करून जातो. )

( तकरीबखान संभाजीला आणून बादशहापुढें उभा करतो. )

**औरंग०**—(संभाजीस) संभाजीराजे, आज इतकीं वर्षे तुम्हीं आम्हांला सतावून सोडलें होतें, पण आतां भाग्यानें तुम्ही आमच्या हातीं लागले आहां. तेव्हां यापुढें तुम्हांला जिवंत ठेवणें म्हणजे जाज्वल्य निखारा अस्तनींत बाळगल्यासारखें होईल. तेव्हां बोला, तुम्ही जगायला चाहतां कां मरायला चाहतां ?

**संभाजी०**—शत्रूच्या हातीं सांपडल्यावर अशा अपमानकारक स्थितींत जगणें हें मानी आणि तेजस्वी पुरुषाला मरणापेक्षांही

ज्यास्त दुःखप्रद वाटत असतें. तेव्हां मला असा प्रश्न करण्याचें कारणच उरत नाहीं.

**औरंग०**—पण नाहीं. तुझ्यासारख्या शूर वीराला लढाईंत मारलें असतें तर गोष्ट निराळी होती; पकडून निःशस्त्र केल्यावर तुझ्यावर शस्त्र चालविणें म्हणजे तुझा उपमर्द होईल. म्हणून म्हणतों कीं बोल, जिवंत रहाण्याची इच्छा असली तर तसें सांग. हा अलमगीर एका अटीवर तुझी इच्छा पूर्ण करील. ती अट म्हणजे ही कीं तुला मुसलमान झालें पाहिजे.

**संभाजी०**--(रागानें) काय ? मी मुसलमान होऊं ? गोष्टच कशाला पाहिजे ! मी क्षत्रिय-मराठा कुळांतला, शिवाजी महाराजांचा पुत्र--तुझ्या मारण्याच्या धमकावणीला भिऊन व जीव बचावण्याच्या लालचीला वश होऊन मुसलमान होण्यास राजी होईन असें तुला वाटलें तरी कसें ? आम्हांला आमचा धर्म जिवापेक्षांही प्यार आहे. धर्मासाठीं आम्ही आपले प्राण वेंचूं. आमच्या हिंदु धर्मांत आणि तुझ्या मुसलमानी धर्मांत अंतर आहे तें येथेंच. आम्ही धर्माकरितां मेलों तर स्वर्गलोकचें द्वार आमच्यासाठीं खुलें आहे. असा लाभ सोडून कोणता शहाणा मनुष्य तुझ्या गुलामांगिरीचा नरकवास पतकरण्यास तयार होईल ! तुझ्या धर्माची मातब्बरी काय सांगावयाची आहे ! राज्यलोभानें प्रत्यक्ष बापाला कैदेंत टाकणारा, आणि भावांना ठार करून मसनद मिळविणारा तूं मोठा अवलिया समजत असशील ! हीच तुझी तुझ्या धर्माविषयींची कल्पना असेल तर तो तुझा धर्म तुलाच लखलाभ होवो।

**औरंग०**—( रागानें ) असें काय ! तूं आमच्या धर्माची निंदा करून स्वतःचा धर्म स्वर्गलाभ करून देणारा समजतोस काय !

तर मग तुला ठार मारून स्वर्गप्राप्ति करून देण्यापेक्षां जिवंत ठेवून नरकवासाचेंच सुख दाखविलेलें बरें.

**संभाजी**—( स्वगत ) हा चांडाळ बोलल्याप्रमाणें करण्यास चुकायचा नाहीं. मला यांनीं कैद केलें आहे हेंच मला मरणाहून अधिक यातना करीत आहे. अशा यातनांत जन्म कंठण्यापेक्षां याला अधिक चिडवून याच्याकडून आपला वध करवून घेणेंच श्रेयस्कर होईल. एकदांच काय या देहाचें व्हावयाचें असेल तें होऊं दे.

**औरंग०**—कां ? आतां कां बोलत नाहींस ? तुझी बेफाम झालेली अक्कल शुद्धीवर येते वाटतें ? तूं तरुण वांड आहेस. तुझ्या तोंडून उतावळेपणानें वेडयासारखे शब्द निघणें स्वाभाविक आहे.

**संभाजी**—( स्वगत ) या गुलामाच्या हातून मरणाची प्राप्ति करून घ्यायला सुद्धां युक्ति लढविली पाहिजे ! त्याशिवाय भागायचें नाहीं. ( उघड ) या संभाजीसारख्या मराठा राजाला मुसलमान करण्यांत तुला आपल्या धर्माचा गौरव केल्याचें समाधानसुख वाटत असेल तर मी त्या सुखाच्या आड येऊं इच्छीत नाहीं. मला स्वतःच्या जिवाची पर्वा नाहीं, पण केवळ तुझ्या समाधानासाठीं मी मुसलमान होईन. मात्र माझी एक अट तूं कबूल केली पाहिजे.

**औरंग०**—( उतावळीनें ) बोल, कोणती तुझी अट ? तुझें मराठी राज्य कायम ठेवूं ? कीं तुझ्या भावाला दसहजारी सरदार करूं ? बोल. तुला काय हवें तें या वेळीं मागून घे.

**संभाजी**—( हंसून ) नाहीं. मराठी राज्य कायम ठेवायचें परमेश्वराच्या मनांत असलें तर तें राहील, आणि माझ्या भावाच्या अंगांत बाबांचें रक्त खेळत असलें तर तो तुझा बंदा गुलाम होऊन राहण्यांत भूषण न मानतां स्वतःच्या पराक्रमानें आपलें गेलेलें

राज्यही मिळवील. मला त्याची फिकीर नाहीं. मला तुझी शहाजादी देत असशील तर—

**औरंग०**—( क्रोधानें ) अरे हरामजादा, मगरूर, कंबख्त ! दिल्लीच्या शहाजादीविषयींची मागणी घालून आमची बरोबरी करूं पाहतोस काय ? आमच्या रुबरु असे अपमानकारक शब्द उच्चारण्याइतकी छाती सैतानाशिवाय दुसरी कोणाची होणार ? तकरीबखान, याला आत्तांच्या आत्तां इथून घेऊन जा, आणि सांडसानें याचे डोळे काढून पैगंबराच्या धर्माची निंदा करणारी याची जीभ तरवारीनें छाटून टाका, आणि हालहाल करून याला ठार करा.

( तकरीबखान संभाजीला नेतो. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग बाविसावा.

### केवळ स्वराज्यासाठीं.

**कथाभाग**—संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठ्यांचें राज्य संभाळण्याची फार मोठी जबाबदारी संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम व त्याचे मराठे सरदार आणि मुत्सद्दी यांचेवर येऊन पडली. पण सुदैवानें श्रीशिवाजी महाराजांच्या तालमींत तयार झालेलीं हुशार, राजनिष्ठ, आणि धोरणी अशीं कांहीं माणसें त्यावेळीं हयात होतीं. त्यांनीं अतिशय शिताफीनें आणि स्वतःच्या अब्रू-कडे किंवा जिवाकडे न पाहतां मराठ्यांच्या राज्याची विघडलेली घडी पुनः बसविली. या वेळच्या इमानी व राजनिष्ठ सेवकांच्या इमानदारीचा एक मासला या प्रसंगांत दाखविला आहे.

# केवळ स्वराज्यासाठीं.

## पात्रें.

**खंडोबल्लाळ**—छत्रपति राजाराम महाराजांचा चिटणीस.

**बहिरव**—खंडोबल्लाळाचा मुलगा.

**जमादार**—खंडोबल्लाळावर पाहरा करणारा.

**स्थळ**—अरुणाचळ किल्ल्यावरील तुरुंग.

**खंडो०**—मी तर स्वामिकार्यासाठीं प्राण देखील अर्पण्यास तयार होऊनच निघालों होतों, तेव्हां मध्यंतरीं हा तुरुंगवास प्राप्त झाल्याचें मला दुःख काय वाटणार? पण खाल्ल्या घरचे वासे मोजणाऱ्या त्या हरामखोर कोंडोविठ्ठलानें व त्याच्या साथीदारांनीं शत्रूला फितूर होऊन हा प्रसंग माझेवर आणिला, आणि केवळ स्वार्थापायीं मराठेशाहीचा नायनाट करण्याचा घाट घातला! त्यांच्या नीचपणाची एकेक गोष्ट आठवली म्हणजे असले करंटे मराठ्यांच्या नांवाला कलंक लावायला देवानें निर्माण तरी कां केले असें वाटून मन गोंधळल्यासारखें होतें. चंदी सर करण्याविषयीं झुलफिकारखानाच्या मागें बादशहाचा नेट लागल्याचें ऐकतांच चंदी सोडली, अमात्यांना भेटलों, मराठे सरदारांच्या फौजा जागजागां वांटून विशाळगडापासून चंदीपर्यंत सरदारांची सारखी रांग लाविली, आणि अशी सारी व्यवस्था करून व महाराजांना विशाळगडीं आणून मराठ्यांचें तख्त इथें स्थापावें म्हणून परत चालला होतों, तों या गुलामानें आडवें येऊन माझी अशी स्थिति

करून सोडलीन्! पण सुदैवानें हा जमादार लांचखाऊ भेटला म्हणून माझ्या बरोबरच कैदेंत पडलेल्या कृष्णाजीपंताची सुटका करून त्याच्या हातीं बहिरवाला निरोप तरी पाठवितां आला. पण माझा निरोप त्याला पोंचला असेल काय ? कां पुनः कृष्णाजी-पंताला हरामखोरांनीं कोठें अडकवून टाकिलें कोणास ठाऊक! निरोप पोंचल्यावर बहिरव आल्याशिवाय खास राहणार नाहीं. ( इतक्यांत बहिरवास घेऊन जमादार येतो ).

**बहि०**—( बापाच्या पायां पडून )–अप्पा, काय हा प्रसंग !

( डोळ्यांतून अश्रु गाळतो. )

**खंडो०**—( त्याला छातीशीं धरून )–बहिरव काय हें ? अरे डोळ्यांतून टिपें गाळण्याचा हा प्रसंग नव्हे; स्वामिकार्यासाठीं आपण किती दुःख सोसण्यास तयार आहों याची ही कसोटी आहे. परमेश्वराच्या कसोटीला आपण उतरलें पाहिजे.

**जमा०**--हं ! फा–फा–फा–फार वे–ळ ला–लावूं नका. ल-ल–लौकर आटपा. ठा–ठा–ठाणेदार मो–मो–मोठा मा–मा–मात्रागमनी आहे. म्ह–म्हणून म्हणतों जा–जा–जाणार तर ल–ल–लौकर निघून जा. मी–मी–बाहेर उभा राहतों. ( जातो. )

**खंडो०**—आटपतों. बहिरव, हे साखळदंड आणि लंघर पाहून तुझ्या काळजाचें पाणी झालेलें दिसतें. तेव्हां—

**बहि०**—तेव्हां माझ्यानें हे कसे सहन करवतील असें तुमचें म्हणणें ना ? खरें सांगूं ? यांनीं तुम्हांला जखडून टाकलेलें पाहून माझ्या काळजाचें पाणी झालें, पण तें मला यांची भीति वाटते म्हणून नव्हे. तुमची सुटका करण्यासाठीं यांच्या दुप्पट वजनाचे साखळ-दंड व लंघर सुद्धां मी आनंदानें अडकवून घेईन.

**खंडो०**—ती माझी खात्री होती म्हणूनच तुला निरोप पाठविला. पण आतां माझें मन बदललें आहे. माझ्याबद्दल तूंच चंदीला जाऊन सांगतों ती कामगिरी कर म्हणजे झालें.

**बहि०**—छेः छेः ! तसें नको. किती झालें तरी राजकारणांत मी अजून कच्चा आहें. एखादी चूक न कळत माझ्या हातून घडली तर मराठेशाहीचें मोठें नुकसान होईल. असली महत्वाची कामगिरी आपणच करावी. मीं हें हत्यार आणिलें आहे, यानें अगोदर हे लंघर व साखळदंड काढतों. आपण मुक्त होऊन हे माझ्या गळ्यांत अडकवा आणि गडाखालीं कृष्णाजीपंत आणि तान्द्या घोडीं घेऊन उभे आहेत त्यांवर बसून एकदम मोठी मजल करून शत्रूच्या टप्प्याबाहेर निघून जा.

**खंडो०**—काय ? मी आपल्या हातानें आपल्या पुत्राच्या पायांत हे साखळदंड आणि गळ्यांत हे लंघर अडकवून स्वतः निसटून जाऊं ? छेः छेः ! हें माझ्या हातून होणें नाहीं.

**बहि०**—तर मग काय पुत्रमोहाला वश होऊन स्वामिकार्यापासून विन्मुख होणार ? अप्पा, मीं सांगावें असें नाहीं; पण पुत्रमोहांत गुंतून राहण्याची ही वेळ नाहीं. महाराज, प्रल्हाद निराजी; व इतर सगळे मुत्सद्दी यांचे डोळे तुमचेकडे लागले आहेत. तुम्ही इकडे अडकून पडल्यामुळें तिकडे किती घोंटाळा उडून राहिला आहे ! तुम्ही शाबूत राहिलांत तर मराठेशाहीची बाजू संभाळली जाईल. त्यापुढें माझ्या एकट्या जिवाची काय किंमत आहे ? आतां वेळ गमावला तर तिकडे कदाचित् चंदी सर होऊन सर्वांना खानाचे कैदी व्हावें लागेल. म्हणून म्हणतों हा पुत्रमोह आंवरून—

**जमा०**—आ—आटपलें कीं नाहीं अजून ?

( बहिरव साखळदंड व लंघर काढतो. )

**खंडो०**—जमादार, झालें बरें? तुमचे फार उपकार झाले आहेत आमच्यावर.

**जमा०**—ग–ग––गरीबाची आठवण ठेवा म्ह––म्ह–– म्हणजे झालें.

**खंडो०**—त्याबद्दल अगदीं काळजी करायला नको. मी बोल-ल्याप्रमाणें सारें करीन.

**बहि०**—ठोका हे लंघर आतां हातांत.

**खंडो०**—दैवा! काय हा प्रसंग आणिलास! मी या वेळीं कसाबाहूनहि कसाब झालों आं!

**बहि०**—अप्पा, असें मनाला वाईट वाटून कां घेतां! मी तर समजतों कीं महाराजांची चिटणिशी आज माझ्या गळ्यांत पडली आहे आणि हे लंघर आणि जंजीर हीं त्या चिटणिशीचीं वस्त्रें-भूषणें आहेत.

**खंडो०**—परमेश्वरा! स्वामिकार्यासाठीं स्वतःच्या सुखाला लाथ मारणारा पुत्र देऊन तूं आज मला धन्य केलेंस! बहिरव, तूं आमच्याच कुळाचा काय, पण साऱ्या हिंदूंचा, साऱ्या महाराष्ट्राचा, उद्धार करशील. ( त्याला घट्ट छातीशीं धरून ) तूर्त तरी हीच आपली शेवटची भेट! महाराजांना सुरक्षित स्थळीं पोंचवून मी तुझी सुटका करायला येतों. पण परमेश्वराच्या मनांत कांहीं विपरीत—

**बहि०**—नाहीं नाहीं–तो भक्ताला कधीं अंतर देणार नाहीं.

**खंडो०**—आपला सर्वांचा आधार तोच आहे. त्याच्या-वरच तुझ्या रक्षणाचा भार टाकून मी आतां जातों. तुला ज्यास्त

काय सांगायचें आहे? आपल्या कुळाला, धर्माला, व देशाला कोणत्याही तऱ्हेनें कलंक लागणार नाहीं असें वर्तन ठेव.

**बहि०**—उडी मात्र बेतानें टाकायची. चांदणें आहे थोडें अंधुक, म्हणून म्हणतों जपून उडी टाकावी.

**खंडो०**—काळजी करूं नकोस. सर्वांचें रक्षण करणारा परमेश्वर समर्थ आहे.

( जातो. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग तेविसावा.

### मराठ्यांची सत्त्वपरीक्षा.

**कथाभाग**—बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या मागें त्यांचा वडील मुलगा बाजीराव याला पेशवापद मिळूं नये म्हणून प्रतिनिधि वगैरे कांहीं मंडळीनें खटपट करून पाहिली, पण तें साधलें नाहीं. याला कारण बाजीरावाच्या अंगचें शौर्याचें व तेजस्वितेचें पाणी. पेशवा झाल्यावर तर बाजीरावानें माळवा, गुजराथ, बुंदेलखंड वगैरे अनेक प्रांत जिंकून शौर्याविषयीं उत्तमच कीर्ति स्थापित केली. बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजीअप्पा हाहि त्याच्यासारखा मोठा शूर होता. त्यानें कोंकणपट्टी जिंकून फिरंग्यांची चांगलीच खोड मोडली. कोंकणावरच्या या मोहिमींत वसईचा किल्ला घेण्यास मराठ्यांना फारच प्रयास पडले. त्यांच्या अंगच्या शौर्याची, धाडसाची, स्वाभिमानाची, स्वराज्यभक्तीची आणि स्त्रीजातीविषयींच्या उदार भावनेची परीक्षा होण्याचीच ही वेळ होती. त्यांतून ते कसे उत्तम रीतीनें पार पडले तें या प्रसंगांतल्या पुढील दोन प्रवेशांत थोडक्यांत दाखविलें आहे.

# मराठ्यांची सत्त्वपरीक्षा.

पात्रें.

**चिमाजी अप्पा**—पहिले बाजीराव पेशव्याचे बंधु.
**मल्हारराव होळकर**—एक सरदार.
**रायजी**—दुसरा एक सरदार. एक फिरंगी स्त्री, सेवक वगैरे.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—वसईजवळ मराठ्यांची छावणी.

( चिमाजी अप्पा खिन्न होऊन एकटेच बसले आहेत. )

**अप्पासाहेब**—( स्वतःशीं ) अगदीं नाहीं तरी आज दोन अडीच महिने आम्ही या किल्ल्यासाठीं फिरंग्यांशीं झगडत आहों. आमचीं शेंकडों शूर माणसें या मोहिमेंत कामास आलीं; पण कांहीं लाभ झाला नाहीं. जी पहिल्या दिवसाची स्थिति तीच आज आहे. हा किल्ला सर न करतां मला परत जावें लागलें तर माझी प्रतिज्ञा फोल ठरेल; जे शूर शिपाईगडी जिवाची पर्वा न करतां लढले त्यांचें शौर्य आणि त्यांनीं येथें सांडलेलें आपलें रक्त यांचें काय होईल ? आणि ज्याला अपयशाचा डाग आतांपर्यंत केव्हांही लागला नाहीं तो हा अप्पा काळें झालेलें हें तोंड महाराजांस आणि दादासाहेबांस तरी कसें दाखवील ? मला पाहून सारा महाराष्ट्र नाक मुरडील, माझा धिक्कार करील, माझ्या तोंडावर थुंकेल. रणांगणीं पडलेल्या शिपायांचीं बायकापोरें व सोयरींधायरीं मी नाहक इतक्यांची हत्या केली म्हणून मला शाप देत राहतील. आमचे हाडवैरी जे प्रतिनिधि आणि जाधव त्यांना दादासाहेबांच्या

वर्मी घाव घालायला आयतीच संधि सांपडून ते दादासाहेबांना भर-दरबारांत खालीं पहायला लावतील. दादा, ज्या तुम्हीं आपल्या बाहुबलानें सर्व हिंदुस्थानभर समशेर गाजवून शत्रूंना थरथर कांपायला लाविलें, आणि तुमच्या वाईटावर असलेल्या दरबारी मंडळींचीं तोंडें बंद केलीं, आणि ज्या तुह्मीं आपल्या अतुल पराक्रमानें जवानमर्द ब्राह्मण वीर अशी अखंड कीर्ति संपादन केली, त्या तुमच्या नांवाला, तुमच्या कुळाला, तुमच्या कीर्तीला कालिमा लावणारा हा कुलांगार जन्माला आला म्हणून भावीं बखरकार माझा उल्लेख करतील ! असा हा कपाळकरंटा अप्पा जन्माला आला नसता तरी बरें होतें. जन्माला आलों हा माझा अपराध नसला तरी असलें हें निंद्य जीवित मीं कायम ठेविलें तर मी खास अपराधी होईन. छेः छेः, आतां मी हें काळें तोंड कोणालाही दाखणार नाहीं हाच निश्चय.

( इतक्यांत मल्हारराव होळकर येतात. )

**मल्हार०**—कोणता निश्चय ? आपल्या हातानें आपल्या जिवाचा नाश करून घ्यायचा हा ? वाहवा ! अप्पासाहेब, आपण ब्राह्मण, शास्त्र जाणणारे, माझ्यासारख्या धनगरानें तुह्माला शास्त्र काय शिकवायचें ? पण आत्महत्या हें शास्त्रांत भयंकर पाप सांगितलें आहे असें पुराणिक बोवांच्या तोंडून मीं कितीकदां ऐकिलें आहे. शिवाय अपजय घेऊन जाणें हें वीराला जेवढें लांछन, त्यापेक्षां भागूबाईसारखें मुळमुळु रडत बसणें व आत्महत्या करून घेणें हें कमी लांछन आहे काय ? आणि इतक्या निकरावर गोष्ट आणण्यासारखें झालें आहे तरी काय ?

**अप्पा०**—आतां आणखी काय व्हायचें आहे ? फिरंग्यांनीं आमची छावणी लुटून, आमचा विध्वंस करून, आमच्या लोकांना

पकडून, जबरदस्तीनें बाटवून हांकून लावण्याचें बाकी राहिलें आहे हेंच ना ? तें झालेलें पाहण्याचें या अभाग्याच्या नशिबांत असलें तर तेंही होईल. पण मी ह्मणतों आत्महत्या हें जर पाप आहे, तर तुह्मीच मला तोफेच्या तोंडीं देऊन माझें मुंडकें या किल्ल्याच्या तटाच्या आंत पाडाना ?

**मल्हार०**—अप्पासाहेब, तुम्हींच असा धीर साडला तर आमच्या सारख्यांनीं कोणाकडे पाहून हिंमत धरायची ? तुम्हींच असे हातपाय गाळून अविचारानें मराठ्यांवर भयंकर अनर्थ गुदरून आणिला तर मराठी राज्याचें दुर्दैव म्हणायचें, दुसरें काय ? देवाच्याच मनांत फिरंग्यांच्या हातून मराठ्यांची बेअब्रू करवून महाराष्ट्रावर संकट आणायचें असेल म्हणून या वेळीं तुम्हाला अशी दुर्बुद्धि होत आहे म्हणावयाची ! पण अप्पासाहेब, मी म्हणतों, देवाच्या मनांत जरी मराठ्यांचा विध्वंस करायचा असला तरी तो तुम्ही आपल्या हातानें किंवा आमच्या हातानें कां करून घेतां ? मी म्हणतों मरायचें खरें, मग आपल्याच तरवारीनें आपली मान कापून किंवा तोफेच्या तोंडीं जाऊन मरण्यापेक्षां शत्रूच्या माना कापींत कापीत, मर्दुमकी गाजवून मेलेलें काय वाईट आहे ? उठा, मरायचें पण हें काळें तोंड जगाला दाखवावयाचें नाहीं अशा निश्चयानेंच उठा. मग सिद्धिदाता परमेश्वर समर्थ आहे. मला आतां जी खबर तुम्हास सांगावयाची आहे ती ऐकिली म्हणजे तर जयश्री आपणा मराठ्यांस माळ घालील कीं नाहीं या विषयीं तुमच्या मनांत जें निराशेचें काहूर उठलें आहे तें पार मावळून जाईल अशी माझी पक्की खात्री आहे.

**अप्पा०**—सुभेदार, तुम्ही माझी कशी तरी समजूत घालण्या-

साठीं मला आशेच्या मचाचें बोट लावीत आहां झालें. काय खबर सांगावयाची आहे ? कळूं द्या एकदांची.

**मल्हार०**—आतां कसें बोललांत ! ऐका तर. किल्ला फारच मजबूत आहे. केवळ शक्तीवर भिस्त ठेवून आपण कितीही लढलों तरी तो हातीं येईलच अशी खात्री नाहीं. म्हणून युक्तीचा प्रयोग करून शत्रूचा भेद काढण्यासाठीं आपण सरदार माणकर, मोरे व अंजुरकर यांना पाठविलें होतें. त्यांनीं आपलें काम सोळा आणे केलें आहे.

**अप्पा०**—तें कसें काय ?

**मल्हार०**—सरदार माणकर यांनीं गुराख्याचें, मोरे यांनीं कासाराचें व अंजुरकरांनीं सुताराचें अशीं सोंगें घेऊन किल्ल्यांत प्रवेश केला आणि आंत चोहींकडे हिंडून कोठें काय आहे, बुरुजाला कोठें सुरुंग लावितां येईल वगैरे सर्व माहिती आणिली आहे. त्याप्रमाणें किल्ल्याचे बुरुजाखालीं दारूचे बुधले भरून ठेवण्याची व्यवस्थाही केली आहे. आतां आपली फौज नीट बंदोबस्तानें ठेवून सुरुंगाला बत्ती दिली कीं झालें काम फत्तें. मग पडलेल्या खिंडारांतून आपल्या फौजेनें जाऊन लांडगेतोड केली कीं आपणाला जय मिळालाच पाहिजे.

**अप्पा०**—सुभेदार, खरेंच का ? तुमचे हे शब्द अमृतसंजीवनेसारखे माझ्या या हताश अंतःकरणाला नवीन उमेद आणणारे आहेत. धन्य आहे तुमची आणि तुमच्यासारख्या आमच्या दुसऱ्या इमानी, धाडसी, आणि स्वामिभक्त सरदारांची ! जयाविषयींचा माझा आशांकुर अगदीं सुकला होता, त्याला तुमच्या या शब्दांनीं पुनः जिवंत केलें आहे. आतां पाहतों फिरंग्यांची मात्रा आमच्या शूर गड्यांपुढें कशी चालते ती. ( आवेशानें उठून )

सुभेदार, चला. आतां तुम्ही मला हवें तें बिकट काम करायला सांगा; सिंहाच्या गुहेंत शिरून, त्याची आयाळ धरून, त्याला खेचीत आणण्याला सांगा; किंवा पांच पंचवीस निवडक गड्यांनिशीं किल्लेदाराच्या छातीवर पाय देऊन आंत जाण्यास सांगा; हा अप्पा माघार घेईल तर ब्राह्मणाचा बच्चाच नव्हे; बोला काय करूं ?

**मल्हार०**—हें भाषण आपल्यासारख्या वीराला शोभणारेंच आहे. चला, मी सांगतों पुढें काय करायचें तें. (जातात.)

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—मराठ्यांची छावणी.

(अप्पासाहेब डेऱ्यांत एकटेच बसले आहेत.)

**अप्पा०**—धन्य त्या दयाळु परमेश्वराची ! मराठ्यांची अब्रु जाण्याची वेळ आली होती, पण त्या सच्चिदानंद प्रभूच्या कृपेनें, कैलासवासी श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या पुण्याईनें, वडिलांच्या आणि गुरुमहाराजांच्या आशिर्वादानें, आम्हांला आजचा सोन्याचा दिवस दिसला. मला हिताचा उपदेश करून माझ्या मनाची उद्विग्नता पार घालविण्याची बुद्धि जर सुभेदार मल्हारराव होळकरांना झाली नसती, तर केवढा अनर्थ ओढवला असता ! मराठ्यांचा नायनाट होण्याचा वखत आला होता; पण खैर झाली. आमच्या जिवासाठीं आणि मराठ्यांच्या नांवलौकिकासाठीं प्राण सुद्धां खर्ची घालण्यास सदैव तयार राहणाऱ्या आमच्या इमानी व शूर सरदारांची धन्य म्हणावयाची ! आमच्या विजयाचें सर्व श्रेय मल्हारराव

होळकरांना आणि शत्रूचा भेद आणून बुरुजाखालीं सुरुंग लावणाऱ्या सरदारांकडेस आहे. आजच्या लढाईच्या धुमश्चक्रीसारखी धुमश्चक्री कधीं कोणीं पाहिली नसेल. दीड तासपर्यंत तलवारीशीं तलवार कशी भिडून राहिली होती ! दुसऱ्या बाजूनें तोफांतून जोरानें बाहेर पडणाऱ्या गोळ्यांचा सारखा वर्षाव सुरू होता. हजारों वीरांचीं शिरकमलें कशीं फुटाण्यासारखीं उडत होतीं. फिरंगी म्हणजे कांहीं सामान्य नव्हे. अंधेरी रात्र, आपला आणि परका ओळखण्याची पंचाईत, भाषेची अडचण, अशा स्थितींत फिरंग्यांनीं आमच्यासारख्या गाजी मराठे वीरांशीं थोड्याशा लोकांनिशीं इतका वेळ सामना केला ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. ( सेवक येतो. )

**सेवक**—सरकार, रायजी जुंभाळकर सरकारच्या दर्शनासाठीं आले आहेत.

**अप्पा०**—एकटेच आहेत कीं आणखी कोणी बरोबर आहे ?

**सेवक**—सर्वांगावरून बुरखा घेतलेला एक मनुष्य त्यांनीं पकडून आणिला आहे.

**अप्पा०**—बरें आहे, त्यांना सोड आंत. (स्वगत) सर्वांगावरून बुरखा घेतलेला मनुष्य कोण बरें असेल ? शत्रूचा हेरबीर तर टेहळणी करतांना हातीं लागला नसेल ना ? तो सशस्त्र असला तर ? आपणही सावध रहावें हें बरें ( तरवार हातापाशीं तयार ठेवतो. )

( रायजी बुरखा घेतलेल्या माणसासह येतो. )

**अप्पा०**—काय रायजी, हें काय प्रकरण आज आणिलें आहे ?

**रायजी०**—( हंसत )सरकार, ह्यं ह्यं ? ही शत्रूची लूट आहे. धनी साहेबांस पसंत पडेल असा उत्तम नग आहे म्हणून पायापाशीं आणिला आहे.

**अप्पा०**--तुम्ही काय म्हणतां त्याचा अर्थच कळत नाहीं. नीट उघड करून सांगा.

**रायजी०**—( त्या माणसाच्या तोंडावरचा बुरखा जबरदस्तीनें काढून )-हें पहा लावण्यरत्न, धनीसाहेब. असलें रत्न आमच्यासारख्या आडदांड शिपाई गड्याला काय शोभतें ? आपल्यासारख्या सरदारांच्या भांडारांतच राहण्याची त्याची लायकी. म्हणून या चरणापाशीं आणिलें आहे. फिरंग्यांचा एक मचवा तातडीनें पळून चालला होता तो आह्मीं पकडला. त्यांत हें गवसलें.

**अप्पा०**--( रागानें )-रायजी, तुम्ही हें कोणाविषयीं आणि कोणासमोर बोलत आहां याची कांहीं शुद्ध तुम्हांला आहे का ? ही स्त्री शत्रूकडची झाली म्हणून काय झालें ? स्त्रीजातीवर हात टाकून तिला पकडण्याचें नामर्दपणाचें कृत्य करण्यास तुमचा हात वाहला कसा याचेंच मला आश्चर्य वाटतें. स्त्रीजातीवर हात टाकिला ही तुमची पहिली चूक; आणि अशा थोर, उच्च, कुलीन स्त्रीविषयीं विटंबनापर भाषा आणि तीही माझ्यासमोर बोलतां हा तर तुमचा अक्षम्य गुन्हा आहे. नीचा, असले घाणेरडे शब्द माझ्यापुढें उच्चारण्याला तुला लाज कशी नाहीं वाटली ? कशाला शिपाई झालास ? हरामखोरा, उद्यां समज तुझी बायको, आई किंवा बहीण शत्रूच्या हातीं लागली आणि त्यांनीं तिची अशी विटंबना मांडली, तर तूं असाच दांत विचकून बोलशील काय ? तुझ्यासारखे पाजी, दुष्ट, अधम पुरुष माझ्या सैन्यांत आहेत हें मला आजच कळलें. नीचा, पड या स्त्रीच्या पायां आणि क्षमा माग, तरच ह्या हातून जिवंत सुटशील. नाहींपेक्षां हा पहा आत्तांच तलवारीनें तुझी गर्दन छाटून टाकीन.

**रायजी०**—नाहीं, नाहीं धनीसाव ! सरकारच्या आज्ञेप्रमाणें करतों.

( स्त्रीच्या पायां पडून क्षमा मागतो. )

**अप्पा०**—उतर तुझा पोषाख अन् दे इकडे ती तलवार. या तुझ्या वर्तनानें तूं आपल्या शिपाईबाण्याला कलंक लाविला आहेस. आत्तांच्या आतां माझ्या सैन्यांतून चालता हो. जर पुनः येथें दिसलास तर तोफेच्या तोंडीं देईन हें नीट ध्यानांत ठेव.

( रायजी जातो. )

( स्त्रीस ) आमच्या या नीच शिपायानें तुमचा मोठा अपराध केला आहे त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. तुमचा अपमान झाल्याबद्दल मी क्षमा मागतों. मला तुम्ही मातोश्रीच्या ठिकाणीं आहां. आतां निर्धास्त असा. तुमच्या केसालासुद्धां धक्का लागणार नाहीं. तुमच्याबरोबर विश्वासुक माणसें पोंचविण्यास देतों. तुम्हांला जेथें जाणें असेल तेथें तीं तुम्हांस सुखरूप पोंचावितील. या जिंकलेल्या मुलुखांपैकीं पांच हजारांचीं दोन गांवें चोळीबांगडीसाठीं तुम्हांस इनाम देतों. कोण आहेरे तिकडे ?

**सेवक०**—जी सरकार.

**अप्पा०**—हणमंतराव पानसुळे व त्रिंबकजी घोडमुखी, यांना माझी आज्ञा सांग कीं, या बाईला जायचें आहे त्या ठिकाणीं सुखरूप पोंचवून या. आत्तांच्या आत्तां निघा म्हणून सांग.

**स्त्री०**—आपले माझ्यावर अनंत उपकार आहेत. या अनाथ अबलेची अब्रू आपण राखली. परमेश्वर आपलें कल्याण करील आणि जोंपर्यंत मराठ्यांच्या अंगीं हा सात्त्विकपणा आणि ही उदारता कायम राहील तोंपर्यंत त्यांची समशेर यशस्वी राहील येवढेंच मला सांगावयाचें आहे. ( जाते. )



# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग चोविसावा.

### भयंकर आघात.

**कथाभाग**—पहिले बाजीराव पेशवे मरण पावल्यानंतर त्यांचा पुत्र बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब हे पेशवे झाले. यांच्या वेळीं मराठी सत्तेचा सर्व प्रकारें उत्कर्ष झाला, आणि इतर राजांना या सत्तेचा दरारा वाटूं लागला होता. अशा वेळीं अफगाणिस्तानचा मुसलमान राजा अहमदशहा अबदाली यानें हिंदुस्थानावर स्वारी केली. प्रथम त्यालाही मराठ्यांनीं चांगला हात दाखविला आणि त्याला पराजय घेऊन परत जाण्यास लाविलें. या अपमानामुळें चिडून अहमदशहानें कांहीं वेळानें चांगली तयारी करून पुनः स्वारी केली. यावेळीं मराठ्यांचा उत्कर्ष ज्यांना सहन होत नव्हता असे मुसलमान राजेही त्याला मिळाले आणि त्याला तोंड देण्याचें बिकट काम एकट्या मराठ्यांवर पडलें. मराठ्यांत आपापसांत फूट नसती, आणि सर्व सरदारांना एकत्र ठेवून शत्रूला तोंड देणारा, धोरणी, व शहाण्यांची मसलत ऐकणारा एखादा सेनापति असता तर याही प्रसंगांतून मराठे पार पडले असते. पण दुर्दैवानें यावेळीं चिमाजी अप्पाचा मुलगा सदाशिवराव भाऊ ऊर्फ भाऊसाहेब यानें सेनापतीचें काम

आपलेकडे घेतलें होतें. भाऊसाहेब हेकेखोर, उर्मट, आणि हलक्या कानाचा असल्यामुळें त्याच्या हातून या मोहिमेंत फार चुका झाल्या, आणि त्यांचा असा परिणाम झाला कीं, अबदालीशीं झालेल्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पुरा मोड होऊन त्यांचे ठळक ठळक सरदार व हजारों शिपाई मारले गेले. ही पानिपतची लढाई म्हणजे मराठ्यांच्या सत्तेला भयंकर आघातच झाला ! मराठ्यांच्या इतिहासांतला हा अत्यंत महत्त्वाचा पण खेदकारक प्रसंग पुढील प्रवेशांत वर्णिला आहे.

# भयंकर आघात.

## पात्रें.

**भाऊसाहेब**—नानासाहेब पेशव्यांचा चुलतभाऊ.

**विश्वासराव**—नानासाहेबांचा मुलगा.

जनकोजी शिंदे, सुभेदार मल्हारराव होळकर, बळवंतराव मेहेंदळे, इब्राहिमखान गारदी, समशेर बाहादूर इ. पेशव्यांचे सरदार.

**सुरजमल जाट**— कुंभेरीचा जमीनदार.

**काशीराज**—मोगल बादशहाच्या तर्फेचा वकील.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**—दिल्लींतला एकवाडा.

( भाऊसाहेब, विश्वासराव, होळकर, सुरजमल जाट व बळवंतराव मेहेंदळे विचार करीत बसले आहेत. )

**जाट**—( होळकरास एकीकडे )–सुभेदार साहेब, तुम्हीं व्यर्थ मला या भानगडींत घातलेंत. तुम्ही मध्यें पडलां नसतां तर मीं यांचें तोंड सुद्धां पाहिलें नसतें, मग शब्द खर्चण्याचें नांव कशाला ? यांना तुमच्या आणि माझ्या पांढऱ्या केंसांची बिलकुल कदर नाहीं. हे तुमचे मेहेंदळे तर भारीच उद्दाम आहेत. त्यांना आपण दोघेही कस्पटाप्रमाणें वाटत आहों.

**होळ०**—( जाटास ) ताजें रक्त आहे, मारतें आहे उसळीवर उसळी. ठोकरा खाल्लया म्हणजे येईल अक्कल ठिकाणावर. पण आपण त्यांच्या बोलण्याचा राग मानून खरी हिताची सल्ला देण्यास चुकलों तर जग काय म्हणेल ? सांगणें आपलें काम आहे. ऐकणें न ऐकणें हा त्यांचा अखत्यार आहे.

**जाट**—( होळकराला ) अहो, सोशिकपणाला तरी कांहीं मर्यादा असते. मराठी राज्याचे मुख्य आधारस्तंभ अशा तुमच्यासारख्या पोक्त अनुभवी सरदारांना भाऊसाहेबांनीं ' समजली तुमची धनगरांची बुद्धि ' असे अपमानकारक शब्द बोलून दुखवावें आणि तुह्मीं ते मुकाट्यानें गिळून बसावें हें तुह्मांला कसें काय वाटतें तें मला ठाऊक नाहीं, पण मला तर तें ऐकून इतकी चीड आली कीं आत्तांच्या आतां ही छावणी सोडून चालतें व्हावेंसें वाटलें.

**भाऊ०**—काय करावें ? बुंदेले व पाराजीपंत वाघ खजिना आणायला गेले ते अजून तिकडेच ! त्यांच्याकडचें कांहींच वर्तमान कळत नाहीं.

**जाट**—( हंसत ) पण आतां त्यांच्या येण्याची इतकी जरूरी तरी काय राहिली आहे ? नड होती ती छतानें भागविलीच आहे !

**भाऊ०**—छत काढलें तें पैशाची अडचण भागविण्यासाठीं असें अजून कां तुह्मांला वाटतें ?

**जाट**—नाहीं, म्हटलें बादशाही तख्ताचा एकंदरींत आपण खूप मान ठेविला म्हणायचा ! येवढे थोरले नादिरशहा व अबदाली सारखे बोलून चालून लुटीसाठीं चालून आलेले, पण त्यांनीं देखील बादशाही तख्ताची मर्यादा राखली ! आणि त्याच तख्तावरील छत आपण आमच्यासारख्या पिढीजात बादशाही उमरावादेखत बेधडक काढून फौजेस रोजमुरा देतां ! तुम्हांला पैक्याची टंचाई असली तर मी येथच्या येथें पांच लाख रुपये हजर करतों, छताला मात्र हात लावू नका, त्यानें तुमचें भलें होणार नाहीं, अशी मीं विनंति केली असतां ती आपण ऐकिली नाहीं आणि—

**भाऊ०**—भाईसाहेब, पैशाच्या लोभानें किंवा पातशाहीचा अपमान करण्याच्या बुद्धीनें आम्हीं छत काढलें नाहीं, उलट रुप्याचें छत काढून सोन्याचें बसविण्याचा आमचा विचार आहे.

**जाट**—तें आपण नको सांगायला. मी सगळें समजून आहें. आमच्या चित्तांत हिंदुधर्म आहे म्हणूनच तुमचें आमचें इमान झालें, आणि त्याचें सार्थक फारच नामी झालें म्हणावयाचें!

**भाऊ०**—मी इतका जीव तोडून सांगत असतां तुम्हांला आमचें म्हणणें खरें वाटत नाहीं, तेव्हां दुर्दैव म्हणायचें! पण माझी पक्की खात्री आहे कीं, हे चार दिवस निघून गेले म्हणजे सर्व तुमच्या प्रत्ययाला येईल. बरें पण तें असो. कुंजपुऱ्यांत कुतुबशहा व दुसरे कित्येक मुसलमान मोठ्या फौजेनिशीं बेसावधपणानें राहिले आहेत अशी बातमी आहे. मला वाटतें एकदम जाऊन त्यांना घेरलें तर खचित जय मिळेल. याउप्पर जशी सर्वांची मर्जी. कसें काय सुभेदार काकासाहेब?

**होळ०**—मर्जी कसची? ताबेदाराला कसली आली आहे मर्जी आणि अक्कल?

**भाऊ०**—काकासाहेब, तुम्हीही जाटाप्रमाणेंच अंग काढून घेऊं लागलांत तर ग्रंथच आटोपला म्हणायचा!

**बळ०**—भाऊसाहेब, शितावरून भाताची परीक्षा होत असते. जाटांनीं आणि सुभेदारांनीं काय मांडिलें आहे तें त्यांच्या आतां-पर्यंतच्या भाषणावरून न कळण्याइतके कांहीं आपण मठ्ठ नाहीं झालों. रडतराऊत घोड्यावर बसविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मला आज्ञा व्हावी. मी एकटा जाऊन सगळ्या शत्रूंची चांदी उडवून येतों.

**होळ०**—अहो मेहेंदळे, जरा भान ठेवून बोला. तुम्ही ब्राह्मण असलांत तर तुमचें महात्म्य तीर्थाचे ठिकाणीं. येथें तुमच्या गमजा नाहीं चालायच्या, समजलांत?

**जाट**—भाऊसाहेब, आमच्यासारख्या बुढ्या माणसांनीं या दरबारांत बसण्याची शोभा आतां राहिली नाहीं. आतां आम्ही आणि सुभेदारांनीं घरांत शोभेसाठीं म्हणून तरवारी बाळगाव्या, आणि बळवंतरावासारख्या तरण्या बांडांनींच राजकारणी मसलती देऊन मोठाल्या कामगिऱ्या कराव्या हेंच योग्य. ( होळकरास ) चला , सुभेदार, हात दाखवून अवलक्षण करून घेण्यांत कोणता अर्थ आहे ?

( दोघेही उठतात. )

**भाऊ०**—काय हा अर्थाचा अनर्थ ? मनुष्याचें मन एकदां संशयानें ग्रस्त झालें म्हणजे त्याची बुद्धि प्रत्येक शब्दांतून अकल्पित अर्थ काढूं लागते. भाईजी, काकासाहेब, आपण आपसांतच असे वर्दळीवर येऊं लागलों तर पुढें कसें व्हावें ?

**होळ०**—आहेत हे ( बळवंतरावाकडे बोट दाखवून ) बहादूर गडी. कांहीं कमी पडूं देणार नाहींत. आम्हां बुढ्या माणसाच्यानें आतां काय कामगिरी होणार आहे ? इतक्या उपर आम्ही ताबेदार माणसें, धन्याच्या मर्जीबाहेर जाणें हा आमचा धर्म नाहीं. हुकूम होईल तों ऐकण्यांत कसूर होणार नाहीं.

**भाऊ०**—तर मग ठरलें कुंजपुऱ्यावर चालून जायचें. चला, त्या तयारीला लागा.

**होळ०**—फार उत्तम आहे. ( जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—कुंजपूरचें रणांगण.

( जनकोजी शिंदे, मल्हारराव होळकर, भाऊसाहेब, मेहेंदळे, इब्राहिमखान, समशेर बहादूर वगैरे मंडळी प्रवेश करतात. कुतु-

बखान, सयमतखान वगैरे शत्रूकडचे कैद केलेले सरदार ओळीनें उभे राहतात. )

**मल्हार०**—शाबास जनकोजी ! धन्य आहे तुझी आणि तुला जन्म देणाऱ्या तुझ्या मातापितरांची ! तूं आज अचाट पराक्रम करून मराठ्यांचा जरीपटका किल्ल्यावर नेऊन लावण्याची आपली प्रतिज्ञा तडीस नेलीस. दमाजी गायकवाड, इब्राहिमखान, तसेच सिंहाचे बच्चे आमचे हे समशेर बहादुर, सर्वांनींच आपापल्या परीनें आज लढण्याची शर्थ केली म्हणूनच शत्रूकडचे कुतुबखान आणि दुसरे कित्येक सरदार आपल्या हातीं जिवंत लागले. आमच्या छोटे सरकारांनींही आज आपल्या तलवारीचें पाणी प्रथमच शत्रूला दाखविलें आणि आजच्याच प्रसंगीं त्यांच्या पुण्यप्रतापानें आपणास मोठा विजय मिळाला. तेव्हां हा शुभशकुनच म्हटला पाहिजे.

**भाऊ०**—आज आमच्या विश्वासरावानें आणि शिंदे, इब्राहिमखान, समशेर बहादूर वगैरे मंडळीनें जी जवानमर्दी केली ती पाहून आम्हांस फार फार संतोष वाटतो. मराठे म्हणजे कः पदार्थ असें या हरामखोरांना ( कुतुबशाह वगैरे मंडळीकडे हात करून ) वाटत होतें. आतां त्यांना कळलें असेल मराठे कोण आहेत तें. हा कुतुबखान म्हणजे नीचपणाचा मूर्तिमंत पुतळा आहे. ( त्याच्या पुढें उभा राहून) अय मगरूर ! जिसने दत्ताजीको जूतेकी ठोकर मारी और खंजरसे उसका गर्दन काटा वह शयतान तूं ही है नहीं ? (सयमतखानास) यह कौन ? सयमतखान कतलबाज ! तूने अंताजी मानकेश्वरके तीन हजार लोगोंको कतल किया. अब तेरेको कत्तल फर्माता हूं. कुतुबशाह ! अब तेरे दिलमें क्या सोच है ?

**कुतुब०**—जनाबेमंद, कुसूर माफ करना. मेरी जान बचाव. अहमदशा अबदली और सुजाउद्दौला और नजीबखानसे आपको चाहे वैसा इकरार कर देता हूं. मेरेको कयूदखानेमें रखो, लेकिन् जिंदा रखो. चाहे तो मै पचास लाख रुपय्या जुरमाना देता हूं. मुझे जिंदा छोडो. अगरचे मेरेसे जंग करनेकी खायश् हो, तो चंद-रोजके आरसेमें पचीस हजार जमियत लेकर आपके सामने हाजिर रहूंगा.

**भाऊ०**—दत्ताजीकी गर्दन किसने काटा ? कोनसे हातसे कटार चलाई ? वो हात अव्वल कलम करेगा. और जिस पावसे उसको जूतेकी ठोकर मारी वो पावभी कलम करेगा. फिर तेरी पेशवे बहादूर के झेंडेके नीचे गर्दन उडाई जायेगी.

**मल्हार०**—सरकार, मला वाटतें याला जीवदान दिल्यानें याच्या मार्फतीनें आपणाला पुष्कळ कामें करून घेतां येतील. याला मारल्यानें दत्ताजी परत येतात असें थोडेंच आहे ?

**जनकोजी०**—मलाही असेंच वाटतें. याला नुसता कैदेंत ठेवण्यांतच आपला अधिक फायदा आहे.

**भाऊ०**—इब्राहिमखान, आपकी राय कैसी है ?

**इब्रा०**—सरकारे अली, मेरी राय यह है कि कुतुबशाहको प-कडकर लानेसे आपका मतलब हासिल हो चुका है. अब इसको रखना, चाहे वैसा इकरार इसके मदतसे दुरानीसे कर लेना, जुर-माना और मुलूख देना, और फेर इसको छोड देना.

**भाऊ०**--बहादर, आपकी भी रायका बयान करो.

**समशेर०**--इब्राहिमखानकी राय मेरे समजमें बहोत दुरुस्त है. उसके उपर हुजूरने गौर करना चाहिये. दुश्मनकी जान लेनेमें हुजू-

रका बदनाम होगा. मगर इसको जिंदा छोडनेसे आपके रहिम-दिलकी बडी तारीफ होकर आपका नाम यह आलम दुनियामें कायम होगा.

**भाऊ०**--तुम्ही सगळे शत्रूवर दया करावी म्हणतां, पण मला नाहीं तें बरें वाटत. एक वेळ नजीबखानाला सुभेदारांनीं जिवंत सोडला त्याचें फळ अजून भोगीत आहों. आतां हा जिवंत सोडला तर दुप्पट आग लावून देईल. हे लोक बेइमान असतात. शिवाय, कुतुबशहाचें शिर लाथेनें उडवून देण्याची माझी प्रतिज्ञा खोटी होईल. तें नाहीं कामाचें. उडादो इनकी गर्दन ( कुतुबशहा वगैरे मंडळीस घेऊन जातात ) आतां तुम्हां सर्वांना आपापल्या डेऱ्यांस जाण्याची परवानगी आहे. ( सर्व जातात. )

**बळंवत०**--( भाऊसाहेबांस ) मी म्हणत होतों तें आलें प्रत्ययाला ? सुभेदार पाहिलेतना कुतुबशहाचा जीव वांचविण्यासाठीं कसे गयावया करीत होते तें ? त्यांनीं हा जीवदानाचा प्रश्न काढला नसता तर कोणाच्या ध्यानींमनीं सुद्धां ती गोष्ट आली नसती. आपण कांहींही म्हणा, पण सुभेदारांना म्हातारचळ तरी लागला आहे किंवा ते दुराणीला आंतून खास सामील तरी आहेत. दोहोंतून एक गोष्ट नक्की आहे. सुरजमल जाट निघून गेला तो सुभेदारांच्या मसलतीवांचून गेला नाहीं. त्याचा गोट लुटला असता तर केवढी बहार झाली असती ! एक कोटपर्यंत ऐवज सरकारजमा झाला असता.

**भाऊ०**—तुम्ही म्हणतां तसें असेल खरें. मी आतां सुभेदारांना साफ सांगणार आहें कीं तुम्ही बोलवल्याशिवाय दरबारांत येऊं नये. आपल्या ज्या त्या बेतांत पाचर मारण्याचें तरी एकदांचें बंद होईल !

**बळ०**—आपली स्वतःची खात्री झाली हें बरें झालें. असो. आज आपणास फार त्रास झाला आहे. जरा विश्रांति घेतल्यावर पुढचे बेत ठरवितां येतलि.

**भाऊ०**—मीही तेंच म्हणणार होतों. चला.

( जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**--पानिपतची समरभूमि.

( भाऊसाहेब, जनकोजी शिंदे, होळकर, इब्राहिमखान वगैरे सरदार प्रवेश करतात. )

**भाऊ०**--कोण हा दुःखाचा डोंगर माझ्या टाळक्यावर कोसळला ! या वज्राघातानें माझें हृदय फुटून चूर्ण झालें आहे. विश्वासरावाला आणण्याची मला कोठून बुद्धि झाली ! आतां मी कोणत्या तोंडानें परत जाऊं ? ‘ माझा विश्वास कोठें आहे ’ म्हणून वहिनी विचारतील त्यांना मी काय सांगूं ? अरे घातक्या निर्दया यमा, तूं विश्वासाच्या आधीं मलाच कां ओढून नेलें नाहींस ? म्हणजे हें अपेशाचें खापर तरी माझ्या डोक्यावर फुटलें नसतें. आतां मी असा आक्रोश करीत कितीही वेळ बसलों तरी माझा विश्वास परत येणार आहे काय ? अहो जनकोजी, अहो इब्राहिमखान, अहो मराठे वीर हो, माझा विश्वास कोठें आह तो मला दाखवा. यमाच्या दाढेंतून त्याला बाहेर काढीन असा वीरश्रीचा आवेश माझ्या अंगांत आतां संचरला आहे. काय म्हणतां ? तो दुष्मनांच्या हातीं लागला ? तुम्ही त्यावेळीं काय करीत होतां ? आपल्या यजमानाला शत्रूंनीं फरफर ओढीत नेलें हें तुमच्यानें पाहवलें तरी कसें ? तुम्हीं काय

त्यावेळीं हातांत बांगड्या भरल्या होत्या ? पण मीं तुम्हांला तरी काय म्हणून दोष द्यावा ? या कपाळकरंट्या भाऊच्या भवितव्यतेंत अपेश लिहिलें होतें. ती भवितव्यता कशी टळणार ? अरेरे ! त्या दुष्ट दुराणीनें माझ्या बाळाच्या देहाचे तुकडे तुकडे केले असतील ! सरदार हो, माझ्या बरोबर कृतांताच्या दाढेंत उडी घेण्याची ज्यांची हिंमत असेल तेवढे येथें रहा. बाकीचे आपापले जीव घेऊन परत दक्षिणेला जाण्यास निघा कसे ! जनकोजी सुभेदार, तुम्ही आतां येथें राहूं नका. कबिले घेऊन आतांच्या आतां दक्षिणेस जा. मराठ्यांच्या बायकामुलांची अब्रू राखण्याचें काम आतां तुमच्यावर सोंपवितों. जा. पुण्यास जाऊन नानासाहेबांना आणि वहिनीसाहेबांना माझे साष्टांग नमस्कार कळवून त्यांना विज्ञापना सांगा कीं म्यां दुष्टानें तुमचा सर्वस्वीं घात केला. पेशव्यांच्या कुळाच्या नांवाला कलंक लाविला. त्याबद्दल क्षमा करा. तुमचे चिरंजीव विश्वासराव आणि भाऊ सदाशिवराव पांचलाख सेनेसह इंद्रलोकीं खुशाल आहेत. त्यांच्याविषयीं आतां अगदीं बेफिकिर रहा. हाच माझा शेवटचा निरोप. आतां मारूं किंवा मरूं याशिवाय तिसरी गोष्ट नाहीं.

**जनकोजी**—खाविंद गेल्यावर आमच्या सारख्यांनीं तरी जिवंत रहण्यांत काय भूषण आहे ? प्राण निघून गेल्यावर कुडीचा काय उपयोग ? जेथें धनी तेथें आम्ही. आतां कबिल्याला सुरक्षितपणें दक्षिणेंत पोंचवावयाचें तर तें काम सुभेदार चांगलें करतील. ते वृद्ध आहेत. श्रीमंतांना समजुतीच्या चार गोष्टी सांगून त्यांच्या मनाला धीर देतील. मला परत जाऊन काय करायचें आहे ? मला धन नको, दौलत नको, राज्य नको, कांहीं नको. या सर्वांवर लाथ मारून व हातावर शिर घेऊन लढावें आणि धारा-

तीर्थी हा देह ठेवावा, येवढी काय ती इच्छा उरली आहे. ती पुरी झाली म्हणजे कृतकृत्य होईन.

**भाऊ०**—जनकोजी बाबा आतां म्हणाले तें अगदीं योग्य आहे. बायकामुलांचें संरक्षण करून त्यांना पोंचविण्याचें बिकट काम करण्यास सुभेदारावांचून दुसरा भरंवशाचा गडी मला दिसत नाहीं. नानासाहेबांना धीर देण्यास त्यांच्यासारखाच पोक्त मनुष्य पाहिजे; नाहीं तर ते हाय खातील. ( होळकराकडे वळून ) काकासाहेब, या भाऊसाहेबांची येवढी ही शेवटची विनंति तुम्हीं ऐकलीच पाहिजे. तुम्ही हो म्हटलें ह्मणजे मी निर्घोर होईन. मग मी आहें आणि दुराणी आहे. पाहून घेऊं. विश्वासरावाच्या मृत्यूचा सूड उगविल्यावांचून हा भाऊ हातची तलवार आतां खालीं ठेवायचा नाहीं.

**होळ०**—भाऊसाहेब, तुम्हीं या वेळीं मला विलक्षण पेंचांत धरलें आहे. मी ' होय ' म्हणेन तर हा थेरडा लढाईला भिऊन पळून आला अशी साऱ्या दुनियेंत माझी अपकीर्ति होईल. 'नाहीं' म्हणेन तर धन्याच्या बायकामुलांच्या संरक्षणाचें काम सांगितलें असतां तें सुद्धां थेरड्यानें केलें नाहीं असा कृतघ्नपणा पदरीं येईल. दोन्हीकडून अब्रू जाण्याचा वखत आला आहे. श्रीम्हाळसाकांतच यावेळीं माझी काय लाज राखील ती खरी. ( विचारांत पडतो. )

**भाऊ०**—काकासाहेब, विचार कसला करतां ! तुम्ही धन्याचे एकनिष्ठ सेवक म्हणवितां ना ? बस तर. तुमच्या धन्याचीं बायकामाणसें तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. त्यांना सुरक्षितपणें घरीं नेऊन पोंचविण्याची जोखमीची कामगिरी तुम्हांला केली पाहिजे. अनमान करण्याची ही वेळ नव्हे. घटकेचाही विलंब लावूं नका. आत्तांच्या आतां निघा. दुष्मन् विजयश्रीनें फुरफुरत

आतां आपल्या गोटावर छापा घालतील. त्यापूर्वी तुम्हांला येथून कूच केलें पाहिजे.

**मल्हार०**—( कपाळाला हात लावून स्वगत ) काय हा वृद्धापकाळीं माझ्यावर प्रसंग ! विश्वासरावासारखे हिरे आणि शेंकडों मोत्यें पानिपतावर उधळून हा कपाळकरंटा मल्हारी भ्याडासारखा रणांगणाला पाठ दाखवून दक्षिणेला परत जाणार, यापेक्षां येथेंच त्याला मृत्यु कां येत नाहीं ! म्हाळसाकांता, सोडीव एकदांचा मला या संकटांतून !

**भाऊ०**—सुभेदार, अजून तुमच्या तोंडांतून होकार निघत नाहीं ? आतांपर्यंत आमचे धिंडवडे झालेले तुम्हीं पाहिलेत ते थोडे झाले वाटतें ! म्हणून आतां आमच्या बायकामुलांच्या अब्रूचे धिंडवडे झालेले पाहण्यासाठीं तुम्ही थांबतां आहांत ? तुमच्या पांढऱ्या केंसांची तरी--

**होळकर०**—पुरे पुरे, भाऊसाहेब ! आमची शोभा केलीत तेवढी पुरे ! आणखी बोलून माझ्या म्हाताऱ्याच्या काळजाला नका हो घरें पाडूं ! तुमची आज्ञा शिरावर धारण करून हा निघालों पहा दक्षिणेस जाण्यास. ( सर्वांस रामराम करून जातो. )

**भाऊ०**--वीरहो, बायकामुलांच्या काळजींतून तर मुक्त झालों. आतां प्रत्यक्ष कृतांताशीं गांठ घेण्यास तयार होऊन मी हा चाललो पहा. चला, या सगळे माझ्या मागून.

( सर्व जातात. )

## प्रवेश पांचवा.

( जनकोजी घायाळ होऊन पडला आहे. इतक्यांत काशीराज येतो. )

**काशी०**--उठा उठा ! कोठें तरी लपण्याची जागा अगोदर शोधा. येथें राहिलांत तर ठार व्हाल.

**जन०**--काय येवढी गडबड आहे ? शत्रु येत आहे काय ?

**काशी०**--येत आहे काय म्हणून काय विचारतां ? बरदोरखानाचा विचार आतांच्या आतां तुम्हांला ठार मारण्याचा आहे. त्याचे लोक आत्तां येथें येऊन पोंचतील. सला सुगावा लागतांच तुम्हांला कळविण्यासाठीं मी पुढें धांवत आलों आहें.

**जन०**--तुमचे हे मोठे उपकार आहेत. पण मी वीराचा बच्चा आहें. मरणाला मी मुळींच भीत नाहीं. शत्रु आले तर असा घायाळ झालों असतांही त्यांच्याशीं दोन हात करीन. तुम्ही आतां येवढेंच करा कीं महादजीला माझा शेवटचा निरोप कळवा. त्याला म्हणावें कीं तूं जर खरा वीरपुत्र असशील तर सूड घेशील. होळकरांनाही असाच निरोप कळवा. भाऊसाहेबांचें काय झालें ? ते जिवंत असले तर त्यांना माझे शेवटचे दंडवत सांगून विनंति कळवा कीं, या जनकोजीच्या हातून धन्याची कांहींच सेवा या लोकीं घडली नाहीं म्हणून शरम वाटून मीं परलोकची वाट धरली आहे.

**काशी०**—आतां कोठचे भाऊसाहेब ! ते केव्हांच गेले ! त्यांचें प्रेत शत्रूच्या हातीं लागून त्या दुष्टांनीं डोकेंहीं कापून नेलें. विश्वासराव आणि भाऊसाहेब या दोघांच्याही प्रेतांना उमरावगीर गोसाव्याकडून अग्निसंस्कार करविण्यांत आले.

**जन०**—हायरे दुर्दैवा ! काय तुझे हे विचित्र खेळ ! मराठ्यां-भाग्यसूर्य मावळला ! महाराष्ट्रभूमीचें सौभाग्य हरपलें भाऊसाहेबासारखा हिंमतदार गडी पुनः दिसणार नाहीं. भाऊसाहेब, सेवकाला मागें ठेवून धन्यानें पुढें जाणें तुमच्यासारख्या

सरदाराला कसें हो आवडलें ? थांबा थांबा ! हा पहा मी आलों इंद्रलोकीं तुमच्या सेवेला ! काशीराज--

**काशी०**—आतां बोलण्यांत वेळ घालवूं नका, अगोदर उठून जिवाच्या रक्षणाची कांहीं तजवीज करा. मला येथें फार वेळ थांबतां येत नाहीं. गिलच्यांनीं व दुराण्यांनीं मला येथें पाहिलें तर मीं त्यांच्याशीं फितुरी केली असें समजून तें मला हालहाल करून मारतील. ( कान देऊन ) हा गलबला कशाचा ? बरदोरखानाचे लोक आले वाटतें. मला आतां येथून पळ काढलाच पाहिजे. ( घाईघाईनें निघून जातो. )

( मुसलमान येतात. )

**जनकोजी**—(त्यांस पाहून )—या, माझी ही तलवार तुमच्याच रक्तासाठीं तान्हेली झाली आहे. मृत्यूच्या आधीन होण्यापूर्वीं हिची तृष्णा मला शांत केली पाहिजे.

( मुसलमानाशीं लढतां लढतां मरून पडतो. )





# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग पंचविसावा.

### कानउघाडणी.

**कथाभाग**—नानासाहेबांच्या मृत्यूनंतर पेशवापदावर आलेला त्यांचा पुत्र माधवराव याच्यासारखा तेजस्वी, थोर मनाचा, शहाणा व न्यायप्रिय असा पुरुष क्वचित्‌च झाला असेल. माधवराव अल्पवयी असल्यामुळें त्याच्या हातून एखादे वेळीं चूक होत असे; पण अशा वेळीं न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारखीं माणसें निर्भीडपणानें त्यांची चूक दाखवून त्यांची कानउघाडणी करीत. माधवराव अशा पुरुषांचा किती मान राखीत व त्यांच्या हितोपदेशाप्रमाणें वागण्यास कसे तत्पर असत हें या प्रसंगावरून दिसून येईल.

# कानउघाडणी.

## पात्रें.

**स्थळ**—शनिवारचा वाडा.

( श्रीमंत माधवराव व रामशास्त्री प्रवेश करतात. )

**माधव०**—यावें शास्त्रीबोवा. ठीक आलांत. आपली स्वारी प्रातःकाळीं आली होती म्हणून कळलें; पण मी बसलों होतों जप करीत, त्यामुळें गांठ घेतां आली नाहीं. म्हटलें, ब्राह्मणजन्म सुदैवानें लाभला आहे त्याअर्थीं त्यासारखें कांहीं जन्माचें सार्थक केलें पाहिजे.

**राम०**—अलबत. ब्राह्मणांचें तें कर्तव्यच आहे. मीही आतां त्याच विचारानें आलों आहें.

**माधव०**—म्हणजे ?

**राम०**—दुसरें कांहीं नाहीं. आपल्याप्रमाणें मलाही वाटतें कीं, ब्राह्मणकुळांत जन्म घेतल्यासारखें देहाचें कांहीं सार्थक करावें. सर्व त्रिभुवनांत व्यापून उरणारा, सर्वदा आनंदस्वरूपी असा असतां अहंकार–मोहादि कारणांमुळें जो परमात्मा बद्ध झाला आहे त्याच्या मुक्तीची इच्छा वाईट कोण म्हणेल ? येणेंकरून जीवात्म्याचें कल्याणच होईल. आपलें उदाहरण पाहून माझ्या मनांत आज आलें कीं, आपणही असें कांहीं साधन करावें; पण तें करावयाचें म्हणजे हे ऐहिक मायापाश तोडून, सर्वसंगत्याग करून, काशीसारख्या एखाद्या क्षेत्राचे ठायीं सावधानचित्तानें अधिष्ठित झालें पाहिजे. अतएव काशीक्षेत्राला जाण्याची योजना करून

आपली आज्ञा घेण्यासाठीं आलों आहें. आपलीही तशीच इच्छा आहे; त्याअर्थी विनंति करतों कीं, आपणही प्रस्थान ठेवून मजबरोबर निघण्याची तयारी करावी. काशी म्हणजे प्रतिकैलास आहे. तेथें जान्हवीच्या पवित्र उदकाचें त्रिकाल स्नान करून जपजाप्य, योगसाधन, आणि भगवंताच्या मंगल नामाचें स्तवन हीं करण्यांत आपण दोघेहि कालक्षेप करूं.

**माधव०**—आपला भाव माझ्या ध्यानांत पुरा आला नाहीं; पण मी सकाळीं जपजाप्य करीत बसलों होतों यावर आपल्या भाषणाचा रोंख दिसतो. खरें ना ?

**राम०**—माझ्या बोलण्यांतला भाव इतकाच कीं, आत्मस्वरूप ओळखण्याची आपणास इच्छा झाली आहे ही फार चांगली गोष्ट आहे. ती येथें राहून साधतां यावयाची नाहीं, यासाठीं आपण मजबरोबर काशीस चलावें. मलाही योगमार्गाची थोडीशी माहिती आहे, तेव्हां त्या मार्गात आपला प्रवेश मला करून देतां येईल.

**माधव०**—आतां पुरता उमजलों. मीं मघाशीं म्हटलें तेंच. शास्त्रीबोवा, आपण योग्य पुरुष आहां. आपली निःस्पृहता पाहून माझें पूर्ण समाधान झालें. आतां आपलें वास्तविक म्हणणें कळवा.

**राम०**—श्रीमंतांचा......

**माधव०**—मघांची थट्टा नको. आपला भाव स्पष्टपणें सांगा. मी उपदेशाला पात्र आहें.

**राम०**( हंसून )—श्रीमंतांची थट्टा करण्याची माझी योग्यता नाहीं. आपण विशेष आग्रह करतां तेव्हां माझा भावार्थ स्पष्टच

सांगतों, आपण मध्यान्ह कालपर्यंत नाक धरून असे जप करीत बसलां तर प्रजेचें पालन कसें होईल ? मुख्यांनीं कारभार पाहणें सोडलें म्हणजे हाताखालचे कामगार अर्थातच आळशी होतात. असें झालें म्हणजे गरीबगुरीबांची दाद कशानें लागते ? आपण जपजाप्य करीत दोनप्रहर पावेतों बसणार असें जेव्हां ऐकलें, तेव्हां तो जप सर्व अनिष्टांचें मूळ असा मला भासला. आपण जन्मतः ब्राह्मण खरे, पण व्यवसाय उचलला आहे क्षत्रियांचा. आतां आपला मुख्य धर्म जपतपादि साधन हा नव्हे, प्रजापालन हा आहे. तें धर्मसाधन सशास्त्र हातून झालें तर त्यांतच आपणास मुक्ति आहे. आपण प्रजेचें संकट दूर करून तिचें रक्षण करावें, आणि तिनें आपणासाठीं परमेश्वरापाशीं आपलें कल्याण चिंतावें, असा परस्पर संबंध ध्यानांत धरून कर्तव्यास उद्युक्त झालें पाहिजे. भगवंतांनीं गीतेंत अर्जुनाला जो उपदेश केला तो हाच. मी आपल्या पदरचें कांहीं सांगत नाहीं. हवें असल्यास शास्त्रार्थ काढून दाखवितों.

**माधव०**—मला आपणापुढें शास्त्राधारांची मातब्बरी मुळींच वाटत नाहीं. आपणच मूर्तिमंत शास्त्राधार आहां. शास्त्रीबुवा, आज आपले माझ्यावर मोठे उपकार झाले आहेत. आपण माझ्या डोळ्यांत खरें ज्ञानांजन घातलें. मला संकटाच्या मार्गांतून काढून सरळ रस्त्याला लाविलें. श्रीमंतांच्या जवळ तोंडापुरतें गोड बोलून होस हो लावणारीं आणि बुडत्याला अधिक खोल पाण्यांत बुडविणारीं अशींच माणसें बहुधा असतात. आपल्यासारखा निःस्पृह, सत्यवक्ता, हितोपदेश करणारा मनुष्य मिळण्यास भाग्यच पाहिजे. आपण आज माझी ही कानउघाडणी केली नसती तर ब्रह्मकर्म करणें हेंच आपलें कर्तव्य समजून खऱ्या कर्तव्याकडे माझें दुर्लक्ष झालें असतें. प्रजापालनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या कारभाऱ्याचा लोकांनाहि

लवकरच कंटाळा आला असता, आणि एकदंर कारभारांत ढिलेपणा येऊन कामाची घडी विघडली असती. आपल्या या निस्पृहतेच्या भाषणानें माझ्यावरचेंच नाहीं तर एकंदर राज्यावरचें संकट टाळलें असें मी समजतों. माझ्या हातून चूक घडत होती. आतां माझे डोळे उघडले. हे सगळे आपले उपकार आहेत.

**राम०**—माझ्या बोलण्याचा श्रीमंतांला राग आला नाहीं यावरूनच लोक आपल्या स्वभावाची तारीफ करतील. माझें काम झालें. आतां मला आज्ञा असावी.

**माधव०**—आपणांस सवड असेल तर मला आपलेपाशीं आणखी कांहीं गोष्टी बोलावयाच्या आहेत. आपल्या बोलण्याचा राग मला कधीं येणार नाहीं. आपल्यासारखीं निस्पृह माणसें भलतें सलतें सांगणार नाहींत व ऐकूनही घेणार नाहींत ही माझी पूर्ण खात्री आहे. म्हणूनच आपणास मी विचारतों कीं लोकांना सुखावह होतील अशा गोष्टी करून राज्यकारभाराची इमारत प्रजेच्या संतोष-वृत्तीच्या भक्कम पायावर उभारावी असें वारंवार मनांत येतें. तर याविषयीं आपली सल्ला काय आहे ती ऐकण्याची इच्छा आहे.

**राम०**—आपल्या मनांत अशी सदिच्छा प्रादुर्भूत झाली हाच या राज्याला शुभ शकून म्हटला पाहिजे. प्रजापालकांचा हा धर्मच आहे कीं त्यांनीं सदैव लोककल्याण कसें साधतां येईल याचा विचार करून दक्षतेचे उपाय योजावे. आम्हांकडून राजधर्माचें अध्ययन करवींत असतां आमचे पूज्यपाद आचार्य वारंवार म्हणत असत कीं प्रजेस सौख्य व्हावें एतद्विषयीं जो दक्ष असतो तो राजलक्ष्मीपासून आपण स्वत: किंचितहि शोभा न पावतां उलटी तिलाच शोभा आणितो. राज्यकारभाराच्या सुधारणेसंबंधानें मलाही कांहीं थोड्या सूचना कराव-

याच्या होत्या. त्या करण्यास आपण ही आयतीच संधी दिली आहे. लोकोपयोगी गोष्टींत दोन तऱ्हा पाळिल्या पाहिजेत. प्रथम, सांप्रत जी अव्यवस्था असेल ती समूळ उपटून टाकिली पाहिजे. नंतर दुसऱ्या नव्या उपयुक्त व्यवस्था केल्या पाहिजेत.

**माधव०**—आपण हें ठीक सांगितलें. पण असें मोघम नको. अमक्या अमक्या गोष्टी करायला नकोत किंवा हव्या तें स्पष्टपणें सांगावें.

**राम०**—रयतेच्या कल्याणाविषयीं इतकी कळकळ बाळगणारे आणि आश्रितांशीं इतक्या नम्रतेनें वागणारे उच्चपदाधिष्ठित पुरुष थोडेच असतील. असो; मला न्यायाच्या कामाची विशेष माहिती आहे, म्हणून आपण प्रथम तीच गोष्ट घेऊं. धर्मशास्त्राप्रमाणें न्याय देण्याचें काम तर चाललेंच आहे. पण कित्येक खटले असे येतात कीं त्यांचे निर्णयार्थ व्यवहारतत्त्वाचा व अवांतर विचारहि करावा लागतो. यासाठीं अशा खटल्यांच्या निर्णयाचें काम गांवोगांवीं पंचायती नेमून त्यांचेकडे सोंपविल्यानें प्रजेला लवकर आणि यथान्यवहार न्याय्य मिळेल. दुसरी गोष्ट अशी कीं, पानपतच्या लढाईत आपला पराभव झाल्यापासून आपल्या राज्यांत राहणाऱ्या मुसलमान प्रजेस कित्येक कामगार त्रास देतात, याविषयीं बंदोबस्त झाला पाहिजे. इराणी, दुराणी, अफगाण वगैरे त्यांचे जातभाई जरी आपणाशीं दुष्मन् होऊन लढत होते, तरी आपल्या राज्यांत राहणाऱ्या मुसलमानांनीं इमान सोडलें नाहीं आणि मराठी राज्याविरुद्ध बोटसुद्धां उचललें नाहीं. शांत समुद्रांत बळकट नांगरलेल्या गलबताप्रमाणें वादळाचे वेळींही त्यांचीं मनें शांतच राहिलीं. कित्येक तर आपल्या बाजूनें स्वजनांशीं लढले. अशांचा या राज्यांत छळ होणें अगदीं इष्ट नाहीं.

**माधव०** —पानपत ! पानपत ! ( उसासा टाकून ) होऊन गेली गोष्ट; आतां काय तिचें ? शास्त्रीबुवा, आतांपर्यंत या गोष्टीची गंधवार्ताही माझ्या कानीं आली नव्हती. आपली प्रजा म्हणजे आपलीं लेंकरें; मग त्यांची जात, धर्म, आचार, भाषा हे भेद पाहावयाचे नाहींत. सर्वांना सारख्या दृष्टीनें पाहावयाचें. त्यांपैकीं एखाद्या वर्गाला कोणी इजा दिली तर ती माझी मानखंडना असें मी समजतों, या गोष्टीचा बंदोबस्त मी आत्तांच्या आतां आज्ञापत्र लिहून करणार आहें. त्यावांचून मला चैन पडावयाचें नाहीं. महार, मांग, धेड, चांभार, मुसलमान, कोणीही असोत. ते जोंपर्यंत आपापल्या धर्मानें चालत आहेत व या राज्याच्या प्रभूशीं-श्रीशिवाजी छत्रपति महाराजांच्या गादीशीं—नेकीनें व इमानदारीनें वागत आहेत, तोंपयत न्यायाच्या दृष्टीनें त्यांची योग्यता निःसंशय वर्णगुरु ब्राह्मणांच्या बरोबरीनें आहे, आणि आमच्या कारभाराचें सुख भोगण्यास सर्वांच्या बरोबरीनें त्यांनाही हक्क आहे ही गोष्ट आज्ञापत्राच्या द्वारें आणि दौंडी पिटवून सर्वांना जाहिर करवितों. आणखी काय म्हणणें आहे ?

**राम०**—आणखी म्हटली म्हणजे सांगण्यासारखी एक गोष्ट आहे. गरीबांस अधिकारी लोक वेठीस धरतात—

**माधव०**—पण वेठीस धरण्याची सक्त मनाई मीं यापूर्वींच केली आहे.

**राम०**—आपण तोंडी आज्ञा केली असेल; पण ती लेखी व्हावयास पाहिजे. त्याशिवाय कामगार लोक ऐकायचे नाहींत. कालच वसई महालांतून कांहीं लोक तेथील सुभेदार विसाजीपंत

अण्णा यांनीं हुकुमाविरुद्ध आचरण केल्याबद्दल अर्ज घेऊन आले आहेत.

**माधव०**—काय ! विसाजीपंतानें माझ्या हुकुमाची अमान्यता करून बेगारी धरले ? केवढा हा त्यांचा उन्मत्तपणा ! शास्त्रीबुवा, आपण उद्यां प्रथम परवाने तयार करून मोर्तबास पाठवा, मग दुसरें काम. त्या परवान्यांत साफ लिहावें कीं जबरीनें बिगारी धरल्यास फार मोठी सजा दिली जाईल. विसाजीपंतानें बिगाऱ्यांकडून जें सामान नेवविलें त्याची जप्ती करून लिलांव करून टाका. जो पैसा येईल त्यांतून बिगाऱ्यांची वाजवी दस्तुरी देऊन शिवाय त्या गरिबांस नुकसानीबद्दल योग्य बक्षिसें द्या. बाकी उरेल तें तूर्त अमानत खात्यांत पडूं द्या. विसाजीपंताला तर कामांतून तहकूब करा. असे दुष्ट व उन्मत्त लोक चाकरींत ठेवून उपयोग नाहीं.

**राम०**—पंताला एक वेळ क्षमा करावी.

**माधव०**—नाहीं; शास्त्रीबुवा, आपला शब्द मोडल्याबद्दल मला आपण क्षमा करावी. पण या कामांत आपलाही शब्द मोडणें भाग आहे. योग्य आज्ञा मोडणें म्हणजे केवढी जोखिमीची आहे हें विसाजीपंताला व सर्वांना कळलें पाहिजे.

( घड्याळावरील माणूस येतो )

**घड्याळजी**—तेरा घटका रात्र संपून चौदावी घटका सुरू आहे सरकार.

**राम०**—श्रीमंतांस मी फार वेळ खोळंबविलें. आतां आज्ञा असावी.

**माधव०**—वेळ झाला खरा, पण बरींच महत्वाचीं कामें उरकलीं.

( जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग सविसावा.

### पेशवाईवर वज्राघात.

**कथाभाग**—राघोबादादा व आनंदीबाई यांचा पुत्र बाजीराव हें मोठें गुणी बाळ होतें. त्यांची संगत सवाई माधवराव पेशव्याला लागूं नये म्हणून नाना फडणिसांनीं कडेकोट बंदोबस्त ठेविला होता. तथापि रावबाजीनें बळवंतराव नागनाथ नांवाच्या एका माणसाच्या द्वारें सवाई माधवरावाशीं पत्रव्यवहार ठेवून नानांच्यासंबंधानें माधवरावाचें मन कलुषित करून ठेविलें व तुम्ही वास्तविक राज्याचे मालक असतां नानाच्या कैदेंत तुम्हांस राहावें लागत आहे अशी त्याची समजूत करून दिली. त्यामुळें माधवरावाच्या मनाला ती गोष्ट लागून राहिली व तींतून सुटका होण्याचा दुसरा कांहीं उपाय न दिसल्यामुळें त्यांनीं आपल्या वाड्यांत गच्चीवरून खालीं कारंजावर

उडी टाकून आत्महत्त्या केली अशी गोष्ट सांगतात. कित्येक असेंही म्हणतात कीं माधवरावानें आपण होऊन उडी टाकली नाहीं; तर त्या वेळीं त्यांना ताप येत होता व त्या तापांत गच्चीवर बसल्यामुळें वात होऊन उठत असतां वायूच्या झटक्यांत त्यांच्या अंगाचा तोल जाऊन ते खालीं कारंजावर पडले. दोन्ही प्रकारच्या गोष्टी त्या वेळीं पुण्यांत प्रचलित होत्या. ह्या गोष्टी व त्या काळीं पुण्यांतल्या ब्राह्मणवर्गाची किती हीन स्थिति होती तिचें वर्णन या प्रसंगांत केलेलें आढळेल.

---

# पेशवाईवर वज्राघात.

## प्रवेश पहिला.

### पात्रें.

**माधवराव**—श्रीमंत सवाई माधवराव पेशवे.

**नाना**—नाना फडणवीस.

**स्थळ**—शनिवारवाड्यांतला गणेशमहाल.

( माधवराव एकटेच विचारांत गर्क असे बसले आहेत. )

**माधव०**—(स्वतःशीं) मी कोण ! आणि कशासाठीं जन्माला आलों आहें ! या दोन गोष्टींचा विचार करतां करतां हें डोकें तापून गेलें, पण अजून कांहीं उलगडा होत नाहीं. मी या पेशवेपदाचा मालक ! छेः ! तसें असतें तर प्रत्यक्ष माझे चुलते बाबासाहेब यांच्याशीं मीं पत्रव्यवहार करूं नये, त्यांच्याकडल्या माणसाची भेट घेऊं नये, वगैरे सक्त नियम मला कां पाळावे लागले असते ? आणि नागनाथानें मला बाबासाहेबांकडून पत्र व ताईत आणून दिल्याबद्दल त्या विचाऱ्याला राजद्रोही ठरविण्यांत यऊन कैदेंत कां राहावें लागतें ? त्याच्यासाठीं मीं मध्यस्थी केली असतां माझ्या शब्दाला माझ्या राज्यांत मान मिळूं नये यासारखी अपमानास्पद गोष्ट दुसरी कोणती असेल ? माझा असा अपमान करणारे तरी कोण ? तर आमचेच कारभारी ! तेव्हां मी इथला मालक आहें असें समजणें हा केवढा भ्रम आहे ! वेड्या माधवा ! तूं पेशवा नाहींस, या गादीचा मालक नाहींस, तूं एका यःकश्चित् खरडेघाश्या कारकुनाच्या हातांतलें कळसूत्री बाहुलें—त्याचा गुलाम—कैदी म्हण

पाहिजे तर–आहेस. येथें पाहिला प्रश्न तर सुटला. पण तूं जन्माला कशासाठीं आलास ? तुझ्या वाडवडिलांनीं मिळविलेला नांवलौकिक वाढविण्याला, निदान कायम राखण्याला, कीं स्वतःच्याच नोकराच्या हातांत बंदिवान होऊन तो नांवलौकिक घालविण्याला आणि वाडवडिलांच्या तोंडाला काळिमा लावण्याला ? ते पहा माझे वडील, आजोबा, पणजोबा, सगळे कसे रागीट व तिरस्काराच्या मुद्रेनें माझ्याकडे पाहत आहेत ! त्यांच्याकडे वर मान करून पाहण्याची सुद्धां मला शरम वाटते. बाबा, आजोबा, पणजोबा ! नका हो, या अनाथ लेंकरावर असे रुष्ट होऊं नका. मी तुमच्या रोषास नव्हे तर तुमच्या करुणेस पात्र आहें. काय म्हणतां ? असल्या मेषपात्र संतानापेक्षां निःसंतान बरें ? ठीक आहे. तुमचे हे शब्द मी पुरतेपणीं लक्षांत ठेवूनच यापुढें वागेन. मग तर तुमचा संतोष होईल ना ? ( पुनः विचार करून ) पण मला काय करतां येणार आहे ? माझ्या हातीं काडीइतका तरी स्वतंत्र अधिकार कोठें आहे ? अशा स्थितींत मीं काय करावें हें मी कोणाला विचारूं ?

( इतक्यांत नाना फडणवीस येतात. )

**नाना०**—( हात जोडून ) श्रीमंतांची काय आज्ञा आहे ?

**माधव०**—( मोठ्यानें हंसून )—आज्ञा ! ( पुनः हंसतो. ) काय चमत्कार आहे पहा ! माणसाचा काळ फिरला म्हणजे त्याबरोबर शब्दांचेहि अर्थ फिरतात, आणि ते स्वतः निर्जीव असतांहि सजीव माणसांची थट्टा करूं लागतात ! कारभारी साहेब, आज्ञा कसलीन् कोणाची व कुणाला ? कोणीं ती करायची अन् कोणीं पाळायची याबद्दलचा सर्व ब्रह्मघोंटाळा अलीकडे झाला आहे. जी पाळली जाईल तीच आज्ञा, आणि ती करणारा मालक; न

पाळली जाइल ती प्रार्थना, अर्ज, विनवणी आणि ती करणारा बंदिवान! असा कांहीं जगाचा विचित्र प्रकार झाला आहे.

**नाना०**—समजलों. परवां जगन्नाथाला फितुराबद्दल कडक शिक्षा केली त्या गोष्टीवर श्रीमंतांच्या भाषणाचा रोख दिसतो. श्रीमंतांना राग येण्यासारखें तें कृत्य माझ्या हातून घडलें, त्याबद्दल क्षमा असावी. श्रीमंतांनीं त्या हरामखोरासाठीं शब्द टाकिला, आणि मला तो मोडावा लागला, याबद्दल मला फार दुःख होतें. पण काय करूं! श्रीमंतांची मर्जी सांभाळायला जाईन तर आजपर्यंत वाडवडिलांनीं अत्यंत परिश्रमानें वाढविलेल्या मराठी राज्यरूप वृक्षाच्या मुळाशीं अशा फितुरी लोकांच्या खटपटीनें कीड लागून तो केव्हां उमळून पडेल त्याचा नेम नाहीं, हा विचार माझ्यापुढें सदोदित उभा आहे. श्रीमंत सुज्ञ आहेत, विचारी आहेत. त्यांना सगळी स्थिति समजून सांगितली, अन् पूर्वीचा कुलवृत्तांत निवेदन केला, दुष्ट लोकांनीं याच वाड्यांत कारस्थानें करून आपल्या वडिलांचा कसा नाहक बळी घेतला, आणि याच कैदाशिणी आनंदीबाईचे पुत्र आपल्याशीं सलगी करून मूर्ख लोकांच्या नादीं लागून, आपल्या हातून या राज्याचा नाश झालेला पाहण्यासाठीं कसे टपून बसले आहेत हें आपल्या गळीं उतरवून दिलें, म्हणजे आपला राग शांत होईल असा भरंवसा धरून मीं तें धाडस केलें. पेशव्यांच्या गादीसाठीं आणि मराठी राज्याच्या रक्षणासाठीं स्वतःच्या हिताकडे, लौकिकाकडे किंवा प्राणाकडेहि न पाहतां जें योग्य दिसेल तें रावयास हा नाना कधीं चुकणार नाहीं. गादीची एकनिष्ठपणें सेवा करणें हाच माझा धर्म, हीच माझी तपश्चर्या, आणि हाच माझा पुरुार्थ आहे. हेंच व्रत आतांपर्यंत मीं चालविलें. आतां म्हातारपणीं त्या व्रतापासून ढळून स्वतःला व वाडवडिलांना रौरवनरकांत घाल-

ण्याची दुर्बुद्धि परमेश्वर मला कधीं न देवो. राज्यकारभाराचें जूं श्रीमंतांनीं घेतलें म्हणजे मात्र मी मोकळा होईन. तोंपर्यंत कोणा-च्याहि रागलोभाची पर्वा न करतां राज्याचें हित मला पाहिलें पाहिजे. ज्यास्तकमी बोलल्याबद्दल क्षमा असावी.

**माधव०**—माझें डोकें दुखूं लागलें आहे. मला घटकाभर निवांतपणा मिळाला तर बरें होईल.

**नाना०**—ठीक आहे. हा मी रजा घेतों. ( जातों. )

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—भांग्या मारुतीजवळचा अड्डा.

( बचंभट, अन्नंभट, कृष्णंभट वगैरे ब्राह्मण मंडळी चकाट्या पिटीत बसली आहे. )

**कृष्णं०**—काय अन्नंभट ? चंगळ आहे ना ?

**अन्नं०**—अरे, चंगळ म्हणून काय विचारतोस ? कोणाचें दुखणें आणि कोणाचा भाग्योदय ! देवाची करणी अगाध आहे म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. नाहीं तर हा बचंभट, याला संध्येंतलीं चोवीस नांवें म्हणतां येईनात, याला कोण विचारतो ? पण दैवयोग कांहीं विचित्र खरा ! अनुष्ठानाला बसलेल्या पढिक वैदिक ब्राह्मणांच्या यादींत नांव पडून रोज चार मोहोरा कनवटीला लाविल्याशिवाय बहादर घरीं येत नाहीं.

**कृष्णं०**—पण तूं हें संधान कसें रे जुळविलेंस ?

**बचं०**—तेवढें मात्र विचारूं नकोस. स्वतःचें बिंग कधीं कोणी सांगत असतो का ? पण मी तुम्हांला म्हणून सांगतों. तुम्ही कोणत्याहि भावानें देवावर गंध पुष्पें वहा, देव आपला प्रसन्न होतो. मग धर्माधिकारी तर काय मनुष्यच !

**अन्नं०**—आमच्यापासून लपवून कशाला ठेवतोस ? धर्माधिकाऱ्याच्या घरच्या स्वैंपाकीणबाईच्या शिफारशीचा हा प्रताप असें स्पष्ट सांगेनास ?

**बचं०**—बरें बुवा, तसें कां होईना ?

**कृष्णं०**—काय रे बचंभट, मग आमची तशी सोय लावून देईनास ?

**बचं०**—नाहीं कोणत्या लेकानें म्हटलें आहे ? तुझीच काय ? पण मुंज न झालेल्या तुझ्या मुलाचें, फार काय, पण एखाद्या मोलकरणीच्या मुलाचें सुद्धां नांव अनुष्ठानाच्या यादींत घालतों पाहिजे तर. या दिवसांत ब्रह्मदेवानें हवें त्याला ब्राह्मण होण्याची मोकळीक ठेविली आहे. शिखा आणि सूत्र येवढीं असलीं कीं झाला वैदिक ब्राह्मण! अर्ध्या दक्षिणेवर पाणी सोडलें कीं झालें काम फत्ते !

**अन्नं०**—पण काय रे, अशा अनुष्ठानाचें फळ यजमानाला कसें मिळणार ?

**बचं०**—त्याच्याशीं आपल्याला काय करायचें आहे ? बारसें असो कीं बारावा असो, आपली दक्षणा ठेवलेली !

**कृष्णं०**—भले बहाद्दर ! अशा अनुष्ठानाचें फळ कसें मिळतें तें दिसतेंच आहे. श्रीमंतांच्या नाकाशीं अगदीं सूत धरलें आहे म्हणतात ! खरें काय ?

**बचं०**—आजचा दिवस पार पडणें कठीणच आहे. राजवैद्य, मांत्रिक, पंचाक्षरी श्रीमंतांच्या उशाशीं अगदीं बसून आहेत.

( आक्रोश ऐकूं येतो. )

हें पहा ! श्रीमंतांचें अवतारकृत्य आटोपलें वाटतें ! हो. असेंच. हे पहा घोडेस्वार चोहींकडे बातमी देण्यासाठीं दौडत चालले आहेत.

**अन्नं०**—अरेरे ! मोठा घात झाला ! ब्राह्मणांचा पोशिंदा गेला ! गोब्राह्मणांना आतां आधार राहिला नाहीं !

**कृष्णं०**—खरें पुसशील कीं नाहीं, तर हे मराठे लोक ब्राह्मणांच्या नांवानें खडे फोडीत असतात तें एका अर्थी खरें असें मला वाटूं लागलें आहे. नानांच्या जाचामुळें त्रासून त्या त्रासांतून सुटण्यासाठीं श्रीमंतांनीं कारंजावर उडी टाकली, अर्थात् त्याबद्दलचें पाप ब्राह्मणांच्या–नानांच्या–डोक्यावर आहे.

**बच्चं०**—छट् ! भलतेंच एखादें ! दुसरे तिसरे काय म्हणत असतील तें म्हणोत ! लोकांच्या तोंडाला कोणाला हात लावतां येणार आहे ! पण श्रीमंतांच्या अगदीं जवळचीं माणसें उडी टाकली असें कांहीं म्हणत नाहींत. उडी टाकली हें अगदीं खोटें ! अगदीं बनावट गोष्ट !

**कृष्णं०**—मग काय म्हणतात ? खरें काय आहे ?

**बच्चं०**—खरी गोष्ट अशी आहे कीं, श्रीमंत अंगांत ताप असतांना उघड्या हवेंत आपल्या आजी–साठीणबाई–यांच्याजवळ बसले होते. अन् तेथें त्यांना वायूचा झटका येऊन ते उभे राहिले. तों अशक्तपणामुळें तोल जाऊन खालीं पडले.

**कृष्णं०**—तुम्ही ब्राह्मणमंडळी नानाचा पक्ष घेऊन असेंच म्हणावयाची.

**बच्चं०**—बरें बुवा, ब्राह्मण मंडळीचें राहो. तुकोजीराव होळकर तर ब्राह्मण नाहींतना ? ते सुद्धां असेंच म्हणतात असें माझ्या कानीं आलें आहे.

**अन्नं०**—असेल कदाचित्. तसेंहि असेल. पण हीं राजरहस्यें आपणाला हवींत कशाला ? आज श्रीमंतांच्या मृत्यनें पेशवाईवर मोठा वज्राघात केला यांत शंका नाहीं.

**बचं०**—आतां पुढें कठीण दिवस येणार आहेत.

**अन्नं०**—कठीण कसे ? मी तर म्हणतों कीं ब्राह्मणांना उलट चांगले दिवस येतील. आनंदीबाईचा पुत्र बाजीराव आतां पेशवा होईल. तो स्वतःच मुळीं भिक्षुकासारखा चांगला पढिक आहे, आणि भोक्ताहि पण तसाच आहे. त्याच्या हातून रोज ब्राह्मणभोजनाचा थाट उडेल ! मजा आहेन् काय !

**कृष्णं०**—वाः ! अन्नंभट, तुमचें अन्नंभट नांव अगदीं योग्य आहे ! तुमच्या खादाडपणावरून तुम्हांला हें नांव ठेविलें कीं नांव अन्नंभट म्हणून तुम्ही नांवाप्रमाणें कृति करतां तें ब्रह्मदेवालाच विचारलें पाहिजे.

**बचं०**—जाऊं द्या तो वाद. ही पहा लोकांची झुंडचीझुंड शनिवारवाड्याकडे जात आहे. आपणहि जाऊं चला तिकडे मौज पहायला. ( जातात. )

# नाट्यरूप भारतवर्ष.

## प्रसंग सत्ताविसावा.

### अधःपात !

**कथाभाग**-श्रीमंत सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर राघोबादादा व आनंदीबाई यांचा पुत्र बाजीराव पेशव्याच्या गादीवर बसला. राज्य करण्याला अवश्य लागणारे कोणतेहि गुण याच्या अंगीं नव्हते. हा गोडबोल्या होता इतकेंच; पण हलकट व पाजी लोकांच्या नादीं लागलेला, वरून स्नानसंध्या व टिळेमाळा करणारा, पण पोटांतून अत्यंत दुष्ट, कपटी व दुराचारी होता. त्यावेळीं पुण्याच्या दरबारांत शहाणा माणूस कोणीच न उरल्यामुळें हलकट लोकांचें प्रस्थ माजलें होतें. शेवटीं या गोष्टीचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. मराठी राज्याला पूर्वीपासून उतरती कळा लागलीच होती. तीच वाढत जात जात शेवटीं मराठेशाहीचा पूर्ण अधःपात झाला, आणि मराठ्यांचें राज्य नष्ट झालें. पुणें दरबारची या वेळची स्थिति पुढील प्रसंगांत वर्णिली आहे.

# अधःपात!

**स्थळः**-पुणें शहरांतला एक वाडा.

( कृष्णशास्त्री एकटेच विचारमग्न बसले आहेत. )

**कृष्ण०**—(स्वतःशीं ) कान आणि डोळे यांच्यांत चार बोटांचें अंतर असतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. पेशवे सरकारचा केवढा नांवलौकिक काशीपासून रामेश्वरापर्यंत गाजतो आहे! बाजीराव पेशव्यासारखा धर्मात्मा दुनियेंत नाहीं, खरी ब्राह्मणशाही पाहायची झाली तर पुण्यासच पाहावी, गोब्राह्मणांचा प्रतिपाळ बाजीराव पेशव्यांनींच करावा, हिंदुधर्माचा मूर्तिमंत अभिमान पेशव्यांच्याच ठायीं, खरा मुत्सद्दीपणा, खरें शहाणपण, खरें राजकार्णी चातुर्य पेशव्यांचेच दरबारीं दिसतें, असें आम्ही ऐकत होतों; व येथें आपल्या आर्यविद्येला राजाश्रय मिळेल म्हणून मोठ्या आशेनें येवढा लांबचा प्रवास करून आलों. पण येथें पहावें तर काय? सगळी अंधेरनगरी! जिकडे पहावें तिकडे अधर्म, अनाचार व अत्याचार यांचेंच साम्राज्य दिसत! ब्राह्मणाच्या राज्यांत पंढरपुरासारख्या क्षेत्राचे ठिकाणीं गंगाधरशास्त्रयासारख्या ब्राह्मणाचा खून व्हावा काय! शिव शिव! ही नुसती कल्पना सुद्धां कांटा आणणारी आहे! ही ब्रह्महत्त्या या ब्राह्मणराज्याचा सत्यानास केल्याशिवाय खचित राहणार नाहीं. इथला दरबार सगळा हरिदास, पाणक्ये, हुजरे आणि खुषमस्करे यांनीं भरलेला आहे, ' अबला यत्र प्रबला ' या वाक्याची सत्यता जर पहावयाची असेल तर ती इथें पाहण्यास मिळेल. कोठें श्रीमंत थोरले बाजीरावसाहेब, नानासाहेब, भाऊसाहेब, रावसाहेब यांच्यासारखीं नररत्नें, आणि

कोठें त्यांचे हे दिवटे वंशज ! कोठें नानाफडणिसांचें अटोकाट शहाणपण, आणि कोठें सदाशिव माणकेश्वर अन् त्रिंबकजी यांच्यासारख्या नीच वृत्तींच्या माणसांची खुषमस्करी वृत्ति ! कोठें रावसाहेबांची न्यायबुद्धि व प्रजावत्सलता आणि कोठें या ब्राह्मणाधम पेशव्याची विषयलंपटता आणि अंदाधुंदी कारभार ! विश्वेश्वरा! मला तुझे चरण सोडून या पापनगरीला येण्याची दुर्बुद्धि कां बरें दिलीस ? या ब्राह्मणराज्याच्या वैभवशालित्वाबद्दल व न्यायनीति, राज्यकार्यधुरंधरता, धर्मशीलता वगैरे गोष्टींबद्दल आम्ही काशीवासी पंडित भ्रमांत होतों तेच बरे होतों ! येथील एकंदर प्रकार पाहून माझ्या हृदयाला इंगळ्या लागल्यासारख्या वेदना होत आहेत. येथें धन, अब्रू, फार काय, पण प्राण सुद्धां निर्भय नाहींत. बाजीराव पेशव्याच्या दुष्कृत्यांचा घडा भरत आला असला पाहिजे, त्याशिवाय त्याला अशी दुर्बुद्धि कशी सुचणार ! परमेश्वरा ! या नरकवासांतून या प्रजेला सोडविशील तो भाग्याचा दिवस म्हटला पाहिजे. माझ्यासारख्या सत्त्वस्थ ब्राह्मणाला या राज्यांत पाण्याचा घोट घेण्याचें सुद्धां भय वाटतें. नको आतां इथें रहाणें. ( आकाशाकडे पाहून ) आतां दोन घटका रात्र राहिलीशी दिसते. प्रातर्विधि उरकून देवाचें नामस्मरण करावें, आणि गर्गाचार्यांच्या मुहूर्तावर धरावा काशीचा मार्ग झालें !

समाप्त.

हें पुस्तक ( पृष्ठ २०९ ते २७६ खेरीज करून )
गोपाळ बळवंत जोशी यांनीं पुणें येथें आपल्या
आनंद छापखान्यांत (२३३ अ सदाशिव पेठ )
छापिलीं.

व

पृष्ठ २०९ ते २७६ अनंत विनायक पटवर्धन यांनीं
पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापिलीं.